

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

**सूचना** :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

[कृ. मा. प.]



# प्रेरणा आणि निर्मिती




डॉ. एस्. एस्. भोसले

लोकवाङ्मय गृह, प्रा. लि.

मूल्य / २० रुपये

प्रथमावृत्ती / फेब्रुवारी १९७६

लोकवाङ्मय गृह. प्रा. लि.

---

प्रकाशक / एच. बी. घाणेकर, लोकवाङ्मय गृह, प्रा. लि.
१९० बी, खेतवाडी मेन रोड, मुंबई ४०० ००४.

मुद्रक / श्री. एस. ए. मोहिते, श्री. व्यंकटेश प्रिंटिंग प्रेस,
२४०२/६ ए, वरुणतीर्थ वेस, कोल्हापूर.


© डॉ. एस्. एस्. भोसले

---

मुखपृष्ठ / रचना / प्रकाश विश्वासराव

आमच्या 'वहिनी' व धाकटे मामा ह्यांना

— बाळ



गोणाईच्या भाषेत बोलायचे, तर विठाईमाऊलीच्या संगाने नामदेवानी स्वत:च्या संसाराची 'फजिती' करून घेतली. देवाचा अखंड शेजार साधून नामदेवानी पंढरीचा परिसर कीर्तनरंगी रंगविला आणि दूर पंजाबातील घुमानपर्यंतचा भाग 'बीठलु'च्या नामघोषाने दुमदुमून टाकला. या भावभक्तीने गाजविलेल्या, मंत्रविलेल्या कीर्तनरंगात नामदेवाना संसाराचे भान उरले नाही. लौकिकार्थाने नामदेवांच्या हाती संसाराचा भोपळा आला, अशी संसारात निमग्न होणाऱ्या सांसारिकांची समजूत झाल्यास नवल नाही.

त्यामुळेच विठाईमाउलीला 'तुझ्यासहित पंढरी मी गिळीन' अशी गोणाईने प्रच्छन्न धमकी देऊन सुद्धा नामदेव संसारसन्मुख झाले नाहीत. ते हसले नाहीत की विठाईमाउलीही डगमगली नाही. नामदेवानी स्वत:च्या संरक्षणाचा, संवर्धनाचा वसा स्वत: होऊन "विठाईमाउलीवर सोपविला आहे.नामदेवाशी केलेल्या संवादात गोणाई 'मी एक आहे तंव करीन तळमळ। मग तुझा सांभाळ करील कोण।।" असे तळमळत असतानाही नामदेव म्हणत: 'मज आदि अंतीं एकु। जननी आणि जनकु पांडुरंग।।" असे देवपिसे लागलेल्या, विठ्ठलनामाने झपाटलेल्या नामदेवानी लौकिकार्थाने संसार असा कधी केला नाही. त्यामुळे अशा संसारातील चढउतार, चवरव, रंगढंग ऊनपाऊस इत्यादी शतरंगी व्याधीउपाधींचा स्पर्श त्यांना कधी होऊ शकला नाही.

या देवपिसेपणापासून – भुताटलेपणापासून – नामदेवाना मागे खेचण्यासाठी

## एक नामदेवांचा संसार : एक एरंडाचे झाड

## २ : प्रेरणा आणि निर्मिती

कितीकांनी प्रयत्न केले म्हणून सांगावेत ? आईवडील, बायकोमुले, आप्तेष्ट–मित्र सारे सारे झटले. पण सारे प्रयत्न वाया गेले. लुळे पडले. विठाईमाउलीच्या भावभक्तीच्या बळाने पार जखडले गेलेले नामदेव तसूभर काही मागे सरकले नाहीत. नामदेवांचे देवपिसे पाहून त्यांची आई गोणाई तर पार वैतागून गेली. तिच्या अंतरंगाचा अगदी 'कहार' उसळला. विठाईमाउलीसकट सर्वांना तिने बोल लावला. नामदेवाना कडक शब्दात ती म्हणाली देखील, " नाम्या, तू हे देवपिसं सोड. हा देव घरघेणा आहे. त्याला भजतात ते आपल्या संसाराला मुकतात सर्वांचा तसा अनुभव आहे. स्वरूप दाखवून तद्रूप करणाऱ्या या विठ्ठलाचा संग बरा नव्हे. याच्या संगतीनं संसार भाजून निघतो आणि भिकेचा भोपळा हाती येतो. संसार जाळणारा आणि भिकेचा भोपळा हाती देणारा असाच हा देव आहे. तो मैंद, कपटी आहे. नाम्या, इतरांच्या मुलांसारखा तू मोठा होशील, सुखानं संसार करशील, अशी आस मी धरली होती; पण तू माझी घोर निराशा केलीस. देवा, तूही मला नामदेवासारखाच दिसतोस. आम्ही माणसं ती काय ? साधे अनाथ शिंपी ! काही शिवणंटिपणं करून पोट भरीत होतो. तेही तुला पाहवलं नाही. केवढं हे आमचं दुर्भाग्य ! आमचा संसार तू कुळासहित बुडविलास. तुला सर्वांगसुकुमार म्हणतात; पण तुझं हृदय तर अतिकठीण आहे. एरव्ही आम्हा दुर्बलांचा घात करून आमच्या घरादाराची वाताहत का करशील ? तुझं दर्शन म्हणजे जीवित्वाची हानी हेच खरं ! भले आपलं देवपण मला दाखवलंस ! देवा, आम्ही तुझीच पाळिलीपोशिली आहोत. तेव्हा हा नामा, सुखाचं हे निधान, मला परत करून मला जीवदान दे ; नाही तर मी आपला गळा तुझ्या चरणी विटेसहित बांधीन. देवा, माझ्या लेकरावर, या परधनावर तुझं मन का ? मी तर आपल्या देहाचा संकल्प करून, घरादारावर पाणी सोडून आले आहे. आता तुझ्या पायी जीव तरी देईन किंवा हा नामा तरी नेईन."[१] गोणाईच्या मनीच्या या व्यथेची कथा बनली, पण विठाईमाउली काही विरघळली नाही. नामदेव परिणामशून्यच राहिले.

खरे तर, नामदेवांच्या दृष्टीसमोर संसार 'शून्य' होता. नामदेवानी संसार त्याज्य मानला होता असे नव्हे. पण भोगभावनेने तो केला नाही हेही खरे ! वठाईमाउलीच्या भक्तीने त्यांचा संसार आपल्या पोटात घेतला होता.

---

१. साखरे श्री नानामहाराज : श्री सकल संत गाथा : 'नामदेवगाथा' : संपा : का अ. जोशी : ९८७. १०१७
तुळपुळे डॉ. शं. गो. : पाच संतकवी : १९६२, पृ. १४३

भावभक्तीच्या अर्चनेत सर्वस्वी सतेज असलेले नामदेव, संसाराच्या बाबतीत सर्वस्वी उदास होते. सर्वस्वाशी उदास असणाऱ्या नामदेवांचे उदासपण एकाच बाबतीत फिटले आणि ते म्हणजे विठाई माउलीच्या भक्तीच्या बाबतीत ! नामदेवानी विठाई माउलीच्या भावभक्तीचा, नामसंकीर्तनाचा संसार केला, तर विठाई माउलीने नामदेवासाठी अलौकिकाचा संसार मांडून दिला. साहजिकच लौकिक संसाराचे रूप जपावे, असे नामदेवाना कधी वाटले नाही; वाटलेच असेल तर ते फार क्वचितच ! त्या दृष्टीने नामदेव संसाराच्या संदर्भात 'कच्चे घट' च होते. आणखी एका विसोबा खेचरांची इथे गरज होती; पण त्याचा अभाव हीच कथा होती. दामाशेटी, गोणाई–लाडाईसारखी वडीलधारी मंडळी होती. पण नामदेवापर्यंत त्यांचा आवाज कधी पोचू शकला नाही. त्या सर्वांच्या कथेतील हे एक कारुण्य होते.

नामदेवाना विठाईमाउलीचा वेध लागला होता. गोणाई व विठ्ठल यांच्या संवादात नामदेवांच्या या संसारविषयक उदासीनतेचे केलेले प्रत्ययकारी वर्णन आपल्यापुढे काही भावस्पर्शी चित्रे उभी करते. गोणाई म्हणते :

बुडविली क्रिया बुडविलें कर्म । बुडविला धर्म पाहा येणें।।
तुझिया नामाचें लागलेंसे पिसें । असोनी न दिसे लोकाचारीं ।।
नेणों काय कळे तुवां वागविला । संबंधु तुटला मज नाम्याचा।।
बुडविला आचार बुडविला विचार । बुडविला संसार कुळासहित ।।
आपुलें पारिखें सर्वथा सारिखें । नेणों कवण्या सुखें वेडावला ।।
बुडविला मोहो बुडविली ममता । बुडविली अहंता मीतूंपण ।।
हा नेणे वेव्हार कां इंद्रियांचें सुख । अखंड याचें लक्ष तुझे पायीं ।।
बुडविली कल्पना समूळीं वासना । बुडविली सेवा त्रिविध कैसी ।।
हांसे नाचे प्रेमें फुंदतु डुल्लतु । अहर्निशीं गातु नाम तुझें ।। ९ ।।
असोनी नसता केला ये संसारीं । म्यां वाहिला उदरीं तैसा नाहीं ।।
गोणाई म्हणे देवा त्वां केली निरास । चालविलें उदास बाळ माझें ।।[२]

अशा उदास नामदेवानी भक्तीचा डांगोरा पिटून अहंतेचा खुंट वाढवला, परंतु संसारखुंट भस्म करून टाकला. संसाराच्या बाबतीत उदासीन असलेल्या नामदेवानी साऱ्यांचाच निरास केला. त्यामुळे त्या बाबतीत नामदेव अंती कोरेच राहिले. संसाराचा भ्रमु नामदेवाना कधी झाला नाही. त्यांनी जीवेभावे सर्वस्वे

---

२. कित्ता : १२८२, पृ. २१५

## ४ : प्रेरणा आणि निर्मिती

धरणे धरले होते ते विठाई माउलीपाशी ! नामदेवाना देव आपलासा करता आला; पण संसार कवटाळता आला नाही. विठाई माउलीने नामदेवाना कवेत घेतले, पण नामदेव संसाराला कव घालू शकले नाहीत. संसाराचा चरणस्पर्श भाळी ध्यावा, असे नामदेवांच्या ध्यानीमनी कधी आले नाही. नामदेवाना त्याची खंत नाही. किंबहुना विठाई माउलीच्या संसाराखेरीज अन्य वेगळा काही संसार असू शकतो ही दृष्टीच नाही. त्याबाबतचे सारे भानच हरपून गेले आहे. पंढरीचा पांडुरंग हा नामदेवांचा देव, त्याचे भजनपूजन ही त्यांची भक्ती, आपण त्याचे लडिवाळ बाळ आहो, हे त्यांचे समाधान व त्यांच्या चरणाशी विलीन व्हायचे, ही जीवनाची कृतार्थता. नामदेवांची अशी ही श्रद्धास्थाने होती. त्या श्रद्धेने नामदेवांच्या हाती लौकिक संसाराची नरोटी आली. तशी ती कुणी मुद्दाम हाती दिली असे नव्हे; पण ती सहजतेने येऊन स्थानापन्न झाली. परिणाम असा की, शिंपियाच्या कुळी जन्म घेतलेल्या नामदेवांचा जीव 'सदाशिवी' गुंतून पडला. जीवनाची धन्यता त्यातच सामावली, आकारली. नामदेव स्वतःच सांगतात:

> शिंपियाच्या कुळीं जन्म मज जाला । परि हेतु गुंतला सदाशिवीं ।।
> रात्रीमाजी शिवीं दिवसामाजी शिवीं । आराणूक जीवीं नाहीं माझ्या ।।
> सुई आणि सातुळी, कात्री गज दोरा । मांडिला पसारा सदाशिवीं ।।
> नामा म्हणे शिवीं विठोवाचीं अंगी । त्याचेनि मी जगीं धन्य जालों ।। [३]

याचा अर्थ उघड आहे : विठाई माउलीने मांडलेल्या विश्वाच्या पसाऱ्यात नामदेवाना संसार भेटलेला आहे. अखिल विश्वाच्या संसारात वैयक्तिक जीवनाचा लहानुसा संसार त्यांनी मिटवून घेतला आहे. नामदेवानी संसाराचे चलनवलन तटस्थ डोळ्यांनी कदाचित पाहिले असेल; हृदयकमळात त्याचा ओसंगही स्पर्शून गेला असेल. पण निढळाशी निढळ मिळवून संसारासाठी ते कधी खपले; कष्टले असतील, हसले रडले असतील असे वाटत नाही. विठाई माउलीचे प्रेमपिसे लागले आणि सारी संसार-उपाधी सांडून गेली. 'विठ्ठल, विठ्ठल' हेच चिंतन झाले. 'मेघश्याम मूर्ती डोळस सावळी' अशा विठाई माउलीने नामदेवांचा सकळ देहभावच हरपून टाकला. भक्तीच्या संसारात लौकिक संसाराचा देह पार विरघळून गेला, वितळून राहिला. साहजिकच नामदेवाना दैहिक, ऐहिक किंवा कौटुंबिक संसारात रस वाटला नाही. ऐहिक संसाराच्या स्वरूपात मन पांगुळले नाही, की त्याच्या स्वरूपाने अभ्यंतर कोंदाटून गेले नाही. त्यामुळे नामदेवानी

---

३. कित्ता : श्री नामदेवचरित्र, 'कुलजन्मवृत्त' : अ. १२४, : पृ. २०९

संसार केला असला तरी त्यातील सहजसुखाने ते वेडे बनले नाहीत. ते सुख जोडले त्यांनी विठाई माउलीशी ! कुळासहित घर बुडवून त्यांनी ते जोडले. त्यात संसाराची धुळी झाली

नामदेवाना ' आत्मसुख ' मिळवायचे होते. त्यासाठी पंढरीच्या नामाचे बळकट भाव एकनिष्ठेने त्यांनी मुखी धरले होते. साहजिकच " इष्टमित्र बंधू सज्जन सोयरा । माझिया संसारा हाचि एक " ही त्याची संसारासंबंधीची भावना होती. "आसनीं शयनीं न विसंबे भोजनीं । घालीन मुरडोनीं हृदयामाजी ।।" अशा अनिवार श्रद्धेने नामदेवानी अलौकिकाचा संसार–विठाई माउलीचा संसार–उभा केला असला, तरी त्यांनी व्यावहारिक संसाराला मुरडच घातली होती. सृष्टी बुडाली तरी विठाई माउलीला सोडायचे नाही, असा नामदेवांचा मनाचा संकल्प होता. त्यामुळेच कदाचित असेही असेल की, व्यावहारिक संसाराच्या कर्दमात बुडून त्रिविध सेवा बुडवायची नाही, असा नामदेवांचा निश्चय झाला असेल ! काहीही असो, निसर्गक्रमाने नामदेवानी संसार थाटला असला, त्यांना तसा तो थाटवून दिला असला तरी खऱ्या अर्थाने तो उभा असा कधीच राहिला नाही. लग्नबंधनानंतर मुलाबाळांची वीण विणणे हा काही संसार नव्हे. त्यापलीकडे जाऊन या संसाराला वेगळा अर्थ असतो, त्याचे म्हणून एक दर्शन असते. या अर्थासाठी अपूर्व खस्ता खाव्या लागतात, खदखदा हसावे आणि ढसढसा रडावेही लागते! व्यावहारिक संसाराच्या बाबतीत नामदेवांच्याकडून याबाबत काही घडले नाही; घडणे अशक्यच होते. पण अलौकिक संसाराच्या संदर्भात नामदेवांच्याकडून सर्व काही घडले; कारण स्पष्ट आहे, ते हे की, अध्यात्मिक संसारात नामदेव जितके रमले, तितके व्यावहारिक संसारात रमले नाहीत. त्यांच्या मनाची मूस व देहाचा बंधच त्याउलट होता. साहजिकच 'रथस्य नाभी' प्रमाणे नामदेवांच्या जीवनाचा केंद्रबिंदू अध्यात्मिक संसार होता. इतर सर्व बाबतींतील देहभाव हिरावून घेण्याचे विश्ववेगळे नवल त्यामध्ये होते. या नवलाने अध्यात्मिक संसारात, नामदेवाना भेटलेल्या अंतरीच्या एकीने व्यावहारिक संसाराची सोय दूर राखली. या मानवी संसारातील भिन्नपणाचे रण नामदेवाना मानवणारे नव्हते. परिणामी नामदेवांचा घराचार उद्ध्वस्त झाला. नामदेव म्हणतात, "या देवासी भेटी जन्ममरण तुटी । मावळली गोष्टी संसाराची ।। " त्यामुळे नामदेवांच्या संसाराच्या बाबतीत त्यांच्या सग्यासोयऱ्यांच्या दृष्टीने सारे ओखटेच घडत गेले आहे.

अशा या ओखटचातून नामदेवाना वाचवावे, म्हणून कितीकांचा प्रयत्न आहे म्हणून सांगावे? आईवडिलांपासून तो सग्यासोयऱ्यांपर्यंत सारे ह्या रांगेत

आहेत. नामदेवाना लागारलेले विठाई माउलीचे भूत निघावे, असा साऱ्यांचा प्रयत्न आहे. नामदेवानी भक्तीचा डांगोरा पिटू नये, असे या मंडळींना चुकूनसुद्धा वाटत नाही. तशी एवढीही वासना त्यांच्या मनी नाही. पण नामदेवानी संसार सांभाळून हे सारे 'थेर' करावेत, अशी त्यांची वांच्छा आहे. पण ही वांच्छा असफल व्हावी अशी नियती आहे. खरे तर, नामदेव आणि त्यांची कुटुंबीय मंडळी यांच्यात नामदेवांचा संसार ही एकच गोष्ट विवाद्य आहे. तिच्यात संवाद साधला की वाद उरत नाही अशी अवस्था आहे; पण असा संवाद साधण्यासाठी कोण रस्सीखेच सुरु आहे, केवढी घालमेल उचंबळून राहिली आहे! यातूनच नामदेव काय, किंवा त्यांचे कुटुंबीय काय, यांच्या मानवी संसारासंबंधीच्या भूमिका स्पष्ट होतात. पैकी नामदेवांच्या कुटुंबीयांच्या प्रतिक्रिया या चारचौघांप्रमाणे आहेत, म्हणून त्यांचा विचार अप्रस्तुत आहे. मात्र नामदेवांच्या भूमिकेने एक वेगळे दर्शन देण्याचा अट्टाहास ठेवला आहे.

खरे तर, नामदेवानी संसारात राहूनही संसारासंबंधी 'अनासक्त योग' आरंभिला आहे. या योगाला विठाई माउलीच्या प्रेमाचे थोर अधिष्ठान आहे. 'निःसंगाशी संग' करताना आपण 'महिमेचा संसार' सांडून टाकत आहोत, याची नामदेवांच्या मनाला टोचणी नाही, खंती नाही. त्यांच्या मनाला आच आहे ती विठाई माउलीला शरणागत कसे व्हावयाचे त्याची. 'नामाका ठाकुर दीन दयाला' अशी नामदेवांच्या मनाची आर्त अवस्था आहे. नामदेवानी आपल्या हिंदी पदांतून 'ईश्वरमहिमा' आळविताना म्हटले आहे:

तू अगाध वैकुंठनाथा । तेरे चरनौ मेरा माथा ।।टेक।।
सखे भूत नाना वेषूं । जत्र जावूं तत्र तूंही देषू ।।
जलथल महीथल काष्ट पषाना । आगम निगम वेद पुराना ।।
मै मनीषा जनम निरबंध जवाला । नामाका ठाकुर दीन दयाला ।।[४]

याचा अर्थ हा की, हे "वैकुंठनाथा, तू अतर्क्य आहेस, तुझ्या चरणांवर माझं मस्तक असो. नाना वेषधारी भूतमात्रात, जेथे जावे तेथे, तुलाच पहावं. जली-स्थली, मही-स्थली, काष्ठी–पाषाणी, सर्व प्रकारच्या विद्येसहित, वेद आणि पुराणे या ठिकाणीही तू आहेस. ज्याला मनुष्यजन्म आहे तो निर्बंध आहे, नामदेवांचा देव दीनांचा दयाळू आहे."

---

४. श्री संत नामदेवांची सार्थ हिंदी पदे : संपा : ज. नी. झनकर, र. रा. भावकर, द. मो. पाटसकर : पृ. ८५, १२५

नामदेवांच्या सतत तापलेल्या चित्तावर, शिणलेल्या कायेवर विठाई माउली हा उतारा आहे. पुत्र-कलत्र सकळ हिताला च भजतात; दुःखाचे वाटेकरी कुणीच होत नाहीत. विठाई माउली मात्र होते; ती अंतर कधी देत नाही. व्यावहारिक संसारात पुत्र-कलत्र लाभाचिया लोभेच एकत्र येतात; पण विठाई माउली मात्र न सांगता सर्व काही जीवीचे जाणते. आपले मौनच केवळ जाणून घेते असे नव्हे, तर नामदेव म्हणतात, "शब्द माझा कानीं पडतां तत्क्षणीं। येतसे टाकोनी झेपावत" असेही घडते. नव्हे, तसेच घडते. त्यातून अभयदान मिळते. 'मायबाप सखा जिवलग सोइरा' भेटल्याचा आनंद लाभतो. नामदेवांच्या दृष्टीने हा आनंद ठीक असला तरी त्यांच्या कुटुंबीयांच्या दृष्टीने ही सारी केवळ जल्पना आहे. घराची सोय सांडून विठाई माउलीशी साधलेली जोडी तापदायक आहे. मायबापांना टाकून देवाचे केलेले ध्यान निष्कारण आहे. स्त्रीपुत्र, बंधुभगिनी, गणगोत, इष्टमित्र या सर्वांची सांडणी करून विठ्ठलमात्र जोडण्याची कल्पना व्यर्थ आहे. पण नामदेवाना विठाई माउलीखेरीज दुसरे निधानच नाही, हेही तेवढेच खरे आहे.

त्या दृष्टीने पाहता नामदेवाना संसाराचा प्रेमा असा मुळीच दिसत नाही. आईवडील, पत्नीमुले, बहीणभाऊ इत्यादी नाती ते मानतात; पण त्यांनाच सर्वस्व समजून चालण्यामध्ये सारे काही सामावले आहे, असे मात्र त्यांना वाटत नाही. नामदेवांच्या दृष्टीने या सर्वांचे स्थान विठाई माउलीच्या पायांशी आहे. या माउलीच्या भक्तीच्या आड कुणी येत असेल तर त्याला डावलण्याची त्यांची तयारीही आहे. नामदेवांचा विठाई माउलीच्या प्रेमाचा जिव्हाळा अलौकिक आहे, यात शंका नाही. नामदेव विठाई माउलीची केवळ पूजाअर्चाच करतात असे नव्हे तर, ते माउलीच्या चरणी पूर्ण मीनले आहेत. नामदेवाना मातेच्या स्तनपानाची जाणीव आहे, पित्याच्या कृपादृष्टीची ओळख आहे, पत्नीची व्यथा दिसते आहे, विसोबा खेचरांचे ऋण त्यांनी आपल्या मनी वागवले आहे, जनी दासीची सेवा मंजूर आहे; श्रीज्ञानेश्वरांच्या सहवासाने अंतःकरण उलून आले आहे – अशा एक का दोन, अनेक गोष्टींचा ठावठिकाणा त्यांच्या हृदयाच्या गाभ्यात जपला गला आहे. त्या काय किंवा इतर काय, कुठल्याच गोष्टीला अंतर देऊ नये, अशी नामदेवांच्या मनीची आस आहे. पण जे व्हावयाचे ते सारे विठाई माउलीच्या भक्तीच्या चौकटीत घडावे अशी शर्त आहे. "नामा झाला देव, देव झाला नामा" अशीच जिथे अवस्था, तिथे अशा शर्तीखेरीज दुसरी कोणती गोष्ट येऊ शकणार?

साहजिकच संसाराविषयी – म्हणजे संसार करीत नाही याविषयी–

नामदेवांच्या मनामध्ये खंत नाही, गाढ व्यथा किंवा वेदना नाहीत, विठाई माउलीच्या भक्तीच्या संसारात कुटुंब–संसार बसवला असल्यामुळे त्या संसाराला पडलेले कुलूप किंवा अर्गळा तोडावी–फोडावी, अशी नामदेवाना इच्छा नाही. हिंदी पदांत नामदेवानी त्रिलोचणेशी केलेल्या संसारविषयक संवादात आपली भूमिका ठळकपणे मांडली आहे. बुडबुड्याप्रमाणे असणाऱ्या जीवनाचा आनंद हरिगुण गाण्यातच आहे, अशा धारणेने नामदेव म्हणतात:

"अरे भोळ्या, संसार–मायाजाळाच्या पिंजऱ्यात पडशील तर तुला एका दिवसात तीन वेळा काळाची झडप येईल. द्रव्य, रूप आणि यौवन पाहून, अरे अडाण्या, गर्व काय करीत आहेस ? अरे, मातीचा कच्चा घट पाण्यानं भरला तरी त्याचा विनाश होताना वेळ लागत नाही. सर्वांनी सुग्रास भोजन केलं आणि नित्य नवा असा शृंगार केला तरी प्राण देहाची धूळ करून, दोराचा फास सोडून चालला. आईबाप, पुत्रलक्ष्मी आदी परिवार इतका संसार मिळवून, अडाण्या, तू एकटाच चाललास. तुझ्यामागं घरात ज्यांचं वास्तव्य आहे, ती तुझी आई, तुझ्यामागं एक वर्षभर रडेल, बहीण सहा महिने रडेल आणि पत्नी दहा दिवस रडेल रे ! नामदेव म्हणतात, त्रिलोचना ऐक, गोविंदाचं गुणगायन कर. कारण चार दिवसांचा पाहुणा ज्याप्रमाणं निघून जातो, बुडबुडा विलय पावतो, त्याप्रमाणे तुझं जिणं आहे."[५]

नामदेवांच्या या दृष्टीमुळेच आईवडिल, पत्नी व मुले यांनी संसाराकडे परतण्याची केलेली कोणतीच विनंती त्यांना मान्य नाही. किंबहुना घराचारासंबंधी त्यांच्या मनामध्ये उद्वेगच आढळतो. राजाई व नामदेव यांच्या संवादामध्ये "सर्वस्वें सांडोनी धरिला तुम्ही देव" असे जे राजाई म्हणते, त्या सर्वस्व सांडण्यामध्ये संसार आहे, हे स्पष्टच आहे. साहजिकच नामदेवांच्या जीवनामध्ये संसाराचा ठाव, त्याचा वेध, त्यातील सुखदु:खे–या आणि इतर अशा कुठल्याच गोष्टीला 'सत्यपण' नाही. टाळ–दिंडीचा घोष ब्रह्मांडी नेऊन पोचविण्यात नामदेव मग्न असल्यामुळे संसाराकडे त्यांची पाठ आहे. अदृष्टाची भूक असल्यामुळे प्रत्यक्षाला नामदेव विन्मुख झाले आहेत. नामदेव संसारात चतुर्भुज झाले असले, तरी प्रत्यक्षत: त्यांनी चतुर्भुजालाच वरले आहे; अगदी मनापासून वरले आहे. संसार दूर लोटला गेला आहे, दूर फेकला गेला आहे.

व्यावहारिक संसारात नामदेव सामान्य आहेत, पण त्याबाहेर ते असामान्य

---

५. कित्ता : 'त्रिलोचनाशी संसारविषयक संवाद' : पृ. १५६

आहेत. सर्वसामान्य चार जणांना संसार प्रिय असला तरी नामदेवाना विठाई माउली प्रियतर आहे. नामदेवांच्या अवतीभोवतीची माणसे सामान्यांच्या दृष्टीने संसार करतात, तर नामदेवानी असामान्यांच्या तळमळीने विश्वकुटुंबाचा संसार थाटला आहे. सामान्यांच्या कळा असामान्याला कळणे कठीण, तशाच असामान्याच्या वेदना सामान्यांना उमजणे त्याहूनही कर्मकठीण ! साहजिकच नामदेवांच्या कळा सामान्यांच्या कक्षेपलीकडे गेल्यास मुळीच नवल नाही. त्यामुळे आईवडील, पत्नीमुले इत्यादी मंडळींना नामदेव देवपिसे लागलेले वेडेपीर वाटतात, तर यापैकी किंवा इतर अनेकांच्या मनात उपजणारा उद्वेग नामदेवांच्या मनी मुळी ठसतच नाही. नामदेवानी आपल्या चित्तात विठ्ठल कसा वसला आहे याचे सुंदर वर्णन केले आहे. नामदेव म्हणतात :

" तू अशी आई आहेस की, मी देवळात जाताना मला जाणं वर्ज्य करतेस. माझं चित्त त्या चतुर्भुजावर रमलं असून मनात रामनाम वसलं आहे. आई ! मी सुकर्म सोडून जर काही कुकर्म करीत असेन, तर तू मला वर्ज्य करावंस. परंतु ज्यानं ही सृष्टी उत्पन्न केली आहे, तो आदिपुरुष मी सेविला आहे. " आई म्हणाली, " पुत्रा, ऐक. तू असा उद्वेग का करतोस बरं ? अरे, ज्यानं पृथ्वी उत्पन्न केली, त्याच्याकडं आपलं चित्त का लावतोस ? " "आईशिवाय बालकाची, चंद्राशिवाय रात्रीची किंवा दीपाविना मंदिराची जशी शोभा नसते, त्याप्रमाणे मी कृष्णाविना उणा आहे. कोणाच्या मनात काही असतं, कोणाला काही सुंदर प्रिय असतं, नामदेवाच्या चित्तात विठ्ठल वसला आहे. म्हणून तो असे हरिगुण गात आहे. "[६]

नामदेवांच्या मनामध्ये रुजलेल्या या भक्तीमागे त्यांच्या घराण्याची परंपरा आहेच; पण नामदेव त्या परंपरेचे प्राण आहेत.

जगी ज्ञानदीप पाजळू पाहणारे " नामदेव हे मराठी भाषेतील आद्य आत्मचरित्रकार होत. त्यांनी लिहिलेले आत्मचरित्र संपूर्ण नसले तरी त्यांच्या जीवनातील काही अत्यंत महत्त्वाच्या प्रसंगांवर प्रकाश पाडण्यास ते समर्थ आहे. " असे डॉ. तुळपुळे यांनी म्हटले आहे, ते यथार्थ वाटते.[७] या आत्मचरित्रामध्ये नामदेवांचे गृहजीवन, त्यांची सांसारिक ओढाताण, त्यांच्या भक्तीस होणारा कौटुंबिक विरोध, संसाराकडे निःसंगवृत्तीने पाहण्याची दृष्टी, व्यवहारी दृष्टीची

---

६. कित्ता : 'माता–संवाद', पद्य १२५ : पृ. १५८

७. तुळपुळे डॉ. शं. गो. : पाच संतकवी : १९६२, पृ. ४४२

अनभिज्ञता इत्यादी गोष्टींचे स्पष्ट चित्र मिळते. त्यातून नामदेवांच्या तलस्पर्शी गृहजीवनाचा सुरेख चित्रपटच दृष्टीसमोर येतो. मात्र या आत्मचरित्रात्मक अभंगांतून नामदेव भेटतात ते पारमार्थिक दृष्टीने अलौकिकात रमणारे. यामुळे घडले आहे ते असे की, या अध्यात्मिक अलौकिकत्वाने दामाशेटी–गोणाईच्या पुत्राचे कौटुंबिक जीवन विस्कळीत झाले आहे. राजाईचा पती तिच्यापासून दूर गेला आहे. नारा-महादा यांचा बाप हिरावला गेला आहे. त्यामुळे चौदा माणसांचा संसार सांभाळण्याची अवघड जबाबदारी राजाईच्या अंगावर येऊन पडली आहे. राजाई मोठ्या धीराने ती पेलण्याचा प्रयत्न करते, प्रसंगी कातावते, रागावते, पण साऱ्या रागरंगात संसार उभा करण्याचा, सांभाळण्याचा प्रयत्नही करते. त्यामागची तिची जिद्द नामदेवांच्या पारमार्थिक जिद्दीइतकीच प्रशंसनीय आहे.

आपल्या 'भक्तविजया' त महिपतीनी नामदेव हे उद्धवाचा अवतार आहेत असे म्हटले आहे, तर नरहरी मालूकृत 'भक्तकथामृत' ग्रंथात त्यांना सनत्कुमाराचा अवतार असे संबोधिले आहे. नामदेव असे हे इतरत्र 'अवतार' वाटले असले, तरी संसाराच्या बाबतीत काही ते कुणाला कर्त्याधर्त्या पुरुषाचे अवतार वाटलेले आढळत नाहीत. दामाशेटी, गोणाई, राजाई या साऱ्यांनीच नामदेवांच्या संसारविन्मुख वृत्तीवर कोरडे ओढले आहेत. 'जीवीं विठ्ठलाचा छंदु' घेतलेल्या नामदेवांची अवस्था 'लौकिक व्यवहार नाठवेचि कांहीं।' अशी आहे. तर नामदेवांच्या कुटुंबियांना लौकिक व्यवहाराखेरीज अन्य काहीच आठवत नाही, अशी परिस्थिती आहे. टाळ–दिंडी घेऊन रंगणामध्ये नाचण्यात नामदेवांच्या मनाला सुख आहे, तर त्यांच्या कुटुंबीय मंडळींना यासंबंधी तिरस्कार नसला, तरी संसार सोडून हे सारे करीत राहावे यासंबंधी नावड आहे. कै. ज. र. आजगावकर लिहितात, "आपल्या मुलाची पारमार्थिक वृत्ती पाहून हरिभक्त दामाशेट यास कदाचित बरे वाटले असेल, परंतु नामदेवांची आई गोणाई हिला मात्र तो प्रकार फारसा आवडला नसावा असे वाटते. आणि तसे होणे साहजिकच आहे. पुरुषापेक्षा स्त्रियांस संसाराची आवड नेहमीच अधिक असते. आपल्या मुलांनी चांगला उद्योगधंदा करून पैसे मिळवावेत, आपल्या सुना-लेकींच्या अंगावर पुष्कळ दागदागिने असावेत, ही बहुतेकींची इच्छा असते आणि या नियमास गोणाई अपवाद नव्हती. तिने व नामदेवांची पत्नी राजाई हिनेही, सगळा दिवस टाळ कुटण्याचे सोडून संसाराकडे थोडेबहुत लक्ष देण्याविषयी नामदेवास परोपरीने सांगून पाहिले असले पाहिजे. नामदेव सगळा दिवस देवळात बसून टाळ कुटू लागले, म्हणून गोणाईने पुष्कळ कडक आणि मर्मभेदक शब्दांनी त्यांची कानउघाडणी

केली. परंतु ते इतके शांत झाले होते की, त्यांच्यावर आईच्या भाषणाचा काहीच परिणाम झाला नाही.''[८] कारण उघड आहे. नामदेवानी ते निःशंकपणे सांगून टाकले आहे. ''या देह-घर-संसाराचा आलासे कंटाळा ।। म्हणोनी गोपाळा शरण आलो ।। ''त्यामुळे नामदेवाना पुत्र–कलत्र 'बापुडी' वाटतात. त्यांच्यात रमून जावयाचे म्हणजे 'रौरवकुंडी वास' असे त्यांना वाटते. संसारसुख म्हणजे विषाचा विस्तार अशी त्यांची धारणा आहे. म्हणून ते संतांना शरण जातात; कारण त्या जागी जन्मांतरीचा शीण हरतो. विठ्ठलाच्या पायी नामदेवाना त्रिभुवनीचे वैभव दिसते. कल्पतरूची छाया आणि कामधेनूचे दुभते यांचा अनुभव ते त्याच्या पायी घेतात. त्यामुळे संसाराच्या रंगमंचावर तारेवरची कसरत करीत राहण्यापेक्षा पंढरीच्या चोहटचावर भक्तीत दंग होऊन राहणे त्यांना अधिक बरे वाटते. 'पंढरी माहेर, विठ्ठल माऊली' अशा जीवनदृष्टीच्या नामदेवांच्या अध्यात्मिक संसारात मीतूपण नसले, तरी व्यावहारिक संसाराच्या बाबतीत मात्र अंतराय आहे. साहजिकच व्यावहारिक संसाराचा अव्हेर आणि त्यासाठी जन्मांतरीचा प्रवास करीत राहण्यासंबंधीचा तिटकारा नामदेवांच्यात दिसतो.नामदेवांचा संसारासंबंधी असा हा वैराकार होता. हा वैराकार घालवून नामदेवाना संसाराचे निजकारण लावून द्यावे म्हणून सकळ समुदाय गोळा झाला, पण नामदेव अपराजितच राहिले.

नामदेवानी संसार केला तो केवळ लौकिक अर्थानेच होय. खरे तर, लौकिक संसाराची उठाठेव नामदेवांच्या स्वभावाला मुळीच मानवणारी नव्हती. अपूर्व ध्येयाच्या दीप्तीने तेजाळून निघालेल्या ध्येयवाद्याच्या मनाला ती तशी मानवणारीही नसते. नामदेवाना विठाई माउलीच्या भक्तीचे वेड लागले होते. ते कळा लावणारेच, पण जीवन प्रदान करणारे असेही वेड होते. अशा वेडचाचा संसार कुणीतरी सांभाळीतच असतो. सुखी–असुखी, कोणत्या का पद्धतीने असेना तो चालतच असतो. 'तो चालतो आहे ना, चालू दे. आपण पुढं चलू. थांबला तर पाहू' अशी ध्येयवेडचाची भूमिका असते. आपला पूजाविषयच हे सारे घडवत आहे, अशी त्याची श्रद्धा असते. नामदेवांचा संसारही असाच होता. तो पडला कधीच नव्हता; चालता होता. नामदेवांच्या भक्तीच्या वेडाला आणि भक्तीने मिळवावयाच्या लाभाला पोषक अशीच ही गोष्ट होती. साहजिकच नामदेवाना संसाराची ओढ लागली नाही. आसक्ती निर्माण झाली नाही. म्हणून दुसऱ्यांनी संसाराची ओढ करू नये, किंवा आसक्ती बाळगू नये, असा मात्र नामदेवांचा प्रयत्न नाही. ओढ लावून ओढग्रस्त करून घ्यावी, असे नामदेवाना वाटत नाही. ते त्यांच्या ध्यानीमनीही

---

८. आजगावकर ज. र. : प्राचीन मराठी संतकवी, भाग १ : पृ. १११

नाही. नेटका प्रपंच करून परमार्थ साधावा, अशी त्यांची जीवनदृष्टी असली तरी नेटक्या संसारात मुटका होऊन राहणे नामदेवाना मंजूर नाही. त्यामुळे नामदेव नेटका संसारही करू शकले नाहीत.

या साऱ्याचा परिणाम राजाईच्या भाषेत सांगायचा, तर "लावोनी लंगोटी झालेती गोसावी । आमची ठेवाठेवी कोण करी ॥ " अशी आहे. नामदेवानी ठेवाठेवी अशी कुणाचीच केली नाही, ती ज्याची त्यालाच करावी लागली. साहजिकच भक्तीमध्ये ब्रह्मानंदे डुलणाऱ्या नामदेवाना संसार-सन्मुख करू पाहणारे अवघेजण भांबडभूत ठरतात. नामदेवानी प्रीत केली ती विठाई माउलीवर, प्रेमा दिला तो भक्तीचा. त्यामुळे नामदेवांचा लौकिक संसार म्हणजे अठरा जागी ठिगळ लावलेला संसार आहे; कंथा आहे. याबद्दल नामदेवाना काय वाटत होते, हे समजण्यास मार्ग नाही. पण घरच्यांच्या माथ्यावर मात्र आभाळ फुटत होते यात शंका नाही. कै. ज. र. आजगावकर यांनी नामदेवांच्या गृहजीवनाच्या परवडीची एक कथा सांगितली आहे. राजाई आपल्या दारिद्र्यास कंटाळून चंद्रभागेत जीव देण्यास गेली असता पांडुरंगाने तिचा जीव वाचविल्याची ही कथा आहे. ती अशी आहे: "नेहमी उपोषणे करकरून आणि आपल्या लहान मुलांचे हाल होत असलेले पाहून राजाई आपल्या जीवास कंटाळली, आणि आपले मुलगे नारा आणि महादा यास पाठीस आणि पोटास बांधून व तान्ह्या बाळास हातात घेऊन तिने भिवरेच्या डोहात उडी टाकली. त्यावरोबर पांडुरंग तेथे प्रकट झाला आणि त्याने तिला पाण्यातून काढून काठावर आणून उभे केले. देव माणसास मरूही देत नाही म्हणून राजाई त्याच्यावर फारच रागावली व जमिनीवर डोके आपटून पुन्हा तिने पाण्यात उडी टाकली. पुन्हा देवाने तिला बाहेर काढून नदीच्या पैलतीरी नेऊन ठेवले. राजाई अगदी वैतागून गेली होती. ती मुलांस घेऊन घरी जात असता वाटेत एक मेलेला सर्प तिने पाहिला. तेव्हा मरण येण्यास हा फार चांगला उपाय आहे म्हणून तो सर्प तिने घरी नेला आणि शिजल्यावर आपण तो खावा आणि मुलास घालावा म्हणजे सर्वांस लवकर मरण येईल अशी तिची समजूत. पण चमत्कार काय झाला पहा; ज्या भांड्यात सर्प शिजत ठेवला होता, त्यावरचे झाकण राजाईने काढताच आत सगळे सोने झालेले तिच्या दृष्टीस पडले. मग आनंदाच्या भरात तिने लगबगीने ते उचलले आणि नामदेवास नेऊन दाखविले. सोने पाहताच नामदेवांचा कपाळशूळ उठला. ते राजाईला म्हणाले, " वेडे, हे काय घेतलेस ? आपल्यासाठी पांडुरंगाला श्रम पडले ना ? " त्यांनी ब्राह्मण बोलावले आणि ते सगळे सोने त्यांस वाटून देण्यात आले."

नामदेवांच्या गाथेत 'राजाईचा निश्चय' या प्रकरणातील वरील कहाणीत

शास्त्रपूत दृष्टीला न पटणारे चमत्कार वगळता एकंदरीने नामदेवांच्या संसाराची ससेहोलपटच स्पष्ट होते यात शंका नाही.[९] नामदेवानी ईश्वराच्या भक्तीचे सणंग छान विणले असले, तरी संसाराच्या सणंगाला चारदोन गाठीही त्यांना नीटपणे घालता आलेल्या नाहीत हे उघड दिसते. त्यामुळे संसाराचे सणंग जागजागी कसे विरून गेले आहे ! प्रपंची उदासीन असणाऱ्या नामदेवाना संसाराचा संग त्याज्य होता, त्यामुळे त्यांना संसारविषयक अंतरीची खूण सापडली नाही. नामदेवानी ' संसार केला ' असे म्हणता येत नाही. त्यांच्यासाठी संसार रचला गेला, त्यात ते उभे राहिले, पण रमलेच नाहीत. त्यांनी संसारातील सुखदुःखे भोगली नाहीत असे मुळीच नाही. पण त्यात लडबडणे मात्र घडले नाही. नामदेवानी आपली संसारविषयक वासना ईश्वराच्या भक्तीत संक्रांत केली होती. त्यामुळ संसारात राहूनही संसाराचा संग त्यांना कधी बाधला नाही. नामदेवाना संसाराच्या भेटीची आवड कधी उत्कंठित करू शकली नाही. पण ईश्वरकृपेच्या लागराने मात्र त्यांना नेहमीच माहेरची आस लावली. या माहेराने लौकिक संसारातील जीव हिरावून घेतला, संसाराची उपाधी गळून पडली. त्या दृष्टीने संसारात नामदेवाना ज्ञानियांचे गज किंवा मोक्षदायी बीज भेटले नाही. परिणाम असा की, नामदेवानी साऱ्या सांसारिक उपाधींचा आंगोठा मोडला आणि संसारात असूनही ते मुक्त राहिले ! नामदेवांच्या या दरिद्री संसाराचे करुण वर्णन रखुमाईकडून विठोबाला आलेल्या राजाईचा निरोपामध्ये आर्ततेने केले आहे. केवळ राजाईचा संसारच नव्हे, तर रसिक वाचकही पार ढवळून निघावा, अशी त्यातील गाढ व्यथा आहे. चिंतेच्या वणव्यात उभी जळणारी राजाई गांजल्याचा दावा मांडते तेव्हा वेदनेचा अपार भार माथ्यावर साकळून राहतो. नामदेव परमार्थातील समतावादी खरे, पण कुटुंबीयांच्या बाबतीत मात्र ते, 'एकलेंचि येणें, एकलेंचि जाणें' अशा निदिध्यासाने, अतिशय कठोरपणे जीवनप्रवास करतात. गोमटचा हरिनामापुढे संसाराचे लावण्य त्यांना थिटे वाटते. नामदेवांच्या दृष्टीतून ईश्वरभक्ती हे चंदनाचे झाड असून संसार म्हणजे एरंडाचे झाड आहे. म्हणून नामदेव संसाराच्या अंबरात कीळ होऊन जाऊ इच्छीत नाहीत. ईश्वरभक्तीतील चैतन्याच्या गाभ्याला उणेपण आणू पहात नाहीत.

खरे तर, नामदेवांचे गृहजीवन समृध्द होते. नामदेवांच्या या गृहजीवनात त्यांच्या आईवडिलांपासून तो पत्नीमुलांपर्यंत आणि घरच्या दासीपासून तो त्यांच्या गुरुपर्यंत किती लहानथोर मंडळी येतात म्हणून सांगावे ? दामाशेटी व

---

९. कित्ता : पृ. ११४

गोणाई हे नामदेवांचे आईवडील, राजाई ही पत्नी, नारा, महादा, गोंदा व विठा हे चार मुलगे, आऊबाई ही बहीण, लिंबाई ही मुलगी, आणि चौघाही मुलांच्या बायका असा हा कुटुंबमेळा आहे. या अव्याजमनोहर मेळाव्यात ज्ञानेश्वर, जनाबाई व विसोबा खेचर यांनाही कुटुंबीय मंडळींसारखेच महत्त्व आहे, स्थान आहे. नामदेवांची कुटुंबीय मंडळी नामदेव मोठे व्हावेत अशा धडपडीत असतात, तर त्यावरोबरच त्यांच्या घरची दासी जनाबाई व नामदेवांचे गुरू विसोबा खेचर हेही नामदेवांचे जीवन समृध्द करण्याच्या प्रयत्नात दिसतात. " कीर्तनीं जन्मला । हरिभक्तीनें शिंपिला " असा देह असणाऱ्या जनाईने नामदेवाना दिलेली साथ अपूर्व अशीच आहे.

या सर्वांनीच नामदेवांचे जीवन मोहरेदार बनावे, यासाठी अट्टाहास राखला आहे. नामदेवानी संसाराच्या शून्यात रमावे, अशी कुटुंबीयांची इच्छा आहे, तर त्यांचे अध्यात्मिक जीवन सधन बनावे, असा जनाई-विसोबांचा प्रयत्न आहे. नामदेवानी संसारात अगदी रत होऊन जावे, पुरे मिळून जावेसे कुटुंबीयांना वाटते असे मात्र नाही. पण संसाराविना जिणे म्हणजे ' भिगुळवाणें परदेशी जिणें ' असे मात्र त्यांना जरूर वाटते. आणि म्हणूनच देवाप्रमाणेच नामदेवानी संसारही अनंतरूपे अनंतवेषे पाहावा अशी त्यांची इच्छा आहे, आर्त आहे. पण नामदेवांची निरंतरची धडपड मात्र सर्वस्वी विरूध्दच आहे. साहजिकच नामदेवांच्याकडून संसाराची पोसणी झालेली नाही. ईश्वरभक्तीला त्यांनी संसाराचे अर्घ्य दिले आहे घरात कुणी पाहुणा आला की मीठमिरचीची वाण पडते, गणोबा नाइकाला पुढे घालून आणण्याचा प्रसंग येतो, गणगोतामध्ये सत्त्व बुडते किंवा सकळ लोकलाजच सांडली जाते, हे सारे घडते ते यामुळेच होय ! नामदेव संसारी पुरुषापेक्षा अधिकतर–अधिकतर तरी कसले–सर्वस्वीच संतकवी होते, उत्कट भक्त होते. या भक्ताला प्रत्यक्ष संसारातील दर्शनापेक्षा भक्तीचा संसार महत्त्वाचा होता. सायुज्यमुक्तीची आस तिथे संतृप्त होत होती. साहजिकच " देह जावो अथवा राहो । पांडुरंगीं दृढ भावो । " अशा अढळ निर्धाराच्या नामदेवाना संसार श्रमाचा भोपळा वाटल्यास नवल नाही. या सांसारिक परवडीची क्षिती मग नामदेवाना तरी का वाटावी ? जगजेठी, जगत्पाळ आपली सारी आळ पुरवील अशी ज्यांची श्रध्दा, त्यांनी आपल्या संसाराला दैन्याने मारलेल्या मिठीवद्दल चिंता का करावी ?

नामदेवांच्या गृहजीवनाची ही परवड ध्यानी घेऊनही त्यांनी संसाराची

राहाटी मोडली असे वाटत नाही. लौकिक अर्थाने त्यांनी व्यवहार विध्वंसिला असला, तरी त्यांच्या सांसारिक जीवनाचा परिपोष त्यांच्या विश्वधर्मात झाला, हे विलोभनीय वैशिष्ट्य होय. नामदेवानी संसार केला तो स्वेच्छेने नाही आणि अनिच्छेने नाही; त्यांनी तो केला परेच्छेने ! श्रीमद्विद्यारण्यमुनींनी 'पंचदशी' मध्ये या 'परेच्छे' चे विवेचन करताना म्हटले आहे:

नैष दोषो यातेऽनेकविधं प्रारब्धमीक्ष्यते ।
इच्छाऽनिच्छा परेच्छा च प्रारब्धं त्रिविधं स्मृतम् ।।५२।।[१०]

या परेच्छेनेच नामदेवाना संसारात टाकले आणि त्याबाहेरही घेतले. त्यात वाउगे काहीच नाही.

ज्ञानेश्वरानी 'मार्गधारें वर्तावें । विश्व हे मोहरें लावावें । अलौकिक नोहावें । लोकांप्रती ।।[११] असे म्हटले आहे. त्याप्रमाणे नामदेवांच्या जीवनविषयक कर्तव्यकर्माची अखेर लोकक्रांतीत घडल्यावर अमृत टाकून कांजीची आवडी का धरावी ?

नामदेवांच्या गृहजीवनाच्या संदर्भात नामदेवांच्या समकालीनांकडे पाहता ज्ञानेश्वरानी प्रपंचाचा पसारा मांडलाच नाही. यौवनाच्या उंबरठ्यावर पाऊल असतानाच आपले जीवितकार्य पुरे करून त्यांनी समाधी घेतली. नामदेवांच्याच तोलामोलाचे कार्य करणारे संत एकनाथ हे त्यांच्याप्रमाणेच एक गृहस्थाश्रमी संत होते. नाथांची प्रपंचाची कहाणी साठा उत्तरी सफळ संपूर्ण झाली. त्यांचा यशस्वी संसार हा एक अनन्वय अलंकारच होता. प्रपंच त्यांनी परमार्थरूप केला. त्या मानाने तुकाराम हे गृहकारणाच्या संदर्भात नामदेवांच्या प्रपंचजीवनाच्या अधिक जवळ येतात. त्या दोघांच्याही परमार्थप्राप्तीस त्यांच्या कुटुंबीयांकडून झालेल्या विरोधाचे स्वरूप मात्र विभिन्न आहे. दामा शेटी, गोणाई व राजाई या घरच्याच मंडळींनी नामदेवांना उपदेशाच्या चार गोष्टी सांगून पाहिल्या; पण या विरोधाची धार मुळचीच बोथट होती. 'नामयाची दासी जनी' व नामदेवांचे चारही मुलगे यांनी त्यांचा पारमार्थिक अधिकार पाहून वेळोवेळी व्यक्त केलेल्या अभिजात आदरभावामुळे हा विरोध आणखी सौम्य झाला. अखेरीस नामदेवांचे माता-पिता आणि त्यांची पत्नी यांनी आपली आग्रही भूमिका सोडून देऊन त्यांना

---

१०. श्रीमद्विद्यारण्यमुनिविरचिता: संपा. आचार्यभक्त विष्णु वामन बापटशास्त्री, 'सुबोध पंचदशी,' 'तृप्तिदीप', पृ. ३७३
११. ज्ञानेश्वर : ज्ञानेश्वरी, ३.१६९

मनोमन सहकार्य दिले व त्यांच्या सहवासाने आपले जीवन कृतार्थ झाल्याचे मान्य केले. "आता ये संसारीं मीच धन्य जगीं । जे तुम्हां अर्धांगी विनटलें ।।" असे राजाईने शेवटी म्हटले आहे 'नामयाने संसारा जिंकिले' असे साफल्याचे समाधान येथे आहे. अर्थात् केवळ लौकिक अर्थाने विचार करणाऱ्यांची गोष्ट वेगळी आहे; हे स्पष्ट आहे.

केशसुतांच्या कवितेचा जन्महेतू कोणता या प्रश्नाचे उत्तर शोधताना अच्युतराव कोल्हटकर–वर्डस्वर्थ यांचे एक समानार्थी संकलित विधान, " उत्कट मनोवृत्तींचा–भावनांचा–खळाळीसारखा अनायासे बाहेर पडणारा शब्दांचा महापूर म्हणजे काव्य, " मनात घर करते. केशवसुतांच्या संख्येने त्रुटित पण गुणांनी बहुमोली उत्कट कवितेने ते सार्थतेने धरून ठेवले आहे. किंबहुना केशवसुतांच्या बहुतेक कवितेचे स्वरूपच मुळी वादळी, खळाळी आहे. पण भावना, कल्पना आणि विचारांचे स्फुरण यांचा त्यात समतोल असल्याने ते अनेकरंगी गंधाच्या झळाळीने माखून गेले आहे.

केशवसुतांच्या प्रतिभेच्या या सहजनर्तनात त्यांच्या कवितेच्या जन्महेतूसंबंधी पृच्छा करतो तेव्हा, " काव्यं यशसे अर्थकृते व्यवहारविदे " ही मम्मटाची व्याख्या गृहीत धरून चालत नाही. किंबहुना असल्या प्रयोजन–प्रकल्पातील पारंपारिक प्रयोजनांवर केशवसुतानी विश्वास ठेवलेला नाही. रूढ अर्थाने त्यांचे

दोन **केशवसुतांची कविता:**
**एक जन्महेतू**

मनोमन सहकार्य दिले व त्यांच्या सहवासाने आपले जीवन कृतार्थ झाल्याचे मान्य केले. "आता ये संसारीं मीच धन्य जगीं । जे तुम्हां अर्धांगी विनटलें ।।" असे राजाईने शेवटी म्हटले आहे 'नामयाने संसारा जिंकिले' असे साफल्याचे समाधान येथे आहे. अर्थात् केवळ लौकिक अर्थाने विचार करणाऱ्यांची गोष्ट वेगळी आहे; हे स्पष्ट आहे.

केशसुतांच्या कवितेचा जन्महेतू कोणता या प्रश्नाचे उत्तर शोधताना अच्युतराव कोल्हटकर–वर्डस्वर्थ यांचे एक समानार्थी संकलित विधान, " उत्कट मनोवृत्तींचा–भावनांचा–खळाळीसारखा अनायासे बाहेर पडणारा शब्दांचा महापूर म्हणजे काव्य, " मनात घर करते. केशवसुतांच्या संख्येने त्रुटित पण गुणांनी बहुमोली उत्कट कवितेने ते सार्थतेने धरून ठेवले आहे. किंबहुना केशवसुतांच्या बहुतेक कवितेचे स्वरूपच मुळी वादळी, खळाळी आहे. पण भावना, कल्पना आणि विचारांचे स्फुरण यांचा त्यात समतोल असल्याने ते अनेकरंगी गंधाच्या झळाळीने माखून गेले आहे.

केशवसुतांच्या प्रतिभेच्या या सहजनर्तनात त्यांच्या कवितेच्या जन्महेतूसंबंधी पृच्छा करतो तेव्हा, " काव्यं यशसे अर्थकृते व्यवहारविदे " ही मम्मटाची व्याख्या गृहीत धरून चालत नाही. किंबहुना असल्या प्रयोजन–प्रकल्पातील पारंपारिक प्रयोजनांवर केशवसुतानी विश्वास ठेवलेला नाही. रूढ अर्थाने त्यांचे

## दोन केशवसुतांची कविता: एक जन्महेतू

तिकडे ध्यानही नाही. त्यामुळे केशवसुतांच्या संकलित कवितेचा चेहरामोहरा, त्याची दिशा व त्या दिशेतून मिळणारा पायरव घेण्याने आपला जन्महेतूचा प्रवास सोपा बनण्यास साहाय्य मिळते.

केशवसुतांच्या कवितेच्या एकूण प्रवासातून कोणता पायरव मिळतो ? केशवसुत मास्तर होते : उत्कृष्ट शिकविणे आणि असे शिकविणे मिळणार नाही अशी चारचौघात ख्याती असणे हे त्याकाळच्या मास्तरांचे वैशिष्ट्य. कशातरी मिळणाऱ्या, घाम गा–गाळून पोट जाळण्यासही पुरेशा न पडणाऱ्या तुटपुंज्या चार दिडक्याहून परम संतृप्तीचेच नव्हे तर ब्रह्मानंदसहोदराइतके ते अवीट होते. केशवसुत असे कौतुकाचे समाधान घेणारे होते की नाही हा प्रश्न नसला तरी ते वेगळे होते. नुसते मास्तर नव्हते. पेशाने मास्तर असले तरी दृष्टीकोनाने, विचार–संवेदनेने मास्तर नव्हते. कविमास्तर होते, त्यांचा मुळचा पिंड कविप्रकृतीचा आहे. तोही नित्याच्या मास्तराचा नाही, त्याहून अधिकाचा आहे. सर्वसामान्य मास्तर कौतुकाचे समाधान परम संतृप्तीचे मानतो. पोरवडचात आणि घरच्या इकडल्यातिकडल्या मेणचटलेल्या मंडळीत गुंग असतो. येईल तेवढेच अंगावर घेतो; किंबहुना तसले काही अंगावर पडूच नये म्हणून खपणे असे चालते. नेमेचि जगणे होते. चोहोबाजूनी डोळ्यावर आलेल्या झापडामुळे विशालतेने काही आकळावे आणि व्यापकतेने काही ढवळून काढावे असे मनात क्वचितच यावे! साहजिकच जीवनाची सारी दिशा भर बाराच्या सावलीसारखी पायापायात घुटमळणारी-घोटाळणारी. सायंकाळच्या सावलीसारखे लांबलांब पसरून तिने भुतासारखे कधी भेडसावले नाही, भेवडावले नाही. मास्तरासारख्यांचे आपले हे गणितच होते. पण केशवसुत या पठडीबाहेर आहेत. मास्तर ही पठडी एक पण केशवसुतांच्या जागेपणाच्या, सावधानतेच्या पायरवाने पठडीचा मार्ग बदलला आहे; वेगळा झालेला आहे. त्यामुळे केशवसुत कविमास्तर असले तरी 'हल्लक' कविमास्तर नाहीत, काव्यात्म पिंडाचे आणि संवेदनाक्षम मनाचे कविमास्तर होते. त्यामुळेच कवीच्या अंतःकरणात फुटलेला उचंबळ तसाच मांडला गेला नाही तर त्यास सावध मनाने टिपलेल्या, तरल हृदयाने वेचलेल्या आणि जागृत मनोवृत्तींनी संचित केलेल्या जीवनलक्षी क्षणकणांची डूब मिळाली. साहजिकच केशवसुतांची कविता केवळ कविता राहिलेली नाही तर काळ अधिक काव्य मिळून विचार कविता बनून आली आहे. केवळ ती कविताच असती तर कलात्मकतेची चढती उतरती भाजणी मांडून, कलात्मकतेच्या तरल–शबल पातळचा दाखवून सोडून देता आले असते ( अर्थातच ते सोपे असे नाही; खेरीज पंडितांशिवाय बहुजनांना महत्त्वाचेही नाही.) पण केशवसुतांच्या कवितेत त्यांचा

प्रक्षोभांनी गर्दी केलेला काळ, त्यांचे तत्त्वचिंतक मन आणि भावनाप्रधान कवि प्रकृती सारेच एकमेकात अडकून पडलेले असल्याने केवळ कलात्मकतेच्या ऊंचसखल, लांब-रुंद, उथळ-खोल पातळ्यांहून दूरवर जाणे क्रमप्राप्तच होते. मात्र असे जायचे तर परिस्थितीचे मापन हवे. कविकालीन विचार-वादळांचे मापन करू देणाऱ्या केशवसुतांच्या कवितेची ती अनिवार्य गरज आहे. या संदर्भाने 'समग्र केशवसुत' कार प्रा. भ. श्री. पंडित लिहितात, "केशवसुतांचा जन्म झाला त्यावेळी या देशात इंग्रजी राजवट प्रस्थापित होऊन जवळजवळ अर्धशत-काचा काळ लोटला होता. जुने झपाट्याने जात होते आणि नवे हळूहळू येत होते. हा काळ संक्रमणाचा होता ज्यानी जुनी पेशवाई पाहिली होती आणि आता नव्या आंग्लाईत जे तडजोडीने स्वतःस सामावून घेण्याचा प्रयत्न करीत होते, त्यांच्या मनात नव्या-जुन्या विचारांचे मंथन चालू होते. विष्णु कृष्ण चिपळूणकरांच्या निबंधमालेचा वाङ्मयीन आविष्कार झाला, त्यापूर्वी चाळीस-पन्नास वर्षांपासून महाराष्ट्रात जांभेकर, भाऊ महाजन, फुले, लोकहितवादी, विष्णुशास्त्री पंडित आदी सुधारकाग्रणींचे नवविचार 'दर्पण', 'दिग्दर्शन', 'ज्ञानोदय', 'ज्ञानप्रकाश', 'प्रभाकर', 'इंदुप्रकाश' इत्यादी नियतकालिकांच्या माध्यमातून व सार्वजनिक सभा-समारंभातून प्रसृत होत होते. निबंधमालेच्या वाङ्मयीन आविष्कारानंतर महाराष्ट्रात जे राजकीय व सामाजिक विचार प्रसृत झाले त्यांच्यावर मात्र पाश्चात्य संस्कृतीची छाप होती. राजकीय विचारात राष्ट्रवादाचा विचार प्रसृत होता आणि हा आपला देश काल परवा-पर्यंत परतंत्र असल्यामुळे त्या अनुकूल वातावरणात त्या राष्ट्रवादाची ज्वलंत ज्योती जिकडे तिकडे तेवत होती. सामाजिक विचारांवर गिबन्, मिल, स्पेन्सर आदी पाश्चात्य चिंतकांच्या विचारांची छाया होती." [१] ही संक्रमणावस्था कालेकरून पक्व बनली. तत्कालीन उलटसुलट वैचारिक झंझावाताने (आणि इतर प्रयत्नांनी) तिच्या पक्वतेस साहाय्य पोचविले. मग नवी दृश्ये, नवी ध्येये, नवी रूपे, नवी मनोगते उसळली. त्यांचा उलगडा करताना "केशवसुतांचा काळ व कवी" मध्ये प्रा. ना. के. बेहेरे यांनी म्हटले आहे, "आपली प्राचीन परंपरा अत्यंत थोर, आपले राष्ट्र अत्यंत वैभवसंपन्न, आपला इतिहास दिव्य व अभिमानास्पद, आपला धर्म उदार व सर्वसंग्राहक, आपली संस्कृती श्रेष्ठ असताना केवळ विषारी रूढीच्या नि घातकी आचारांच्या वाढीने आपल्या थोरवीस कलंक लागला; दिव्यावर आलेली ही काजळी झाडून टाकली तर आपले वैभव आपणास पुनरपि प्राप्त होईल व आपले राष्ट्र समर्थ, संपन्न व स्वतंत्र होईल

---

१. पंडित प्रा. भ. श्री. : समग्र केशवसुत : (संपादित) : पृ. ६१

असा आत्मविश्वास व स्वाभिमान या धुरिणांच्या ठिकाणी होता. इंग्रजी विद्येची मूलभूत तत्त्वे त्यांनी आत्मसात केली व इंग्रजांच्या राष्ट्रीय सद्‌गुणांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न केला. इंग्रज आपल्या देशावर विलक्षण प्रेम करतात, आपणही आपल्या हिंदमातेला देवतेप्रमाणे पूज्य मानू व तिच्या स्वातंत्र्यासाठी आपले प्राण अर्पण करावे लागले तरी ते अर्पण करू. इंग्रजांचा धर्म एकेश्वरी आहे; वेदांतात देखील ईश्वर एक आहे असेच सांगितले आहे; ख्रिस्तीधर्म स्वीकारण्याची आपणाला मुळीच गरज नाही, आपण आपल्या उपनिषदांचा अभ्यास करू व ते प्राचीन थोर हिंदी तत्त्वज्ञान जगात प्रसृत करू. आपल्या देशात माजलेल्या जातीभेदाला तिलांजली देऊ व अस्पृश्यतेचे भूत गाडून टाकू; मग आपला समाजही ख्रिस्ती किंवा मुसलमानी समाजाप्रमाणे संघटित होऊन बलशाली बनेल. स्त्रियांना शिक्षण देऊन व पुरुषांच्या बरोबरीने त्यांना समान हक्क देऊन आपण त्यांना भोगदासी न लेखता इंग्रजांप्रमाणे खऱ्या सहचारिणी बनवू.... इंग्रजांना आपल्या इतिहासाचा अभिमान वाटतो, मग आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाचा अभिमान आपणाला का वाटू नये ?... इंग्रजी भाषा व वाङ्‌मय थोर खरे, परंतु आपली मराठी भाषा काय हलकी आहे ?" याप्रमाणे महाराष्ट्रात स्वधर्म, स्वदेश व स्वभाषा यांच्या अभिमानाचे वारे वाहण्याला प्रारंभ झाला होता. हिंदुस्थानातील इतर प्रांतापेक्षा महाराष्ट्रात या वाऱ्याला झंझावाती स्वरूप येऊ पाहत होते. रानडे, चिपळूणकर, टिळक, आगरकर या चौरस देशभक्त पंडितांनी स्वातंत्र्याची व आत्मोद्धाराची दुहेरी व दुधारी चळवळ जोराने चालविली होती. अशा वादळी काळात उभ्या असलेल्या केशवसुतानी वादळाचे सम्यक् आलोडन करून अनुभूती–अनुभवांचे रेखांकन केले. म्हणूनच ते केवळ कवी राहिले नाहीत. त्यांनी पहिली उचकटली ती मास्तरकीची कळकटलेली चिवटजिवट चौकट आणि दुसरी गंधर्वनगरीत रममाण होणाऱ्या केवळ कविप्रकृतीची सोबत ! या उखडण्यातून बंड करणाऱ्या कवींचे बंड निर्माण झाले. वादळी काळात केशवसुतही एक वादळ बनले. असे वादळ पेलण्याचे, त्यावर स्वार होऊन राहण्याचे सामर्थ्य असल्याखेरीज टिकणे शक्य नव्हते. बदलता काळ स्वीकारू इच्छित असलेल्या राष्ट्रस्वातंत्र्य, बुद्धीप्रामाण्य, व्यक्तिस्वातंत्र्य आणि ऐहिकतेचे सुखसंवर्धन यांच्या आवश्यक जयजयकारात वादळ बनूनच सामावणे शक्य होते. अन्यथा वाहवण्याखेरीज गती नव्हती. केशवसुतांच्या प्रतिभेने हे शक्तिशालीत्व दाखविले. त्यामुळे त्यांची कविता त्यांच्या काळातील नवमूल्यांच्या आत्माविष्करणाचे अपत्य ठरली आहे. ती नटवे नर्तन न करता शाहिराचा जोस घेऊन येते ती त्या क्रांतदर्शी काळाच्या संदर्भात ! मात्र केशवसुतांची कविता म्हणजे केवळ काळाची बखर नव्हे, खबर तर नव्हेच नव्हे ! आत्मावलोकनाने आत्मबल

घेणाऱ्या काळातील केशवसुतांच्या मनोवृत्तीने, आत्मबलाने परिप्लुत कवितेला जन्म दिला आहे. आत्मघातकी पुरातन परंपराविरूद्ध पुरोगामी प्रवृत्तींचा पुरस्कार या अटीतटीच्या सामन्यात केशवसुतांच्या अंतर्भेदी प्रतिभेने स्वतंत्र खाणाखुणांची स्पष्ट लावणी केली आहे, प्रत्ययकारितेने जीवनाभिमुखतेचा मार्ग चोखाळला आहे. त्यामुळेच " केशवसुतांची कविता वृत्तिवाचक तर आहेच; परंतु तिच्यावर तिच्या युगाचा, वातावरणाचा व परिस्थितीचा फार खोलवर ठसा उमटला आहे. त्यामुळे ती जातिवंत व जिवंत वाटते. त्यांच्या पूर्वीच्या पिढीतील कविता यांत्रिक आहे. त्या पिढीतील कवी कवितेचे यंत्र चालवीत आहेत असे वाटते. केशवसुतांच्या कवितेत चैतन्य आहे. ती स्वतः हालते, स्वतः चालते, स्वतः बोलते आणि रसिकाच्या अंतःकरणाला हात घालते. "[२] केशवसुतांच्या कवितेची ही ताकद त्यांच्या कवितेच्या जन्महेतूचे धागेदोरे केशवसुतांच्या कविप्रवृत्तीच्या पिंडात, त्यांच्या काळातील परिस्थितीत, त्या काळातील नवमूल्यांच्या पुढाकारात सापडतात, आढळतात. मग प्रत्यक्ष कविता कोणते हेतू बोलून दाखविते ? काय सांगते ?

केशवसुत 'शुरु हवा है जंग हमारा' अशा प्रतापी कालखंडात उभे असल्याने केशवसुतांच्या मुळातल्या बंडखोर वृत्तीने, उफाळून उठण्याच्या सात्त्विक स्वभावाने, उचंबळून येण्याच्या प्रवृत्तीने विकृतीवर मग ती कुठलीही आणि कसलीही असो, हल्ला चढविला आहे. विकृतीवर घणाघात करावेत, त्या घणाघातातही चांगले टिकवून धरता आल्यास ठेवावे, बाकी सारे उडवून लावावे, नवे निर्मावे–स्थापावे असा नेम आहे. तिथे कोमलता असलीच तर आपद्धर्म येणारी, नजाकत आढळली तर जाता जाता वाट पुसणारी. पण कलेच्या माफक जाणीवेबरोबरच 'परिस्थिती वेडेपण' असल्याने कणखरतेने घावामागून घाव घालावेत हीच मुख्यतः वृत्ती व या वृत्तीने आणि स्वभावाच्या स्वाभिमानी बैठकीने, ज्याचा जन्म खाली मान घालून जायचा अशा दुर्मुखलेल्या मितभाषी केशवसुत मास्तराना विलक्षण जोर मिळाला आहे, जोसाचा नेट लागला आहे. तिथे नाजूक–साजुकपणाला अवसर नाही की मेंगळा व्यवहार नाही. त्यामुळे केशवसुतांची कविता मनोरंजन करण्यासाठी किंवा करमणूक साधण्यासाठी म्हणून अवतरत नाही. ती जाणता–अजाणता हेतुशःच अवतरते. कवी केशवसुत अगदी मोजूनमापून, ठरवूनबिरवून किंवा अमके अमक्या पद्धतीने सांगायचे, तमके तमक्या पद्धतीने मांडायचे अशी इंच् न् इंच् फूटपट्टी लावून लिहितात असा हेतुशःचा अर्थ नाही. सहजच लिहितात पण सहजोद्रेकच मुळी हेतूपूर्णतेने आखणी करतो. त्यात 'हेतुशः' सकट कला, विचार आणि काव्य

---

२. पंडित प्रा. भ. श्री. : समग्र केशवसुत : (संपादित) : पृ. ६२

ही सारी येतात. तीत कुणा एकाची निखळ निखळता असे असत नाही. त्यामुळे हेतुच्या पाठबळाने उभ्या असलेल्या केशवसुतांच्या कवितेतील केवळ कलांगांच्या तरलतेचा शोध घेऊ म्हटल्याने फसगत होते, नाडी बरोबर लागत नाही; 'स्टेथास्कोप' पुनःपुन्हाः लावला तरी धडधडीचा अर्थ कळत नाही.

केशवसुतांच्या कवितेत अशी कोणती धडधड धडपड करते ? या धडधडीच्या धडपडीचे संकलित रूप मांडायचे तर केशवसुतांची कविता एक मिश्रराग आहे असे म्हणता येईल. मात्र या मिश्ररागात खालीवर असे नसून साऱ्यात समधातता आणि समतोलता आहे. कवितेचा सातत्याने तोल सांभाळण्याचे कौशल्य कवीने दाखविले आहे. त्याच्या तालतोलाचा तो विशेष गुण म्हणता यावा इतके त्याचे महत्व आहे. केशवसुतांच्या कवितेचा वेदनानिग्रह हा पहिला राग, कवीला लाभणारा आनंद हा दुसरा आणि आत्माविष्करण हा तिसरा; असा हा मिश्रराग आहे. केशवसुतांच्या दृष्टीने या संकलित 'एक' रागामधील कलात्मकता आणि सामाजिकता यात विरोध नाही. त्यातूनच आपल्याला 'नवीन कविता' लिहायची आहे याची प्रखर जाणीव कवीच्या मनात दिसते. तशी ती निर्माण होताना समाजस्थितीतील अनृत, विटाळ, विकृत ते दूर राखून समाजजीवनाचा सांस्कृतिक दर्जा, प्रतिष्ठा आणि शोभा वृद्धिगत करण्याची केशवसुतांच्या कवितेची धडपड आहे. राधेकृष्णाची बुळबुळीत गाणी गाण्यासाठी दिव्य शक्तीचे स्फुरण नाही. तिला गर्जायची आहेत संघर्षातून निर्माण होणाऱ्या 'परमानंदे परिपूर्ण' जगाचा आकार घेऊ पाहणाऱ्या कल्पनेची गाणी. "जे रम्य ते बघुनिया" "गाणे सवेची मनात होय जागे" ते केवळ सृष्टीतले 'रम्य' पाहून नव्हे तर 'त्या' जगाचे 'रम्य' रूप पाहून ! त्यासाठी सारखी धडपड, जमेल तेवढी, झेपेल तेवढी धडपड आहे. 'फुकट दवडलेल्या तासा' बद्दल त्यामुळे दुःख प्रगट होते. जो क्षणाचा विचार करीत नाही त्याच्या हातून अनंत काळ निसटतो. म्हणून क्षणाचा विचार आवर्जून केला आहे. मात्र केशवसुतांच्या कवितेचा सारा आटोप किंवा सारा खटाटोप हा पक्षबाज पद्धतीने कुठला तरी एक विचार सांगावा, असा नाही तर समुद्धारक तत्त्वांचे उच्चार–स्फुरण, त्या दिशेचे मार्गक्रमण अशी तिची वाटचाल आहे. 'आज' मध्ये जे नाही ते 'आज' मधूनच 'उद्या' साठी लावणी करून, आपल्या कवितेच्या प्रकाशस्फूर्तीने अंधारी अंतःकरणात उगीच तग धरून असलेली पणती उजळता येईल तेवढी उजळावी असा हेतू आहे. या पणतीच्या प्रकाशात जगायचे कसे आणि कशासाठी याचा शोध घेता येईल अशी आशा आहे. ही आशा अंधुक हे खरे पण डॉ. रा. शं. वाळिंबे यांनी म्हटल्याप्रमाणे, "काव्यविषयक मूलभूत कल्पना टाकून नवीन कल्पनांची प्रस्तावना करावयास

पाहिजे हा विचार प्रथम केशवसुतांच्या कवितामध्ये स्पष्टपणे प्रकट झाला. भोवतालच्या अचेतन, निरुद्योगी व उदास जगाला चैतन्य देणे हे कवितेचे कार्य होय, हा विचार केशवसुतानी पुनः पुन्हा मांडला आहे." स्थूलरुपाने हा तिचा हेतूउद्देश आहे. अखेरीस साधायचे काय यासंबंधी प्रायः अस्पष्टता आहे. केशवसुतानी आपल्या कवितेचा जन्महेतू सांगताना "कवितेचे प्रयोजन" मध्ये म्हटलेच आहेः

आलेल्या दुरवस्थितींतुनि तुम्ही उत्तीर्ण व्हाया जरी,
उद्योगीं रत व्हावया धरितसां औत्सुक्य चित्तीं तरी,
गाण्यानें कविच्या प्रभाव तुमचा वर्धिष्णुता घेइल,
स्फूर्तीचा तुमच्या पिढ्यांस पुढच्या साक्षी कवी होईल!

केशवसुतांच्या बव्हंशी कवितेचा हा सूर आहे. अंतःस्फूर्तीने तो लागला आहे. केशवसुतांच्या समग्र कवितेच्या आलोचनात त्याचे पदविन्यास आढळतात. त्यात केशवसुतांच्या कवितेच्या ज्या जन्महेतूवर लक्ष खिळून राहते तो हेतू वेदनानिग्रह होय. वेदनानिग्रह एक मोठे वर्तुळ मानले तर कवीला लाभणारा आनंद आणि त्याचे आत्माविष्करण ही दोन बारकी अंतर्वर्तुळे कल्पिता येतील. किंवा वेदनानिग्रह हा आदि कल्पिला तर कवीचा आनंद आणि त्याचे आत्माविष्करण हे त्याचे मध्य आणि अंत असेही म्हणता येईल. एकूण एक सलग वस्तू घनाकार घेऊन अखंड सलगतेचे दर्शन देते. त्यामुळे कप्प्याकप्प्याच्या विचाराहून वेदनेचा समग्र विचार अवलोकिला की, त्यात सारे आकारते, सामावते.

सहज चालता चालता केशवसुतांच्या काळाकडे धावती नजर फेकून तो गोळा केली की, हा उलथापालथीचा, घालमेलीचा, ढवळाढवळीचा, वेदनांचा काळ होता असे जाणवते. वेदना देणारा-घेणारा, वेदना सहन करण्यास भाग पाडणारा, त्यांची आच लावणारा असा हा क्षोभकारक काळ होता : पारतंत्र्याची–स्वातंत्र्य नस–ल्याची–वेदना, दारुण असहाय्यतेची वेदना; अशा कितीतरी वेदना लळलळत होत्या. जीवनाने झुंजावे, संग्राम मांडून बसावे, त्याला मुळी उसंतच मिळू नये अशी स्थिती होती. कदाचित् एखादा अर्धाकच्चा कवी या फेऱ्यात अडकून वेदनेच्या चक्रात पिचून जाता ! वैतागाने वेदनेच्या चरकात स्वतःची जीवनशक्ती आणि जीवनस्फूर्ती यांचा रस गाळीत राहता ! ( स्वातंत्र्यानंतरच्या काळात अधांतरी तडफडणारी असली शून्य उदाहरणे थोडी नाहीत. ) पण ठिणग्यांच्या फुलत्या कहरात 'हरपले श्रेय' शोधण्यासाठी, मानवी जीवनात उफाळून येणाऱ्या

सत्त्व–स्वत्वनिष्ठ जीवनशक्तीवर दृढ विश्वास असावा लागतो. अलबतेगलबते जीवनशक्तीचे गर्भाशय उलगडून रस्त्यावर येत असतात. मात्र केशवसुतांच्या ठिकाणच्या विश्वास–निर्धाराने या जीवनशक्तीबद्दल कौतुकाची भावना राखली आहे, जयनाद घुमवला आहे.

केशवसुतांच्या काळची वेदना मूकपणे सहन करता येण्याजोगी नव्हती. तिचे स्वरूपच मुळी असे की, तिच्या केवळ धगीने वाणी पुरती बसून जावी, कायम मूक व्हावी आणि तसे घडले नाही तर जनशक्तीच्या आवेगी दाहकतेने तिने तिच्या दहनाकडे मोर्चा वळवावा. केशवसुतांच्या कवितेचा आवेग असा दफन दहनाकडे आहे. दफन–दहनाकडे म्हटले खरे पण खरे तर दहनाकडेच अधिक आहे : दफन–दहनात 'पुरून जाणे' समान असले तरी दहनातील पार 'भस्मणे' दफनात नाही, मूळच निर्वंश नाही. दफन–दहनाची यातायात करायला टणक प्रकृती आणि निर्भय मन लागते. अन्यथा केवळ भारानेच खांदे मोडून पडण्याची नाहीतर जबर दुखण्याची (आणि कामातूनच निघून जाण्याची) मोठी भीती असते. पण केशवसुतानी, समाजातील महानांचा पराभव करणाऱ्याविरूद्ध तोच मार्ग चोखाळला. केशवसुतांचे समाजाकडे मनःपूर्वक लक्ष होते. त्यातील सळसळत्या घडामोडीसंबंधी जाणीव होती. समाजात राहून त्याच्याकरवी जीवाचे सारे चोचले आणि मनाचे पुरे थेर फिटवून घेऊन त्याकडे पाठ फिरविणाऱ्यांना 'मला काय त्याचे ?' वाटते. 'स्व'खेरीज एकतर त्यांना दुसरा समाज नसतो आणि असलाच तर स्वतःच्या सुखाव्यतिरिक्त त्याचे अधिक मोल नाही अशी त्यांची फोलकट कल्पना असते. त्यामुळे 'स्व' आणि 'स्व' खेरीज विचार नसतो, इच्छा नसते. वाट मिळत नाही. पण केशवसुतांचा परिसर इतका आत्मकेंद्रित नाही. तो विश्वकुटुंबी आहे, मानवतावादी आहे. मानवतावाद्याच्या पायाखालची वीट लांबीरूंदीत भक्कम असावी लागते. अनेकांचे बूड तीवर टेकायचे असते. केशवसुतांची बैठक तशी आहे. "ब्राह्मण नाहीं, हिंदुहि नाही, न मी एक पंथाचा, तेच पतित कीं जे आंखडिती प्रदेश साकल्याचा !" ही त्यांची बैठक असल्याने "कोण मला वठणीला आणूं शकतो तें मी पाहें !" असा त्यांचा उभा प्रश्न आहे. या प्रश्नाचे प्रयोजन केशवसुतांच्या हेतुशः कवितेने सांगून टाकले आहे, "प्राप्तकाल हा विशाल भूधर, सुंदर लेणीं तयांत खोदा, निजनामें त्यांवरती नोंदा, बसुनी कां वाढवितां मेदा ? विक्रम कांहीं करा, चला तर ! अटक कशाची बसलां घालुनि ?" हे सारे करायचे तर झुंजण्याची, झगडण्याची, झेपावण्याची तसेच काही घडले तर टाकून देण्याची आणि झटकून मोकळे होण्याची मनाला

आदत हवी. कुत्र्याचे जिणे कंठतात त्यांच्याकडे पेटण्याची, पेटवून घेण्याची आणि पेटवण्याची कसलीच शक्ती असत नाही. ते जगत नाहीत असे काही म्हणता येणार नाही पण जीवनातला संग्राम हरवून बसतात असे मात्र म्हणता येईल. जीवनाने सतत तडजोडीकडेच धाव घेण्यात जीवनाचा अपमृत्युच असतो. केशवसुतानी तो पत्करलेला नाही.केशवसुत-कवीने समाजातल्या जातीनिर्बंधघातक चाली,लांगूलचालन अप्पलपोटेपणा इत्यादी दिसेल त्या विकृतीवर, ढोंगासोंगावर, करंटेपणावर, दांभिक गैरवर्तगुकीवर, स्मशानकळा असणाऱ्या हरेक बाबींवर शब्दरूपी अण्वस्त्रांचे हल्ले चढविले आहेत. परंपरागत रूढीरूपी गंजलेल्या शस्त्रांना मोडीत काढण्याचा चंग बांधला आहे. " सर्वांगीण सुधारणा त्यांना (केशवसुतांना)अवश्य व प्रिय वाटते हे स्पष्ट आहे." त्यामागे उसळणाऱ्या फुलत्या ठिणग्या अंगावर घेऊन चामडीचे चकांदे काढून घेण्याची तयारी राखलेली आहे. तसेच यशाच्या नादाने हरखून जाण्यासाठी मनाचे आशावादित्व जिवंत ठेवले आहे. याचे कारण असे की, केशवसुतांची वृत्तीच मूलत: विधायकाचा वसा जपणारी अध्यात्मप्रवण तथा सामाजिक आहे. अशी वृत्ती नेहमीच तत्त्वचिंतनात गढत असते. या वृत्तीचे स्वरूप स्पष्ट करताना प्रा. वा. ल. कुलकर्णी यांनी सांगितले आहे, " केशवसुतांची वृत्ती ही मूलत: अध्यात्मप्रवण आहे. आधिभौतिकापेक्षा त्यांचे मन अध्यात्मामध्येच स्वाभाविकपणे अधिक रंगते. जे वरवरचे आहे त्यापेक्षा जे आंतरिक आहे त्याचे संशोधन करण्याकडेच त्यांच्या मनाचा स्वाभाविक कल आहे. ते केवळ अध्यात्माची भाषा बोलत नाहीत तर अध्यात्म अंगी बाणण्याचा यत्न करिताना आढळतात..... अध्यात्मविचारातून स्फुरलेली अद्वैताची शिकवण आणि पाश्चात्यांच्या संपर्काने इकडे आलेली समता, बंधुता व स्वातंत्र्य ह्या तत्वत्रयीची शिकवण ह्या दोन परस्पर पोषक विचारसरणींच्या मंथनातून केशवसुतांचा क्रांतिवाद मात्र जन्माला आलेला आहे. खऱ्याखुऱ्या अध्यात्मप्रवण मनोवृत्तीला अन्याय, विषमता, पारतंत्र्य इत्यादी जीवनाला ग्रासणाऱ्या गोष्टींचा तिटकाराच असतो. ही दृष्टी जेव्हा जेव्हा आधिभौतिकाकडे वळते तेव्हा तेव्हा तिला प्रथम मानवाचे दु:ख दिसते; व जीवनातील दु:खे कशाने निर्माण झाली आहेत ह्याचा शोध घेण्यातच ह्या मनाला स्वारस्य वाटत असते व ही दु:खे मनुष्यनिर्मित असून त्यांच्या मुळाशी माणसाची स्वार्थपरता आहे, अज्ञान आहे असे जेव्हा त्या मनाला आढळून येते तेव्हा एकीकडे त्याला दु:ख वाटते तर दुसरीकडे त्वेषाचे कड येतात. केशवसुतांच्या काव्यात आपणास या दोन्हीही भावना पदोपदी अनुभवावयास मिळतात. हरतऱ्हेचा अन्याय, हरतऱ्हेची विषमता, हरतऱ्हेचे दास्य, हरतऱ्हेची दास्यपरता पाहून त्यांचे हृदय एकीकडे पिळवटून जाते तर दुसरीकडे त्यामधून उफाळून बाहेर पडणाऱ्या शब्दात

त्यांच्या अंतःकरणातील संवेगाची भावना प्रगट होते.'' [३] या वृत्तीनेच हा बडा बंडवाला पुढे आला आहे. ' लोकनिंदाभय ' बाजूला फेकून ' या लोकी बघुनी कभिन्न सगळा अंधार कोंदाटला, सारावा दूरि तो जरातरि असा हेतू मने घेतला ' आहे.

केशवसुतानी ' मने ' घेतलेला हेतू ठीक अपला तरी तो साध्य झाला असे केव्हा मानायचे ? त्याचा मुक्काम कुठे ? ' साधू आणि असाधू यांचे समप्रकर्षी युग ' आले की मुक्काम. ते थांबायचे ठिकाण. पण मनासारखे सारे घडावे हे मनाचे झाले. पण तसे ते घडले तर ते जीवन कसले ? केशवसुताना याची जाणीव आहे. या जाणीवेने धैर्याला बळ दिले आहे. समजले आणि उमजले तेवढे जीवनाचे रूप जाणण्यात या धैर्याचे गम्य आहे, जीवनशक्तीची नांगी आहे. त्यामुळे 'जीवन निरर्थकच-शून्यच बेटे ' असे नाही तर बुऱ्याच्या निराकरणासाठी, घार आकाशात उडताना आपले पाय पोटात आणून, सारे बळ एकवटून झेप घेते तसे जरूर असते. डॉ. पां. दा. गुणे यांनी लिहिले आहे,'' नियम हे मनुष्याच्या सुखासाठी आहेत, मनुष्य नियमांकरता नाही. म्हणून जे नियम–मग ते सामाजिक असोत, व्यावहारिक असोत, धार्मिक असोत अगर राजकीय असोत–मनुष्याच्या सुखासाठी न होता दुःखकारक, जाचक होतात ते तोडले पाहिजेत. हे स्वातंत्र्यतत्त्व केशवसुतांच्या सर्व कल्पनांच्या मुळाशी आहे व म्हणूनच त्यांचे काव्य जिवंत जिव्हाळ्याचे व हालवून सोडणारे असे आहे. ' स्वतंत्रतेचे शाहीर ' या नात्याने ते आंग्लकवी शेली व जर्मन कवी शीलर यांच्या तोडीचे आहेत यात बिलकूल शंका नाही. त्या दोघांप्रमाणेच आपणाला सृष्टीचा–देवाचा–काही संदेश मानवजातीला सांगावयाचा आहे, आपले अवतारकृत्य उदात्त व दिव्य आहे असे केशवसुताना अखेरपर्यंत वाटत होते..... यामुळे आपले काव्य केवळ काही व्यक्ती अगर देश याकरिता नसून ते सर्व मानवजातीकरिता आहे, अशी आमच्या कवीची ( केशवसुतांची ) कल्पना असल्यास नवल नाही..... (म्हणूनच) केशवसुत नुसतीच प्रीतीची रडकथा गाणारे कवी नव्हते अगर नुसत्याच कोरड्या सृष्टिवर्णनांनी कालक्षेप करणारे कवी नव्हते; भोवतीचा खराखुरा प्रपंच विसरून लटक्या परमार्थाचा दंभ दाखविणारेही कवी नव्हते. परिस्थिती बरोबर ओळखणारे व शक्यतर परिस्थितीला वळण लावणारे ते प्रपंचकवी आहेत, रवींद्रबाबूप्रमाणे संत कवी नाहीत. केशवसुत जाज्वल्य आहेत. रविबाबूप्रमाणे सौम्य नाहीत; रविबाबू प्रगूढ व्यंगाचे भोक्ते आहेत.

---

३. कुलकर्णी प्रा. वा. ल. : ' साहित्य, ' ऑक्टो, १९४९ : ' केशवसुत : काही विचार ' : पृ. ५–६–७

काहीतरी गूढ, न उकलण्याजोगे, हृदयाने केवळ अनुभवावयाचे असे केशवसुताना काहीच दिसत नाही. परमार्थ, देव याविषयी विचार करण्यास केशवसुताना मुळी वेळच नव्हता. अगदी लहानपणातच प्रपंचातील–व्यवहारातील–अज्ञान, विषमता इत्यादींची कष्टप्रद जाणीव त्यांना पटली होती व त्या गोष्टींच्या निराकरणार्थच त्यांची कविता जन्माला आली असे म्हटल्यास हरकत नाही.''[४] हे घडले केशवसुत अर्धेमुर्धे भाजलेले कच्चे मडके नव्हते म्हणून !

धोंडा एक समीप हो पडुनियां होता तिथें त्यावरी
गेली दृष्टि मदीय, कौतुक तधीं झालें मनाभीतरीं
कां कीं त्या ध्वनिचें खरेंपण मला घोंड्यांत त्या भासलें,
काढूं बाहिर ते झटूनि, मग हें चित्तांत मीं घेतलें.

अशी ज्या केशवसुतांची झटापट त्यांची वेगळी झेपण कशी असेल ? धडाक्याने पुढे सरायची ज्याची हिंमत त्याने पुढेच सरावे, सरायचे. त्याने रंडागीते का गावीत ? वळण देणारी ' रण ' गीतेच गावीत, द्यावीत, लिहावीत. कारण आदेशच मुळी असा :

'' हातीं घेऊनियां निशाण कवि तो पाचारितो बांधवां–
' या हो या झगडावयास, सरसे व्हा, मेळवा वाहवा ! '
प्रेतेंही उठवील जी निजरवें, ती तो तुतारी करी
आतां नादवती, निरर्थ तर ती त्याची कशी चाकरी ?
'' आशा, प्रेम तसेंच वीर्य कवनीं तो आपल्या गाइल;
गेलें वैभव गाउनी स्फुरण तो युष्मन्मना देइल ... ... ''

असल्यानंतर न टळणारे होण्यमाण मनोवांच्छित वृत्तीने हाती आणण्यासाठी ' पुरुषार्थ नव्हे पडणे रखडत ! ' तरीही या वाटचालीत दुर्मुखलेल्यापुढे कधीमधी ' जायाचे जग का असेच ? ' असा विचार क्षणभर मनावरून झरझरून जातो. पण ' जगामधी या तुला कशाला परमेशे धाडिले ? ' या प्रश्नार्थकाने झरझरणे विरते; ' कोठे जातोस ? ' ने ते पुरेच विरते आणि मग शब्दांना आवाहन होते, ' शब्दांनो, मागुते या ! ' शेवटी शब्दच होऊन जाणाऱ्या शब्दांच्या दासांचे सामर्थ्य वाणी आणि अर्थ यात उभे असते. '' दैनंदिन जीवनातील नवा आशय काव्यरूपाने टिपण्यास प्रारंभ करणाऱ्या

---

४. ' मनोरंजन ' : ऑक्टो, १९१५ : पुस्तक २३ वे, पू. भा. ४ : ' केशवसुतांची कविता, ' पृ. १३५

केशवसुतानी शब्दातून घुमविलेला अर्थाचा ध्वनी वेदना वितळविण्यास साहाय्य करणारा आहे. म्हणून ' द्या उत्तेजन हो कवीस, न करा गाणे तयाचे मुके ' असा अवधानाचा चारा ते मागतात. त्यातून प्रमेयाची दोंदे पेलली जाणार आहेत.

हे सामर्थ्य वेदनानिग्रहात विनिमय पावणारे असले तरी वेदनानिग्रह ज्याद्वारा व्हावयाचा त्याचे म्हणून काही घटक आहेत. अरेबियन नाईट्स्मधल्या कोळ्याच्या कथेतील राक्षसासारखी अगडबंब वेदना आपली पाय पसरून पडली आहे आणि तुरकाटीने तिला ढकलून दूर करण्याचे असफल प्रयत्न सुरू आहेत असे नव्हे तर घटकाघटकावर हल्ले करून आखवंद ढिग कोसळून टाकण्याचे प्रयत्न सुरू आहेत. जेणे करून कार्य अधिक जलदीने घडण्यास मदत मिळणार आहे. हे घटक तरी कोणते ? एक: पारतंत्र्याबद्दलची असीम चीड–स्वातंत्र्यावरची अनिवार आसक्ती, दोन: जातिभेदाच्या कॅन्सरचा नष्टांश, तीन: मजुरादी असमर्थांना अन्न-वस्त्रआसरादी बाबींचा पुरवठा, चार: सोयऱ्याधायऱ्यांचा वियोग विरह असा हा मामला आहे. या साऱ्याच्या मुळाशी

सोन्याचे सरले अहा ! दिवस ते, आली निशा ही कशी
सौख्याचा नद तो सुकून पडलों या दुःखपंकीं फशीं !
कालक्रीडित हें बघून रडला, हें व्यस्त कांहीं नसे;
प्रौढत्वीं निज शैशवास जपणें बाणा कवींचा असे.

मनोव्यथा आहे. पण कालक्रीडिताने अश्रुंचे वाहवणे नाही तर तेही बदलू–बदलूच हा आत्मविश्वास आहे. पण म्हणून ' स्वोत्कर्षाचा रवि ' मावळून ' ऱ्हासाची निबिड रजनी छळाया ' पातल्याने ' दुःखाचा तोवरि खचित तो भोग आहे अम्हाला ! ' असे परंपरागत मन अधूनमधून म्हणत आहे पण कवी दैववादी नाही. कर्मवादीच आहे. नास्तिक्यात भेटणारे म्हणून जे एक आस्तिक्य असते ते अशा दृष्टीत भेटते. दुर्दैव्यांचे नशिबी ' स्वतंत्रतेची पहाट ' आणि ' उत्कर्षाचा दिन ' असेल की नाही अशी शंका मनाला चाटून जात असतानाच मित्राला आवाहन होते:

कोठें असशिल आतां मित्रा माझे ?
करीत असशिल काय काम तीं काजें ?
देशासाठीं शरीर झिजवायाला
स्फूर्ती आणित असशिल का कोणाला ?

म्हणजे देहाचा इच्छातारा देशावरील काळी निशा नष्ट करण्याच्या कामी खर्ची पडण्याच्या दृष्टीने लागलेला. कवीची ती मनोभावना. या मनोभावनेने 'अमुच्या कराहि यत्न व्हावेत' ही तीव्र इच्छा. आप्तापासून मित्रांपर्यंत साऱ्यांना त्यासाठी आवतण आहे. वस्तुतः आवतण जावे आणि मगच हलावे अशी काही ही बाब नाही. स्वेच्छेने पुढे यावे अशी ही मॅझिनीभावना. पण काळाचाही काही गुण असतो. पुढे सरायला, आहे तिथेच खिळवून ठेवायला आणि मागे हटवायला काळही कारण होतो. त्याचे चिरेबंदीपण कधी कधी माणसाच्या आकलनाच्या पल्याड असते. म्हणूनच जागे न झालेल्या, जागे होऊनही आपल्याबरोबर कुणी जागे झाले आहे काय हे डोळे किलकिले करून पाहात पाहात हालचालींचा विचार असणाऱ्या अंशाना जागे करण्यासाठी असली आवतणे जरूर असतात. दहाजणाना बरोबर न्यायचे तर 'चला ! चला !!' चा हाकारा द्यावाच लागतो. त्याखेरीज न हालणारे काही कमी नसतात. स्वतःला जमेल, झेपेल तेवढे सुरूच आहे, पण इतरांचा साह्यभार पोचला तर तेवढीच गती म्हणून मित्राप्रमाणे बापूला

बापू ! गड्या ! ध्वज उभा करशील काय ?
तूं देशकारण करूं झटशील काय ?
बापू ! जनांत दिवटी धरशील काय ?
स्वातंत्र्यदेव मनसा भजशील काय ?

अशी हाक दिली आहे. या साऱ्यात पोटतिडिकीने भरलेले एक आर्त आहे. ते 'एका भारतीयाचे उद्‌गार' मध्ये

देवा ! केव्हां परवशपणाची निशा ही सरून
स्वातंत्र्याचा द्युमणि उदया यावयाचा फिरून ?
केव्हां आम्ही सुटुनि सहसा पंजरांतूनि, देवा,
राष्ट्रत्वाला फिरुनि अमुचा देश येईल केव्हां ?

यात परिणत झाले आहे. पण मला पुनःपुन्हा एक गोष्ट जाणवते ती ही की, सामाजिक कवितेत केशवसुतांचा आढळणारा सर्वंकष आवेग आणि प्रक्षोभ त्यांच्या राजकीय मानल्या गेलेल्या कवितात का आढळत नाही ? काहीशा संथपणाने तिथले वातावरण थंड का राहते ? "तत्कालीन वातावरण राजकीय चळवळींपेक्षा सामाजिक आंदोलनांनी अधिक क्षुब्ध झाले होते." हे त्याचे एक कारण असेल किंवा दुसरेही

एक कारण संभवते: आमची देशभक्ती मुळातच क्षीण, संकटकाळी धडपडून जागी होणारी. इतरवेळी बरीचशी सुस्तावून पडणारी. अशा गाळाला फुंकर घालून चेतवावे लागते. सामाजिक कवितेच्या विषयसृष्टीतही याचे प्रत्यंतर मिळते. राजकीय स्वातंत्र्याबरोबरच सामाजिक स्वातंत्र्य हवे; त्याविना स्वातंत्र्याला पूर्णता नाही. कुणा ना कुणा एकाच्या अभावाने कुणा ना कुणाचे एक अर्धांग पक्षघात झाल्यागत अजागळासारखे किळसवाणेपणे लोंबत राहील, म्हणून सर्वच बाजूनी पूर्णता हवी; असा केशवसुतांचा विचार असला तरी सामाजिक कवितेत क्षुब्ध करण्याचे सामर्थ्य आधिक्याने आहे. 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' म्हणूनच निपजला. 'मजुरावर उपासमारीची पाळी' आल्यावर

सर्वांस देवा ! बघतोसि सारखा,
होतोस कां रे गरिबांस पारखा ?
कांहींस सुग्रास सदन्न तूं दिलें,
साधी अम्हां भाकरही न कां मिळे ?

असा धीट प्रश्न आला. आतापर्यंत देवाला दरडावून प्रश्न विचारला तो तुकारामांच्या उपेक्षित जिजाईनेच. 'काळतोंडचा विठचा' म्हणण्याचे साहस तिच्यानेच करवले. बाकी साऱ्यांनी केकांची आवली म्हटली. पण आदब राखून कळवळचाने मजुराने काहीसा तसाच प्रश्न विचारण्याचे धाडस केले. पुढे घडणाऱ्या रूद्राच्या रूपाचा असा छोटासा आविष्कार केशवसुतांच्या आशावादी–मानवतावादी–निष्ठेने केला आहे. मार्गाचे सूचन नसले तरी उरात पिचून गेलेल्यासाठी सद्भावयुक्त सहानुभूतीच्या धारांची वर्षा आहे. अर्थात मार्गसूचन हे काही केशवसुतांचे काम नव्हते–नव्हे ! ते आगरकर–टिळक–गोखले यासारखे विचारवंत महोदय करीतच होते. केशवसुताना त्याची गरज नव्हती. 'काहीतरी तरावया गावे' ची पठडी वळून 'साऱ्यांतरी तरवावया गावे' ची संथा घेतली ती आगरकर-टिळक यांच्या विचारांचे केवळ पुनर्लेखन किंवा नवलेखन म्हणून नव्हे. आंतरिक उचंबळीतून, जीवीच्या जिव्हाळचाने लिहिणाऱ्याला पुनर्लेखन जमत नाही. नव्या उन्मेषाची तीच तर मुळी गंमत आहे. समाजाच्या चेहऱ्यावरील जीर्णता आणि त्याच्या आचारविचारांना आलेली अपभ्रष्टता पिटाळायची तर निर्जीव पुनर्लेखन मूल्यहीनच होते. वंचिताजवळ जाताना शोकाचा सागरही निरुपयोगी असतो. असले काही तिथे लागीचेच नसते. तिथे अमिट संकटे लंघित करणारी झेपच उपयोगी ! कुजल्या–सडलेल्या आणि अधिकाधिक 'वर्स' होत चाललेल्या समाजाला उभे करायची हिंमत बाळगायची तर तसा रजेराच कामाचा. आयुष्यावर निराशेची

छाया असणाऱ्या, करपलेल्या हृदयासाठी निर्भरतेने गर्जणाऱ्या विचारांचे कल्लोळच हवेत. रुढीची–अन्यायाची गिधाडे भोवती घिरट्या घालीत असताना समाजाची होणारी अधोगती–अवनती रोखण्यास मानवी कर्तबगारीवरील भरवसा मोलाचा ठरतो. "बंधनातून सुटण्याची नूतनतर खटपट" करणाऱ्या केशवसुतांनी त्याचे दर्शन दिले आहे. चाललेल्या खडतर प्रवासात सोयऱ्याधायऱ्यांच्या स्नेहाने ते सात्त्विकसंपन्न केले आहे. अन्यथा आर्थिक टंचाईपासून 'एकलेपणाची आग' थंडावण्यापर्यंत, नाही म्हटले तरी जिथे सारे दिडक्या चालीने चालणारे तिथे मनाचा ताजेपणा राखण्यासाठी सगेसोयरे हवेतच. शेवटी समाजाचे नाते ऋणाचे, सग्यासोयऱ्यांचे रक्ताचे. पहिल्याहून दुसरे अधिक घट्ट. पहिल्यात देण्याघेण्याचा, फेडण्यासवडण्याचा भाग येतो. दुसऱ्यात 'फिफ्टी फिफ्टी' ची तडजोड नाही. रक्ताची तडजोड अशी कधीच असत नाही. 'जग फिरले तरी आपला कुणीतरी आहे, अगदीच एकटे नाही, शेवटी कुणीतरी येईल' ही गर्भाच्या धारणेबरोबर गर धरणारी भावना कुठलीही परिस्थिती येवो, कसलीही निराशा येवो, धीर देणारी असते. 'मित्रांची खोली लागलेली पाहून', 'गोष्टी घराकडिल मी वदता गडचा रे', 'नैऋत्येकडला वारा', 'आई ! ! आई !,' 'आई करिता शोक' सारख्या कवितांतून शोक आहे पण धीराच्या रूपाने तो उभा आहे. तिथे टिच्चून भरलेल्या भावना असल्या तरी असमाधानाचे भाले नाहीत. 'जीवित्व शोक–संकुल नाटक' खरे पण या धीरापोटी 'मी काल क्रमुनी असा, जड जगा काडीवजा लेखितो !' यातील 'जड जग' महत्त्वाचे आहे. शेवटी जीवनाचे सौंदर्य सत्याच्या ध्यासात, त्यासाठी प्राणाची बाजी लावून मिळविलेल्या विजयाच्या आत्मविश्वासात आहे. केशवसुतांच्याजवळ हे आहे. म्हणूनच जुनाटपणात स्वतःला गुरफटून घेण्यात त्यांना आनंद नाही. स्वतःचे सिद्धांत कुठल्यातरी साच्यात बसवण्याचा हव्यास नाही. केशवसुताना त्यात आनंदच नाही अर्थात् आपण काहीतरी नवीन लिहितो यात तो नाही तसाच 'नवी गीते' गाऊन आपण काहीतरी अलौकिक करीत आहोत यातही तो नाही. "नवा कमी नसून जुन्यावर ताण केली आहे" असे समीक्षकांनी म्हणावे असे केशवसुताना वाटत नाही. आपल्या अनुभूतीचा शोध घेत घेत भावोत्कटतेने जाणवले त्याचे शब्दांकन करण्यात त्यांना आनंद आहे. आधुनिक मराठी कवितेच्या प्रारंभकाळी केशवसुतानी ही जाणीव पक्की केली. वस्तुतः प्रा. वि. म. व गो. म. कुलकर्णीद्वय 'झपूर्झा' च्या संपादकीयात लिहितात त्याप्रमाणे; "चारचौघात मिसळण्याचा त्यांना कंटाळा होता. व्यावहारिक दृष्टया त्यांचे आयुष्य एकलकोंडे व एकमार्गी होते; त्यातच त्यांच्या साध्या, संकोची, मितभाषी, मानधन अंतर्मुख वृत्तीची भर पडलेली. **"Poet as dreamers should sit aloof, listeniug to the etherical voice of silence"**

ही त्यांची भूमिका असल्याने समानधर्मीयांचा मेळावाही त्यांनी आपल्याभोवती कधी गोळा केला नाही. आणि जगाने तर त्यांच्या एककल्ली, विमनस्क, नादी वृत्तीला उद्देशून 'मास्तर भ्रमिष्ट आहेत झालं!' असा शेरा केव्हाच मारून टाकला होता!....'' केशवसुतांच्या या बऱ्याचशा नीरस व नीरंग अशा जीवनचित्राच्या पार्श्वभूमीवर त्यांचे काव्यात्म प्रखर व्यक्तिमत्त्व खूप उठून दिसते. केशवसुत म्हटले की, तेजाचा अभिनव बाणा मिरविणारे, बंडाचा झेंडा हातात घेऊन धामधूम उडवून देणारे, 'कोण मला वठणीला आणू शकतो ते पाहू' असे उद्दाम आव्हान देणारे, 'जुने जाऊ दे मरणालागुनि' असा पुकारा करणारे, 'देवदानवा नरे निर्मिले' असे ठणकावून सांगणारे एक साहसी, आक्रमक, विमुक्त, घणाघाती व्यक्तित्व डोळ्यासमोर उभे राहते; यातच त्यांच्या व्यक्तित्वातील गूढ, विमनस्क, आर्त अशा काही छटा मिसळल्या जातात आणि मग त्याला विलक्षण गहिरेपणा प्राप्त होतो.... केशवसुतांच्या कवितेपेक्षा तसूभर अधिकच त्यांच्या या 'काव्यात्म व्यक्तित्वा' चे सौंदर्य वाचकाला वेढून टाकते....''[५] केशवसुतांच्या काव्यात्म आविष्काराचे प्रत्ययकारी चित्रण आणि त्यातून व्यक्त होणारा वेदनानिग्रहाशी निगडित असणारा कवीचा आनंद– केशवसुतांच्या कवितेत खरे मोलाचे काय असेल ते हेच होय. या मोलाचा प्रभाव त्यांच्या निसर्गापासून प्रेमापर्यंतच्या अनेक कवितांतून दिसतोच पण तो अधिक दिसतो कवी आणि काव्यविषयक कवितांतून! 'कविता आणि कवी', 'कवितेचे प्रयोजन', 'कल्पकता', 'शब्दांनो, मागुते या!', 'स्फूर्ती', 'काव्य कोणाचे?' 'प्रतिभा', 'आम्ही कोण?' इत्यादी कवितांतील केशवसुतांचा एतद्विषयक दिमाख अगदी ओझरत्या नजरेनेही पाहून घ्यावा. संत-पंत-तंत काव्याच्या भूमीतून निपजलेल्या केशवसुतानी घटपटादी खटपटीच्या जंजाळात असलेल्या कवितेच्या हेतूला अलोट चैतन्य प्राप्त करून दिले. 'अस्मत्समाजातुनी शिथिलता' जाताना आणि 'युरोपीय उमदे राहून वाखाणिले' जात असताना 'विश्वामाजी पसरत जाणारी विभूती' गमलेले केशवसुत स्वतःतल्या बुद्धीच्या निश्चिततेने 'हृदयातुनि न जे बोल, निघती ते सगळे फोल' असे धीरशीलतेने सांगत होते. 'सोमाचा रस वेदकाळच्या ऋषिवर्यांनी उकळीला, शेष तयाचा द्या तर लौकर पिपासु जे त्या आम्हांला!' मधून केशवसुतांच्या आख्ख्या व्यक्तित्त्वाचे सावट मिळत होते. 'सभारूपी पाहुनि' काव्याचे नटणे नसून साऱ्या जीवनाला कवटाळणारी ती सोमशक्ती; याच्या घोष-चलनात केशवसुतानी स्वतःच्या दमदार आत्माविष्करणाबरोबर मोठा आनंदही मानला आहे. केशवसुतांच्या 'जागल्या'च्या भूमिकेत

---

५. झपूर्झा : पृ. ११-१३

त्यांच्या आत्म्याचे आवाहक आत्माविष्करण पुरेपूर आहे : तिच्यामध्ये कलावेधी किमयाच नाही, केशवसुतांच्या कवितेतील विचारधारा ही केवळ वाङ्मयिकच नाही; तर बहुतांशी सामाजिक व सांस्कृतिकही आहे.

केशवसुत सामाजिक काव्याबरोबर आत्मपर चिंतनात्मक कवितेत अधिक रंगले आहेत. आत्मपर चिंतनात्मक कविताही अधिक रसमधुर आहे. संख्येने थोडकी पण भावगर्भ रसवत्तेने मोलाची आहे : तुकारामांच्या पाखंडखंडनाच्या परखडतेने आणि रामदासांच्या घणाघाती ठोसरपणाने, दिलेल्या चंडदर्शनाबरोबरच केशवसुतानी स्वतःचे जीवन, स्वतःचे विश्व आणि जग–जीवनाभोवतीचा परिसर यातल्या भावकोमल वृत्तीप्रवृत्तींचे चित्रणही केले आहे.

अनेक सुहृदांच्या माध्यमातून 'स्व' चे आत्माविष्करण घडले आहे, साधले आहेः तीत वियोगाची उदासता, दुरावलेल्या बाल्याचा निदिध्यास, हरपलेल्या श्रेयाची संवेदना आणि वैफल्याची शोकसंकुलता आहे पण साऱ्याचा उपसर्ग 'स्वतः'लाच होणारा आहे, इतराशी संबंध असलाच तर तो 'उपसर्गा'चा मात्र नाही.

केशवसुतांच्या आत्मपर चिंतनात्मक कवितेचे विश्व स्वतः, स्वतःचे घर, खेडे, त्या खेड्याच्या घरातील आपली माणसे, त्यांच्या स्मृती या साऱ्यांच्या दर्शनाशी निगडित आहे. त्यामुळे 'ते रम्य बालपण' आठवते पण आता ते गेले या जाणिवेने मन व्याकुळही होते. झाल्यागेल्या चुकांची याद येते आणि पश्चात्तापाने अंतःकरण जळतही राहते. भटक्यासारखे जीवन कंठावे लागले हे खरे पण जीवनाने लोभावून विविध स्थलकालाशी जोडलेल्या नात्यागोत्यामुळे हे घडत राहते. या स्नेहसूत्रात श्वासाशी श्वास मिळालेले असतात, अश्रूंच्या भाराने उभारी–माघारी घडलेली असते. केशवसुतानी अशा वास्तू, वास्तू-स्थानांचे आत्मपर कवितांतून भावपूर्णतेने

## तीन केशवसुतांची कविता : 'घनतमिस्त्र' आणि 'हरपले श्रेय'

पूजन केले आहे, अर्चन मांडले आहे. मानवी जीवनाचा आत्मा आप्तात अडकून पडलेला असतो, आत्म्याला आत्म्याचा श्वास मिळाल्याखेरीज प्राण धारणाच मुळी अधुरी राहते, अपुरी होते. केशवसुतासारखा सर्जनशीलतेवर अनिवार निष्ठा असणारा काव्यात्म व्यक्तित्वाचा कवी आपल्या गावाहून येणाऱ्या वाऱ्यानेही पुलकित होतो, हर्षविभोर होऊन उठतो; त्यात ह्या आत्म्याचे तेजःकण दृष्टीस पडतात. शहाळ्यातील रसपानाने मन एकदम निवांत व्हावे तसे होते. कर्मकटकटी विसरल्या जातात, वियोग दुरावतो, विरह नाहीसा होतो. डोळ्यांसमोर मग उरते जन्मधरा, उंच डोंगर, खोल नद्या, तुंग शिखरे, ( आस्वर्गात जणु चढलेली महात्म्यांची मानसे ! ) सुंदर झाडया– असे खूप. खूप कितीतरी. मग भावनेने तुडुंब भरलेले कवीचे मन बोलते, "तान्हा बाळचि राहतो तर किती ते गोड होते असे ! " पण आता ते शक्य नसते, हरपलेले पुनः न येण्याच्या वाटेवर असते. शोक–संकुल जीवन–नाटक केवळ आठवावर जगण्याची वेळ येते, गत्यंतरच नसते. हाती यावे असे वाटते ते येत नसते. आलेले नसते. आलेले असते ते कधीच गमावलेले असते. समाधान नसते. मग स्मृतींवर जगणे एवढेच– अगदी एवढेच– हाती राहते. त्यातच 'आपल्या' साठी काही करायला हवे. पण करता आलेले नाही, द्यायला हवे पण देणे शक्य झालेले नाही. आर्थिक कुचंबणेमुळे असेल, भटकन्तीच्या तणातणीमुळे असेल, स्मृती गहिरी बनणे अटळ होते, किमान होतेच. मग केशवसुतांच्या ह्या गहिऱ्या स्मृतीतून जीवित्वाच्या शोक–संकुल नाटचाचे प्रवेश एकामागून एक सरकू लागतात. कधी त्यांचे स्वरूप आवेगी असते, कधी निवांत संथ ....

जीवनाचे हे शोक-संकुल नाटक जीवीचा जिव्हाळा, भावनांचा ओलावा, उत्कटतेची आळवणी आणि त्यानुसार जीवाचे जगणे यावर उभे असते, जगाचे जीवन उभे करते. आपल्या आप्त-स्नेह्यांचा, परिचित–अपरिचितांचा त्यात क्रम पहिला. जीवन धारणेचे ते मूलाधार. प्रामुख्याने, वैयक्तिकतेतून उद्भूत होणारे हे मूलाधार निर्वैयक्तितेत संक्रात होतात, समधात बनतात. किंबहुना त्या दिशेनेच त्यांचा चेहरा–मोहरा असतो : त्यासाठी आपल्या गावावरून, नैऋत्येकडून येणाऱ्या वाऱ्याने झपाटून जाणारे केशवसुत सह्यगिरीच्या पायथ्याला असणाऱ्या कोकणातील आपल्या खेडचात शिरतात. मनाचा झपाटा इतका तीव्र व्हावा असे तिथे काय असते ? तिथे असतात उंच डोंगर, उंच भारी कडे, धो धो पडणारा पाऊस आणि माजून राहिलेले घनदाट रान. हे रूप काही अनोखे नव्हे पण 'मूर्तिभंजक' अज्ञेयवादी कवी "अशा ठायीं देव तो स्वयें राहे ! " असे गुणगुणतो. जितकी 'तुतारी' 'स्व प्राणाने' फुंकतो, तितकीच ही

निष्ठा आर्जवाने गर्जून सांगतो. त्या सांगण्यात देवत्वावरील सर्जनशीलतेच्या अधिष्ठानावरील श्रद्धेचे निर्देशन आहे, निर्देश निरर्थक नाही. पण अशा अधिष्ठानासाठी घर हवे. छप्पर हवे. जिथल्या वाऱ्यानेही हर्षविभोर होऊन उठावे तिथे ' हे माझे ' घर म्हणून सांगण्यासाठी घर नसावे ? कवीला त्याची खन्त आहे·

अहा ! अज्ञात स्थळीं अशा, मातें !
एक गवतारू खोप रहायातें,
शेतवाडी एक ती खपायाला,
लाधती, तर किति सौख्य मन्मनाला !

पण नाही. ते काही हाती नाही. जे जे असायला हवे पण जे जे म्हणून हाती नाही त्याबद्दल काळजीची काजळी भरून आहे : जीवनप्रवासात कसेतरी जगणे, कसेतरी चालणे सुरु आहे. काही उभारू, काही स्थिराऊ शकत नाही; याची जळणारी जाणीव मनाशी आहे. त्यामुळे यौवनातील कविता काहीशी काजळून गेली आहे. पण तिचे क्षेत्र मर्यादितच आहे. कारण दुर्मुखलेल्या कवीला शिक्षक वामन शिवराम पंडित त्याच्या दुमुखलेपणाची जाणीव करून देतात तेव्हा त्याचा आत्मा जागा होतो, स्वाभिमानाने उजळून निघतो : " तुम्ही नाही तरी सुतादि तुमचे धातील तो प्राशुनी " कोणीही पुसणार नाही, ' कवि तो होता कसा आननी ' असे मार्मिकतेने सांगून राहतो. नैसर्गिक विकृती हे दुर्दैव, त्याच्या व्यथा साहणे खडतरतेचे पण म्हणून जीवनासक्तीचे मोल संपलेले आणि सौंदर्य गमावलेले असते असे नव्हे. त्याच्या आत्म्याचा हुंकार साद–पडसाद उमटवीतच असतो. या हुंकाराने आपल्या सग्यासोयऱ्यांना मायेने घातलेली हाक तो जिव्हाळ्याला पारखा नाही याची साक्ष पटवते. बाह्य सौंदर्याहून अंतःसौंदर्य असे मोलाचे बनून येते. त्यामुळेच उदासीन, भग्न, दुर्मुखलेल्या कवीने आपल्या आप्तांचे केलेले रूपचिंतन जीव वेधून घेणारे आहे. या रूपचिंतनाच्या प्रेमभक्तीतील चिरंजीवी सुखस्पर्शाने सारे वैफल्य सांडून गेले आहे. मात्र स्मृतींनी हृदय उलून आले आहे, भेटीच्या तीव्रतेने काया मोहरून गेली आहे. त्यातूनच यशोदेच्या नेत्रांनी पाहणाऱ्या आणि कौसल्येच्या अंतःकरणाने जपणाऱ्या आईचा आठव होतो. स्वप्नातही साद घातला जातो, प्रतिसाद मिळत नाही. जीव व्याकुळ होतो, आर्त बनतो. प्रसंगी कोसळणाऱ्या विश्वाच्या भाराखाली स्वतःला चिरून घेऊन ' स्वतः ' च्या रक्षणाचा वसा सांभाळणारी आई–आईकडून प्रतिसादच येत नाही. साद येण्यासाठी अस्तित्व हवे असते पण मरणाच्या रूपाने ते वातावरणात कधीच विरून गेलेले असते. बाकी असते ते रुद्रगोड स्मृतींच्या रंगाने रंगलेले, गंधाने गंधित झालेले ! या गंधातून

तीव्रता प्रगटते ती अंतरलेल्या पायांच्या दर्शनाची...केवळ दर्शनाच्या उत्सुकतेने लोचनात पूर दाटतात, पादरजी कोसळून धन्य होण्याची आकांक्षा बळावते. पण एवढ्यानेच सारे ठीक बनते तर किती बरे होते ? पण घडत नाही. आईचे असणे साऱ्यांनाच मूल्य देते, नसणे सारेच शून्यवत् बनवून टाकते. मग या 'कठिण जगी' 'छिद्र काक सारे' होतात. 'करुणेचे लेशवारे' ही मिळेनासे घडतात. पोटात अपराध घालून, हाती धरून सांगाती यायला कुणी राजी नसतात. सत्यव्रताच्या सामर्थ्याहूनही जननीच्या प्रेमाचे सामर्थ्य श्रेष्ठ, मानवी जीवनाहूनही मोलाचे. तेच नाही 'म्हणजे राखाडीच्या प्राप्ती' खेरीज जीवनाला अर्थ नाही. पण जगायचे म्हणजे प्रेमाच्या गाभ्याचा शोध घ्यावाच लागतो, अंतराळात झेप घेण्याची मनीषा ठेवावीच लागते. निरपेक्ष प्रेम जीवनात नेहमीच दुर्मिळ असते, पण हाती येईल त्यावर, तेवढ्यावर जीवनाचे स्तंभ उभे करावेच लागतात. उरते मग प्रिय पत्नी आणि सुहृद : वि. स. खांडेकर ह्यांनी 'केशवसुत : काव्य आणि कला' मध्ये केशवसुतांच्या पत्नीविषयी म्हटले आहे : "केशवसुतांचे धाकटे बंधू सीताराम केशव दामले यांनी त्यांची पत्नी रूपाच्या दृष्टीने फार सामान्य होती, असे सांगितले आहे. ते खरेही असेल. जगात खरी सुंदर माणसे किंवा खरी बुद्धिमान माणसे काय, थोडीच असतात. पण भावनाशील मनुष्य प्रेम करतो ते काय केवळ रूपावर ? छे ! फुलाच्या रंगापेक्षा त्याचा सुगंधच त्याला अधिक प्रिय असतो. सी. के. दामले यांनी केशवसुतांच्या पत्नीविषयी 'त्या अत्यंत गरीब, साधेसुधे व सरळ स्वभावाच्या होत्या' असे लिहिले आहे. त्या जशा सुरूप नव्हत्या तशा शिकलेल्याही नव्हत्या. केशवसुतांचे काव्य कदाचित् त्यांनी उभ्या जन्मात वाचले नसेल. पतीच्या नोकरीच्या अस्थिरतेमुळे आणि सदैव गरीबीतच संसार करावा लागल्यामुळे त्यांना पुष्कळ कष्ट काढावे लागले असतील. पण अशा प्रकारच्या कोणत्याही अंतरायामुळे या पतीपत्नींचे प्रेम उणे झाले नाही. उलट ते दुणावतच गेले." [१] 'फारा दिवसानी भेट' मध्ये 'उभयीं हृदयीं त्वरित उमाळा' आला आणि 'उभयाश्रुजले मिसळुनि गेली!' ती या दुराव्यामुळेच होय, अंतराय विस्तारला म्हणून नव्हे ! 'फुलांच्या भाषेमध्ये रचलेले रूचिर काव्य माल्याच्या मिषाने तू ग्रहण कर' ही केशवसुतानी पत्नीला केलेली विनंती एकजीवतेचीच निदर्शक नव्हे काय ? केशवसुतासारख्या कुटुंबवत्सल कवीच्या पिंडाचा तो धर्म हा भाग त्यात आहेच पण जीवनच मुळी असे की, अशी एकजीवता (आणि त्यातून आर्तताही) येण्याखेरीज गत्यंतर नाही अशी स्थितीही आहे. त्यातूनच स्नेहाचे अनेक धागेदोरे आठवतात. मन हळवे बनते. विरहाग्नीने

---

१. पृ. ५१. ५२

निष्ठा आर्जवाने गर्जून सांगतो. त्या सांगण्यात देवत्वावरील सर्जनशीलतेच्या अधिष्ठानावरील श्रद्धेचे निर्देशन आहे, निर्देश निरर्थक नाही. पण अशा अधिष्ठानासाठी घर हवे. छप्पर हवे. जिथल्या वाऱ्यानेही हर्षविभोर होऊन उठावे तिथे 'हे माझे' घर म्हणून सांगण्यासाठी घर नसावे ? कवीला त्याची खन्त आहे·

अहा ! अज्ञात स्थळीं अशा, मातें !
एक गवतारू खोप रहायातें,
शेतवाडी एक ती खपायाला,
लाधती, तर किति सौख्य मन्मनाला !

पण नाही. ते काही हाती नाही. जे जे असायला हवे पण जे जे म्हणून हाती नाही त्याबद्दल काळजीची काजळी भरून आहे : जीवनप्रवासात कसेतरी जगणे, कसेतरी चालणे सुरु आहे. काही उभारू, काही स्थिराऊ शकत नाही; याची जळणारी जाणीव मनाशी आहे. त्यामुळे यौवनातील कविता काहीशी काजळून गेली आहे. पण तिचे क्षेत्र मर्यादितच आहे. कारण दुर्मुखलेल्या कवीला शिक्षक वामन शिवराम पंडित त्याच्या दुमुखलेपणाची जाणीव करून देतात तेव्हा त्याचा आत्मा जागा होतो, स्वाभिमानाने उजळून निघतो : "तुम्ही नाही तरी सुतादि तुमचे धातील तो प्राशुनी" कोणीही पुसणार नाही, 'कवि तो होता कसा आननी' असे मार्मिकतेने सांगून राहतो. नैसर्गिक विकृती हे दुर्दैव, त्याच्या व्यथा साहणे खडतरतेचे पण म्हणून जीवनासक्तीचे मोल संपलेले आणि सौंदर्य गमावलेले असते असे नव्हे. त्याच्या आत्म्याचा हुंकार साद–पडसाद उमटवीतच असतो. या हुंकाराने आपल्या सग्यासोयऱ्यांना मायेने घातलेली हाक तो जिव्हाळचाला पारखा नाही याची साक्ष पटवते. बाह्य सौंदर्याहून अंतःसौंदर्य असे मोलाचे बनून येते. त्यामुळेच उदासीन, भग्न, दुर्मुखलेल्या कवीने आपल्या आप्तांचे केलेले रूपचिंतन जीव वेधून घेणारे आहे. या रूपचिंतनाच्या प्रेमभक्तीतील चिरंजीवी सुखस्पर्शाने सारे वैफल्य सांडून गेले आहे. मात्र स्मृतींनी हृदय उलून आले आहे, भेटीच्या तीव्रतेने काया मोहरून गेली आहे. त्यातूनच यशोदेच्या नेत्रांनी पाहणाऱ्या आणि कौसल्येच्या अंतःकरणाने जपणाऱ्या आईचा आठव होतो. स्वप्नातही साद घातला जातो, प्रतिसाद मिळत नाही. जीव व्याकुळ होतो, आर्त बनतो. प्रसंगी कोसळणाऱ्या विश्वाच्या भाराखाली स्वतःला चिरून घेऊन 'स्वतः' च्या रक्षणाचा वसा सांभाळणारी आई–आईकडून प्रतिसादच येत नाही. साद येण्यासाठी अस्तित्व हवे असते पण मरणाच्या रूपाने ते वातावरणात कधीच विरून गेलेले असते. बाकी असते ते रुद्रगोड स्मृतींच्या रंगाने रंगलेले, गंधाने गंधित झालेले ! या गंधातून

तीव्रता प्रगटते ती अंतरलेल्या पायांच्या दर्शनाची...केवळ दर्शनाच्या उत्सुकतेने लोचनात पूर दाटतात, पादरजी कोसळून धन्य होण्याची आकांक्षा बळावते. पण एवढ्यानेच सारे ठीक बनते तर किती बरे होते ? पण घडत नाही. आईचे असणे साऱ्यांनाच मूल्य देते, नसणे सारेच शून्यवत् बनवून टाकते. मग या 'कठिण जगी' 'छिद्र काक सारे' होतात. 'करुणेचे लेशवारे' ही मिळेनासे घडतात. पोटात अपराध घालून, हाती धरून सांगाती यायला कुणी राजी नसतात. सत्यव्रताच्या सामर्थ्याहूनही जननीच्या प्रेमाचे सामर्थ्य श्रेष्ठ, मानवी जीवनाहूनही मोलाचे. तेच नाही 'म्हणजे राखाडीच्या प्राप्ती' खेरीज जीवनाला अर्थ नाही. पण जगायचे म्हणजे प्रेमाच्या गाभ्याचा शोध घ्यावाच लागतो, अंतराळात झेप घेण्याची मनीषा ठेवावीच लागते. निरपेक्ष प्रेम जीवनात नेहमीच दुर्मिळ असते, पण हाती येईल त्यावर, तेवढ्यावर जीवनाचे स्तंभ उभे करावेच लागतात. उरते मग प्रिय पत्नी आणि सुहृद : वि. स. खांडेकर ह्यांनी 'केशवसुत : काव्य आणि कला' मध्ये केशवसुतांच्या पत्नीविषयी म्हटले आहे : "केशवसुतांचे धाकटे बंधू सीताराम केशव दामले यांनी त्यांची पत्नी रूपाच्या दृष्टीने फार सामान्य होती, असे सांगितले आहे. ते खरेही असेल. जगात खरी सुंदर माणसे किंवा खरी बुद्धिमान माणसे काय, थोडीच असतात. पण भावनाशील मनुष्य प्रेम करतो ते काय केवळ रूपावर ? छे ! फुलाच्या रंगापेक्षा त्याचा सुगंधच त्याला अधिक प्रिय असतो. सी. के. दामले यांनी केशवसुतांच्या पत्नीविषयी 'त्या अत्यंत गरीब, सालस व सरळ स्वभावाच्या होत्या' असे लिहिले आहे. त्या जशा सुरूप नव्हत्या तशा शिकलेल्याही नव्हत्या. केशवसुतांचे काव्य कदाचित् त्यांनी उभ्या जन्मात वाचले नसेल. पतीच्या नोकरीच्या अस्थिरतेमुळे आणि सदैव गरीबीतच संसार करावा लागल्यामुळे त्यांना पुष्कळ कष्ट काढावे लागले असतील. पण अशा प्रकारच्या कोणत्याही अंतरायामुळे या पतीपत्नींचे प्रेम उणे झाले नाही. उलट ते दुणावतच गेले." [१] 'फारा दिवसानी भेट' मध्ये 'उभयीं हृदयीं त्वरित उमाळा' असा आणि 'उभयाश्रुजले मिसळुनि गेली!' ती या दुराव्यामुळेच होय, अंतराय विस्तारला म्हणून नव्हे ! 'फुलांच्या भाषेमध्ये रचलेले रूचिर काव्य माल्याच्या मिषाने तू ग्रहण कर' ही केशवसुतानी पत्नीला केलेली विनंती एकजीवतेचीच निदर्शक नव्हे काय ? केशवसुतासारख्या कुटुंबवत्सल कवीच्या पिंडाचा तो धर्म हा भाग त्यात आहेच पण जीवनच मुळी असे की, अशी एकजीवता (आणि त्यातून आर्तताही) येण्याखेरीज गत्यंतर नाही अशी स्थितीही आहे. त्यातूनच स्नेहाचे अनेक धागेदोरे आठवतात. मन हळवे बनते. विरहाग्नीने

---

१. पृ. ५१. ५२

चेत:कंद भाजून निघतो. पण त्या भाजण्यातही आशा फुलत राहते. तिने भोवतीचा अंधार वितळतो आणि जाणीव होते ती पाशाची:

पाशांविण या कोठें कांहीं नाहीं,
पाशांकरितां चाले अवघें कांहीं;
पाशांतुनि या सुटतां सुंदर तारे,
तेज तयांचे विझूनि जाई सारें

यातूनच सारे उभे राहिले आहे. पाशात गुंतून पडण्याच्या ह्या रीतीत समर्पणाच्या वृत्तीची अटळता आहे. नियतीची ती नीतीच असते. करू म्हटल्याने ती दूर करता येत नाही आणि सुटू म्हटल्याने तीमधून निसटता येत नाही. बंधनांनी जखडलेल्या बंदिस्त जीवनाचे सारे रूपसौंदर्य या बंधनक्रमातच सामावलेले आहे. म्हणूनच जवळीक जरूर. 'गोष्टी घराकडील' त्यासाठीच येतात. या रसनिर्भर गोष्टीत पाशांचे बंधन अंतर्भूतच, खेरीज हर्षखेदाच्या नावनिशाण्या आणि खाणाखुणा यांचे उफाळणे – फुटणेही आहे. तुकोबानी विठ्ठलचरणी समर्पित होताना "रूपीं गुंतले लोचन । पायीं स्थिरावलें मन" असे म्हटले आहे. केशवसुतांच्या ठायी 'बंधनीं गुंतले लोचन । स्नेही स्थिरावलें मन' असे झाले आहे. त्यात अधिकतर प्रत्यक्ष व्यक्तीपेक्षा त्यांच्या मानसप्रतिमांचे आणि त्यातूनही त्यामागील जीवनधारांचे संकीर्तन आहे.

या आत्मपर संकीर्तनातून – विशेषत: आत्मपर चिंतनसूक्तांतून – केशवसुतांचा जीवनविचार फुलून आला आहे. तो आत्मपरतेने रंगलेला आहेच पण जगाच्या दाहकतेने बेमालूम रंगून गेला आहे. अलौकिक चैतन्यशक्तीच्या हातांनी रेखलेली मानवी जीवनाची गंधर्वकहाणी म्हणजे जीवन, अशी एक सर्वसाधारण व्याख्या आढळते. पण केशवसुत लिहितात,

"अमुचा पेला दु:खाचा,
डोळे मिटुनी प्यायाचा,
पितां बुडाशीं गाळ दिसे,
त्या अनुभव हें नाव असे !"

पण या अनुभवाचे 'अमृत' बनून कवीच्या जीवनात उभे आहे. इतरांच्या जीवनात त्याला ते पसरावयाचे आहे. "मरून जाऊ एक दिनीं" हे सत्य असले तरी अंतिम घटकेची सिद्धीची वेळा साधण्यासाठी हे करायला हवे. कारण त्यात चिरंतनाचा

शोध आहे : जीवन म्हणजे काही जन्म आणि मृत्यु यांची नोंद नव्हे. स्वर्गसमक्षतेच्या निर्मितीत परिणत होणारा चिरंतनाचा सातत्याने चाललेला तो अखंड शोध आहे. असा विनिमय घडला आणि परिणाम साधला तर कवी तृप्त आहे. आलेले हाती घेऊन पुढे धावता येईल अशी कवीची भावना आहे. केशवसुत त्राग्याने बोलतात, विकलतेने लिहितात, वैफल्याने खोंगी घालून बसतात असे वाटतात म्हणून निराश दिसतात. कवीही अखेर माणूसच. त्यालाही नैराश्य आले तर नवल नाही. पण इथली निराशा स्वर्गसमक्षतेच्या मार्गात येणाऱ्या अडथळ्यामुळे आलेली, इतर कुठली नव्हे. 'यात्रिक' कर्ते शरच्चंद्र मुक्तिबोध लिहितात, "त्यांची निराशा म्हणजे ध्येयमार्गावर चालताना होणारी निराशा!" कारण उघड आहे, स्पष्ट आहे. स्वप्नहीन नसलेल्या जीवनात फुलणारी ध्येये मुळी जीवनाचीच निर्मिती करणाऱ्या सळसळत्या चैतन्याचा आविष्कार असतात, आणि त्यांचा मोहरा असतो 'स्वर्गा' कडे! म्हणून केशवसुतांची निराशा व्यावहारिक– प्रापंचिक– समजून अवमूल्यन घडू नये. किंबहुना ती निराशाही ठरू नये. ध्येयमार्गावरील विलक्षण धुंदीचे ते चढउतार, आरोह– अवरोह, आवेग– प्रवेग मानले तर विघडणारे नाही. म्हणूनच केशवसुतानी "नाहीं स्वप्न–न–भास वा बुडबुडा; जीवित्व साचें असें!" असे मानले आहे, अखेरत: ते सत्य आहे: अशाश्वत असले, नश्वर असले, क्षणभंगुर असले; नव्हे ते सारे आहेच पण त्याचे सारखे रूपांतर–वेषांतर सुरूच आहे. ते संपलेले नाही. ते संपलेले किंवा मिटलेले नाही तोवर वळणारे आणि फिरून तेवणारे ते 'सत्य'च नव्हे काय? स्वर्गसमक्षतेचा सातत्याने अट्टाहास सुरू आहे तो ते 'असत्य' म्हणून नव्हे तर 'सत्य' मानूनच होय. या सत्याच्या प्राप्तीच्या वेदना चंद्रप्राप्तीइतक्याच दुस्सह असणार हे उघड आहे. पण या वेदनाहूनही त्यांचा वेद करण्याची माणसाजवळची ताकद मोठी आहे, अजिंक्य आहे. पर्णांवर दंवाचे थेंब चमकावेत तसे काळाच्या पडद्यावर जीवन चमकत असते, स्थिरावत असते, कोसळत असते पण म्हणून स्वर्गसमक्षतेची आसक्ती सुटलेली नसते. ही ध्येयकल्पना उराशी कवटाळून असणाऱ्यांच्या ठायीचे मनोधैर्य आणि तिच्या वाटचालीचा खडतर प्रवास ह्यात निराशा कुठे बसते? कुठे असते? पुढेच सरणाऱ्या जीवन–चेतनेत निराशा सामावत नाही. निराशेचे पंख जळून खाक होत असतात, आशेचे अंकुर फुलत असतात. जीवनत्वाचा घेतलेला वसा जीवनाला टाकता येत नाही आणि जगण्याचे व्रत मरेपर्यंत सोडता येत नाही. तिथे निराशेच्या दाहकतेत भाजून निघण्याला अर्थ काय? कायमचे मूक बनण्यात हशील काय? संसाराला समर गणणाऱ्या आणि 'झटुनि भिडुनि द्या प्राण' असे आवेगाने म्हणणाऱ्या केशवसुताना 'पृथ्वी' 'स्वर्ग' बनत नाही याचेच दु:ख व्हावे. अन्य कशाचे व्हावे? कशाला व्हावे? कशासाठी व्हावे?

प्रयोजन तरी काय? त्यासाठी का परमेशाने ह्या जगामध्ये धाडले आहे? दुःखाच्या प्याल्यातील पृथ्वीच्या नवनिर्माणाचे हे सामर्थ्य स्वर्गाच्या सौंदर्य–सामर्थ्याहूनही अनोखे आहे. तरीही टीकाकार केशवसुतांच्या 'पराभवांची रहस्ये' सांगतात. धपापत्या उराने दलित हृदयाचा गाढोद्वेग मांडीत असतात.

पण टीकाकारांच्या या मांडण्यात वेग असला तरी त्याला वजन नाही. 'या लोकी कभिन्न सगळा अंधार कोंदाटला' हे खोटे नाही, मुळीच खोटे नाही. पण त्यातच रूतणे नाही. 'तेजाच्या उगमाकडेस' चालणे सुरूच आहे. ते थांबलेले नाही, थंडावलेले नाही. कारण 'पृथ्वीस्थाने' 'स्वर्गस्थाने' बनणे जरूर. त्यासाठी 'आला क्षण गेला क्षण' असे सांगणारे घडयाळ आहे. लवाजम्याचे हत्ती झुलतात तिकडे लक्ष जाऊ नये हवे तर, पण इकडे द्यायला हवे. गतीतच श्रेय असणाऱ्या या प्रवासात पृथ्वीचे रिकामे देव्हारे भरले जाणार आहेत. सुखाचा शोध लागणार आहे. पण तो सहजासहजीचा नाही. अधूनमधून काही उफाळणार आहे आणि निवणारही आहे. 'तिमिरामधेच तिमिरामधून' चालावे लागणार आहे. मात्र घडीभर मध्येच ऊन पडणार आहे; अभ्रे उडूनही जाणार आहेत. पण अगदीच तिमिर असे नाही. पण येणारा 'घनतमिस्रा' चा काळाकुट्ट पट्टा 'खुशालीचे क्षीणत्व' जाणवून देणार हेही उघड आहे. त्याच्या जीवघेण्या मिठीने "काळोखाच्या जगामध्ये या, मृत आशांच्या चितावरूनि या, पिशाच्च माझे भटकत आहे, शांति नसेचि तया!" अशा जीव जाळणाऱ्या अशांतीचे गीत ऐन यौवनात फुटणारच पण रम्य सुरलोकाच्या अन्वेषणवेडात मनात गाणेही जागे होणार.... त्याचे मोल केव्हाही अधिक. निराशेच्या तिमिरात नित्य रखडणाऱ्यांच्या मनात ते गायला उभारी असावी हे घनतमिस्रात बुडाल्याचे लक्षण कसे असू शकेल? केशवसुताजवळ ही उभारी आहे. अंतिम क्षणांच्या सुंदरतेच्या प्रसववेणांच्या अनिवार कळांचे दुःख केशवसुतासारखा कलावंतच जाणे! व्यावहारिक–प्रापंचिक– कटकटीत खितपत पडलेल्यांना त्या कशा कळाव्यात? कळणे तरी कसे शक्य आहे? याचा अर्थ केशवसुताना प्रापंचिक दुःखांची जाणीव नव्हती असे नाही. ती पुरेपूर होती. 'तिमिरकल्पने'तून ती वारंवार प्रकटली आहे: केशवसुताना जीवनाकडे निरामय आनंदाच्या दृष्टीने पाहण्याची सवय नसली तरी दि. के. बेडेकर ह्यांनी म्हटल्याप्रमाणे, "त्यांचा एकंदर पिंड दुःखाच्या उगाळणीत रिझण्याचा नसून आनंदाच्या हव्यासाने दिव्याभासांच्या मागे धावण्याचा आहे." म्हणून अमर्याद गवसावे ही इच्छा, मर्यादिताकडे दुर्लक्ष आहे. त्यात सामान्यांच्या जीवनात आढळणारा भौतिक आसक्तींचा आणि आकांक्षांचा आविष्कार नाही तर त्यापलीकडील, हिवाळ्यात भाजल्यानंतर अंगाच्या होणाऱ्या

दाहाच्या व्यथा आहेत. त्यातून कलावंत मनाची क्षणोक्षणी होणारी तडफडच दृष्टीस पडते. कल्पनेला दिसते ते प्रत्यक्षात नसते. प्रत्यक्षात नसले तरी हरकत नाही पण निदान दिसते ते शब्दात तरी यावे. पण नाही. त्यासाठीही 'शब्दांनो, मागुते या!' असा 'झपूर्झा' घालावा लागतो. कलावंत, शास्त्रज्ञ आणि तत्त्वज्ञ यांची होणारी अशी मानसिक कुत्तरओढ नेहमीच सामान्य माणसाच्या टप्प्याबाहेरची असते. सदैव विचारमग्न, उदास, मितभाषी केशवसुत हे असेच एक कलावंत. त्यांच्या मनाच्या तडफडीचा–अग्नीने भाजल्यावर कोवळी कातडी भगभगावी तशा भगभगीचा–अन्वय सहज हाती येणारा नव्हे. पण म्हणून तो प्रापंचिकांच्या कटकटीत पुरला जावा असेही नव्हे. 'स्वयंस्फूर्तीचा विलास' आहेच पण त्याहूनही 'तत्त्वान्वेषणाची भेदकता' मोठी; तिथे 'मुक्त विदेही योग्यापरि' विचारच योग्य. या ना त्या कारणाने आरपार गोठून गेलेल्या सामान्यांकडून त्या योग्यायोग्यतेचा फैसला होणे कठीणच जावे. त्यांच्या स्नेहाचा विरंगुळाच अधिक उपयोगी पडणारा. केशवसुतांच्या कवितेमधील घनतमिस्त्र केवळ वैयक्तिक जीवनातील उणिवेतूनच उपजले आहे असे नसून वाढत्या वयाने येणारी वयस्कता अमूर्त सौंदर्यांचा आस्वाद हिरावून घेते, या खन्तीतूनही ते आले आहे. सुखदुःखें विराट असल्याने; ती कधीच संपत नसल्याने उणिवा नष्ट करता येणार नाहीत अशी 'प्रतीतिधर्मा' केशवसुतांची मुळीच धारणा नाही; उलट 'शब्दांनो, मागुते या!' असे आमंत्रित करून त्या मिळविता येतात अशी बृद्धीवंत मानवतावादी कवी केशवसुतांची दृष्टि आहे. केशवसुत अपूर्ववस्तुक्षमतेचे सर्जक आहेत. त्यासाठी 'मनाने तत्वज्ञ' व हृदयाने कवी केशवसुतांची 'अप्राप्य अज्ञात' प्राप्त करून घेण्याची तळमळ आत्मपरतेचा स्नेह घेऊन (पिंडाचा धर्म म्हणून, त्याविना जगणे अशक्य म्हणून आणि स्वर्गसमक्षतेच्या प्रवासातील विरंगुळा म्हणून) उभी आहे. साऱ्या वणवणीत इतर कुणाची साथ असो नसो, एवढी साथ त्यांना पुरेशी वाटते. साथीसोबतीतून केशवसुत अंतिम श्रेयाचो पूर्ती साधू इच्छितात.

याचे प्रत्यंतर केशवसुतांच्या सामाजिक – 'मानवता' वादी – कवितात प्रामुख्याने मिळते. सर्वांगीण क्रांतिकारकत्व ही सर्वार्थाने दृष्टीस पडते. कलावंताच्या कवेत येणाऱ्या, बहुतांशी जीवनाला स्पर्श करू इच्छिणाऱ्या त्यांच्या कवितेने सामाजिक जीवनाचे आत्मनिर्भरतेने घेतलेले दर्शन लोभनीय आहे : कातळ फोडून जीवन उसळावे तसे ते उफाळले आहे, जीत पाण्याच्या सतत झटक्यानी कातळालाही कंगोरे पडावेत तसे समाजातील जीर्ण रूढींचे आणि शीर्ण अनीतीचे फुगवटे पार खणवटून टाकण्याची ईर्षा आहे. या ईर्षेत अव्वल प्रचाराचा ऐस असूनही केशवसुतानी आपल्यातील 'मी' कलावंत आणि 'मी' चिंतक या दोहोंचे

मिळून बनविलेले (की बनलेले) केशवसुत 'आम्ही' चे संयुग लाखाचे आहे. त्यातून केवळ खुरटे अनुकरण किंवा दुबळे अनुवादन यांच्या आहारी न पडता त्यांच्या सामाजिक कवितेने ऊर्जस्वल रूप प्राप्त करून घेतले आहे. साहजिकच तिला नवा साजशिणगार चढून वेगळ्या उंचीचे देणे लाभण्यात झाला आहे. त्यामुळे ती स्वत: तर धुंदतेच खेरीज रसिकालाही धुंदवीत नेते, चढवीत राहते. असल्या धुंदीफुंदीत इतर कसलाही विचार मग बाकी उरत नाही. केशवसुतांच्या रासवट भाषेचा, खडबडीत शब्दसौंदर्याचा, ओबडघोबड रचनाकौशल्याचा, 'रानगट' व्यक्तित्वाचा कसला कसलाही. तिथे उरतो केवळ कलात्मकतेने नटलेला परिपूर्ण सामाजिक आशय आणि त्याने उभे केलेले वैचारिक क्रांतीचे वाण.

या वाणातून अस्सल शाहिरी आवेश प्रगटतो. नेटका, धीट, सरळ, अचूक, स्पष्ट, नेमका आणि चैतन्यपूर्ण. किंबहुना त्याखेरीज त्याला व्यक्तीकरणच लाभत नाही, मानवत नाही. ज्याची सुळकी उडी तळाचा ठाव घेणारी–अंतिमाच्या गाभ्याला हात घालणारी–त्याचे हे असेच असते. केशवसुतांच्या मानवतावादी कवितेने अंतिम समतेचा पुकारा केला आहे. अधेमधे तिचे थांबणे नाही. टीकाकारांनी हवे तर स्वातंत्र्य, समता, बंधुता असले चलनी शब्द वापरावेत. पण केशवसुतांच्या मनीमानसी ती झिजवट नाणी आहेत. त्यांचे पूजन काळाला अनुसरून ठीक असेल पण ठिणगीचा ध्यास असणाऱ्याला तो अपुरा वाटतो, पुरा पडत नाही. 'मानवाच्या उदात्त सामर्थ्याच्या जाणिवेतून' फुललेल्या केशवसुतांच्या ह्या ध्यासातूनच त्यांची उदंड मानवप्रेमाची, प्रमेये पालटवणारी सामाजिक कविता जन्म घेते.

जीवनाच्या पैदाशीचे सुसंगत शास्त्र आहे. पण त्याच्या पैदाशीनंतरचे जीवन–चैतन्य चौकटीत बसायचे नाकारते. निदान आपण तसे मुळीच बसू शकत नाही असा त्याचा सूर असतो, माणसाचा यत्न राहतो. अगदीच चौकट उभारता येत नसली, काटेरी कुंपणे आणि फुटक्यातुटक्या काचा यांनी परिसर बंदिस्त करता येत नसला–जीवन म्हणजे २ + २ = ४ होणारे ठोकताळ्याचे गणित नव्हे–तरी त्याचे आखणे सुरू असते. जीवन कंठण्याच्या मार्गपद्धतीतील ते अपरिहार्यत्व असते. जीवनाच्या ह्या झेपा–झुंजी, झटचा, तुफान–उसळी केशवसुतानी शिपाई बाण्याने स्पष्टपणे जाणल्या आहेत. म्हणून ह्या चैतन्याच्या सरळमार्गी चालीत आडव्या येणाऱ्या हरेकाचा (मग त्यात कुणीही येवो.) सुपडासाफ करावयाचा असा त्यांचा निर्धार आहे. मानवाच्या जिव्हाळी लागणाऱ्या एकूण एक अनिष्टाचा–राजकीय परतंत्रतेपासून तो सामाजिक परवशतेपर्यंत–नष्टांश हा त्याचा हेतू आहे. कदाचित

शक्तिबाहेरचे हे वजन उचलणेही असेल पण जाणिवेचा जोम आणि प्रतीतीचा जोस अधलेमधले 'हॉल्टिंग स्टेशन' मंजूर करीत नाही. थेट धाव त्या ब्रह्मांडाला पकडण्याची (म्हणूनच केशवसुतांची राजकीय-राष्ट्रीय-सामाजिक कविता राजकीय राष्ट्रीय–सामाजिक राहत नाही. ती निखळ मानवतावादाचे लेणे चढवून येते.) या पकडापकडीत 'स्वजन कुदशा वाचुनी' रडण्याचा किंवा 'हृदय भंगुनिया' जाण्याचा आणि याहूनही अधिक–छळवाद अंतर्भूत असतो. हजारात एखाद्याच्याच नशिबी तो येतो, समाजसंवादनासाठी त्याला तो भोगावा लागतो. अन्यथा येणारे जाणारे खूप असतात. जगात त्यांना तोटा नसतो. मात्र येणाऱ्या जाणाऱ्यात नुस्ते येऊन जाणारे खूप, थांबून गंमत पाहणारे आणि बंद पडत असेल तर दगड टाकून ती वाढवू पाहणारे एवढ्याच संख्येत असणारे; पण थांबून, पाहून उपाय शोधणारे फार कमी. हाताची बोटे पुरेत. अशाना वगळता उरलेल्या मायेच्या खुणा बुजवून काटचांची झुडुपे वाढविणाऱ्या शब्द–बडबड्यांची गणती हवी तर शिरगणतीत व्हावी पण समाजवळणाच्या प्रबोधनात ही खोगीरभरती सोबत राखावी लागते. समाजाच्या उत्थानासाठी निष्ठापूर्वक अंगिकारलेल्या उपासनेत पराक्रमाची प्रेरणा देणारे हे पाठबळ दुर्लक्षून चालत नाही. कुणाही समुद्धारक तत्त्वांच्या उच्चारवंताला त्याचा आदर–स्वीकार करावा लागतो. धरित्रीवरल्या मरगळ आलेल्या आत्म्याच्या कायापालटासाठी सर्वस्पर्शी महाशक्तीचे प्रगमन साधावे लागते. त्या आधारे पुढे सरायचे, सरकायचे, रेटायचे असते. त्यातूनच आत्म्याच्या मुक्तीच्या हव्यासाबरोबरच स्वातंत्र्याचा जयनाद कानी पडतो. पारतंत्र्यामुळे आम्हाला बघायला डोळे आणि ऐकायला श्रुती नसल्या म्हणून दुर्दशेचे वारेच खात रहावे किंवा दुःखभोग कवटाळून त्याला मिठी मारून बसावे असे नाही. असुख देणारे ते वीषच होय. परवशता– मग ती कुठल्याही रूपातील असो– वाईटच. समाजबंधने मान्यच पण म्हणून स्वातंत्र्याचे हरण मान्य नव्हे. त्याने जगातून उठल्यासारखे होते आणि लाजिरवाण्या स्थितीस नेऊन पोचविते. म्हणून ते जितणाऱ्यांचा आणि जितू देणाऱ्यांचा दोघांचाही निषेधच. चुकणाऱ्यांचा गौरव सर्वस्वी अनिष्टच पण चुका दुरुस्त होऊ नयेत असे नाही. त्यासाठीच तर 'परवशपणाची निशा सरावी' ही इच्छा आणि 'स्वातंत्र्याचा द्युमणि उदयी' यावा ही पृच्छा आहे. त्यासाठीची कार्यशीलता स्वतःला पुढे रेटता नाही आली तर तिने अन्य कुणाच्या माध्यमातून सगुण रूप घ्यावे ही तळमळ आहे. अन्य कुणी काही करायचे ते करोत, करतीलही. पण बापू जवळचा आहे. त्याच्या मनोभावना आपल्याशी संधान बांधणाऱ्या. त्याला केलेले अवाहन कारणी लागेल. निदान अगदीच वाया होणार नाही :

बापू ! गड्या ! ध्वज उभा करशील काय ?
तूं देशकारण करुं झटशील काय ?
बापू ! जनांत दिवटी धरशील काय ?
स्वातंत्र्यदेव मनसा भजशील काय ?

केशवसुतांच्या काळच्या देशाबाबतच्या ज्वलंत भावनेचे हे प्रस्फुरण अतूट बलदायिनी आहे.

आपल्या जीवनाचे कोनेकोपरे बारीक नजरेने हेरणाऱ्या केशवसुतांच्या कवितेने केवळ स्वातंत्र्यभावनेचे प्रज्वलनच केले आहे असे नव्हे तर अंतिम समतेच्या विवक्षेने समाजप्रबोधनही साधले आहे. याच समाजजीवनासंबंधीच्या सबल भक्तीच्या भावनेतून 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' प्रकट होतो. अंत्यजता हा हिंदुसमाजाला जडलेला कॅन्सर, माणुसकीला लागलेला कलंक. त्याचा प्रभाव आणि परिणाम सांगण्यात जाणत्यांचा अधिक्षेप घडेल. पण हजारोंच्या सार्वजनिक रस्त्यावर महार पोरांनी खेळण्यात गैर काय ? ते खेळणेही रस्त्याच्या मधोमध नव्हे, 'पथाच्या कडेला.' पण रूढींच्या कर्मकांडाने पुरत्या नासलेल्या विप्राला (आणि इतर अनेकांनाही, ते काही कुणी 'सभ्य' नव्हेत.) परवडणारे नाही. रस्त्याची मध्य काय किंवा कड काय, शेवटी सारा मिळून रस्ताच; खेळ कडेला असला तरी विटाळाचा ओघळ पसाळात रस्ताभर होणारच. महार पोरांना रस्त्यावर मग कसे थांबता येईल ? ( वस्तुतः धरतीवर कुठे ना कुठे महार पोरे असणार. सारी धरती एक आणि ही कार्टी इथे ना तिथे अडमडणार. म्हणजे कुठेही असली तरी विटाळ असा ओघळत पोचणारच. पण कर्मकांडात एवढ्या पल्ल्याचा विचार बसत नाही. दृष्टीला येणाऱ्या प्रत्यक्षाचाच येतो.) खेळणाऱ्या पोरातील बहुतेक सारी धूम ठोकतात. पण एक धीट उरते. ( हा त्या उगवत्या काळाचा प्रतिनिधी! ) पण त्याला 'धम्मक लाडू' ची धमकी. तेही सुसाटते. ( यथावकाश काळाने यावयाच्या पक्केपणातील हे कच्चेपण) थेट आईकडे जाते. त्याचा प्रश्नः

" जरी त्यावर सांवली माझि गेली,
तरी काय बाधा असे ठेविलेली ? "

प्रश्न मूलभूत. उत्तर निरुत्तर. पण समजूत पडणे नावाचा काहीतरी एक भाग आहे. उत्तर येतेः

" अम्ही नीच बा, आणि ते लोक थोर;
तयां पाहतां होइजे नित्य दूर. "

जुन्या काळच्या ठशाची, अंधारी मनाची आई. तिचे हे उत्तर. प्रश्नकर्ते पोर उगवत्या पिढीचे, उत्तरणारी आई विरणाऱ्या युगातली. आईच्या 'सुधे बोलण्यात' सहनशीलतेची पराकोटी असली तरी त्यातूनच पोराच्या रूपाने-नव्या जीवनाने-तरुण बदलाने येणाऱ्या क्रांतीचे झालेले हे पथनिर्देशन आहे; 'स्वप्रतापाची' ची ती नांदी आहे. त्यातूनच ठिणग्या फुटणार आहेत, झोपमोड होणार आहे, समत्वाच्या सूत्राचा अर्थ मस्तकी भिनणार आहे. 'मजुरावर उपासमारीची पाळी' ने त्याचे भरपेट पोषण केले आहे. अंत्यजापासून मजुरापर्यंत सारे कसे एकवटून येत आहे. त्यात या ना त्या रूपातला बदलच संभवतो. अवतीभोवती मंदिरे खुलावीत आणि आमची इकडे भुकेने तळतळ व्हावी, याचा अर्थ काय ? हा अर्थघन प्रश्नच बदल दृढ करतो. तो आज ना उद्या होणार यात शंका नसते. पण क्रांतदर्शी कवीच्या मनाने घेतलेली ही जाग–त्याच्या अंतःकरणाला पडलेले हे स्वप्न-त्याच्या पूर्वीच्या मार्गात काही अडसर येतात. काळाचे ठसे आणि कर्मकांडाचे संस्कार यामुळे जुलूमाच्या प्रतिकारात उणे राहते. तशी महार पोराची आई काय किंवा कवडीही न मिळाल्याने भुकेने मरणारा मजूर काय; ही 'जनता' प्रतिकाराच्या जाणीवेपासून कितीतरी दूर... 'सर्व दुखःम्' मानणारी .. शब्द फुटणे हेच त्या काळाचे मोठे अपत्य. केशवसुतांच्या समाजप्रबोधनविषयक कवितेत याचेच प्रमुखत्वाने दर्शन होते. मात्र वेध घेतला जातो आणि विंधून जातो तो त्यांच्या क्रांतदर्शित्वातील 'बलस्थाना' ने! अन्यथा आईचा 'नित्य दूर' होण्याचा सल्ला आहे तर "हेवा तयांचा मजला मुळीं नसे, जाडी मला भाकर ती पुरे असे;" अशी मजुराची विनीत वृत्ती आहे. या कमालीच्या सोशिकवृत्तीच्या साचलेपणातून होणाऱ्या अचानक स्फोटात स्वाहाकार असतो पण मरगळलेल्या वृत्ती गतिरोध करतात ही गोष्टही डोळ्याआड करणे इष्ट नाही. "कष्टांत देवा ! मरण्यास तत्पर, कां मारिसी हाय ! भुकेमुळें तर ?" या मजुराच्या दैववेडच्या प्रश्नात त्याचे उत्तरच नाही काय? असल्या हताश वैतागापोटी "जन्मास मी काय म्हणोनि आलो ? येताच वा कां न मरोनि गेलो ?" असल्या बुळ्या प्रश्नांचा कवटाळ उपजत गेल्यास नवल नाही. 'शास्त्राद्रुढिर्बलीयसी' लोक मानतात म्हणून हे घडते हे खरे, म्हणूनच 'विस्मृतिचिया खोल खाडयामधी' ती गाडणे जरूर. तीत 'मूर्ख लोकां' ताळ्यावर आणणारे क्रांतदर्शित्वआहे. गलितगात्र मंत्रबळाहून ऐश्वर्यसंपन्न क्रांतिबलाचे प्रोक्षण आहे.

'जगाचे क्षणोक्षणी रंग' बदलायचे तर ह्या प्रोक्षणाची नितांत गरज आहे. त्यातून रूढीचे दास खवळणार आहेत. औचित्याचा फोल विवेक मिटणार आहे. द्यावापृथ्वी द्रवुनि वेगाने मिसळणार आहे. जुलूमाचे तुकडे तुकडे होणार

आहेत. देवांनाच धुडकावण्याची ताकद संचारणार आहे. मात्र साम्यवादाच्या आवेशाने ताणलेल्या शीरांचे नजरेला पडणारे भरपेट ठसठशीतपण, अव्वलरंगी शाहिराचे उसळतेपण आणि केसांचे पिंजारलेपण जाणवणारे असले तरी साध्य साधन विवेकाने अखेर 'सत्त्वाचा उदयोऽस्तु' करायचा आहे. त्यात 'मूर्तिभंजन'– 'बुतशिकन्' आहे पण 'बुतफरोश' नाही. मूर्ती विकणारे सत्त्व आणि स्वत्व यांचाच विक्रा करीत असतात, 'देव' गमावून बसतात. ते आपले काही कार्य नाही. नाव घालवणाऱ्या आणि अरिष्टाची उपासना सांगणाऱ्या साऱ्या 'मूर्ती' चे मुंडन करायचेच आहे पण त्यातही "मूर्ती फोडुनिया, देऊं जोडूनियां। परीं विकूनीया, टाकू न त्या" असे अनुष्ठान आहे. त्यासाठी 'नवा शिपाई' उभा आहे, त्याचे उभे ठाकणे तात्कालिक नाही तर सार्वकालिक आहे. सर्वस्पर्शी तसेच सर्वंगामी आहे. डोळे गरगरून जावेत आणि बुद्धी चक्रावून जावी असा त्याचा 'ताठा' आहे. "ब्राह्मण नाही, हिंदुही नाही न मी एक पंथाचा" ह्या सर्वंकष समतानिष्ठ व्यापक प्रतिज्ञेने केशवसुतातल्या 'मानवाने' संकुचिततेच्या आकुंचितपणाच्या, क्षुद्र हेव्यादाव्यांच्या अगदी पलीकडे ठाण मांडले आहे. ते निर्लेप आहे. त्यामुळे कुंपणात न बसणाऱ्या, सर्वत्र भावंडे असणाऱ्या, आपुल्यामध्ये विश्व पाहुनी विश्वाला पुजणाऱ्या, सर्वत्र भावंडे असणाऱ्या, 'मी' शब्दच न लागणाऱ्या मानवतावाद्याचे–सच्च्या क्रांतिकारकाचे–लागेबांधे पार मातीखालच्या मातीत गेलेले आहेत. "ती माझी, मी त्यांचा, एकच ओघ अम्हांतुनि वाहे!" म्हणून तर "तेच पतित की जे आंखडिती प्रदेश साकल्याचा" आहे. आकाशाच्या पोकळीतून साद यावा आणि धरित्रीच्या गर्भातून नाद घुमावा अशी त्याची तडफड आहे. त्यासाठी 'स्वप्राणाने' 'तुतारी' फुंकणे आहेः तिच्या रणावेशाने सगळी गगने भेदून टाकायची आहेत. अवकाशाच्या ओसाडीतील मुके पडसाद वाचाल करायचे आहेत. रूढी, जुलूम, दंभ यांची फाडून खाणारी राक्षसी संताने गाडायची आहेतः

'चमत्कार! तें पुराण तेथुनि
सुंदर, सोज्वळ, गोडें, मोठे?
अलिकडले तें सगळे खोटें?'

ची अवडंबरे नष्ट करायची आहेत. स्वार्थांधनपेक्ष जीवाने संघशक्तीचे खंदक भरायचे आहेत, संप्रती माजलेले दानव दूर फेकावयाचे आहेत. 'विशाल भूघरात सुंदर लेणी' खोदण्याच्या विक्रमाने देवावर झेंडा मिरवायचा आहे. त्यात त्रिगुणी समाजास त्रिगुणी माल पुरविण्याची हुकमेहुकूम ठेकेदारी नाही तर अश्रूंच्या डोही भिजलेल्या जीवनाचे नवे धारदार कर्तृत्व आहे; उगवत्या जीवनाचे यौवनगीत आहे.

या यौवनगीताचे सूर ज्या काळात लागले त्या काळाचे रूप काय? स्वरूप कोणते होते ? – केशवसुतांच्या मानवतावादी कवितेच्या जन्महेतूच्या संदर्भात या प्रश्नाला खूपच महत्त्व आहे : केशवसुतांच्या काळची सामाजिक परिस्थिती अनिष्ट धार्मिक कल्पना व घातुक आचार यांनी भरलेली होती. इतर अनेक कारणांबरोबर भयानक अज्ञानाने चलत्या असलेल्या जीवघेण्या रूढींनी संस्कृतीला अर्थ ठेवला नव्हता. त्यातच राजकीय दास्याची भर होती. सर्व बाजूनी बांधून टाकले होते, जखडून घेतले होते. पेट्रोल साठ्याच्या आकस्मिक स्फोटात सर्वांगाची सालडी लोंबावीत तशी संस्कृतीच्या मूळच्या मोठेपणाची लक्तरे लोमकळत होती, रस्त्यावर होती. जे काही निर्माण झाले होते त्यास कवचकुंडलाचे रूप आले होते. आचार्य स. ज. भागवत यांनी १९४८ साली मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयात दिलेल्या व्याख्यानात म्हटल्याप्रमाणे, "आपल्या समाजावर हे जे रूढीचे कवच निर्माण झाले होते त्याला बाहेरून ( ही ) लाथ देऊन ते फोडून टाकण्याचे कार्य पाश्चात्य संस्कृतीने केले. इंग्रज आपणावर राज्य करू लागले. त्यांच्या व आपल्या संस्कृतीचा संघर्ष झाला आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता ही सुप्रसिद्ध त्रयी आमच्या विचारवंतांच्या कानावर पडली. या त्रयीचे पडसाद गद्यामध्ये आगरकरानी व कवितेमध्ये केशवसुतानी प्रथम उमटविले. आपल्या संस्कृतीला यावेळी असे एक 'जडत्व', 'निर्जीवपणा' आला होता; तसा आपल्या काव्यातही तो भरून राहिला होता." संस्कृतीच्या ह्या कोंडीला आगरकर–केशवसुतांनी सुरुंग लावला. चांगले खोलवर खणून सुरुंग लावला. या संघर्षात शब्दप्रामाण्याचे पाय मोडत होते. पुराव्याविहीन वडबडीला सज्जड आधाराची मागणी होती. शब्द-अर्थाच्या मखलाशी पोकळ खुंटचा उपटून फेकल्या जात होत्या. भलेपणाचे शिसवी बार घट्ट मेरवून रोवले जात होते. व्यक्तिस्वातंत्र्य, बुद्धिप्रामाण्य आणि ऐहिकतेचे सुखसंवर्धन यांच्या घणाघाताने चिपळूणकरांची केवळ भाषेतील पुनरूज्जीवनवादी विचारसरणी दूर ढकलली जात होती. महाराष्ट्राचे शरीर, मन आणि जीवन यांच्या पुनर्जन्माचा योग सुरू होता: पूर्वचिन्हे पूर्वीपासूनची असली तरी केशवसुतकाळात त्यांचा भर होता. या साऱ्या बदलत्या वातावरणातून निर्माण होणाऱ्या भावात्मक मूल्यांचा ( Positive values ) केशवसुतावर खोल परिणाम आहे. केशवसुतांचा त्यांचा–खास करून त्यांचा–स्वतःचा म्हणून हा परिणाम आहे, तत्काली आगरकरानी उभारलेल्या वैचारिक बंडखोरीने हा परिणाम पुष्ट बनविला आहे. त्या दृष्टीने आगरकराशी त्यांचे निकटचे वैचारिक नाते आहे. पूर्वोल्लेखाप्रमाणे अनुकरण किंवा अनुवादन असे त्यात नसून छाया आगरकरांची. मुद्रा केशवसुतांची असेच घडले आहे. जीवनाच्या हरेक अंगाला स्पर्श करण्याच्या प्रतिज्ञेने झपाटून कटिबद्ध झालेल्या केशवसुताना अनुकरण वा अनुवाद अशक्य

होता. स्वत:च्या काव्याने समाजात स्फूर्ती निर्मू इच्छिणाऱ्याला औरसत्वच पहावे लागते, अनौरसत्व त्याच्या दृष्टीने कालबाह्यच असते. अस्सलाची खाज दत्तकाने भागत नाही. भागल्याचा बहाणा केला तरी चढतेवाढते रूप येत नाही. म्हणूनच केशवसुतांची अनुभूती खोटी किंवा उसनी राहिली नाही. ती अस्सलतेने अवतरली. भावनांचा प्रखर उद्रेक कवितेचा आत्मा बनला; काळजातून काव्य फुटले; आणि त्यात आगीच्या लळलळत्या लोळातील दहनाचे सामर्थ्य आले. नव्या शिपायाचा डिंडिम, तुतारीची गर्जना, 'गोफण' ची हाणाहाण–सामर्थ्याच्या या विस्तारासाठी आहे. 'मनाच्या मळ्याच्या जाणीवेच्या सीमारेषा' फार विस्तृत असणाऱ्यासच ते शक्य आहे. क्रांतिकारकांची भावशक्ती मळ्याच्या या सामर्थ्यात साठविलेली आहे; पण तेवढेच त्यात आहे असे नव्हे तर पुराण्या आप्तवाक्यांना जाळणारे आणि ते जळत नाही तोवर त्यासाठी जळणारे हृदय आहे, जाणीवेचा जिव्हाळा आहे.

त्यादृष्टीने केशवसुतांच्या कवितेत राजकीय किंवा सामाजिक विचारांच्या दर्शनापेक्षा मानवी जीवनाच्या अंतिम हेतुसंबंधीचा विचार अधिक प्रबळ आहे, किंबहुना तोच एक आहे, दुसरे काहीच नाही. बाकी आहेत त्या शिड्या, तिथपर्यंत जाऊन पोचण्यासाठी उपयोगी पडणाऱ्या. तशी केशवसुतांची सामाजिक किंवा राजकीय कविता सामाजिक किंवा राजकीय अशी नसून मूलत: ती मानवाच्या मंगल जीविताशी, त्या जीवितमार्गात उगीच अडमडणाऱ्या खडक कातळाशी आणि त्याच्या प्रयोजनाशी संधान बांधून आहे. म्हणजेच 'माणूस' या घटनेशी ती कुत्र्यासारखे इमान बाळगून आहे. त्यामुळे 'समकालीन राजकीय किंवा सामाजिक अशा तात्कालिक घटनांचा उल्लेख' कुठेही होत नाही, फक्त 'सामान्य परिस्थितीचे अप्रत्यक्ष सूचन' होते. म्हणजेच समाज फिरविण्यासाठी लागणारी चेतनशक्ती देण्याचे कामच केशवसुतांच्या कवितेने स्वीकृत केले आहे. या स्वीकृतीत आगरकरांच्या विचारातील मूळ गाभ्याचा आणि विचारप्रकटीकरणातल्या आवेशाचा असा दोहोंचाही असर आहे. मराठी माणसाच्या रणरणत्या पिंडाने हा असर उजळून टाकला आहे, ऊर्जस्वल बनविला आहे.

या ऊर्जस्वलतेत अहंकार जाणवतो. चांगलाच जाणवतो. विशेषत: व्यक्तिस्वातंत्र्याच्या जयजयकारात त्याचे जाणवणे खूपच घडते. पण नव्या समाजाची रचना आणि उभारणी करण्यासाठी व्यक्तिस्वातंत्र्याचा केशवसुताना वापर करायचा होता हे ध्यानात घेतले की हे जाणवणे खूपच खाली येते. केशवसुत 'विशाल भूधरा' त 'सुंदर लेणी' खोदण्यासाठी 'नव्या मनूतिल नव्या दमाचा' 'शूर शिपाई' बनून आले आहेत. "आडवतील जरि देव तरी। झगडूं त्यांच्याशी

निकरीं । हार न खाऊं रतीभरी ! " असा त्यात अटीतटीचा सामना आहे. त्यात प्रतिगाम्यांच्या, सनातन्यांच्या पीछेहाट करणाऱ्या कल्पनांचा निःपात करण्याचा निर्धार आहे. या निर्धारात 'देवदानवा नरे निर्मिले हे मत लोकां कळवूं द्या' असा तारणारा निखळ मानवी दृष्टीकोन आहे. आत्मघातकी परंपरांच्या या मृत्यूत व्यक्तिस्वातंत्र्याच्या आड लपविलेला अहंभाव किंवा अहंकार नाही. फुसका आवेशही नाही, तो आहे 'आत्मप्रत्यय.' समाजपूजनासाठी, 'सर्वेश्वर' पूजनासाठी. मुळातून उचंबळून आलेले ते आवेगीकरण आहे. जीवनाच्या अन्वयार्थावर आधारलेली पौरुषसंपन्न आत्मविश्वासाची ती ऐट आहे; संघशक्तीचे युयुत्सू आवाहन त्यात समाविष्ट आहे.

केशवसुतानी जीवनाला पोखरणाऱ्या साऱ्या अंतर्बाह्य कुरूपतेवर तडाख्याने हल्ल्यामागून हल्ले चढविले आहेत. समाजातल्या सर्वोत्तम सर्वेश्वराची अंतिमातील हिरण्मयाशी त्यांना सोयरीक जोडावयाची होती. त्यासाठी नरानेच नराला आणलेला हीनपणा त्यांना बदलायचा होता. म्हणून 'योद्धे हो !' ही साद आली आणि 'झटूनि द्या प्राण' हा मंत्र सुसाणला. 'तत्कालीन आत्मजागृत नव्या समाजाचे ते प्रातिनिधिक मूल्य' आहे. केशवसुत ही व्यक्ती निमित्तमात्र आहे. पण त्यांच्या भावनेतील चमक, विचारातील वादळ आणि लिखाणातील गडगडाट साऱ्याचीच पाळेमुळे या भूमीशी खोलवर रूजून आहेत. द्यावापृथ्वीवरील उदात्त कोमल सौंदर्याप्रमाणे, भारलेल्या जीवनप्रेमी विश्वकुटुंबी वृत्तीने ती फुलली आहेत. त्यामुळेच आकाशातल्या घर्षण–क्षेत्राची वाढती व्याप्ती रडारालाच कळते त्याप्रमाणे " विश्वगत विशाल जीवनाशी समरस होऊ बघणाऱ्यांना मानवतावादाचे सौंदर्य बघावयाचे असेल तर त्यासाठी केशवसुतांच्याच काव्याकडे वळावे लागेल. " हे आचार्य भागवतांचे मत आजही खोटे पडत नाही. केशवसुतांच्या थोरवीचे ठसे मात्र मनावर अधिकाधिक गडद, गहिरे होत जातात.

सुमारे अडीच तपापूर्वी कुसुमाग्रजांचा 'जीवनलहरी' हा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. त्यानंतर 'विशाखा', 'किनारा', 'मराठी माती' आणि 'स्वगत' आले. शेवटचे दोन संग्रह गाळून इतर संग्रहात दशकाचा काळ उभा आहे. पूर्वसुरींच्या मतमतांतरांचे पुनर्वाचन करण्याइतपत निश्चित वेगळेपणाचा आढळ त्यातून होतो.

कुसुमाग्रजानी, आपल्या कवितेमधून गायिलेले गर्वगीत साहित्यिकाने समाजाचे सांस्कृतिक नेतृत्त्व केले पाहिजे, या धारणेचे प्रतीक आहे. ते सहजतेने गायिले आहे.

अधूनमधून माणसाला एक मूड येतो. स्वतःतच दंग करवून सोडणारा. कधी कधी माणूस स्वतःच्या मनाच्या विरंगुळ्यासाठी स्वतःशीच गुणगुणतो. हिरमुसलेले मन, मरगळलेली वृत्ती व शिणलेली काया यांना हुशारी आणण्याचा प्रयत्न करतो. अशा दंग अवस्थेत तो या जगात नसला तरी या जगाचा असतो. त्याचा पदर

## चार कुसुमाग्रज :
## मातीच्या पुत्राचे गर्वगीत

2843
२७२१७ जिल्हा



त्याने टाकलेला नसतो. पण आपल्यातच लीन असतो. विलीन होऊन गेला आहे की काय असा मनात संभ्रम जागा होण्याइतपत 'हरवून' बसलेला असतो. 'जीवनलहरी' त कुसुमाग्रजांची थोडीफार अशीच वृत्ती झाली आहे. या वृत्तीतून झपाटलेपणात स्फुरलेल्या–उमळून आलेल्या–कुसुमाग्रजांच्या 'जीवनलहरी' या काव्यात्म कणिका आहेत. कल्पकतेने त्या नटलेल्या आहेत, गंभीरतेने सजलेल्या आहेत आणि जीवनासंबंधीच्या ओढीने त्या मंडित झालेल्या आहेत. प्रत्येक 'जीवनलहरी' प्रायः स्वतंत्र आहे. तिच्यामध्ये कमीअधिक रूपात विचार, कल्पना व भावना यापैकी एखाददुसऱ्या लहरीची तीव्रता अनुस्यूत आहे. टवटवीत, उत्कट, विचारशील स्पंदन हे तिचे सौंदर्य आहे, स्वरूप आहे. त्यातून जीवन, समाज, प्रेम, थोर ऋत्विज; त्यानुषंगाने उभ्या असलेल्या प्रेरणा, श्रद्धा आणि निष्ठा यासंबंधीच्या मूल्याबाबत एक समृद्धसंपन्न विचार, सुसंगत भावनात्मक आविष्कार 'अनुभव' बनून येतो. काही ठिकाणी खोलवर जाऊन जीवनाच्या अंतिम मूल्याशी निगडित असणाऱ्या सखोल जाणीवेचा शोध घेणारा तर काही ठिकाणी अगदीच उपरा; पण अशी स्थळे तशी कमीच.

'जीवनलहरी' नंतर कुसुमाग्रजानी अधिक सांगण्याचा प्रयत्न केला. परिस्थितीच्या उग्र आव्हानातील प्रतिक्रियांचे कलात्मक ढंगाने सुरेख रेखांकन करण्याचा चंग बांधला. पण कुसुमाग्रजानी 'विशाखा', 'किनारा' अखेर दाखविलेल्या सामर्थ्याच्या 'अहेरा' ला पुढे अलौकिकाची जोड मिळू शकली नाही. त्याचा सगळा मोहरा 'जीवनलहरी' च्या "पायरीच्या रेषेवरी माझा सफल प्रवास" असे म्हणत राहिला: 'जीवनलहरी' नंतरच्या 'विशाखा' ते 'स्वगत' पर्यंतच्या (प्रायः 'विशाखा' नंतरच्याच) बहुतेक कवितांत आगळा आविष्कार होऊनही 'आशय' जीवनलहरीच्या परिघातच गुरफटून गेला. कुसुमाग्रजानी 'जीवनलहरी'त (काहीसा कळत नकळत) स्वीकारलेला मूल्यविचार फिरविला नाही. 'बनचुके' बदललेच नसल्याने नवे स्वर फुटले नाहीत. फुटले त्यांचे थोरपण अभावानेच जाणवले, जाणवते.

कुसुमाग्रजातल्या कवीची मूळची 'कल्पक' जात 'जीवनलहरी' ने पक्की केली आणि कविता संक्षेपाने लिहिण्याची त्याला सवय लावली हे खरेच; पण शिवाय कुसुमाग्रजांच्या पुढल्या काव्यावर आपला प्रभावी ठसाही उमटवून गेली. तसे काही नसल्याचे अवसान या कवितेने कितीही आणले तरी ते टिकत नाही, टिकणारे नाही. मात्र, 'जीवनलहरी' ही कवीच्या या नंतरच्या कवितांची 'टाचणे' किंवा 'सुधारलेली आवृत्ती' असा याचा अर्थ नाही. एवढा ताण घेण्याचे

प्रयोजन नाही, आवश्यकताही नाही. आशयाच्या दृष्टीने 'जीवनलहरी' ने ती 'बद्धमुक्त' हा त्यातला–नित्यातला एवढाच–मर्यादित अर्थ आहे.

कुसुमाग्रजांची – पार 'जीवनलहरी' पासून 'स्वगत' पर्यंतची – कविता जीवनासंबंधीच्या एका स्पष्ट जाणीवेने भारून गेली आहे, समरसून राहिली आहे. जन्म आणि मृत्यू यासंबंधीचे समग्र दर्शन कुणाला झाले, कुणाला होणार आहे ? आपण जन्म आणि मृत्यू या मधल्या टप्प्याच्या प्रवासाला 'जीवन' म्हणत असतो, घालवीत असतो, रेटीत असतो. बहुसंख्यांचे जीवन डोळे बांधून घेऊनच चाललेले असते. आंधळेपणाने, अगतिकतेने, हतबलतेने. या जिण्यात लढण्यापेक्षा रडण्याचाच भाग अधिक असतो. आक्रोशाचा, आक्रंदनाचा, कुरकुरण्याचा वाटाच भारी राहतो. एकलव्याची निष्ठा तिथे क्वचितच दृष्टीस पडते. कुसुमाग्रजानी नेमक्या या निष्ठेची जोपासना केली आहे. जीवनाच्या वरवरच्या विरविरीत पटलाचा छेद करून दाहक अंतर्जीवनाचा स्थिर नेत्रांनी वेध घेण्यातच कुसुमाग्रजांचे वेगळेपण लपले आहे.

कुसुमाग्रजांची जीवनासंबंधी एक निश्चित कल्पना आहे: जन्म आणि मृत्यू यामधील जीवनाचा टप्पा माणसाच्या जीवनाचे 'ध्रुवपद' आहे: तो एक प्रवाह आहे, तो जगला पाहिजे, पुढे रेटला पाहिजे. त्यासाठी रडणे अमान्य आहे. तेजाच्या या लाटेतच कवीचे श्रेय आहे :

जीवन हें समरांगण
ज्ञाते म्हणतात, परी ...
अगतिक हे लढणारे
नाहीं शस्त्रास्त्र करी
राहुनि अदृश्य अरीं
घालितसे घाव शिरीं
आणि तहाची आशा
नाहीं तिळमात्र उरी !

असा हयातभर पेटवीत ठेवणारा संघर्ष निर्माण झाला नि त्यातूनही

नव्या जीवनाचा नाद
मला ऐकू येत आहे
लक्ष शून्यांतुनि कांही
श्रेय आकारात आहे.

( स्वगत : 'लाट तेजाची')

असा आशावाद, किंबहुना संघर्षाने काहीतरी रिकामे होत असताना; रिकामे होत जाणारे घट भरले जात आहेत याची अमित जाणीव उपजली आहे. जीवनाचा हा प्रवाह स्थिर नाही. त्याला गती (Motion) आहे. गतिशीलता हा त्याचा विशेष. त्यामुळे हातपाय पसरून थांबण्याला तिथे अवसर नाही, निवांतपणे चार घटका बसण्याला संधी नाही. चालता चालता हे सारे करायचे आहे. जीवनाच्या तेजोमय संगरात दुःखाची वार आणि सुखाची माया साऱ्या जीवनाला वेटाळून बसली आहे. त्यातील गतीचे सूत्र धरून पुढे जायचे आहे, मधुर भविष्याकडे डोकावून पाहायचे आहे. अन्यथा स्वतःच्याच शृंखला स्वतःलाच बांधून टाकण्याची शक्यता आहे. या जाणीवेच्या अभिनिवेशातून जीवन हे लढण्यासाठी, पुडी करून कोनाकोपऱ्यात मुरगळून बसण्यासाठी नव्हे. जीवन जाळायचे आहे, जळायचे आहे. जळणे हेच मुळी जीवन आहे. जीवन ईश्वराने दिलेले दान नव्हे; Life is not a gift of God. ते 'बॉयालॉजिकल' असले तरी त्याचा विचार 'बायॉग्राफिकल' आहे. आहे हे असे आहे. त्यातील पाऊलवाट अशी आहे. त्या अलीकडचे नि त्या पलीकडेच सगळेच ठाऊक असे नाही. ते शक्यच नाही. थोडे माहीत आहे. जे थोडे माहीत तेही पूर्ण ठाऊक असा दावा नाही. पण कुसुमाग्रजाना झालेल्या जीवनातल्या या प्रखर सत्याच्या जाणीवेने

ज्वलनास्तव जर जन्म आपुला
जळावया भिऊं नका

( स्वगतः 'एक फटका' )

असा दावा मात्र मांडला आहे. या दाव्यात

दूर कशाला, मी वाऱ्यावर
असा अनावर डोलत राही
कां डुलतों मी, कां हसतो मी
मलाहि केव्हां कळलें नाही.

( स्वगतः 'तृणाचे पाते' )

अशी प्रांजळ कबुली आहे. दाखविली ती, सांगितली ती एक झलक, त्यात सगळेच आले असे नाही. ते कसे शक्य आहे? कुसुमाग्रजांच्या अनाग्रहातील चारुता इथेच तर आहे. पण त्याबरोबरच स्वतःला स्वतःचा आकार देण्याची (आणि इतरांना देता आला तर तोही देऊन जाण्याची) मनीषा आहे. तसे सामर्थ्य व्यक्त केले आहे. 'विशाखा' पासून 'स्वगत' अखेर झालेले थोर ऋत्विजांचे पूजन ('विशाखा' : 'उमर खैयाम', 'बायरन', 'सैगल', 'बालकवी', 'किनारा' : 'सुभाष', 'सुदामा',

'ताजमहल', 'मराठी माती' : 'मस्तानी', 'शकुंतला', 'उल्काकारास', 'सह्याद्रि' 'स्वगत' : 'शिवाजी', 'साची–१', 'साची–२', 'बापू गोखले', 'बाजीराव', 'ताज', 'औरंगाबाद') याच भावनेतून घडले. मला तसे वाटते. हे थोर ऋत्विज आणि शौर्यस्थळे हयात बंडखोरीला अधिक प्राधान्य आहे. काही अपवाद वगळता बंडखोरी हाच त्यांचा आत्मा आहे. मूर्तिभंजन हा त्यातील गर्भ. या गर्भातून सुढाळ काही निघावे ही मनीची इच्छा. पण त्याबद्दल तशी फारशी क्षितीही नाही. प्राय: कुसुमाग्रजानी बंडखोरांना केलेल्या मानाच्या मुजऱ्यात 'मूर्तिभंजक' वर्गाकडे ओढा अधिक आहे. त्यातून होणारी कल्पनांची झिरपणी (Parcolation of ideas) रचनात्मक (Construction) विरोध करणारी असे नव्हे पण खरोखर विचार करणारी नसावी असे वाटते हे खरे. पण " व्यर्थ न जावो कळा या, वेदनेला अर्थ दे रे " अशीच तिची अंतिम दृष्टी आहे.

मम शब्दांनो मयासुराच्या
भुलाव्यांत या शिरुं नका
निरर्थकाच्या रंगमहाली
पदर धुक्यांचे धरुं नका

असा इषारा कुसुमाग्रजांच्या कवितेने घेऊन ठेवला आहे तो यामुळेच ! त्यात थोडीफार 'नव्या' बद्दल सावधानता व्यक्त होत असली तरी हा इषाराच आधिक्याने आहे.

कुसुमाग्रजांच्या जीवनासंबंधीच्या अटीतटीच्या निग्रहाला झिजवट कळा नाहीत. शेवटच्या बिंदूपर्यन्त जगण्याची आणि जगविण्याचीही (" जरा जगा आणि जरा जगू द्या " असली हेंगाडी किरटी वृत्ती तिथे नाही.) आणि काळाच्या माथ्यावर ठसा उमटवून ठेवण्याची जिद्दीची तितकीच नम्रतेची भावना आहे. वाटचाला येणारे सगळे काही पचवून (प्रसंगी पुरून उरण्याचीही) समग्र जीवनाची आस आहे. जीवन सगळचांच्याच वाटचाला येते. पण सगळचांनाच जीवन जगता येत नाही. क्रमाने रंगवार लावलेला गंजीफाचा डाव पिसून उधळून द्यावा त्याप्रमाणे अनेकांची जीवने उधळली जातात, पिसली जातात. काय घडते हे कळायच्या आतच विचाऱ्यांची जीवने संपून गेलेली असतात. हाती उरते ती भान हरविणारी राख ! या राखाडीत जीवनपहाड फोडीत जाणाऱ्या जलप्रवाहांचे वारसदार, ही जाणीव हरपली तर नवल नाही. किंबहुना सर्वच गायब झालेल्या अवस्थेत तेवढेच शाबूत राहावे हे थोडे कठीणच. मग...

. . . . " Life is untransferable that each man has live his own, that no one can take over his task of living him . . . . After we are born there and then like it or not, we must sink or swim, life is fired at us point blank . . . . "[1]

असा साक्षात्कार होणे तर खूपच दूर ! कुसुमाग्रजाना तो थोडाफार जाणवला आहे. त्यांच्या कवितेच्या आकाशात फुललेल्या मोहोरात त्याचे सादपडसाद आढळतात.

या जीवनविचाराने कुसुमाग्रजाना जीवनवादी साहित्यिक बनविले आहे आणि साहित्यातील त्यांच्या निष्ठाही पक्क्या करून टाकल्या आहेत. केवळ मनोविनोदन हे कुसुमाग्रजाना अमान्य आहे. साहित्याबरोबरच समाजहितही साहित्यिकांना पाहावे लागते, अशी त्यांची धारणा आहे. कलात्मकतेला ढका न लावता तिची बूज सांभाळून प्रयत्न, निष्ठा व श्रद्धा यांच्याशी प्रामाणिक राहून साहित्यनिर्मिती करावी लागते अशी त्यांची वृत्ती आहे त्यामुळे ती जीवनाला स्पर्श करते नि समाजाचे भवितव्य ठरविण्यात हातभार लावते. ते सारे साहित्यात सामावते, किंबहुना त्याचा आणि साहित्याचा संबंध शिवाची पिंडी आणि त्यावर पाय पसरून पडलेला चोखोबा यांच्यासारखा एकसंधी असतो, असा त्यांचा विचार आहे. त्यामुळे साहित्य राजकारणापासून संपूर्णपणे विलग राहू शकत नाही. साहित्य आणि राजकारण या दोन न मिळणाऱ्या समांतर रेषा असे मानण्याचे काहीच कारण नाही. कुसुमाग्रजाना असे मनापासून वाटते. कुसुमाग्रजांची ही भूमिका चूक की बरोबर हा वादाचा प्रश्नही होईल, पण तो बाजूला ठेवून विचार केला तर, त्यांच्या या भूमिकेने त्यांच्या प्रकाशपूजनाला अधिक तेज चढल्याचे स्पष्ट जाणवते. हे तेज कुसुमाग्रज जीवनवादी साहित्यिक आहेत हे ठरवीत असले तरी तसे केवळ जीवनवादी साहित्यिकांच्या कूपमंडूकी वृत्तीबद्दल त्यांना प्रेम नाही; त्यांना प्रिय आहे जीवनातल्या प्रखर मूल्यांची कदर. ते खरेही आहे. त्यामुळे कुसुमाग्रज 'जीवनवादी' च्या चेचवट चौकटीत बसणारे नव्हेत. मनस्वी कलंदर वृत्ती, आत्मचिंतनात रमणारी अंतर्मुख दृष्टी आणि जीवनमूल्यांची कदर करतानाही कलामूल्यांची हेळसांड होऊ न देण्याची सावध प्रवृत्ती–या गोष्टींनी त्यांची अखंड साथ केली आहे.

कुसुमाग्रजांच्या या जीवनदृष्टीचा आलेख 'जीवनलहरी', 'स्वगत' अखेर सर्वत्र पहायला मिळतो.

---

1. Gasset Jose Ortegasy : 'Man & People' : P. 48.

'जीवनलहरी' मध्ये सामाजिक मनाचा आर्त उद्‌गार आणि उदंड आशावाद व काहीसा स्वप्नाळूपणाही व्यक्त करताना कुसुमाग्रजानी म्हटले आहे :

पडलेले मानव हे
चिखलापरि पायदळीं
जगताच्या जुलुमाचे
सत्तेचे दीन बळी !
क्रांतीच्या रविकिरणीं
याच कर्दमामधुनीं
मोहरेल मुक्तीचें
मंगल आरक्त कमल !

हे 'माझेपण' कुसुमाग्रजानी 'स्वगत' मध्येही जपून ठेवले आहे. ते खुरटलेले नाही की वाढलेले नाही. वास्तवाचा मनोरम विलास चढल्याने सुबोध बनून आपल्या-पुढे ते उभे आहे. मुक्तीचे आरक्त कमल मोहरेल असला स्वप्नाळू ध्यास मागे पडला असला तरी त्याच्या सिद्धीसाठी करावयाच्या प्रयत्नांचा–मग हाती फल काहीही येवो–कणखर ओढा सामाजिक कवितेच्या 'ध्रुवपदा' त व्यक्त झाला आहे:

हें सारें खरें असेल
अथवा आहेहि
पण तरीहि–
माझ्या गीताचें ध्रुवपद एकच आहे.
माणसाच्या माथ्यावर
दारिद्र्यासारखा शाप नाहीं
पृथ्वीच्या पाठीवर
इतकें अमंगल, इतकें दुःखदायक, इतकें भेसूर
दुसरें पाप नाहीं !
जोंपर्यंत माझ्याजवळ गीतासाठीं शब्द आहेत,
शब्दासाठीं श्वास आहे
तोंपर्यंत–
याच ध्रुवपदाचा, याच ध्रुवपदाचा
माझ्या गीताला ध्यास आहे !

(स्वगत : 'ध्रुवपद')

हा अधोगत मानव
खोट्या दैवतांचा पुजारी
खोट्या नीतिमत्तेचा पहारेकरी
रानटी भावनांचा मांडलिक
मनाला मारणारा, मानवतेला विकणारा
दुर्बळांना तुडवणारा, नरमांस–भक्षक

( समिधा : 'शैवांची प्रार्थना')

अशी माणसाची, माणुसकीची दुर्दशा झाली आहे. मानवांच्या सृष्टीमधून मानवता हद्दपार झालेली आहे.

मानवाची सावली पण मानवी शरीराशिवाय !
रस्त्यातून घरातून हाडातून रानातून
आपलें हरवलेले शरीर ती शोधीत आहे !

( समिधा : 'वृद्धत्व' )

असे घडले आहे म्हणूनच ' सर्वांतील, सर्वांचा आणि सर्वांसाठी ' कुसुमाग्रजांचे ' हजारांसंगे नाते ' जडून राहिले आहे. कुसुमाग्रजांच्या सामाजिक कवितेमागे असा निश्चित जाणीवेचा ध्यास आहे.

या रडणाऱ्या मातीच्या गर्भात
धसधसत आहेत
पांची खंड पृथ्वी हलविणारे
शेष–कालियासारखे सहस्रवधि नाग
या दगडांच्या उशीवर माथे ठेवून झोपलेली आहे
लक्ष दावानलांची आग !

(स्वगत : ' ध्रुवपद ' )

या लपलेल्या सामर्थ्याच्या गतीचा वेध आहे, ती अधिक कठोर त्यामुळेच झाली आहे

कुसुमाग्रजानी स्थंडिल पेटविले : "गंभीर गर्जितातुनी दे नव्या जगाची स्मृती !" म्हटले. प्रकाशपूजन केले. वणवा भडकविला : " मरण्यालायक मरत नाही जे । त्याजला मारीत वणवा आला " उद्‌गारले, उपहास मांडला : चालू द्या हातांनो.

असेच कार्य, फिरू द्या अशीच जीवित रहाटी । आयुष्य अवघे क्षणात शिणाचे विश्रांतीसाठी । नि शांततेसाठी स्वर्गात स्वागत कराया, सिद्ध वैकुंठाची पेठ आहेच शेवटी " असे परिहासून धिक्कारले. सहजपणे स्वतःच्या काव्यप्रकृतीला अनुलक्षून आणि जीवनाविषयीच्या धारणेच्या संदर्भात ! त्यात खास हेतूचा, काही दिले-मांडल्याचा अव्यापारेषु व्यापार नाही. स्वतःच्या व्यक्तित्वाला जीवनदादायी स्पर्श घडावा या आवेगाने स्फुरलेली (काही लिहिलेली) कुसुमाग्रजांची कविता प्रायः त्यांची, त्यांच्यासाठीची 'आमची' कविता आहे. स्वतः कवीने समूहमनाचा गाढ वहीम तिच्यावर ठेवला, आम्हाला तो भावला म्हणून ती आमच्यासाठी, 'आमची' आहे. कुसुमाग्रजांच्या कवितेतला अंतर्गत सूक्ष्म स्त्रोत या घाटाची कल्पना देतो.

समूहमनाची दीप्तीसंपन्न बैठक घेऊन उभी राहिलेली कुसुमाग्रजांची सामाजिक कविता दाहक सूर्यकिरणांनी झळझळून निघालेली आहे. जमीनअस्मान व्यापून उरणारी विषमता, "असत्यावरती बांधुनि थडगे नसल्यावर आराम करू" अशी माणसाची ढोंगी वृत्ती आणि निर्घृण माणसाचेही अंतःकरण करपवून टाकणारे भीषण दारिद्र्य पाहून कुसुमाग्रज पेटून उठले आहेत. ( आजही थंड नाहीत! ) अन्यायाविषयीची मनस्वी चीड सौम्य उपहासाच्या तीव्र धारेतून व्यक्त झाली आहे. स्वतःच्या झोपडीतील मंद दिव्याने तेजाळ जीवनाची मशाल पेटविली आहे आणि देशाचे विशाल घर दीप्तीने उजळून टाकण्याचे 'गहन जाण्हवीपरी' दान मागितले आहे. या ' भविष्याच्या वरदाना ' च्या मागणीत कुणाचा द्वेष नाही. कुणाचा तिरस्कार नाही, कुणाबद्दल घृणा नाही. आहे ती सुसंस्कृत, समंजस माणसाची सुजाण भूमिका ! त्यामुळे विध्वंसनाचा कसलाच वाकडातिकडा विचार ती मनात उत्पन्न होऊ देत नाही. तिला साम्यवादी रंग आहे हे म्हणणे त्यामुळेच टिकत नाही. साम्यवादी रंगात न बसणारी सर्वोपरि स्वातंत्र्याकांक्षाही ती प्रकट करते. त्यामुळे हे म्हणणे तर अगदीच तकलादू ठरते. मानवी जीवनातल्या मूल्यांच्या कदरीबरोबरच स्वातंत्र्याच्या भावनेबद्दल अनिवार आस्था कुसुमाग्रजानी बाळगलेली आहे. व्यक्ती, समाज आणि राष्ट्र या सगळ्याच दृष्टीने अशी

सोन्याच्या सिंहासनांचा चुरा करणारी
सम्राटांचे मुकुट मातीला मिळविणारी
गुलामांना मानव करणारी
दासांना स्वामी करणारी
संहार करणारी आणि सेवा करणारी

(समिधा : 'नैनं छिन्दति शस्त्राणि')

कुसुमाग्रजांची स्वातंत्र्याकांक्षा आहे. सर्वत्रच तिचा उफाळ सणाट्याने उभा आहे. त्यामुळे कुसुमाग्रजांची दीप्तीसंपन्न कविता अधिकच तेजोमयी झाली आहे.

' देवाच्या दारी ' पासून ती ' राजा आणि मंत्री ' पर्यंत, कुसुमाग्रजानी अन्याया-विरुद्ध स्वातंत्र्याचा हा लढा लढविला आहे. विविधागांनी उपहास प्रगट केला आहे. निर्बल बनून नव्हे तर ' माझ्या जीवनाचा मीच शिलेदार ' ही नेटकी जाणीव मनाशी ठेवून! तीमुळेच तर जगाच्या राण्यापासून राजा आणि मंत्र्यापर्यंत पटेल ते चक्क बजावण्याची शक्ती आली. ' देवाच्या दारी ' धरणे धरून बसलेला, भित्या भावनेस धीर शोधण्यासाठी पाषाणास थोर करणारा आर्त जगाच्या राण्यास ' तुझ्या महिम्याची प्रचंड पुराणे, गमती तराणे अर्थहीन ! ' असे चक्क बजावतो. आर्त डोळ्यातील सारी आसवे आटलेली आहेत अशा ' बळी ' ची अखेर साधताना चित्रमयी भाषेत कवी ' दयेचे मढे ' उभे करतो,

मानवाच्या संस्कृतीची काय लागे ही ध्वजा
तीस कोटी दैवतांच्या की दयेचे हे मढे !
भेकडांनो, या इथे ही साधण्याला पर्वणी
पेटवा येथे मशाली अन् झडू द्या चौघडे !

( विशाखा : ' बळी ' )

अखेर गाडग्यांची रास नशिबी आलेल्या दीन शेतकऱ्याच्या दौलतीचा ' लिलाव ', विषयाने फुंफाट बनलेली धुंद नजर त्याच्या पत्नीपर्यंत, त्याच्या इभ्रतीपर्यंत आणून पोचविते आणि ' थोर थैलीतील वाजवीत नाणी ' बेगुमान सावकार निर्लज्जपणे हुंकारतो,

' आणि ही रे ! ' पुसतसे सावकार
उडे हास्याचा चहुकडे विखार

( विशाखा : ' लिलाव ' )

तेव्हा कुसुमाग्रजांच्या काव्यातून अंगार पेटतो. लाव्हाची लाट उफाळून येते. वेदनांचा घोष घुमू लागतो. भाषेचे कोष रिते होतात. कुठेही तोल न जाता वैखरी पैलूदार शब्दकळेचा वेष परिधान करून येते. ( हे थोड्याफार फरकाने सर्वत्रच घडते; पण अशा ठिकाणी अधिक. ) अशा ठिकाणी यथार्थ रूपकांचा वापर करून कविता अर्थाला सुबोध करण्यात, आवेश चेतवून त्याचा तुंग ऐस रसिकांच्या अंतःकरणात संक्रांत करण्यात ( आणि झोंबवून सोडण्यात )

कुसुमाग्रजांचा उपहास सर्वार्थाने सिद्ध आहे. 'त्यांच्यासाठी', 'आगगाडी व जमीन', 'राजा आणि मंत्री', 'दोन याचक', 'खाकी' ही याची काही उदाहरणे.

कुसुमाग्रजांची सारी सामाजिक कविता 'आषाढ घनाशी झुंजे वादळवात' अशी आहे. 'अंगार कणापरि' तिचे स्वरूप आहे. कवीच्या जिवंत सामाजिक मनातला 'आंतर अग्नी' त्यातून उफाळून आला आहे. या उफाळण्याला सत्त्वसंपन्न जीवनमूल्यांचा आधार आहे. नाशिकचा गोदाकाठ, कवी गोविंद आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या मृत्युंजय गीतांनी भारलेला आहे. याचा वारसा प्रत्यक्ष–अप्रत्यक्षरीत्या गोदेने कुसुमाग्रजाना दिलेला आहे. कुसुमाग्रजांची बंडखोर वृत्ती, या वृत्तीने समजून घेतलेली नियतीची निष्ठुरता. गोदेने केलेले संस्कार, तत्कालीन अस्वस्थ परिस्थिती आणि स्वातंत्र्याचा उद्घोष यामुळे कुसुमाग्रजांचा पिंड असा बनून गेला आहे की त्याला ,लुकलुक' आवडत नाही. ती भोक्ती आहे ती चमचमाटाची! काही ठिकाणी कवितांतून व्यक्त होणाऱ्या सामाजिक आशयाला असावी तेवढी सूक्ष्मता नसली, सामान्य माणसाला भावणाऱ्या आशयाप्रमाणे तो स्थूल रूपात असला, अस्सल कलावंताच्या पिंडात उपजूनही ज्या काव्यात्म पातळीत वितळून मुरायला हवा तसा मुरला नसला, तरी काव्याचा आत्मा सामाजिक ( प्रायः ते असामाजिक असले तरी आडकाठी येत नाही. पण ते तसेच असले पाहिजे हा अनाठायी आग्रह इष्ट नाही. ) व शरीर कलात्मक ठेवून आपली लेखणी विद्युल्लतेच्या तेजात बुडवून 'अग्निरेखे'ने काव्य लिहिणाऱ्या कुसुमाग्रजांच्या सामाजिक कवितांतून जागृत व प्रक्षुब्ध अशा सामाजिक मनाचे तेजस्वी उन्मेष पहावयास मिळतात. कुसुमाग्रजांची सामाजिक कविता 'वादळी' असली तरी धरतीवर चार अंगुळे उभी नाही. प्रारंभी ती स्वप्नाळू असली (किंवा बाटत असली) तरी पुढल्या निर्मितीत प्रखर वास्तवतेच्या उन्हाच्या झळीत हा स्वप्नाळूपणा टिकलेला नाही. 'उंच निळे प्रासाद' उभविण्यातील रित्या शब्दांची कवचे कधीच तुटून–फुटून गेली आहेत.

कुसुमाग्रजांच्या या पूर्वीच्या कवितेतील मानव्यावरील अपार निष्ठा कायमच आहे. महासागरात मानवतेचे निशाण रोवण्याची अनंत ध्येयासक्ती आणि अनंत आशा टिकूनच आहे. फक्त फाजील 'आवेश' आणि 'उतावीळ' कमी झाली आहे. 'लक्ष शून्यातुनि काही श्रेय आकारत' असल्यामुळे कुसुमाग्रज आज लिहितात,

पायतळीं पाषाणास
आहे कांहीं म्हणायचें
संपलें तें पर्व आतां
रडायचें, कण्हायचें

( स्वगत : 'लाट तेजाची' )

काळातील बदल हेरून कुसुमाग्रजांची जीवनस्पर्शी कविता कशी पालटत आली, येत आहे त्याची ही उत्क्रांती एक दर्शक–चिन्ह आहे.

त्यामधून ठसठशीतपणे जाणवते ते हे की, या काव्ययोग्याला समृद्ध मूल्यांचे, अपार त्यागाचे आणि असीम कारूण्याचे जबरदस्त आकर्षण आहे. जुनीपुराणी धाटणी मोडून, जीर्णशीर्ण बंधने धुडकावून वेगवेगळ्या पायवाटांनी जाण्याचे वेड आहे. या वेडात रसिकांशी विनम्र संवाद आहे आणि आपल्या विषयाला तात्त्विक प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याची दृष्टी आहे. परिणामी, प्राधान्याने कुसुमाग्रजांच्या कवितेचे बुद्धीला आवाहन होत असले तरी त्यांची उत्तुंग कल्पकता, सौंदर्यपूजनाच्या तीव्र हव्यासाकडून संथपणाने अंतर्मुख होत जाणाऱ्या विचारमन्थर वृत्तीचा वेगळेपणा, दलित मानवतेविषयी सहानुभूती आणि सणसणून उफाळणारा अंगार, राष्ट्रीय आकांक्षांचे जागते भान आणि त्याचे सांस्कृतिक मूल्य इत्यादी आशय–अभिव्यक्तीच्या गुणांचे दर्शन हमखास घडते. त्यामुळे कुसुमाग्रजाना 'माझे–मीपण नेमके' लाभते.

अमर शेख यांच्या कवितेचे धृपद कोणते आहे ?

त्यामागील प्रेरणा कोणत्या आहेत ?

अमर शेख यांनी सांगितले आहे, " भयावह संघर्ष मजपुढून सरकतो आहे, धक्के देतो आहे. उलथापालथी होत आहेत, बदल होत आहेत. एकेकाळी महिन्याचे रोजे करून पंचगांना, अल्लाला साद घालणारा मी समाजवादाची बुद्धिवादी सावली माझ्या नमाज, रोज्यावर पडलेली मी पाहिली. दुनिया पादाक्रांत करू पाहणारा हिटलरवाद पाहिला. दुसऱ्या महायुद्धाच्या, अवघे जीवन ग्रासून टाकणाऱ्या झळा पाहिल्या, साहिल्या, श्रमजीवी वर्गाची सत्ता प्रस्थापित झालेली, विस्तारीत होत असलेली पाहिली. पिळवणुकीचा पाया असलेली जगातील भांडवलशाही बाजारपेठ अस्तंगत होत असलेली पाहिली. पडेल ते काम मिळवून दुपारची भ्रांत मिटविण्यासाठी जीवाचा आटापिटा केला. त्याच माझ्या श्रमावर जगून मजवरच कुरघोडी करणारा मी पाहिला. संस्थानिकांचा नेत्रदीपक विलास पाहिला. त्या विलासाच्या उपभोगात पिचत पडलेली, सडत असलेली नैतिक मूल्ये पाहिली. नफ्यासाठी उत्पादन स्वीकारणाऱ्या देशातील व्यक्तिगत सुखाच्या एव्हरेस्टबरोबर सामाजिक दुःखांची परिसीमा माझ्याच या खंडप्राय भारतात मी पाहिली. साम्राज्यवाद्यांनी जाता जाता पेटवलेल्या दंग्यात रक्ताचा भाऊ मरून पडलेला पाहिला. वर्गात एका लंगोटीनं बावरलेला जिवश्चकंठश्च बंधू रक्ताच्या थारोळ्यात पडलेला पाहिला. ॲटम, हैड्रोजनसारख्या विध्वंसक बाँबची उत्पत्ती

## पाच अमरशेख यांची कविता: लोककवीची अग्निसूक्तें

पाहिली. हेलसिंकीचा प्रेमळ अंतःकरणाचा पण... 'जगी मानवी युद्ध नको रे' हे गर्जून सांगणारा स्वाभिमानी भंगी पाहिला... कवींच्या लाडक्या चंद्रावर मानवाने रोवलेली ध्वजा पाहिली, वर्णद्वेषानं भाजून, होरपळून निघाल्यामुळे अंतराळातील पाकोळ्यागत भिरभिरणारी 'काळी माणसं' आफ्रिकेच्या जंगलात स्वतंत्र होत असलेली पाहिली. ज्ञानेश्वर, तुक्याची समर्थवाणी ऐकली– नव्हे त्याच्या मानवतावादी प्रकाशातच माझे सारे बाल्य उमलले. 'केशवसुतांच्या तुतारी'ने मला उभे केले. बालकवींच्या 'फुलराणी'ने रिझविले. फुले पाहिली, विरहाकुल कमलिनी पाहिली, प्रेमाने अक्षरशः वेडा होण्याची धुंद अवस्था अनुभवली, आणि त्याच अवस्थेत झालेला प्रेमभंगाचा जबरदस्त तडाखा साहिला. गाढवाइतके कष्ट उपसले आणि कीर्तिशिखरावरील तृप्तीची धुंदीही अमूप लाभली. सुखदुःख, सौंदर्य–नरक सर्व – सर्व काही पाहिलं, साहिलं.''[१] अमर शेखांच्या कवितेमागे परिस्थितीचा हा जाळ आहे. त्यातून मंगलाप्रमाणे अमंगलालाही आमंत्रण आहे, पण अमर शेखांचा कणा बाभळीच्या गाठीसारखा ताठ आहे.

अमर शेखानी सांगितल्याप्रमाणे त्यांनी असे काही पाहिले आहे, असे काही साहिले आहे की तळामुळापासून त्यांचे दुभंगणे घडावे. कातळावर आपटताच नारळाची भकले उडावीत, जपलेल्या – जोपासलेल्या – जोजावलेल्या आत्म्याची खांडोळी व्हावीत, असे काही घडल्यास नवल न वाटावे; पण भयावह संघर्षात उभे राहूनही, दुनियेच्या अनिवार जाळात होरपळले जाऊनही अमर शेखमधील 'माणूस' शाबूत राहिला आहे, ठणठणीत, तडतडीत राहिला आहे. घसघशीत, सटसटीत बोलत गेला आहे : दुभंगणे नाही, गांगरणे नाही, भेदरणे नाही की बावचळणे नाही. ज्ञानेश्वर–तुकारामांच्या ओवी–अभंगावर सांधलेले अभंगत्व तुटलेले नाही, फुटलेले नाही की कोसळलेले नाही. प्रसंगी ते कलते होऊनही कुतुबमिनारासारखे सरळसोट राहिले, दौलताबादच्या किल्ल्यासारखे चिरेबंदी ठरले. साऱ्या जीवनाचा विशाल पट, अवतीभोवतीच्या उफाळणाऱ्या विध्वंसक आक्रंदनातून सुसाणत असूनही क्रांतदर्शी मानवतावादाने तेजाळून गेलेल्या प्रकाशावर काजळी आलेली नाही. गाढवाइतके कष्ट उपशीत मिळणाऱ्या कीर्तीने, शिखरावरील तृप्तीने अमूप धुंदी भोगणे चालू राहिले. अमर शेखानीच लिहिल्याप्रमाणे, '' सुखःदुख, सौंदर्य–नरक सर्व, सर्व काही पाहिले, साहिले. पण खरे सांगायचे म्हणजे सुखापेक्षा दुःख-दुःखच पाहिले. विंदा करंदीकर यांनी आपल्या एका कवितेत म्हटले आहे, ' असं काही

---

१. शेख अमर : ' धरती माता ' : ' सत्य ' ( प्रस्तावना ) : पृ. ११-१२

पाहिलं आहे की ज्याने मी दुभंगलो.' अगदी असंच दुभंगण्याइतकं मी पाहिलं."[२] पण अमर शेख दुभंगले मात्र नाहीत. तिळमात्र फुटले नाहीत की चिरले नाहीत. झेप टाकली, झुंज घेतली, दोन हात केले, दोन घेतले, दोन दिले, ढळ म्हणून कसला तो लागू दिला नाही. प्रबळ संग्राम केला. हार–जीत दोन्हीही घेतली. जितक्या हर्षाने जीत स्वीकारली तितकीच हारही आनंदाने पचवली. यश वाहून जाते, अपयश साचून राहते; तसेही झाले. पण शेवटी यश–अपयश, हार–जीत एकाच तोलामापाने, एकाच मोला–डोलाने स्वीकारली. जय आणि पराजय पचविण्याची शक्ती आत्म्याने मूलतःच कवटाळली; म्हणून दुभंगणे घडले नाही. धरती फाटते, आकाश फाटते, सारी बूजच चिरफाळली जाते तेव्हा माणसाला आत्म्याच्या साहाय्याने उभे रहावेच लागते. अमर शेखांच्या ह्या आत्मिक शक्तीच्या दर्शनाने, ताकदीने, त्यामधील अमीट प्रेरणेने त्यांच्या फुललेल्या कर्तृमकर्तुम शक्तीवर नितांत विश्वासाचे प्रोक्षण केले. वादळातील पाचोळ्यागत गिरक्या खात भिरभिरणारा एक कलावंत कवी अमर शेख, वादळी काळच्या करणीविरूद्ध आत्म्याचे मोल हाती धरुन उभा ठाकला. त्यातूनच अजिंक्य नाही पण त्याजवळ जाऊन पोचणार नाही असे मुळीच नाही; आणि कदाचित पूर्ण बदल करू शकणार नाही हे खोटे नाही पण त्या दिशेने प्रवास करणे अशक्य असे मुळीच नाही; हा आत्मप्रत्यय मनाने पोसला, जोपासला, वाढविला. तुळशीला शांतपणे मंजिऱ्या याव्यात तसे वातावरणात घडत राहिले असते तर आत्म्याचा भडका होण्याचे कारणही नव्हते. पण इथे तर पोटात प्रचंड प्रलय घेऊन भयानक संघर्ष जीवनच ग्रासून टाकतो आहे. मग पोषण न व्हावे, साथ न मिळावी तर काय व्हावे ? अमर शेख मधला आशावाद ताठ झाला. किरकोळीला जागा राहिली नाही. हलके फुलके म्हाताऱ्यासारखे चट्सारे उडून गेले. राहिली ती जीवन ग्रासणाऱ्या, 'आत्म्या' चा पिळा करून टाकणाऱ्या आक्रमणाविरूद्ध इरेसरीची झुंज. त्यातून धगधगती ज्वाला बनून अमर शेखांची कविता येते. मी मी म्हणणाऱ्यांना 'गळवून' टाकणारी, काही काळ जागच्या जागीच स्थिर करून टाकणारी, बुद्धी चक्रावून सोडणारी ! दुरंत प्रमाथी अशी ही कविता आहे. स्वकालीन, समीपकालीन युगप्रवृत्तीची ती वृत्ती आहे.

अमर शेखांची कविता करीत असलेले हे प्रवक्तेपण कुणाचे आहे? कुणासाठी तिची तडफड होते आहे ? कुणासाठी ती धडपडत राहिली आहे? अमर शेखांची कविता सामाजिक जीवनातील सामूहिक मनांचे सुकल्या वेणीसारखा भुगा भुगा

---

२. कित्ता : पृ. १२

होऊन गळून पडणाऱ्या माणसांचे प्रतिनिधित्व करीत आहे. स्वकालीन युगप्रवृत्तींचा हा कवी स्वप्रवृत्तीची रडगाणी गात नाही, स्वदुःखाची कडा तिथे उजळून येत नाही. समूहाची भावना ही या कवीची भावना आहे, समुदायाच्या व्यथा या त्याच्या व्यथा आहेत. खरे तर तो एकटा असा नाहीच. तो अनेकांचाही एक आहे. सहजिकच समाजमनाला भाजून काढणाऱ्या वेदना आणि अंगांग पोळून टाकणाऱ्या व्यथा त्याच्या मनाच्या पुळणीवर तुफानासारख्या आदळतात. या व्यथा-वेदनात, दुःखातच तो असतो, म्हणून तो खऱ्या अर्थाने उभा राहू शकतो, उभा राहिला आहे. या प्रवक्त्याला वैयक्तिक जीवन असले तरी सभोवतालच्या विराट, व्यामिश्र आणि संकुल जीवनात ते पार मिसळून गेले आहे. व्यक्तिगत अस्तित्व हा भास आणि सामाजिक अस्तित्व हे सत्य अशी या प्रवक्त्याची जीवनरीती आहे. इथला 'मी' 'आम्ही' असतो. जगताना कदाचित् ( पण ते तरी कितपत खरे आहे ? ) तो 'मी' म्हणून जगत असेल पण प्रायः त्याचे भान 'आम्ही' तच आहे. स्वाभाविकपणेच तो बोलतो ते तो म्हणून नव्हे, आख्खे समाजमुखच त्याच्या मुखाने बोलत असते, डोलत असते, चालत असते. त्याचा सारा हुंकारच मुळी त्या रीतीचा असतो. अमर शेखसारखा स्वकालीन युगप्रवृत्तींचा प्रवक्ता समाजाच्या श्रद्धेय परिपूर्तीसाठी स्वतःचे निर्माल्य पाहू इच्छितो. 'बेहत्तर पण पीछे हटना नही' किंवा 'हिमतको मत हा मुसाफिर' अशी त्याची प्रतिज्ञा असते, जीवननिष्ठा असते. स्व-मंडित, स्व-मान्य, स्व-रचित ध्यासाच्या परिपूर्तीसाठी, बेगुमान वृत्तीचे संतर्पण हाच मुळी अशा कवीचा पिंड असतो. त्याच्या आशा अमर असतात, अभिलाषा चिरंतन आणि भावनांचा रंग शाश्वत ! साहजिकच त्याचा आवेग ईप्सित गोष्टींकडे दीपस्तंभाप्रमाणे दृष्टी खेचून घेतो. या दृष्टीत नेहमी ताजेपण असते, खेचण्यात कमालीचा आवेग असतो. काळी सावली फारशी पडत नाही. अमर शेखसारख्या प्रवक्त्याची जोरावलेली भावना ही सटरफटर अनुभवांवर जोजावलेली नसल्यामुळे फुलत्या अंगारावर तिची बैठक असते. युगधर्माचे म्हणूनच ती जागरण करते.

या जागरणात प्रामुख्याने भर आहे तो 'समष्टी' वर. विचार आहे तो 'समष्टी'चा 'व्यष्टी' चा नव्हे. ही व्यष्टी 'समष्टी'चा विचार करते तो अनुभवाचा जळता रस घेऊन. तीत माझे काय होणार ? मी कुठवर चढणार ? असले फालतू विचार नाहीत. करायला थोडीफार सवड असली तरी इच्छा नाही. युगधर्माचा प्रवक्ता व्यक्तिधर्माच्या खातेऱ्यात कुजत राहत नाही, सडून जात नाही. कै. अमर शेखनी लिहिले आहे, "अगदी असंच दुभंगण्याइतकं मी पाहिलं, आणि जगातील बहुश-

सगळे विचारवंत आज याच एका चिंतेत आहेत की हे सांधायचं कसं ? या विचारवंतातून कोणीही असा राहिलेला नाही की जो 'वरून' येणाऱ्या एखाद्या प्रेषिताची वाट पाहील. नव्हे–प्रत्येकाची तळमळ आहे की मानवसमाजाचे शारीरिक, मानसिक उध्वस्तीकरण थांबलेच पाहिजे. आपल्याला समजेल एवढा व समाजाला झेपेल एवढा कर्मयोग समाजात बाणवलाच पाहिजे. हा एक सृजनशील विचारप्रवाह आज सर्वत्र वाहू लागला आहे. पण त्याचा एक लक्षांश, कोटयांशही माझ्या कवनात उमटला नाही, तरी संसारातील दुःख नाहीसं व्हावं म्हणून जीवाची कासावीस मात्र चालू असते सारखी. काय करावं म्हणजे हे सर्व नाहीसं होईल व मानवाला हवं ते मिळेल, याच प्रश्नाची घालमेल सतत चालू असते मनात. त्यातून सुटणारे शब्दच काव्यरूप घेत असावेत." म्हणजे सर्वांगीण जीवनाच्या संरक्षणाची कवचकुंडले गळून पडत आहेत, अश्वत्थ मणी तडकले जात आहेत; त्यांची प्रतिष्ठापना कशी करायची असा हा प्रश्न आहे. नव्या युगात, नव्या जमान्यात कवचकुंडले गळून पडताहेत आणि आहे त्या रूपामध्ये, अगदी जशीच्या तशी ती उपयोगीही पडणारी नाहीत. कालानुरूप ती ओघळणार हे अपरिहार्यत्व हे खरे पण गळणाऱ्यांची जागा चिकटणाऱ्या अन्य कुणी घेणे आवश्यक आहे. पण तसे घडत नाही हे दुःख आहे. तसे घडते तर 'अलगसी बात' करण्याचे प्रयोजन नव्हते. म्हणूनच अमर शेखसारख्या कवी–शाहीराने समोर उभ्या ठाकलेल्या, ठाकणाऱ्या परिस्थितीतील 'सत्यधर्म' आळवायचा प्रयत्न केला आहे. त्याने तो 'युगधर्म' मानला आहे.

या युगधर्माचा प्राण अंतःप्रेरणेचा आहे, अंतःस्फूर्तीचा आहे; बेंबीच्या देठापासून तो निघालेला आहे. त्यात दबाव, दडपण, सक्तीचा भाग नाही. युगधर्म सांगणारा मुळातच कलंदर, बेफिकीर आणि काहीसा बेमुर्वत (चांगल्या अर्थाने) असतो. त्याला हुकमेहुकूम लिहिता येत नाही, बोलता येत नाही, नाचणे जमत नाही. तोंडे घालण्याच्या भुलभुलावणीने फुलल्याचा आक्रोश करता येत नाही की डांग्या खोकल्याची गाणी रचता येत नाहीत. कुणाच्या घडवंचीखाली जाऊन बसणे, लखनवी पायघोळ जी–हां–जी करणे हे त्याच्या रक्तात नसते. कुणी–अगदी कुणीही-केव्हा केव्हा स्वतःही स्वतःच्याच आत्म्यावर मिरासदारी गाजवू नये अशी त्याची तहान आणि तिला पिटाळून लावणे ही त्याची भूक असते. तीत पलायनाला, निष्कारण भुभुःकाराला वाव नसतो. आत्म्याच्या स्वातंत्र्याविरुद्ध, त्याने उजविलेल्या तळमळीविरुद्ध काहीही करायला, काहीही स्वीकारायला त्याचा साफ साफ नकार असतो. त्यामुळे जीवनविषयक मूल्यांचा, श्रद्धांचा किंवा निष्ठांचा कालोचित बदल अमान्य नसला तरी त्यांच्या मन चाहेल विघातक फिरवाफिरवीला त्यातील

स्वार्थांध लटपटी-खटपटींना पूर्ण मज्जाव असतो. स्वहितावर निखारे ठेवून, फकिरी पत्करून (तशी ती पत्करल्यामुळेच युगधर्माचे प्रवक्तेपण करता येते.) मूल्यांची जपणूक करावी लागते. तशी ती करताना अंगामनाचा जो विलक्षण कोंडमारा होतो, उतट भावना–विचार–कल्पनांचा जो काला होतो, आणि सर्वांगाची जी रवी होते त्यातून प्रवक्तेपण साधणाऱ्या कवितेची निपज होते : वीर्यपतनानंतरची सृजनोन्मुख गतार्थता तिथे साकळून राहते आणि अभंग चैतन्याने परिप्लुत कडेलोटाची परिसीमाही दिसते. या प्रक्रियेतूनच दुनियेतील 'अलगसी बात' पुढे येते. ज्याचा दुनियेने फारसा कधी स्थिर चित्ताने विचार केला नाही अशा 'बिलकुल नई चीज' चा अमर शेखनी बेंबीच्या देठापासून पुरस्कार केला आहे. जो मुळी ज्यात उभा जळतच असतो त्याला त्या जळण्याची वेदना सांगण्यात अर्थ नसतो. त्यांना भुलविण्या–झुलविण्याचा, त्यांची मने काबीज करण्याचा प्रश्नही नसतो. प्रश्न असतो तो त्यांच्या हिवस परिस्थितीतून त्यांचे मन बाहेर काढण्याचा, त्यातील चैतन्याला कृतिप्रवण बनविण्याचा, त्यांना कृति–प्रवण करण्याचा ! त्यासाठी अभिमन्यूने कृष्ण-कथेला हुंकार भरावेत तसे अशा कवीच्या अंगामनाचे होते. मात्र त्यात परिस्थितीवर घाव घालणे जमले तरी ती तोडणे–फोडणे, त्याचे रस्ते सापडतातच असे नाही. थोडेफार सापडले तरी ते जनव्यापक बनू शकतीलच याची खात्री देणे कठीण असते. कधी कधी स्वतःतील अंगभूत मर्यादांनीच आपले मार्ग आकुंचित करून टाकलेले असतात. मनीमानसी तुफानणाऱ्या कैफाने त्याचे भानही हरवलेले असते. पुढे झेपावणारे मन, बंद झालेल्या वाटा, यातून घ्यावी लागणारी माघार; मग मनाला विलक्षण मरगळ येऊन राहते. अमर शेखना 'व्यवहार' जमला नाही, जमवता आला नाही, त्यामुळे अशा मरगळीने त्यांनाही मिठी घातली आहे. अमर शेखमधील अखेर अखेरचा 'तडफडणारा माणूस' याहून वेगळे काही सांगत नाही.

अमर शेख लोककवी आहेत, मधुबुलंद पहाडी आवाजाचे जमदग्नी लोककवी आहेत. त्यांच्या फुलण्यात त्यांच्या कवितेचे उमलणे आहे. उपायांचे दिग्दर्शन नाही. साम्यवादाचा डिंडिम हे सर्वस्पर्शी उपायांचे चित्रण नाही. त्या मार्गातील एक जीवनप्रणाली म्हणूनच तिचा विचार आहे. जीवनसृष्टीशी निगडित, विचारांनी स्वीकृत म्हणूनच तिचा अंगिकार हे त्याचे स्वरूप आहे. त्याने सगळे प्रश्न सुटतील अशी मनोधारणा असली तरी याहून वेगळे काही मिळाल्यास आणि पहिल्याहून ते अधिक उपयुक्त ठरू पाहत असल्यास ते नको अशी दृष्टी नाही. 'साऱ्या दुःख दैन्याला आग' लावून 'जीवनाची सुंदर बाग' फुलवायची तर कुठलातरी एक खांब घट्ट पकडून कसे चालावे ? कसे जमावे ? अमर शेख एवढे आंधळे नाहीत.

मानव ही जात, माणुसकी हा धर्म मानणाऱ्या माणसाला ते शक्यही नाही. अमर शेख लिहितात, "माझ्याकडून कुणीही लिहवून घेत नाही. कुठल्या मोहानंही मी लिहू शकत नाही. माझी कविता माझ्या पुरतेच बोलायचं तर ती एक अशी तीव्र वेदना आहे. ती लिहिल्याशिवाय मोकळं मोकळंच वाटत नाही मला. त्या माझ्या या निर्मितीला, तळमळीला, वेदनेला कुणी कसलाही रंग दिला; तरी मला त्याचं काही वाटत नाही. पुनः लिहून तो केवळ दप्तरात ठेवून दिली किंवा एखाद्या देवळात, क्लबात, पार्टीत जाऊन चार दोस्तापुढं भेळ कॉफीबरोबर ठेवली की पुरे, असंही मला कधी वाटत नाही. तर ती हजारो लोकांपुढं ठेवून आपली व्यक्तीची भावना हजारो, लाखो लोकांच्या भावनाशी ताडून पहावी असं मला वाटतं ... माझी कविता याच पायावर उभी आहे."[४] साहजिकच कुणाच्याही घडवंचीखाली न जाता अवघ्या लघुमानवाच्या सुखाचा कण शेंगेसारखा उकलू पाहणारी ही शाहिरी कविता आहे : व्यक्तिगत जीवनाच्या एकतारीवर तिला गाता येत नाही. विराट मानवी समूहाच्या अनंत तारांचा सूर तिच्याठायी जमून यावा लागतो, त्यात विरून जाण्याचे सुख मग ती अनुभवते. वैयक्तिक पातळीवरून तिला चालता येत नाही. अशक्य असे नसले तरी, अवघ्याशी तिचे नाते असल्यामुळे, हजारोंशी तिचे सोयरं राहिल्यामुळे, अवघ्या लाखाशी तिचे लागेबांधे असल्यामुळे, ते शक्य होत नाही. मनालाच ते प्रशस्त वाटत नाही. साहजिकच अमर शेख यांची कविता हजारातील, लाखातील आहे पण त्या हजारो – लाखातील कुणा एकाची नाही, कुणा एकट्याची नाही. ती सर्वांची आहे, साऱ्यांची आहे; अवघ्या जनसंमर्दाची आहे. त्यासाठी चंदनासारखे घासले जावे, झिजले जावे अशी तिची धारणा आहे. अवघा मानवसमाज–दलित, पीडित, छलित, श्रमित मानवसमाज–ही अमर शेखच्या कवितेची अपार सीमा; तिच्या बोलात बोल ठेवणे, हसण्यात हसणे मिसळणे, दुःखाने व्यथित होणे ही तिची प्रकृती आहे. तिला कसला रंग असलाच तर तो या विराट मानवसमाजाचा–असीम जनतेचा आहे: तिच्या भावनांचा आहे, तिच्या विचारांचा आहे, तिच्या कल्पनांचा आहे. हा रंग एक वेगळे व्यक्तित्व उभे करतो हे कवीचे सामर्थ्य आहे, पण त्यास वेगळीच रंगरंगोटी करण्याचा अट्टाहास बाळगणे म्हणजे अमर शेख 'मुसलमान' आहेत हे न विसरणे आणि त्यांच्या कवितातून 'लाल टापांचा आवाज' शोधणे होय ! हेकटपणे! मुद्दामहून!! अमर शेखची भावना जनमानसाशी संवादी राहिलेली आहे. तीत कुठेही खाच पडू नये अशी दक्षता आहे. साहजिकच कवितेतील अमर शेख वैयक्तिक अमर शेख नाहीत. दोहोंमधील

---

४. कित्ता : पृ. १३.१४

'प्रकृती' त फारसा भेद नसला तरी कुठेतरी जो थोडाफार असण्याची शक्यता आहे तोही इथे मिटलेला आहे. अमर शेखची सारी कविता म्हणजे जित्याजागत्या जनसमूहाशी चाललेला अखंड संवाद आहे. स्वार्थांधतेने मन मुर्दाड बनलेल्यांना आणि गेंडचासारखी कातडी कमावलेल्यांना वळते – पण कळेलच असे नाही. कदाचित् कळणारही नाही. पण अमर शेखची उभी कविता जीवीच्या जिव्हाळ्याने फुललेले अग्निकाव्य आहे. सर्वस्पर्शी अन्यायाविरुद्ध धमन्या धमन्यातून उसळलेल्या रक्ताचे उद्रेकात्मक प्रतीक आहे. "हे जीवन अविरोध हक्कानं आणि मानानं जगायला मिळावं," अशी या अग्निकाव्याच्या धावपट्टीवरील परखड मागणी आहे.

अमर शेखच्या या अग्निकाव्याचा सूर स्पष्ट आहे. तिच्यामध्ये मानवी स्वातंत्र्या-कांक्षेच्या आड येणाऱ्या अनेकविध गोष्टींसंबंधीची बेसुमार चीड आहे. आतड्याला पडलेल्या कितीतरी लहानमोठ्या गाठींची व्यथा आहे. मनात कोंडून ठेवलेल्या प्रलयांचे, पोटात उभ्या असलेल्या कितीतरी वारूळांचे चित्रण आहे. असीम चीड आणि अनावृत्त द्वेष यांचे वादळी हवामान सर्वत्र पसरून राहिले आहे. रस आटविणाऱ्या जीवनातल्या खलपुरुषांवर देमार प्रवाह आहेत. रीतीसारखे होत नाही, कुठेतरी नड येते; ती जिथे नेमकी येते, तिथे पोचण्याची-अन्यायाच्या गाभ्याशी जाऊन भिडण्याची दर्द आहे. साळसूदपणे सूम काटण्यात दिल नाही. त्यामुळे संघर्षात आनंदाने अंगअंग भिजून येते. उलट काही घडले की, जिद्दीचे स्फुरण असूनही क्षणकाल का होईना पण सारा चेहरामोहरा कोवळा कोवळा होऊन जातो. आतून कदाचित हळूहळू ढासळणे घडत नव्हतेच असे नाही पण वरून कोसळणे होत नाही. सभोर उभ्या जीवनाचा विचका असूनही जीव पाखडणे थांबत नाही. मायाहीन आगीशी खेळ सुरू राहतो. त्यात छक्केपंजे नाहीत, डावपेच नाहीत, लपंडाव नाहीत, सरळ रेषेचा व्यवहार आहे. किंबहुना या चिडीचे किंवा द्वेषाचे असह्य वेदनेत रूपांतर होते तेव्हा खऱ्या अर्थाने अमर शेखचे मानवी जीवनाचे काव्यात्मक स्वातंत्र्यसूक्त फुलून येते असे दिसते. ही वेदना दोन स्तंभावर उभी आहे. ते आहेत: भाकरी आणि स्वातंत्र्य. भाकरी हिरावून घेणाऱ्यांविरुद्ध बंडाचा तर स्वातंत्र्य हिरावणाऱ्यांविरुद्ध क्रांतीचे शस्त्र परजण्याचा आदेश आहे. भाकरी हा पोटाचा प्राण, जगण्याचे सूत्र-तिच्यासाठी कष्ट असावेत, उपसावेत; उपसलेच पाहिजेत, पलंगावर विसावून ती मिळावी ही इच्छा मुडदुशी वृत्तीची आहे; हे सारे ठीक असले तरी कष्ट-अमूप कष्ट-करूनही ती मिळाली नाही, मिळत नसेल तर ? केल्या श्रमावर इतरच कुणी झब्बूशहा सुटत असेल तर ? तर त्यासाठी उठावाची, बंडाव्याची

हाक आहे. भडका उडाला पाहिजे, त्या भडक्यात अन्यायी सारे स्वाहा झालेच पाहिजेत अशी सरणी आहे. कुणाचीही हक्काची आणि त्यातही श्रमाधिष्ठित हक्काची भाकरी छिनावून घेण्याचा कुणालाही अधिकार नाही. प्रत्यक्ष सर्वसमर्थ परमेश्वरालाही; नाही मग इतर पामरांची कथा ती काय? जी गोष्ट भाकरीची तीच स्वातंत्र्याची. एक स्वातंत्र्य गेले की सारे काही नडते. स्वातंत्र्य हा मानवी जीवनाचा मूलाधार. भाकरीसाठी त्याला कात्री लागली की माणूस कुठे, केव्हा आणि कसा मोहवश होईल हे सांगता येत नाही. मग सुसंस्कारामुळे जागी होणारी कर्तव्याची जाणीव घरंगळू लागते. सोन्याच्या दिवसांचे मांडलेले डाव पार उधळले जातात आणि सगळी शोभाच मग नशीबात मांडून ठेवली जाते. खाते नावावर पण अधिकार दुसऱ्याचा; अशी भोगाची विभागणी होते. स्वातंत्र्यात काळीज अडकूनही त्याला जडलेल्या दुर्धर दुखण्यामुळे ते अन्य कुणाचे तरी तावेदार राहते. रुखरुख सोबतीला घेऊन उपयोग नसतो. पराभूत विषण्ण मन संतापाने भिरभिरून काही उपाय नसतो. साऱ्याचीच जिथे राख होते तिथे खाक ती काय असणार? कोणती असणार? सारे जीवनच रिकामे-रिकामे, पोकळ-पोकळ होते. स्वातंत्र्याचा हा मूलाधार गमवायचा म्हणजे राखायचे काय? पूजा बांधायची कशाची? स्वातंत्र्याच्या बाबतीत तडजोड नाही. भाकरीसाठी शरणागती नाही. लाचारी मग ती कोणत्याही रूपाची, स्वरूपाची असो स्वातंत्र्याला विरोधी आहे. भाकरीची लाचारी स्वातंत्र्याशी सौदा करते, तात्कालिक भूक भागविते पण ही भूकच शेवटी अग्निकुंडही पेटविते. अतृप्ती, भयानक भूक आणि उणीव इत्यादींचा भडका उडविते. अमर शेख यांनी आपल्या कवितेमधून भाकरी आणि स्वातंत्र्य यांच्या प्रतिष्ठेचा उद्घोष केला आहे. स्वातंत्र्य हे मूल्य तर भाकरी हा व्यवहार. व्यवहार सांभाळताना मूल्याच्या चिंध्या होऊ नयेत आणि मूल्य राखताना व्यवहाराला किड्यामकोड्याप्रमाणे शेणामातीत कुजत पडावे लागू नये; अमर शेखच्या कवितेची ही दृष्टी आहे; केवळ चतकोर-नितकोर भाकरीसाठी तो विक्राळ आक्रोश नाही. चिंध्यांच्या गाठोड्याला टीप घालीत वसण्याचा प्रकार नाही. वितभर पोटासाठी स्वातंत्र्याचे गर्भाशय उघडे करून मांडलेले ते विद्रूप दृश्य नाही. सत्याच्या पाठराखणीतून त्याच्या प्रतिष्ठापनेसाठी चाललेली एका आत्म्याची—काळजाला घरे पाडणाऱ्या एका आत्म्याची—ती बिकट धडपड आहे. ध्येयवादाच्या स्फुल्लिंगातून अमृतसिंचनाची प्रतीती देणारी, अवघ्यांच्या सुखदुःखाशी देणेघेणे ठेवणारी तिटकाऱ्याची ती वादळी अंगार-गीते आहेत. पोटात आतडी मोकळी मोकळी होऊन चावा घेत असल्याचा भास करून देणाऱ्या ह्या गीतांची धग ज्यांना झेपत नाही त्यांनी स्वतःच्या वांझ-वृत्तीची अभद्र निदेशी सोबत करण्याची गरज नाही.

अमर शेखच्या कवितेमध्ये क्रांतीचा जयनाद विक्राळत राहतो तो ध्येयवादातून. अवतीभोवतीच्या निर्दय–विषम–अन्याय्य परिस्थितीने त्यांचा जीव कातरतो, कुरतडल्यासारखा होतो. त्यातून सुटले पाहिजे, सोडविले पाहिजे असे उमाळे येतात. उमाळ्यामागील 'दया' कृतीत आणणे वाटते तितके सोपे नाही हे मनोमनी पटलेले असते. पण सामान्यांच्या जीवनातील न संपणारी पोकळी प्रलयंकारी झोंबीखेरीज आटोक्यात येणार नाही, हेही निश्चित झालेले असते. अमर शेखना पछाडून टाकणाऱ्या या 'फिलींग' ने त्यांची सारी कविता घडविली आहे; मस्तीने जीवन जगायला ती सांगते, जगत राहते. अमर शेखच्या कवितेजवळ कम्युनिझमचे फक्त 'फिलींग' च नाही, फक्त 'लॉजिक'च नाही तर प्रत्यक्ष 'लाईफ' च आहे; त्यांची कविता तेच बोलते, तेच सांगते; त्यांच्या कवितेतील 'टणकपणा' मागे ही ओढ आहे. प्रा. न. र. फाटक यांनी म्हटले आहे, "कम्युनिस्ट म्हटला की वर्गकलहाच्या भूमिकेवरून तो सामाजिक व्यवस्थेचे निरीक्षण करू लागतो व त्या व्यवस्थेतील जे अल्पसंख्य प्रबळ घटक बहुसंख्य जनतेच्या श्रमावर चरत असतील त्यांच्या नाशाने, एकंदर जनतेला सुखी करण्याची भाषा– तिच्यावर भाषा, अहिंसा या शब्दांची बेगड न लावता-सढेतोडपणाने वापरतो हे सर्वांना माहीत आहे. सत्य-अहिंसेच्या पुजाऱ्यांपैकी मुष्कळांना आज वर्गकलह मान्य आहे. या कलहात अहिंसात्मक म्हणून समजले गेलेले सत्याग्रहाचे शस्त्र उपयोगात आणावे; या कलहातल्या प्रबळ प्रतिपक्षाच्या हृदयपालटावर विश्वास ठेवून त्याच्या नाशाची भाषा बोलू नये व क्रिया आचरू नये, कम्युनिस्ट तशी भाषा वापरतात व सदर पुजाऱ्यांच्या समजुतीप्रमाणे क्रियाही आचरतात म्हणून त्या पंथाला जनतेने जवळ येऊ देऊ नये व सरकारने सुचेल तो उपाय अमलात आणून त्यास ठेचून टाकावे असा त्यांचा अभिनिवेश आढळतो. येथे फक्त वर्गकलहाची स्थिती सत्य, अहिंसेच्या तथोक्त भक्तांनाही मान्य असणाऱ्या मुद्यापुरते पहावयाचे असल्याने तेवढाच मुद्दा वाचकांनी लक्षात ठेवल्यास बरे. श्री. शेख यांचे कवित्व वर्गकलहाने भरलेले आहे म्हणून बिचकण्याचे मग कारण राहणार नाही. कम्युनिस्ट हा आपल्या तत्त्वज्ञानाप्रमाणे जनतेमध्ये राहून, राबून, जनतेच्या सुखदुःखांचा ठाव काढून, लोकजागृतीचे व लोकशिक्षणाचे कार्य करीत असतो. 'खानेकू हम और लढनेकू मेरा भाई' असल्या अंगचुकार तारतम्याने तो वागत नाही, हे कम्युनिष्टांचे गुण त्याच्या शत्रूनाही नाकारता येत नाहीत. त्याचे भय, त्याच्या अविश्रांत व निर्भय स्वकार्यनिष्ठेच्या बळाने वाढू पाहणाऱ्या लोकप्रियतेमुळेच प्रतिपक्षाला वाटते, ही गोष्टसुद्धा अगदी स्पष्ट आहे."[५]

---

५. फाटक प्रा. न. र. : 'अमरगीत': 'सत्य': पृ. ४

यानुसार अमर शेखच्या कवितेला 'कम्युनिष्टी तत्त्वज्ञाना' ची बैठक तर आहेच पण त्याहूनही ते अधिक 'आहे रे आणि नाही रे' च्या वर्गकलहाचे लोकशिक्षण करणारे विद्यापीठ आहे, व्यासपीठ आहे. अमर शेखच्या साऱ्या कवितेचेच मुळी असे स्वरूप आहे : आपण मेलेल्यांची कवने गातो, गुणानुवादाची शर्यत लावतो, गळ्यावर गळे काढून श्रद्धांजली वाहतो. पण क्षणाक्षणाला मरतात त्यांचे काय ? त्यांच्याबद्दल आपण काही करीत असतो का ? निदान मातीत मिळून जाणारे दोन अश्रू तरी ? अमर शेख लिहितात,

पण जे मरती क्षणाक्षणाला
फूटपाथ न् गल्लीबोळातुनि
बेकारीस्तव, औषधाविणा
भाकरीविणा तशोच त्यांची
इच्छा असता जगावयाची,
दखल तयाची कधी न घेता

आपण करतो काय? – कृतघ्न होतो. हा बिलदंरपणा केव्हा एकदाचा नसतो तर हरघडीचा असतो. जीवन ही एक चैतन्यप्रद वस्तू, एक महान प्रयोग आहे. उगीचतेने भरलेले ते भुस्कट नाही की कुणा वेडयाने सांगितलेली अर्थहीन कहाणी नाही. म्हणूनच हरेक घडीतील क्षुद्र, असंस्कृत जगाला आग लावणे क्रमप्राप्त होते. नव्या संस्कृतीतील भेसूर विषपिल्लांना जागीच ठेचणे वृद्धीच्या दृष्टीने जरुर होते. शेवटी जीवनाने एक विराट संगर उभा केला आहे आणि तो जिंकायचा आहे. घरकेपणाने, साळसूदपणाने, समन्वयाच्याच दुबळया भावनेने तो जिंकता यायचा नाही. अपयशाची गाठोडी वाढत जातील आणि निराशेच्या छोटया मोठया चिंध्यानी जीव बुद्रुक बनून जाईल; अमर शेखना त्याची पक्की खात्री आहे. समाजाचे राजसरूप संघर्ष–समन्वयातूनच टिकविता येते असे कवीला वाटते आहे. त्यासाठी

उद्यास मिळविन अनेक साथी
हात देउनी त्यांच्या हाती
ओढुनि स्वर्गा आणिन जगती
वाट अचूक मी चालत आहे

त्यामुळे देह पिजण्याची आणि जीव कातरण्याची भीती नाही. 'जगती स्वर्ग ओढुनि' आणीपर्यंत 'जीवा चैन' नाही, वातावरणात कितीही ताण आले तरी

फिकीर नाही; पण 'जीवनसंगर जिंकाया' 'गध्याचेहि धरिन पाय मी' असे कवी सांगतो,

जिद्द नि ईर्षा मर्दाची पण
मर्दालाही मुजरा देइन
या कायेचे करूनी जोडे
त्या देवाच्या पायी घालीन
मानवदेही असूनिही जो
स्वर्ग मानव चरणी आणिल

— हे व्हावे, घडावे. सारा शक्तिपात होऊन जाण्याआत व्हावे. उभ्या आयुष्याला निःसत्त्व व निर्द्वंद्व कळा येण्याच्या आत घडावे. खरे तर 'होते नव्हते मनही झिजले, आज क्षुधेने सारे थिजले, हात शरीर अन् मनही न उरले,' अशी अवस्था आहे. पण म्हणून संगर कुठे संपला आहे ? कुठे मिटला आहे ? विश्वात शून्य बनून तर जगात कितीतरी जगताहेत. अमर शेख या विश्व-शून्यांची दृक्‌चित्रेच दाखवितात. 'माझी आई' मध्ये ते सळाळून सांगतात,

होय तीच ती माझी आई–माझी आई
ती ताटकळत उभी आहे जी
नाक्यानाक्यावर दिसते ती
गलिच्छ दुवळी दिसते बाई
होय तीच ती माझी आई–माझी आई

किंवा

क्षयाने मेली बाबूची बहीण
केशव तरणाबांड क्षयाने मेला
गेली क्षयानेच आई बेबीची
बेबी पण मेली तीहि क्षयानेच
तरूण बेबी
वय सोळा
झाला तिचा चोळामोळा
तिचा तिच्या तारुण्याचा
रसिक ? मला म्हणती सदा

केवळ आनंद केवळ सौंदर्य
दिसेना तुला कविमनाला
दुर्भागी बेटा

– हे आणि असे कितीतरी बदलायचे आहे. त्यासाठी रात्रंदिन युद्ध आहे, अट्टाहास आहे. वस्तुतः हे लवकर बदलावे, बदलेले जावे, बदलणे आवश्यक आहे; पण कुठे बदलते आहे ? का बदलत नाही हे सारे ? अशा कोणत्या अडचणी मार्गात येताहेत की हे परिवर्तन अशक्य बनते आहे ? कवीपुढे तसे प्रश्न आहेत. तो विचारतो,

पेटत नाहीत कशी ही मने
का मनेच ही मरुनी गेली ?
फत्तरही पण उलतो फुटतो
परिस्थितीशी टक्कर देता
मने कशी ही पेटत नाहीत ?

– अंतिम साध्याच्या दृष्टीने ती पेटविण्याचा, सारखी पेटती राहण्याचा, पेटती ठेवण्याचा कवीचा प्रयत्न आहे. अवघे जीवन सुंदर करण्यासाठी त्याची गरज आहे, चिरकाळ गीत गाण्याची आवश्यकता आहे. शेवटी रक्तवर्णी आकाशाच्या गंगेतून मानवता पाझरत येणार आहे, मायावी दुनियेचा चक्काचूर होणार आहे. गढूळ पाणी ओहोटणार आहे. 'हात कातडे' यौवन उमलणार आहे, फुलणार आहे. पण त्यासाठी,

धडक आता शेवटची घेईन
एक तो तरी एक मी तरी
कुणी तरी पण एकच ठेवीन

असा कवीचा निश्चय आहे. 'मारू किंवा मरू' अशा निर्धाराखेरीज चालणारे नाही. बेडकीला जिथे तारुण्य मिळते आणि मानव टाचा घाशीत मरतो, सासरी नांदायला जाणाऱ्या नवविवाहितेच्या ओटीतील दाणे रेशनिंग कायद्याखाली येतात आणि तिला कायद्याचा फटका मिळतो, करांच्या ओझ्यानी जीव जिकीरीस येतो आणि दुष्काळ अजगरागत पिच्छा पुरवितो, काळचा बाजाराची काळी छाया महागाईची माया पसरवते आणि उपासमार, बेकारी, पिळवणूक, दडपशाहीचा नवा झोक घेऊन अवतरते, यौवनशेतीची भर सुगी फुलून

येते, पण क्षणात त्यावर रेती पसरली जाते, रसरसलेल्या यौवनवेलीला आग लागते आणि आगीत मन-मोहळ खाक होते, मनकळी नाश पावते; तिथे कडोविकडीच्या निर्धाराखेरीज अन्य काय व्यक्त होणे शक्य असते ? दुःखाचा भार डोक्यावर घेऊन मरणाची वाट पाहत बसण्यात काय स्वारस्य असते ? त्यासाठी कवी जीवनातल्या साऱ्या दुर्घटनांकडे आपला मोहरा वळवून उभा आहे. मालन कामाने सुकते आणि बाबूची बहीण क्षयाने मरते तेव्हा कवी फुटून पडतो. सामान्यांच्या जीवनातले अज्ञान, दैन्य आणि दारिद्र्य म्हणजे त्याच्या अवघ्या शक्तीचा मोक्ष करविणारे, आकाशपाताळ व्यापून उरणारे किंबहुना आकाशही भेदून जाणारे ! कवी त्याने उदास होतो पण उदासतेची साय त्याच्या मनावर फार वेळ टिकत नाही. या साऱ्या रौद्र दर्शनाने तो डगमगत नाही. सामान्यही तसा चळणार नाही. त्याच्या अपेक्षा फार मोठ्या नसल्या तरी फार खालच्याही नाहीत, ' मिडियम ' आहेत. निदान आजच्या पुरत्या तेवढ्याच त्याला पुरेशा आहेत. पुढचे पुढे पहायची त्याची इच्छा आहे. तूर्त त्याला हवे आहे,

घट्ट ताक अन् ज्वारी भाकर, हवी खाऊनी एकच ढेकर
प्रिय पत्नीच्या अन् बाळाच्या–गरमगरम श्वासाचा कापुस
भरलेल्या नाजुक गादीवर, लोळू दे क्षण एक मला तर
रूप पहा माझे त्यानंतर, आहे नाही मधील अंतर

या ' एकच ढेकर ' मधून निर्माण होणार आहे,

क्षणात तुजला उमजुन येईल, शक्ती माझी सामान्याची
कवळ्यातच पृथ्वीला आवळुन, असे रसायन काढिन त्यातुन
अमृत जे जगताला होऊन, फुलेल अवघे जीवन त्यातुन
कल्पतरूंची बाग लावुनी, कामधेनुची लाविन दावण

कामधेनूची ही दावण लावताना क्षणभर ' लवणे ' घडले तरी मोडणे नाही. सर्वस्वच फेकायचे म्हटल्यावर भोवऱ्याच्या गतीला भ्यायचे कशाला? त्यासाठी कवी अंगार होतो,

होय तोच आहे अंगार
आग ओकणे मजला प्यार
आग सदाची ओकावी
कीडाकीटके जाळावी
आग आगीची फुलवावी
आग जीवने खुलवावी

– आगीचे अमृत प्यालेले जीवन आता मरणार नाही, मारणार आहे; नष्ट होणार नाही, नष्टांश करणार आहे; विझणार नाही, विझविणार आहे. कारण त्यातून एक नवा राग आळवला जायचा आहे. कवी सांगतो,

आणि शेवटी अणु-परमाणू
जनतेच्या सेवेला आणू
संघ-संस्कृती नवीनच बाणू
नवजनशक्ती हेच सुकाणू
खुलवू जीवन-बाग
लावु जुन्याला आग
नव्या जगापुढती
नवा आळवू राग

– यामागील वेदना वैयक्तिक नाही, सामूहिक आहे. स्वतःच स्वतःला ती रचत जात नाही तर समाजाची बांधणी ती करू मागते. सेवाबुद्धीची, त्यातून नव्या घडण– रचनेची ती वेदना आहे. डोळ्यात न मावणारा व्यापक सहानुभाव हा तिचा आधार आहे. पण सहानुभावाचे दुबळेपणात रूपांतर होऊन ती रडत-भेकत नाही. उलट रडायला भाग पाडावे इतके सामर्थ्य घेऊन ती उभी राहते, कवीला समर्थ बनविते. बॅगची झिप उलगडीत जावे तसे हे घडते. त्यातून वेदनेचा वेद करण्याची वाटचाल राहते. मग अवतीभोवतीची निर्दय परिस्थिती पाहून, सामाजिक दुर्दशा अवलोकून हृदय-मन आणि विचारांचा उडालेला क्षोभ सरळसोट पद्धतीने, व्यंग्यात्मक रीतीने किंवा उद्‌बोधनाच्या तऱ्हेने प्रकट होतो. त्यात सरळ 'लक्ष्या'वर लक्ष आहे. आडून, घालून-पाडून, उगीच तिरक्या रीतीचा मामला नाही. सरळसरळ दोन हात-हारजीत काय व्हायची असेल ती प्रत्यक्ष रणभूमीवर– अमर शेखचे असे कवितातंत्र-युद्धतंत्र आहे. स्वभावात अनेक कंगोरे असले तरी कवितेची चाल सरळ मनाला भिडणारी, 'गनिमी कावा' तिने वर्ज्य केला आहे. असे युद्धाला सरळसरळ उभे ठाकायचे म्हणजे आहे त्याहून बळ अधिक हवे, हिंमत जास्त हवी, कडोविकडीची शर्थ हवी. किंबहुना साऱ्यांचेच माप आहे त्याहून खूप खूप जादा हवे. त्यामुळे मानसिक धैर्य उंचावते, क्रांतिफुले फुलतात. रामकुमार वर्मा ' मेरा करुणाका वारि सींचता रहे अवनिका अन्तराल! ' असे आपल्या एका कवितेत म्हणतात; त्यात थोडा बदल करून अमर शेखच्या बाबतीत म्हणता येईल, ' मेरे अंगारके फूल सींचते रहे अवनिका अन्तराल ! ' अमर शेखना हे वर्णन ' फिट्ट ' बसते. त्यामुळेच

अमर शेखची कविता ही दुःखोन्मुखी प्रवृत्तींचे दास्य स्वीकारणारी नाही तर युगजीवनाशी संस्पर्श साधणारी आहे. म्हणूत तिचे आक्रंदन हे ऐहिक दुःखाच्या नव्हे तर अंतिम दुःखभावनेच्या निराकरणासाठी आहे. साहजिकच मानवी जीवनाची ती करूण-गाथा झालेली नाही तर तेजोनिधीचे रूप तिला प्राप्त झाले आहे. कदाचित् अमर शेखची कविता करूण–गाथा झाली असती तर जुन्या जीवनाला आग लावून नव्या जीवनाचा नवा राग तिला आळविता आला नसता ! नव्या युगाचा नवा मदारी तिला बनता आले नसते. कदाचित शेखांच्या दारी भिकारी बनून, आलेल्या भवताला आर्त हाका मारीत, चाललेले प्रलयंकारी खेळ पाहत–केवळ पाहत–रहावे लागले असते ! पण तसे घडलेले नाही. अमर शेखनी घडू दिलेले नाही. कारण अमर शेखची वेदना ही व्यक्तिगत विकार – वासना-भावनातून निर्माण झालेली नाही तर प्राकृतिक विकासाच्या वृत्तीतून ती निपजलेली आहे. यात बेहोषी आहे, बेभानता आहे, बेफाटपणा आहे आणि पूर्णतया विलीन होण्याची समर्पणशीलताही आहे. वैयक्तिक जीवनातला सारा 'लिहाज' त्यात पार पार विरघळून गेलेला आहे. त्याचे अधिक एक कारण म्हणजे ही वेदना अध्यात्मिकतेत बुडालेली नाही. तिला त्याचा स्पर्शही नाही. तिचा मार्ग ठेमेठोक आहे. देव, दैव किंवा दैववाद यांना उधळीत तिची चौखूर घोडदौड चालू आहे. निखळ धुव्वा हाच या ठेमेठोकपणाला अभिप्रेत आहे. अमर शेखची कविता अध्यात्मिकतेत पुरेपूर सरमळून गेली असती तर ' जगही जळू दे, शेष मरू दे ' असा उच्चार कठीण होता. ' एकीचं स्मणं ' लागणे अवघड होते. त्यामुळे अमर शेखच्या उभ्या कवितेचे स्वरूप दुष्टदलनकारी बनले आहे. युगजन्य दुःखभावनेचे आविष्करण तीत असले तरी व्यक्तिगत शोकाला श्लोकाचे किंवा अन्य कुठल्या प्रकारचे आवरण चढविलेले नाही, चढविण्याचा प्रयत्नही नाही.

या दुष्टदलनकारी कवितेला एक विशिष्ट जीवनदृष्टी आहे; भाकरी आणि स्वातंत्र्य किंवा भाकरी की स्वातंत्र्य ? अशा संघर्ष-प्रश्नात ती उभी आहे. या संघर्षात कुणा एकाची बाजू नाही, घेण्याचा प्रश्नही नाही तर भाकरी मिळवून स्वातंत्र्य राखायचे आणि स्वातंत्र्य सांभाळून भाकरी मिळवायची अशी ही कसरत आहे. मोठी विकट अशी ही वाट आहे; पण या वाटेचा स्वयंभू धाक इतका मोठा आहे की यापैकी कुणाही एकाचा विक्रा करून साटेलोटे साधण्याची तयारी नाही, हिंमत नाही. श्रमाधिष्ठित भाकरीमागे स्वातंत्र्याचे सुदर्शनचक्र राहते, त्यातील कळाबाज हिंमतीने ते सामर्थ्य एकवटून येते; किंबहुना त्यामधील विलक्षण थरारक संघर्षाने दीप्तिसंपन्नता मिळते.त्या मार्गात आडवे पडणाऱ्यांची अवस्था दळता दळता अचानक जात्याचा दांडाच हाती यावा तशी होते ! अमर शेखची कविता हे

करून जाते: साहजिकच अमर शेखची "कविता आरामखुर्चीत बसून चहाचा घोट घेता घेता दलितांचे दैन्य समजावून घेणाऱ्याकरिता प्रामुख्याने नाही. तिचा रोख ज्यांना दिवसातून एक वेळसुद्धा पोटभर जेवण मिळत नाही, मग इतर सुखविलासाबद्दल बोलायलाच नको–अशा करोडो निरक्षर जनतेवर आहे. या जनतेला वाली कुणी नाही म्हणून ऐक्य साधून स्वावलंबनाच्या पराक्रमाने आपला उद्धार साधावा असे श्री. शेख यांच्या बहुतेक कवितेचे 'ध्रुवपद' आहे. जनतेत स्वोद्धाराची शक्ती आहे पण ती शक्ती ऐक्याच्या अभावी व्यक्तिव्यक्तिगणिक फुटलेली आहे. त्यामुळे कार्यक्षमतेच्या बाजूने ती असून नसल्यासारखीच ठरते. श्री. शेख हे आपल्या अनेक कवितांमधून शेतकरी-कामकऱ्याला पुनः पुन्हा गर्जून सांगत आहेत की 'संघ-समुदाय' निर्माण करा. त्याची कास धरा आणि दुसऱ्याच्या औदार्याकडे लाचारीच्या आशाळभूत दृष्टीने पाहत न बसता आपले न्यायसिद्ध अधिकार आपल्या मनगटाच्या बळावर विश्वासून उपभोगू लागा; तुम्हाला शासन करण्यासाठी, कितीही प्रचंड सामर्थ्य एकवटून मग अंगावर आले व तुमची एकी अभंग राहिली, तर ते सामर्थ्य आल्याजागी जिरून जाईल व तुम्ही विजयी व्हाल." अमर शेखनी त्यासाठी शेतकऱ्याकामकऱ्यांच्या हाती 'लाल बावटा' दिला आहे. कुणी असे समजण्याचे कारण नाही की मार्क्सचे 'दास कॅपिटल' वाचून अमर शेखसारखी मंडळी 'लाल' झाली आहेत, 'कम्युनिस्ट' बनली आहेत. तसे कुणाला मानायचे असेल तर माझी त्याबद्दल तक्रार नाही. पण माझी ती भूमिका नाही. सभोवतालच्या परिस्थितीतून, मनुजवैरी समाजव्यवस्थेतून आणि सर्वभक्षक कालप्रवाहातून ही मंडळी कम्युनिस्ट झाली आहेत. लाल बावटचाने धरलेल्या एकीच्या रुमण्यातून 'कॅपिटल' मधील गाभा समाजजीवनात यावा असे या मंडळींना प्रामाणिकपणे वाटते, पोटतिडिकेने वाटते. खरे तर ती जीवातून फुटलेली मते आहेत. त्यामुळे कुणाच्या तरी वतीने, वगीने अशाना झोडपून काढण्याचे कारण नाही. प्रत्यक्ष कम्युनिस्ट सत्तेत काय घडते, त्याचे अनुभव किती विदारक असतात हे स्वतंत्र प्रकरण असले तरी लाल बावटचाच्या साहाय्याने एकीचे रुमणे हाती घेतलेल्या अमर शेखसारख्या मंडळींना हे प्रकरण सहीसही मान्य होते असे समजण्याचे कारण नाही. (चीनच्या निर्घृण आक्रमणाच्या वेळची अमर शेखची 'राष्ट्रीय भूमिका' आणि अखेरीस पक्ष सोडतेवेळचे त्यांचे 'वचन' – आणि सारे कम्युनिस्ट पक्षात असताना– ज्यांना समजून घ्यायचे नाही त्यांना समजून देण्याचा त्रास घेण्याचे कारण नाही.) त्यामुळे अमर शेखसारख्या लोककवीने हाती धरलेल्या 'लाल बावटचा' चा रोख 'स्वातंत्र्य शांतता स्थापू, अवघे जग त्याने व्यापू' याकडे आहे. आपण हे समजून घेतले पाहिजे. एकदा हे समजून घेतले की कुठली तत्त्वप्रणाली किंवा

कुठला मार्ग यासंबंधात आपला आकस शिल्लक उतरत नाही. मनात तरळत राहते ती मग अशा प्रयत्नांमागील, धडपडीमागील तळमळ ! केवळ तळमळीने तत्त्वप्रणाली किंवा मार्ग शुद्ध ठरत नाहीत हे मला मान्य आहे पण अशा तत्वमार्गातच अशा तळमळीला फुले–फळे धरू शकतात, किमान काही काळतरी तसे अवश्यमेव घडते हे कुणाला अमान्य व्हावे असे नाही. म्हणून अमर शेखच्या कवितेची ' लाल मसाला ' म्हणून हेटाळणी करणे परंपरावादी असले तरी खचित मनाला शोभविणारे नाही.

अमर शेखना ' अवघे जग ' स्वातंत्र्य-शांततेने व्यापून टाकावयाचे आहे. कशासाठी ? '' पोराबाळास्नी सुखाचा घास, घरात सर्गांचा वास ' व्हावा म्हणून. त्यासाठी अभिमानाने भरलेल्या इतिहासाच्या पानातून स्फूर्ती घेऊन जगत्शक्तींना जागवायचे आहे. पण त्यासाठी माध्यम कोणते वापरायचे ? कसे वापरायचे ? परिस्थिती कळली, तिच्यामधील खाचा-खोचा टिपता आल्या तर साधनांचा आणि त्याच्या वापराचा अचूक वेध घेणे सहज शक्य आहे. अमर शेखसारख्या मंडळींना ते साम्यवादी विचारप्रणालीत आणि कार्यपद्धतीत सापडले आहे. खरे तर अवतीभोवतीच्या निर्दय परिस्थितीचा हा जसा एक भाग होता, पोटाचा जसा योग होता तसाच या मंडळींच्या दृष्टीने तो योगायोगही होता. पुढे त्याचे नियतधर्मात रूपांतर झाले. ढेरीवर उंदरे खेळविणाऱ्यांनी मरता मरता सुद्धा पश्चात्ताप न दाखविता गरीबांच्या मानगुटीवर समंध होऊन बसावे, शक्तीने पिकविलेले युक्तीने काढून घेतले जावे आणि काळ्या आईचा सखा पुत्र हलधर ' कुणबी ' च रहावा, निर्मळ गंगाजळात कासियाने ठाण मांडून बसावे अशावेळी आपद्धर्माचे नियतधर्मात रूपांतर होऊ नये तर काय व्हावे ? चक्रव्यूहातून बाहेर पडणे अवघड ठरल्यास नवल वाटू नये. जिथे श्रद्धांना जोर असतो तिथे विज्ञान लुळे पडते, तत्त्वज्ञान फिके होते; म्हणून कुणी ते सांगण्याच्या फंदात न पडणे बरे ! येशू, बुद्ध, गांधी थोर खरे पण सर्वसाधारण सर्वार्थाने काही त्यांचे मानसपुत्र नव्हेत; साहजिकच सारी हयात साच्यात नासते, साच्यांना हाडांची राख फासली जाते, गिर्नीमालकाची तिजोरी हासत राहते तेव्हा थोरांनी सांगितलेल्या तत्त्वज्ञानाची सामान्यांशी सफा काडीमोड असते. थोरांच्या तत्त्वज्ञानाने सामान्यांना बळ मिळत असले तरी तो लांब पल्ल्याचा विषय; सामान्याला महत्त्वाचा वाटतो तो व्यवहार, व्यवहाराशी सांगड; त्यामुळे त्याचे असतात ते रोखठोक ऐहिक प्रश्न; ' कामगारांची हाक ' मधील कामगारबाई सांगते,

घरामंदी मी राबराब राबले
काम करून गिर्नीत दमले
मला अखेरीला पोट भवले
फुकट माझं नशिब झाले वाळंत मी
पैसा दुधाला तांब्याच्या नायहो होय हो ऽ

म्हणून समाजातल्या सर्वस्पर्शी रक्तशोषकांवर हातोडे टाकायचे आहेत. अमुक एका गोष्टीसाठी हातोड्याचे घण राखून ठेवले आहेत आणि अमुकासाठी नाही असे काहीच नाही. जिथे जिथे म्हणून न्याय-अन्याय्याची बात आहे मग ते कुणाकडूनही होवोत–स्वकियाकडून अगर परकियांकडून कुणाकडूनही होवोत–त्यावर घणाघात जरूर आहेत. नुसते घणाघात घातले की संपले, क्रांतीचे चक्र पुरे झाले, गरीबगुरीबांचा संसार सुखाचा झाला, सारे कसे आलबेल असे नाही. तेवढाच काही त्याचा हेतू नाही. तेवढाच तो असता तर चारदोन टाळकी फुटण्यामध्ये, सडकण्यामध्ये कवितेची सारी विरी निघून गेली असती. इथे आढळणारा ऐस वेगळी दृश्ये दाखवितो. अमर शेखच्या कवितेमागचे सूत्र आहे:

त्वेषानं चिडून आलो रानात
निसतीच भाकरी नाही मनात
कारभार समदा घ्यावा हातात
धनीकशाहीचं पाडून दात

– आणि पुढे असेही आहे,

त्या राजामहाराजांचं शेपूट कापून
रानीच्या बागंत ठेवायचं जपून
ठाण्याचा दवाखाना झोकायचा हाय
त्येस्नी सुखाचा हाय
यापुढं राजाचं काम नाय्– आता नाय् नाय्

–येथल्या सगळ्या अन्याय्याशी– साऱ्या दुःखांशी– धनिकशाही निगडित आहे. ती केवळ शेटजी-सावकार-भटजी-गिरणीमालक एवढ्या पुरतीच मर्यादित नाही. काळा नुरुप रूपे पालटणारी साऱ्या प्रकारची धनिकशाही– सरंजामशाही– एवढा तिचा व्यापक अर्थ घेतला पाहिजे. अन्याय शेवटी कुठेही आणि कुणाच्याही बाबतीत झाला तरी तो अन्याय्याच. काळानुरुप रूपपालट घडला म्हणून काही अन्याय्य न्याय्य ठरत नाही चित्रणात आवश्यक चित्रे नाही आली म्हणून अन्याय्य मालिकेचा स्त्रोत अडवून थांबत नाही. गाभा पकडून सूत्र सांभाळण्यात गैर

काहीही नाही. केवळ त्याने अमर शेखसारखा कवी मोठा होत नाही; त्यामुळे कुणी मोठा वगैरे होतो किंवा करता येतो अशाही भ्रमजंजाळात मी नाही. म्हणून अमर शेखच्या धनिकशाहीच्या नाशाच्या संदर्भाला कमकुवत अर्थ चिकटविणे इष्ट नाही. ज्या कवि-मनाला, पिळल्या गेलेल्या साऱ्यांना साथीला घेऊन, कंब्रा कसून केवळ धनिकशाहीचे दातच उचकटायचे नाहीत तर सारे जगच बदलायचे आहे, त्याच्या स्वप्नीही असले काही कमकुवत संदर्भ असण्याची शक्यता नाही. मग इतरांनी ते आवर्जून चिकटविण्यात मतलब काय ? रक्त शोषणाऱ्या जळवांविरुद्ध धडक घ्यायची, प्रसंगी रक्तही सांडायची तयारी राखायची तर एकीचे जाळे विणले पाहिजे आणि जनतेच्या क्रांतीचे उद्यान उसळले पाहिजे. केवळ भाकरीसाठी हे नाही. त्या नंदनवनात असणारे सुखनैव असोत, पण ज्यांच्या श्रमा-घामा-रक्तातून अवघे जग उभे झाले त्यांना अंग टेकायला इंचभर जागाही मिळू नये ही काही न्यायाची गोष्ट नाही. अन्नवस्त्र पुरविणाराच भुकानागडा रहावा ही शांतिसूक्ताची बात नाही. कुणीतरी निर्मावे, पिकवावे आणि कुणीतरी बशानी सुखेनैव ताव मारीत रहावे इत्यादीतला अन्याय्य कुणालाही दिसावा, मान्य व्हावा, समाजरचनेतील विषमतेचा तिटकारा यावा, राग यावा. मतभेदाचे कारणच नाही. त्यातून त्या वर्गाच्या निर्दालनाचा म्हणजेच त्यातील प्रवृत्तीच्या निःशेषीकरणाचा प्रयत्न व्हावा की मूळची अन्यायी समाजरचना बदलण्याचा प्रयत्न करणारा अमर शेखसारखा लोककवी कम्युनिस्ट म्हणून बहिष्कृत व्हावा ? 'ईश्वरे राखिले तैसेचि रहावे' हे तत्त्वज्ञान नाही. भ्याडाची ती पळवाट आहे. माणुसकीचे हक्क मिळवून माणाने जगण्यासाठी लढण्याचा आदेश हे स्वप्न नाही, तो व्यवहार आहे. हा व्यवहार कुठल्या मार्गाने आविष्कृत होईल हा भाग गौण आहे. (शेवटी पूर्ण समाधानकारक मार्ग कुठलाच नसतो.) पण आदेश ही वस्तुस्थिती आहे. इतिहासाच्या पानापानातून ही वस्तुस्थिती पुनः पुन्हा पुनरावृत्त होत आली आहे. पण या आदेशाप्रमाणे लढायचे तर हाती शस्त्र हवे पण जीवन जगण्याचीच मारामार त्यांच्याजवळ शस्त्र कसे असावे ? कुठले असावे ? पण शस्त्र नसले म्हणून काय झाले ? निःशस्त्रही लढू शकतो, नव्हे लढतो. निःशस्त्र खऱ्या अर्थाने निःशस्त्र असतो असेही नाही. वज्रकठोर मानसिक बळाचे शस्त्र त्याच्या गाठीशी असते. त्या आधारे पृथ्वीही कलथून टाकण्याची त्याची हिंमत राहते. अमर शेखनी कम्युनिझममधल्या वर्गीय दृष्टीचा पुरापुरा अंमल केला आहे. 'सांब सदाशिव' मध्ये ते सांगतात,

वर्ग ऐक्य घे नीट जाणुनि
तेच तुझे नव अस्त्र–मोहिनी

पण वर्ग–ऐक्याच्या म्हणून काही विशेष गोष्टी आहेत. समाजातील नवे दैत्य ठेचायचे, मुर्दाड गोष्टी हटवायच्या म्हणजे तशा त्या हव्यातच. त्याखेरीज का 'जीत–गीत' निर्माण होते? जीवनातल्या संघटक अजिंक्य सामर्थ्याचा तळपता आविष्कार जुन्या जगाला भस्मीभूत करतो, मरण हस्तगत करून शत्रुला जिते पुरतो आणि विजय पाहण्यास उरतो. हृदयाच्या आतल्या गाभ्यातून लाव्हारसा–सारखे फुटणारे हे लाव्हाकण कुणाची बाजू धरून आहेत असे नव्हे; तर हजारो शेकडो वर्षे अश्रूंनी दारे ठोठावणाऱ्या अवघ्या पीडितांचे ते प्रतिनिधी आहेत, 'जनता पक्षा' चे न पढविलेले साक्षीदार आहेत. त्यासंबंधात फेकल्या जाणाऱ्या कुत्सित टोमण्यांची चाल नतद्रष्ट प्रवृत्तीची निदर्शक राहील.

अमर शेखचे जीवनविषयक काय किंवा इतर काय, कोणतेच तत्त्वज्ञान पुस्तकी नाही, बुकिश नाही किंवा 'प्रिंटेड मॅटर' सारखे नाही. पोपटी सवयीने ते मांडलेले नाही की पान्हा चोरल्यासारखे त्यात काही लपवून ठेवलेले नाही. जीवनाशी ते अतिनिकट आहे आणि म्हणून सळसळते आहे, जिवंत आहे. झगड्याखेरीज ह्या जीवनाला काही लाभले नाही, झगड्याखेरीज गत्यंतर उरले नाही. खडतरपणे झुंज, झगडा, झेप हाच या जीवनाचा धर्म झाला. अमर शेखनी आपल्या कवितेत त्याचीच पूजा बांधली आहे, बांधावी लागली आहे. जीवनाला तुफानाची गती आणि विद्युत्शक्तीची झीट असल्यामुळे खोंगी घालून बसणे म्हणजे संपणे, ते संपायचे नाही म्हणून काही धडपड नव्हे; तर आपल्यासमोर उभ्या ठाकलेल्या जीवन-जगताचा अन्वयार्थ लावण्यासाठी यातायात ही त्यातील प्रमुख बाब होय. सामाजिक जीवनाच्या संदर्भाने ती करावयाची ही तीमधील भरीवता आहे. खरे तर सर्वसाधारण आपण 'जगत' असतो : रघू कारकुनासारखे रेटत असतो, किंबहुना नुकतेच कुणाला तरी मसणवटीत पोचवून आल्यासारखे दिवस ढकलत असतो; जीवनाचा अन्वय लावण्याची आणि अर्थ शोधण्याची, त्यातील उल्हास आणि फाल्गुन दोन्हीही भोगण्या-टाकण्याची आपली हिंमतच नसते. उभयान्वयी अव्यये आपण जोडीत जातो आणि लाळेने तार धरावी तशी जीवनाची लांबण लावतो. जीवनासंबंधीच्या भ्रांत–विलक्षण – भ्रष्ट – कल्पनात आपण जीवनाचे 'कटलेट्' करतो. या भ्रांतिष्टपणात खरे जीवन बाजूला पडते आणि जे जीवनच नाही त्याचा विचार होतो. वैफल्य मग गरोदर राहते. अमर शेखनी असा भ्रांत विचार बाजूला टाकला आहे. 'भोवरा' मध्ये अमर शेख लिहितात,

नको मला ही स्थिरता असली
ज्यात मानवी तगमग नाही

— ही तगमग कशासाठी ? तर सागर-मंथन करून जीवन्मोती शोधण्यासाठी. पण ते जीवन्मोती म्हणजे जीवन नव्हे तर त्यासाठीचा अखंड शोध हे जीवन होय. 'बुद्धीचे हत्यार' वापरून कवीला ते शोधायचे आहे. प्रयत्नांची सोबत आहेच. बुद्धीचे सामर्थ्य आणि श्रमाची ताकदच शेवटी तारणारी, त्याचा वापर कसा आणि कोणत्या पद्धतीने करतो यावर सारे अवलंबून. अमर शेख सांगतात,

पण मानवाच्या बुद्धीचे शास्त्र
कधी नि केव्हाही गंजलेले नाही– बोथटलेले नाही
धार त्याची आहे तशीच
तीक्ष्ण आहे, राहील तशीच
तीक्ष्ण अशी चिरकाल अमर
आणि अजर यावच्चंद्र दिवाकरौ

— न गंजलेल्या बुद्धीचे हत्यार माणसाला अस्वस्थ करते. भोवऱ्यामागून भोवरे निर्माण होतात आणि त्यात आपण गुंतत जातो : आयुष्य हाच एक भोवरा आहे. जन्म हा भोवरा आहे, मृत्यु हा भोवरा आहे. जन्ममृत्युच्या मध्येही भोवरेच आहेत. कुठून तरी ते सुटलेले असतात आणि कुठेतरी जात असतात, विरत असतात. कुठून आले आणि जाणार कुठे याची कुणालाच माहिती नसते. आयुष्यातले हे भोवरे हेच आयुष्य असते. ते नाहीत म्हणजे आयुष्य नाही, त्यातली धडपड नाही, तडतड नाही, तगमग नाही. अशा भोवऱ्यात, अमर शेखांचासारखा तगमगीचा भोक्ता कवी जीवनाचे साफल्य मानतो. या उंच, सरळ आणि सीध्या माणसाची ती भूक आहे.

इतकी गती अन् इतकी स्थिरता
हवीच मानव-जीवन चित्ता
तरीच जीवन-साफल्याचे
समाधान होईल ते साचे

—या समाधानासाठी म्हणून सुद्धा एक 'जीगर' लागते. ती वाटेल त्याच्या ठायी असत नाही. त्यासाठी तसेच 'चरित्र' असावे लागते, 'चारित्र्य' ठेवावे लागते. कवीने 'चरित्र माझें' मध्ये ते सांगितले आहे,

चरित्र माझे चरित्र माझे
जे अश्रूंच्या डोही भिजले
स्वेद-नदीच्या पुरात फेकुनि
रक्त-सागरीही बुडविले

—त्यातूनच 'अवघे संकट वारायची' हिंमत आली आहे. अश्रूंच्या डोही ते विश्रब्ध बनलेले नाही की स्वेद-नदीच्या पुरात फुटून आलेले नाही. 'तो मरतो हे पाहुनिसुद्धा' मध्ये कवी म्हणतो,

तो मरतो हे पाहुनिसुद्धा
धडपडतो मी जगण्यासाठी
जगण्यामध्येच आहे 'गंमत'
ती पुरती अनुभवण्यासाठी
गमतीचा आस्वाद फक्त
जगण्यामधुनी ना घेता येतो?

ही जीवनावरील आसक्ती नव्हे तर ओढ; गमतीजमतीचा स्वाद हवा असेल तर जगायला सांगते; दुसरा मरतो म्हणून घाबरण्यात अर्थ नाही असे म्हणते. ही गंमत संपल्यावर किंवा संपता संपता जे मरण यावे ते कसे असावे अशी कवीची इच्छा आहे? कवी सांगतो,

कुत्र्याच्या मौतीने नाही
मौतीने वाघाच्या नाही
सरळ नि साधा माणूस म्हणुनी

—सामान्य माणसावरील ही निष्ठा आणि थरारून टाकणाऱ्या मृत्यूला हसत-मुखाने कवटाळण्यावरील श्रद्धा आधुनिक मराठीत नवीन नसली तरी अपूर्व आहे— ती ज्या तेजोनिधित्वाने भारून राहिली आहे ते निःसंशय थरारक आहे. ज्याचा जन्मच मुळी दर्याच्या उदरात झाला, त्याच्यासमोर कुणी सारा दर्याच लुटून नेत असेल तर त्याने थंड का बसावे ? सामान्यांच्या शक्तीबुद्धीवर अपार श्रद्धा असणाऱ्याने धनसत्तेचे हंडीबाग पिसाटले म्हणून मागे का सरावे ? तसे घडले तर सत्य जगातून पळाले असे होईल. जगाचा भाव मग कोण सावरणार ? कसा सावरणार ? अमर शेखनी नेमके हे सूत्र टिपले आहे. विशाल मानवी जीवनाकडे एक सुसंस्कृत, जबाबदार व समंजस माणूस म्हणून त्यांनी पाहिले आहे. त्यामुळे

सामान्य माणसाच्या आशाआकांक्षांचे, भावनाविचारांचे, विकार – विलसितांचे प्रतिबिंब त्यांच्या कवनात ठसठशीतपणे पडले आहे. त्यात आतड्याचा जीवघेणा पीळ आहे, मस्तकाच्या ठिकऱ्या उडविणाऱ्या कळा आहेत, शरीराच्या रंध्रारंध्रातून फुटणारा दुःखाचा आवेग आहे आणि डोळ्यातून फुटून बाहेर पडू पाहणारे लाव्हारसासारखे अश्रुपिंडही आहेत. याहून वेगळे काही सांगण्याची गरजच नाही. मात्र या सांगण्याला आणखी एक मखमली अस्तर जोडले पाहिजे. अमर शेखचे मायभूमीसंबंधीचे प्रेम हे असेच एक उज्ज्वल अंग आहे. इतरांच्या निष्ठा काय आहेत त्याची चौकशी करण्याचे कारण नाही. कदाचित त्या विकलेल्याही असतील पण अमर शेख साम्यवादी असूनही त्याचा त्यांच्याकडून विक्रा झालेला नाही. त्यात शंभर नंबरी अस्सलपणा आहे, निखळपणा आहे; बनावटी सूर एवढाही नाही. मायभूमी नंतर महाराष्ट्रभूमी असा तिचा क्रम आहे. कधी कधी कोण अगोदर असा संभ्रम पडावा इतकी तीव्रताही महाराष्ट्रभूमीच्या संबंधात आढळते. या निष्ठेत लोभसवाणी आकर्षकता आहे, उदात्ततेची उत्कटता आहे. ( अमर शेख मुसलमान असल्यामुळे त्याची लोभनीयता अधिकच वाढते हे तत्सम टीकाजंतूना सुद्दाम सांगायला नको. ) ' जन्मभूमी'त अमर शेख लिहितात,

स्वर्ग आला भूवरती दास होउनी
रूप मुग्ध सिंधु सतत चरण चुंबनी घेई
धन्य मानुनी

– ही धन्यता केवळ शब्दातील नाही, ' लिगी ' नाही; राष्ट्रवादी प्रवृत्तीचा तिला एक विलक्षण साज आहे. बर्फ पेटतो तेव्हा अनेकांची तोंडे गप्प होतात. उघडतच नाहीत. उघडतात तेव्हा त्यांचा काही उपयोग नसतो. पण अमर शेख मात्र ' बर्फ पेटला, हिमालयाला विझवायाला चला ' अशी वृद्ध–तरुण साऱ्यांना हाक घालतात. शब्दावर कोलांटउड्या मारीत बसत नाहीत. हिमगिरीवर रक्तकलश चढू द्या म्हणतात. जनसागर सीमेला भिडू द्या सांगतात. शिरकमळे अग्नीत पडू द्या लिहितात कारण आतून उफाळून येणारा जळजळता आवेग. लब्धप्रतिष्ठित टीकाकारांच्या कुत्सित टीकेने तो काहीसा उदास बनत असला तरी थांबत नाही. प्रपाती वेगाने तो थळथळून वाहतो. हा प्रपाती वेगच मग बोलतो,

रक्ताचे खत मिळता थोडे
सीमेवरची झुडपे झाडे
देशरक्षणा बनतिल वेडे
तृणपर्णांना मिळेल शक्ती–तेच रोखतील हल्ला !

—या शक्तीला जात-धर्म-पंथ भेद सारे वर्ज्य आहे. अमर शेखच्या मनात तो विचारच नाही. मग ते चीनचे आक्रमण असो अगर पाकिस्तानचे. परकिय असो अगर स्वकिय. मायभूमीवर प्रेम करण्याचा, तिच्यासाठी घालून घेण्याचा मक्ता काही फक्त हिंदुत्वनिष्ठांनाच दिलेला नाही, किंवा हिंदुत्वनिष्ठच देशावर प्रेम करतात, करू शकतात, आणि बाकी सारे काफर अमतात असे नाही. ती कुणा एकाच्या बापजाद्याची जायदाद नाही की घटनेने कुणी एकाला बहाल केलेला मूलभूत हक्क नाही. पण अमर शेखच्या बाबतीत दुर्दैवाने तसे मानले गेल्याचे दिसते. " शेवटी अमरशेख मुसलमान. मुसलमान शेवटी काफरच. आपल्या देशावर त्याचं असून असून प्रेम ते काय असायचं ? साले, जगायसाठी ढोंग करतात झालं.' असा सूर उमटला. खाजगीत स्पष्ट रीतीने, सार्वजनिक जागी दबक्या पद्धतीने. या मनोवांछित वृत्तीवर अमर शेखची देशप्रीती हिणकस ठरविण्यात आली. कविता दूर राखली गेली. अमरशेख मुळात कम्युनिस्ट, त्यात मुसलमान; या दोन्हीचेही वावडे असणाऱ्यांनी त्यांचा द्वेष केल्यास ते त्यांच्या लब्धप्रतिष्ठित स्वभावाला साजेसेच झाले असे म्हटले पाहिजे. अमरशेख आपले मुसलमानपण विसरले पण आपण त्यांचे मुसलमानपण विसरलो नाही. परिणामी हा शाहीरकवी आतून खारावून गेला, उदासत गेला, शोकान्त त्याने जवळ केला. डॉ. सदा कऱ्हाडे यांनी ' अमर शेखांची शोकांतिका ' मध्ये म्हटले आहे... " महाराष्ट्र हा माझा म्हणूनच मी मानला. मराठी संस्कृतीविषयी अभिमान बाळगला. मी कधी हिंदूंचा द्वेष केलेला नाही.... मी मार्क्सवादी असलो तरी ज्ञानदेव–तुकारामांच्या मराठी संस्कृतीवर मी प्रेम केलंय..... आणखी काय सांगू ? " पण अमर शेखांचे हे प्रेम जाणण्यात आम्ही थिटे राहिलो. संशयी बनलो. सुतळी–दोरा बांधलेल्या तुटल्या–फुटलेल्या काडी – चष्म्यातून जुन्यापुराण्या पंतोजीने पहावे तसे आम्ही पाहत राहिलो. अमर शेखच्या निर्मळ भावनेची कदर आम्ही आमच्या बरबटलेल्या मनाने केली. कार्यक्रमांना लाखोंनी हजेरी लावली, उपहासविडंबनाने मनसोक्त बुचकळून निघालो, विलक्षण बेहोषीत बुडत गेलो पण; पुढे काय केले ? आम्ही हे प्रेम केले ते अमर शेखवर नाही तर त्यांच्यातील बेहोषीवर. प्रचलित राजकारण किंवा अन्याय्यांची मालिका यावर ' हव्या ' त्या नेमक्या शैलीत बोलणारा एक माणूस या दृष्टीने त्याच्या आविर्भावावर आम्ही प्रेम केले. अमर शेखमधला ' माणूस ' आम्ही समजावून घेतला नाही, आम्हाला घ्यावासा वाटला नाही; आम्हाला त्याची गरजच वाटली नाही. या गरज नसण्याच्या पोटीच त्यांच्या कवितेकडेही आम्ही साफ दुर्लक्ष केले. मनात बसविला तो एक

---

७. 'सत्यकथा' : ऑक्टो ६९, पृ. ४४

प्रचारक, किंबहुना शाहीर म्हणजे प्रचारक, त्यात एवढे अभ्यासावयाचे ते काय ? ऐकायचे आणि सोडून द्यायचे ! वस्स, त्यापलीकडे आम्ही आमचे सोयर जमविले नाही. पण शाहीर मुळात कवी असतो. काव्यगायन–काव्यवाचन करणारा अभिनयकुशल अभिनेता असतो हे आमच्या ध्यानीच येत नाही. अमर शेखच्या बाबतीत आले नाही, अद्यापही येत नाही. त्यात अमर शेख 'अस्पृश्य' ठरले : जनतेकडून, त्यांनी बांधीलकी पत्करलेल्या त्यांच्या पक्षाकडून, आप्तस्वकियांकडून. जनतेला निदान तेवढी सूक्ष्मता नव्हती पण इतरांचे तसे नव्हते. जनता 'अमर शेख: एक शाहीर, आपली मने व्यक्त करणारा एक उद्दाम–दणका शाहीर' एवढ्यावर भाळली, तेवढ्यावरच थांबली. कारणे काही असोत, इतरांनाही बोलावेसे वाटले नाही, बोलले नाहीत. या न बोलणाऱ्यांनीच अमर शेखचा शोकांत लवकर घडवून आणला. साऱ्यांनी अमर शेखच्या डफाचा वापर केला पण त्या डफाच्या संरक्षणाची हमी घेतली नाही. त्यातून डफ तुटून शाहीर फुटला, डफ तसाच उरला. या फुटण्याउरण्याचा तसा विचारही फारसा कुणी केला नाही. अमर शेखच्या बाबतीतच नव्हे तर अशा सर्वांच्याच संबंधात तसा तो करणे आवश्यक आहे. सामाजिक जीवनात एवढी कृतज्ञता आपण सांभाळणार की नाही यावरच आता आम्ही उभे राहू शकणार आहोत. या संदर्भात डॉ. कऱ्हाडे यांनी लिहिले आहे, "कलावंताला नुसतीच वेहोषी नको असते. त्याला संरक्षणही हवं असतं. शारीरिक जीवितसंरक्षण तसंच मानसिक संरक्षण. भावजीवनाचं संरक्षण. शाहीर अमरशेख ह्यांना असं संरक्षण मिळालं का ? त्यांच्या शरीरावर हल्ले झाले ते त्यांनी समर्थपणे परतवले. पण त्यांच्या भावजीवनावर होणारे हल्ले त्यांना परतवायचे होते. त्यांचे तेच प्रयत्न करीत होते.... आपल्या 'वेदनेची कैफियत' आपली आपणच जनतेच्या न्यायालयात मांडावी आणि तिलाच काय तो न्यायनिर्णय करू द्यावा, असं त्यांना वाटत होतं. कलावंताला केवळ कलानिर्मिती करू द्यावी, त्याच्या सर्व संरक्षणाची जबाबदारी प्रतिष्ठितांनी आणि समाजानं स्वीकारावी. निदान लोकमान्य कलावंताच्या बाबतीत हे व्हायला हवं. कलावंत स्वतःच्या संरक्षणासाठी स्वतः धडपडू लागला तर त्याच्या कलानिर्मितीवर निःसंशय परिणाम होतो." डॉ. कऱ्हाडे पक्षाच्या बांधीलकीचा प्रश्न उपस्थित करून त्यासंबंधी लिहितात, "कोणताही कलावंत जेव्हा एखाद्या राजकीय पक्षाची बांधीलकी पत्करतो, पक्षाच्या ध्येयधोरणाशी बांधला जातो आणि सर्वार्थानं पक्षनिष्ठ बनतो, तेव्हा केव्हातरी त्याच्या भावजीवनाची शोकांतिका होते. कलावंत आपली प्रतिभा, आपलं कलासामर्थ्य पक्षाच्या ध्येयधोरणाला, तत्त्वज्ञानाला अर्थपूर्ण करण्यासाठी पणाला लावतो. त्यातच तो सार्थक मानतो. राजकीय पक्षाला हे हवंच असतं.

पण कुठेतरी, केव्हातरी कलावंताची कुचंबणा होऊ लागते. आणि कोणताही राजकीय पक्ष आपल्या ध्येयधोरणाचं, तत्त्वज्ञानाचं संरक्षण करीत असतो. कलावंताच्या भावजीवनाला संरक्षण देण्याची जबाबदारी राजकीय पक्ष घेत नसतो. कारण, त्याच्या लेखी कलावंत म्हणजे प्रचारयंत्रणेचा एक घटक. आणि कलावंताच्या भावजीवनाला तडे जाऊ लागले म्हणजे कलावंत एकाकी पडतो. अमर शेख तसे एकाकी पडत होते, अशी माझी प्रामाणिक समजूत आहे.''[८]

एकूण आम्ही सर्वांनी अमर शेखचा केवळ 'डफ' सांभाळला आणि अमर शेख गमावला. ही काही केवळ अमर शेखच्याच जीवनाची शोकान्तिका नाही तर उभ्या महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाची ती शोकान्तिका आहे !

या उभयपक्षी शोकान्तिकेमुळे काही झगझगीत प्रकाशझोत पडतातः महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातला कृतज्ञतेचा वसा किती खचूड आहे हे जसे त्यावरून स्पष्टतया दिसते त्याबरोबरच अमर शेखनी 'डफा'वर जोर घातल्याने, त्यातील बेभानतेचा वारा सरू लागताच एकदम हलके हलके होऊन निर्माण झालेल्या पोकळीत ते कसे मुडपत गेले तेही दिसते. आणि 'कामापुरता मामा' या न्यायाने वागणाऱ्या, स्वतःतच गुरफटून असणाऱ्या 'जन्ते' बद्दल, जनतेच्या पक्षाबद्दल काय बोलावे ? – ती तर अद्याप वयात यायची आहे. तोपर्यंत अमर शेखसारखे हविर्भाग पडत राहणार, पडत राहतील हे स्पष्ट आहे. तोपर्यंत आम्हाला कुणीही दिसला तरी 'वरलिया अंगा'ने, 'जय महाराष्ट्र' मधील मन दिसण्यापेक्षा आम्ही त्यातून प्रकट होणाऱ्या स्फूर्तीनेच उत्तेजित होणार !

अन् इतिहासाची पाने । भरली सारी अभिमाने
शतकानुशतक पहा वळुनि । लिहिली आपुल्या रक्ताने
घेऊन स्फूर्ति त्यातून जागवू जगत शक्तींना

—असे सांगताना अमर शेख, या मार्गात आड येणाऱ्यांशी 'तडजोड न्हायरं तडजोड न्हायरं' असे आवेशाने म्हणणार तेव्हा अधिकतर आम्ही टाळ्यांचा कडकडाट करणार . . . तोही एक सुरात क्वचितच, बहुतांशी दबका; सूचना मिळाल्यावर थोडा जोरका; पण तेवढ्यापुरताच ! महाराष्ट्राचा दीप्तिसंपन्न इतिहास उलट्या डोळ्यांनी बघणाऱ्यांना, भीडमुर्वत न ठेवता महाराष्ट्रधर्म– भारत हितांकित महाराष्ट्रधर्म–समजावून सांगताना

---

८ : कित्ता : पृ० ४७, ४८

महाराष्ट्र लुटारू, म्हणती पोटभरू, लुटालुट आम्हा करायची न्हाई
जनतेला लुटायचं, धोरन म्हराठचाचं नव्हतं ते यापुढं न्हानारबी न्हाई
मेलो आम्ही जर, भूत होऊपर, भांडवलशाही गाडू सोडायचं न्हाई
अगर हम बचेंगे, फिर भी लढेंगे बाणा, मराठा हा चुकायला न्हाई

असे अमर शेख गर्जणार तेव्हा आम्ही 'व्वा ! झक्कास ! ' म्हणत तोंडाचा चंबू करून बसणार! समोरचा शाहीर-कवी देशप्रीतीने 'रक्ताचा मेढेकोट' करणार

हक्कावर कोणाच्या कोणी
जगू नये रे बांध घालुनी
हेच शिकवते माय मराठी
म्हणुनिच ती मम ओठी, पोटी

किंवा,

नको लढाई लादलीच तर घ्या पोराला माझ्या,
देशकारणी देते मी एकुलता माझा राजा

—अशा 'माझा देहचि धरतीमाता' अशा सायुज्यभावनेने तळमणार आणि आम्ही मंत्रमुग्धतेत वाहून जाणार..... लब्धप्रतिष्ठितांकडून झालेली अमर शेखची दिल्लगी हे कशाचे प्रमाण आहे ? निरनिराळे गल्फस् सागरमध्यात आपले अस्तित्व संथपणे लोपू देतात तसे 'जन्ता' प्रवाहात आपले इमान मिसळून टाकणाऱ्याशी जनतेची म्हणून काही कर्तव्ये आहेत. तिने ती पार पाडायला शिकले पाहिजे. अन्यथा या 'जन्ते'ला भवितव्य असणार नाही, तिला अभिवादन करता येणार नाही. जनतेच्या कृतघ्नतेमुळे तिच्यासंबंधी निर्माण होणारी अश्रद्धा शेवटी सारेच करुण बनवील.

कै. अमर शेख हे मराठी शाहिरी परंपरतील अखेरचे सूत्रधार आहेत. प्रारंभापासून त्यांचा मी शाहीर–कवी असा उल्लेख करीत आलो आहे. त्यामुळे अमर शेखना कवी म्हणायचे की नाही हा साहित्यिक पिंडीवरील विंचवांना पडलेला प्रश्न माझ्यासमोर नाही हे स्पष्ट आहे. 'अमर शेखजवळ कवित्व होतं. प्रतिभा होती. प्रतिभेला अभ्यासाची जोड होती. कम्युनिस्ट पार्टीनं त्यांना जवळ केलं. मार्क्सवाद शिकवला. तो मार्क्सवाद त्यांच्या हाडीमाशी खिळला... त्याच मार्क्सवादानं त्यांच्या प्रतिभेला स्फुरण चढलं. कवित्वाला–प्रतिभेलाही काही अनुभवविश्व लागतंच. त्या अनुभवविश्वाची किल्ली मार्क्सवादानं त्यांना प्राप्त करून दिली. पक्षाचं ऋण त्यांनी कधीही अमान्य केलं नाही. मतभेद झाले,

त्यासंबंधी जाहीर निवेदन केलं गेलं, तरीसुद्धा त्यांची कम्युनिष्ट पक्षावरील निष्ठा कायम होती. त्यांचं शत्रुत्व भांडवलदारांशी होतं. वैर अन्यायाशी होतं. मंत्र समतेचा होता. तंत्र झंझावाती प्रचाराचं होतं. मंत्रतंत्राच्या साह्यानंच एक श्रेष्ठ दर्जाचा शाहीर म्हणून लोकप्रियतेच्या कळसापर्यंत ते पोचले. "[९] सृजनाची वेदना भोगणाऱ्या या कवीने सामान्यातील असामान्यत्वाला हाक घातली. वरून लोकशाहीचा घोष करणाऱ्या पण आतून शोष लावणाऱ्यांवर घणाघात केले. दिवाभीत बनून खुडूक बसलेल्या पापभीरू सज्जनांना साद दिली. झुंडशाहीच्या पूजकांना लोकमताचे पाईक बनण्याचे आवाहन केले. पण कसे ? शाहीर आणि कवी या दोहोंचे सौंदर्य जपून ! अमर शेखमध्ये शाहीर आणि कवी यांचे नैसर्गिक वैभव होते. आपली 'मूळ प्रकृती' टाकून मराठ्यांच्या इतिहासाचे समंजस वाचन करणारा, आपला कार्यक्रमच शिवप्रभूंच्या जयजयकाराच्या गगनभेदी गर्जनेने सुरू करणारा अमर शेखइतकाच 'थोर समाजवादी मुसलमान' शोधणे गरजेचे होईल. किमानपक्षी छ. शिवाजी महाराजांवर इतकी भालमर्जी ठेवणाऱ्या अमर शेख कडून आपल्या क्षुद्र राजकारणासाठी छत्रपतीवरील मायावी प्रेमाचा शो करणाऱ्या निष्क्रिय, षंढ, निर्बीज हिंदुत्वनिष्ठांनी जमले तर धडे घ्यायला ही हरकत नाही. (शेवटी ज्ञानदान हा पवित्र भाग असल्यामुळे त्याच्या स्वीकारात जातीपातीचा प्रश्न येऊ नये.) कवितेच्या आत्मनिमग्न सपक पार्थिवतेत निमज्जन करणाऱ्यांना अमर शेखच्या सामाजिक संदर्भाच्या कवितेतील कलात्मकता समजून यायला थोडा वेळ लागेल. कदाचित हा वेळ कधी संपणारही नाही पण म्हणून जन्माचे दुखणाईत होण्याचे काहीही कारण नाही. शेवटी कलावंत रूजत असतो. त्याने रूजतच जावे हे खरे; त्यात त्याचे म्हणून एक मोठेपण आहे. अमर शेख त्यात उणे पडले असे म्हणताना संकोच नाही. मागे वळून पाहताना अमर शेखच्या या शोकांन्तिकेचा, शाहिरी परंपरेतील प्रभाकर शाहिराच्या शोकान्तिकेशी धागा जुळतो. (अर्थात प्रभाकराची अखेरच्या दुर्दैन्यातील कवने वगैरे वगळून) पूर्णतः तो जमतो असे नव्हे, मात्र स्थूल अंगाने जमून जातो. तेल्यातांबोळ्यांचा हा शाहीर कवी आडमुठ्या कलाकोष्टकात बसत नसला, बसविण्यात अडचणी उभ्या केल्या जात असल्या तरी प्रा. मं. वि. राजाध्यक्ष यांनी म्हटल्याप्रमाणे ... ... "पण कवी म्हणून त्याचे स्वतंत्र स्थान आहे, त्याची स्वतंत्र दिशा आहे हे सुद्धा मानले पाहिजे. कवितेचे अनेक जातिवंत प्रकार असू शकतात; त्यापैकी हा एक. कसली तरी झापडे बांधून याकडे डोळेझाक करणे अरसिकपणाचे होईल. "[१०] मी मी म्हणणाऱ्या अभिमान्यांच्या

---

९. कित्ता : पृ. ४५

१०. पोतदार आचार्य माधव : अमर शेख यांची कविता : प्रस्तावना : प्रा. मं. वि. राजाध्यक्ष, पृ. ७

डोळ्यात खुपावी इतकी अमर शेखनी मऱ्हाठी संस्कृतीची परंपरा सांभाळली आहे. केशवसुती कवितेची धून घेऊन चालणारा हा समाजोन्मुख कलावंत मराठी परंपरेचा, मराठी अस्मितेचा, मराठी संस्कृतीचा ज्वलंत उपासक आहे, जीताजागता रखवालदार आहे. अमर शेखनी आपल्या काव्याचा उगम सांगताना म्हटले आहे, '' वैराण माळरानात, खडकाळ जमिनीवर माझे काव्यबीज अंकुरले आहे. सामान्य जनांच्या आशा – आकांक्षा, हर्षविषाद, आनंद – सौंदर्य यांच्या कल्पनापासून मी किमपीही दूर सरू शकत नाही. '' साहजिकच ती ' स्वप्ना ' तही ' सत्य ' शोधते. भविष्याचा वेध घेते. परिणामी कळा, काव्य आणि तत्त्वज्ञान यांनी फुललेली अमर शेखची कविता प्रक्षोभ, रोखठोकपणा, उग्रता यांनी बेफाम बनते; किंवहुना या घटकांना रसाचे स्वरूप प्राप्त होते. अमर शेखची जीवनाच्या प्रगमनशीलतेवर नितांत श्रद्धा असल्यामुळे समाजपरिवर्तनाची तिला तीव्र ओढ आहे. त्यामुळे एकूण कवितेचा सूर आवाहक नसून क्रांतिकारक आहे. अमर शेखची सारी कविता म्हणजे मिरासदारी विरुद्ध आगडोंब आहे आणि अमर शेख म्हणजे अवघ्या दलितांच्या अस्वस्थ आत्म्याचे विश्वस्त आहेत. कारण समाजातील अज्ञान – दारिद्र्याचा, अन्याय–विषमतेचा, जीर्णशीर्ण वृत्तीप्रवृतींचा बीमोड करण्याची शक्ती कवितेमध्ये असते असा ' केशवसुती विश्वास ' त्यांच्या-मध्ये आहे. अमर शेखांची कला लोकाभिमुख आणि जीवन कलाभिमुख होते. कम्युनिस्ट असूनही कलेची व्यवहारी सौदेबाजी त्यांनी कधी केली नाही. समाजातील दारुण असाहाय्यतेने ऊर पिचत गेला, वेदना उफाळत गेल्या, मनाचा बंधारा फुटत गेला आणि काळीज कापीत जाणाऱ्या ओळी फुटत राहिल्या. श्री. नारायण सुर्वे यांनी म्हटल्याप्रमाणे '' मैदानातील या महान् माणसाने, जगाच्या नवनिर्मितीसाठी ' जळणाऱ्या ' या कवीने काव्याचे यथार्थ मोल दाखवून दिले आहे. '' ते कुणाला मान्य होवो वा न होवो ; शेवटी काल त्याबद्दल उचित निर्णय घेणारच असल्यामुळे अट्टाहासाची गरजही नाही. म्हणून अमर शेखच्या कवितेविरुद्ध उगीच डुरक्या देण्यात अर्थ नाही. हंबरडे फोडण्यात स्वारस्य नाही. हजारो, शेकडो वर्षे अश्रूंनी दारे ठोठावणाऱ्या अवघ्या दलित जनतेला '' विझू नकोस, विझवू नकोस. पेटव, बुजव, रुजव, रिझव, हटव, हटू नकोस '' असे सांगणारी अमर शेखची कविता शिवरात्र आहे, मराठी मातीच्या ' वेडा ' ने झपाटलेली आहे.

नारायण सुर्वे यांचा पहिला काव्यसंग्रह – ' ऐसा गा मी ब्रह्म ' – १९६२ साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर चार वर्षांनी १९६६ साली – 'माझे विद्यापीठ' हा त्यांचा दुसरा काव्यसंग्रह प्रकाशात आला. दोन्ही काव्यसंग्रहांना महाराष्ट्र शासनाची पारितोषिकें प्राप्त झालीं. मात्र ' ऐसा गा मी ब्रह्म ' ने सुर्व्यांना 'राजा'पर्यंत पोचविले असले तरी 'लोकां'पर्यंत पोचविले नाही; ब्रह्माला ती किमया साधता आली नाही. या लोकांपर्यंत जाण्याच्या अभावाबरोबरच समीक्षकांची दृष्टी ओढून घेण्यातही ते म्हणावे तसे यशस्वी ठरले नाही.

असे असले तरी, ' ऐसा गा मी ब्रह्म 'ने चार चौघांचे लक्ष वेधावे, अशा काही कळा स्वतःजवळ बाळगल्या होत्या. या कळा, सुर्वे नावाचे नव्या दमाचे ' कुणी ' मराठी सारस्वताचे दार ठोठावत आहे; आज ना उद्या पण फार उशीरा नव्हे, लवकरच ' हा कुणी ' लक्ष्य खेचून घेतल्याखेरीज राहणार नाही, हे जरूर जाणवून देत होत्या. घेणाऱ्यांनी त्याचे भान, खुल्या मनाने घेतले; इतरांनी ते

## सहा नारायण सुर्वे :
## – त्यांच्या 'विद्यापीठा' चे 'पोष्टर'

टाळता येईल तर बरे असे वाटून दूर राखण्याचा प्रयत्न केला. पण कुणी सुटले नाही, सुटता आले नाही. मात्र या जाणीवेचे स्वरूप सार्वत्रिक, सार्वजनिक नव्हते. ते बरेचसे मर्यादित, खाजगी आणि कप्प्यातले होते. अपरिचित अनुभवविश्व व दमदार प्रतिमासृष्टी इत्यादी कलांमुळे 'ब्रह्मा' मधील कविता काहीशी उठून दिसली हे खरेच पण त्यामधील वरवरचा सूर दिलगिरीचा वाटला तरी आरंभापासून एका दुर्दम्य आत्मविश्वासाने ती फुलत राहिली, याकडे विशेषसे लक्ष्य गेले नाही. त्यामुळे फारसा, व्हावा तसा बोलबाला झाला नाही; नवख्या प्रवाशाची ती मुशाफिरी वाटली.

पण 'माझे विद्यापीठ' आत्मविश्वास, बोलबाला आणि मानसन्मान घेऊन आले. गेल्या दशकातील, मराठी कवितेच्या संदर्भात एक प्रगल्भ, पक्क व कणखर स्वरूप 'माझे विद्यापीठ' ने दाखवून दिले. या दाखवण्यात, अनिर्बंध मुक्त वृत्तींचा मुक्त शैलीने केलेला आविष्कार आणि संवेदनाशील सौंदर्यात्मक प्रतिक्रियांनी विनटलेला लोभसवाणा घाट या आधुनिक कवींमधील दोन्ही बाजवांना अंगास घेऊन, 'नाही रे' च्या जगाच्या अंगाने, आशय-अभिव्यक्तीतील अनोळखी अनुभवविश्वाच्या ठेमेठोक ताणांच्या दर्शनाचा, मराठी कवितेच्या कक्षा रुंदावणारा तिसराच मार्ग सुर्वे यांनी चोखाळला. त्यात मध्यमवर्गीय सोस आणि उसासे यांना स्थान नाही, बिळबिळीत प्रीतिभावनेचे बाहुल्य नाही; की कनिष्ठ वर्गाकडे निष्कारण सहानुभूतीने पाहण्याचा प्रयत्न नाही. सुर्व्यांच्या कवितेचे हे रूप नाही, याचा अर्थ सुर्वे-पूर्व कवितेचे ते रूप आहे असे होत नसले तरी बहुतांशी ते तसे आहे हे स्पष्ट आहे. अर्थात तसे ते असण्यात गैर काहीच नाही; समजणेही चूक आहे. शेवटी, कलावंताच्या जीवनाची पाळेमुळे ज्या मातीखोतीत रूजून विस्तारलेली असतात, त्याच जीवनरसाने त्याच्या काव्यात्म जाणीवा पोसल्या जाणे, उमटून पडणे हे नैसर्गिक आहे. सुर्वे तरी त्याला अपवाद का ठरावेत ? ( कदाचित ठरतेच तर समीक्षेला तो वेगळा मुद्दा झाला असता ! ) साहजिकच सुर्वे यांच्या कवितेमधील काव्यात्म जाणीवांचे स्वरूप तपासून पाहणे अगत्याचे ठरते. शेवटी कुणीही माणूस, लहान-मोठा, गरीब-श्रीमंत, कलावंत अ-कलावंत कुठल्या ना कुठल्या झगड्यात भाजून निघत असतो, संघर्षात होरपळत असतो. ताणा–प्रतिताणात उलथापालथा होत राहतो. माणसागणिक, या भाजण्या–होरपळण्याची तीव्रता कमीजास्ती असू शकेल; पण ती नसते असे काही होत नाही. जीवनाला वेढून असणारे हे ताण–तणावे, साऱ्या साहित्याच्या मुळाशीही असतात. साहित्या मधील काव्यात्म जाणिवांचा वगैरे उल्लेख होतो तेव्हा दुसरेतिसरे काही नसून हे ताणच अभिप्रेत असतात. संघर्षशील जीवनात ते विलक्षण गतीने आणि

व्यामिश्रतेने वावरत असतात. कधी एकेरी, एकमार्गी, कधी दुहेरी, अनेकपदरी; पण वव्हंशी अनेक पदरांचे पेड या स्वरूपातच ते असण्याची शक्यता असते. त्यांची उचल कशी, कोणत्या दिशेने, गतीने, रीतीने होते, केली जाते; हा कलावंताच्या कुवतीचा, कलात्मक जाणिवेचा प्रश्न आहे. या ताणात कमीत कमी ज्या दोन वस्तूंचा संबंध येईल, त्यापैकी एक बाह्य व दुसरी कविमन किंवा दोन बाह्य वस्तूंवरोवर तिसरे कविमनाचे टोक असे, काहीही असेल ; कलाकृतीचे रूप निश्चित केले जात नाही तोपर्यंत ते नेमके काय असेल हे सांगणे शक्य होईल असे नाही; किंबहुना होणारही नाही. मात्र त्याशिवाय त्या ताणाला काव्यात्मताच मिळणार नाही; आणि अशी काव्यात्म पातळी लाभणेही तर त्यातली शर्त आहे. यात कविमनाचा येणारा संबंध कधी सहभावाचा तर कधी विरोधभावाचाही असेल. सर्वसाधारणपणे, याव्यतिरिक्त उरणारा तटस्थत्वाचा संबंध एकूणच साहित्यनिर्मितीच्या दृष्टीने वांझ असतो. एकतर संबंध या स्वरूपापर्यंत तो पोचत नाही, त्यामुळे निर्मितीचा संभवही उरत नाही. साहजिकच पहिले दोन ताण उरतात. पैकी विरोधभावातील ताण स्पष्टच असतो, परंतु दुसऱ्यात, संबंध सहवासाचा असला तरी सहभाव प्रस्थापित होताना ताण हा उद्भवतोच त्याची ती प्रकृती असते. तो दोन किंवा त्याहून अधिक वस्तूतील संबंधातून निर्माण झालेला असतो. तसा तो मुळातच असतो किंवा उवबलेला वाटू नये अशा रीतीने कल्पिलेला असतो ; त्याची उभारणी एकूणच कलावंताच्या ताकदीचा प्रश्न असतो. अशी कुठलीही संबंधाची जवळिक भावनारहीत नसते. या भावनेचे ज्ञातरंगी स्वरूप नीट ओळखणे, जाणणे, अनुभवणे म्हणजे त्या त्या वस्तूंना नीट 'भोगणे' त्यातून निर्माण झालेल्या ताणांचे स्वरूप आकलन करणे होय. हा रसिकाच्या कक्षेतील प्रांत आहे. अर्थात् ह्या भावाची-अंतर्गत भावाची–संमिश्रता, व्यामिश्रता ही अनुभवाच्या एकेरीपणावर अवलंबून नसते तर ती त्यामधील गुंतागुंतीवर, आवेगशीलतेवर आणि अनभव घेण्या-स्वीकारण्याच्या तल्लख पद्धतीवर उभी राहते. काहीवेळा भावाचा–अनुभव अनेकपदरी, विविधस्पर्शी व अनेकरंगी असूनही त्याची अभिव्यक्ती एकेरी, एकांगी असू शकते, शेवटी, हा कलावंताच्या अंतर्गत बळाचाच प्रश्न राहतो.

सुर्वे यांचे पुरे जग 'नाही रे' चे आहे. 'ब्रह्म' आणि 'विद्यापीठ' या दोन्ही काव्यसंग्रहांची ती साक्ष आहे. ही साक्ष 'आहे रे' चा मागमूस राखत नाही. सर्वत्र 'नन्ना' चा पाढा आहे; उपेक्षितांचा, वंचितांचा, अवहेलीतांचा बाजार आहे. ज्ञानाला, मानाला, सुखाला, स्वास्थ्याला किंबहुना दोन वेळच्या पोटभर सोडाच पण साध्या जेवणालाही आचवलेली ही माणसे आहेत. सकाळी मिळाले

तर दुपारची भ्रांत आहे, दुपारी दोन घास पोटात पडलेच तर रात्रीचे काय करायचे ? असा प्रश्न 'आ' वासून उभा आहे. पोटाची ही परवड दुर्दैन्याचे आणि दुर्दशेचे दशावतार दाखविणारी आहे. कारण ह्या 'नाही रे' ना घरे, खोल्या नाहीत. झोपडपट्ट्या आहेत; ती खुराडी आहेत : एकमेकांच्या उरावर तिथे झोपावे लागते, एकमेकांच्या मांडीवर बसण्याखेरीज गत्यंतर नसते. कमीत कमी किती गरजात माणूस आपला जीवन–व्यवहार भागवू शकतो त्याचा हा नरकवास पुरता पुरावा असतो. खरे तर हा संसार नसतो. त्यामुळे त्यास संसार कशासाठी म्हणायचे ? असा प्रश्नच उपस्थित होत नाही; त्याची आवश्यकताही नाही, एकीकडे जरत्कारू धाकटचा पोरांना पोटाशी घेऊन आई पेंगुळते, दुसरीकडे थोरल्याचा मरगळलेला शृंगार तेजीत येतो. डुकरीणीच्या पिलासारखी वीण वाढत जाते. अगतिकता साकळून येते. कोनाडे न् कोनाडे सजत जातात. पोरां बाळांवर राग निघतात. पोटाची आग जाळण्यासाठी कदाचित भारेच्या भारे माथ्यावर चढतात, माथी कर्जात सडून जातात. चिडून उठतात. तशीच कारखान्याची वाट चालतात, त्या वाटा बंद होतात तेव्हा खोकत खोकत स्मशान वाट जवळ करतात. अधूनमधून चळवळीची धुराडी पेटतात. त्यात भाजून निघतात. समता, स्वातंत्र्य, समृद्धी इत्यादी घोषणा, आश्वासने भस्म होतात. उभ्या आयुष्यभर परिणाम भोगावे लागतात. अन्न मिळत नसले तरी अंग जीव सोडत नाही. जगणे थांबत नाही. मरण येत नाही. ते यावेसे वाटले तरी येऊ नये असेही वाटते. मन पाण्यावरच्या नावेसारखे हेलकावे खाते, द्विधा राहते. या साऱ्या जंजाळात जीवनच हरपते, पार खाक होते. पोटाच्या कळा सारे पार नासवून टाकते. त्या पोरांच्या जन्माने उगवतात; भुकेने उपटतात. काय करावे, काय नाही? या गोधळगुंत्यात सारी अगतिकता गोठून जाते. वंचितांची ही दुनिया क्षुद्र रंगात रंगणारी, खबूड स्वप्नात रमणारी असते. रंगमहाल सजणे कठीण हे जसे तिला माहीत असते, तसे माणूस म्हणून जगणेही अशक्य असल्याचे ती पुरेपूर जाणते. अशा उपेक्षितांच्या जगात संप, हरताळ, मोर्चे, निदर्शने यांना ऊत येतो. जातीय दंगे उसळतात. माणसेच माणसांच्या उरावर बसतात; एकमेकांना कापून काढतात. परस्परांचे वैरी ठरतात. सल मनात राखून जगत राहतात. उभ्या माणसाचीच इथे दैना असते, दुर्दशा असते. 'नाही रे' वर्गाच्या मनाच्या भिकार जाणिवा आणि उच्चभ्रू 'आहे रे' वर्गाने, त्यांच्या सभोवती पसरलेले परिस्थितीचे कोंडाळे, गरीबांच्या उद्धाराच्या वलगना करण्यात सार्थक मानणारे कुंकवाचे धनी शासन आणि शासनावरही कडी करणाऱ्या धंदेवाईक राजकीय कार्यकर्त्यांच्या भंपक घोषणा–या साऱ्या दुष्ट चक्रात पिचून, पिळवटून निघते ती ही वंचितांची दुनिया ! या साऱ्याच्या मुळाशी एक सर्वंकष ताण असल्याचा

प्रत्यय येतो. या विश्वाचे बाह्यान्तर जीवन त्याने व्यापले असल्याचे जाणवते. वैयक्तिक किंवा सामूहिक, उभ्या जीवनाचीच दैना त्यातून उद्‌भवत असते.

या दृष्टीने सुर्वे यांच्या पिचल्याखचल्यांच्या दुनियेला फारसा सांस्कृतिक संदर्भ नाही; साहजिकच ताणाबाणांचे स्वरूपही सूक्ष्म नाही; स्थूल आहे; 'बाह्या' शी अधिक निगडित आहे. परिणामी, सुर्व्यांच्या कवितेत कामगारजीवनाचे विविध अंगांचे आवाहन किंवा इतरांना अस्वस्थ करणारी यंत्रजीवनातील आर्तता भावत नाही. कदाचित हे आवाहन पोचते असे मानले तरी ते आर्त स्वर शब्दात अचूक घेता येत नाहीत असे म्हणता येईल; किंवा भंकस जीवनाच्या वटवटीत सांस्कृतिक संदर्भाला अशी सूक्ष्म आंतरिकता मानवत नाही; असेही सांगता येईल. या साऱ्या वजाबाकीतून अखेर हाती राहतो तो एकच ताण ' आहे रे ' विरूद्ध ' नाही रे ' मधील ढोबळ ठसठशीत, स्थूल आणि रवरवीत कानठळ्या बसविणारा आक्रोशाचा ताण ! तसा हा झगडा काही आजकालचा नाही, सनातन आहे. निरनिराळ्या रूपांनी तो चालत आला आहे, सुरू राहिला आहे. ' साम्यवाद ' हे त्यापैकीच एक नाव. ' ऐसा गा मी ब्रह्म ' मध्ये, सुर्व्यावरील साम्यवादाचा पगडा स्पष्ट आहे. ' माझे विद्यापीठ ' मध्ये त्याचा प्रभाव कमी झाला आहे. पण नारायण सुर्वे हे कवी ' विशिष्ट झापडे ' लावलेले कवी असून या कवीच्या मनावर एका विशिष्ट विचारसरणीने (म्हणजे साम्यवादाने) कुरघोडी केलेली आहे, असे नाही. सुर्वे यांच्या उभ्या कवितेपाठीमागे रिकाम्या पोटांची आच आहे आणि या कवितेला ' विशिष्ट वृत्तीवर हल्ले चढवायचे आहेत,' किंवा ' त्यांच्या कवितेला एक लाल इच्छा मनात जपायची आहे,' असे नाही. नुसती विधाने केल्याने काही सिद्ध होत नाही आणि काहीही विधान न करता अनेक गोष्टी सिद्ध होऊन जातात. त्याप्रमाणे साम्यवादी विचारसरणीशी सुर्व्यांची बांधीलकी इतकी सुस्पष्ट आहे की जी आवर्जून सांगितली पाहिजे असे नाही किंवा तसा उल्लेख करण्याने काही विशेष माहिती पुरविली जाते असे मुळीच नाही. त्यामुळे सुर्वे या कवीची कविता ' साम्यवादी ' विचारसरणीचा उद्‌घोष करण्यासाठी, डिंडिम वाजविण्यासाठी लिहिली गेली आहे, असे ठरत नाही; हे आवर्जून ध्यानात घ्यायला हवे. नारायण सुर्वे साम्यवादी आहेत की नाहीत, छुपे कम्युनिस्ट (Crypto Communist) आहेत की नाहीत, हा कलांतर्गत विचार नाही; उघड उघड कलाबाह्य विचार आहे, आणि म्हणून सुर्वे असे ' कुणीतरी, ' ' काहीतरी ' आहेत असे ठरवून, त्यांच्यावर ते लादून त्यांच्या कवितेचे समीक्षण करणे मराठी समीक्षेत बसत असले तरी समीक्षा मूल्यात ते बसणारे नाही. खेरीज एक गोष्ट स्पष्ट करावयास हवी की, नारायण सुर्वे यांनी साम्यवादी

विचारप्रणालीकडे असलेली ओढ आणि त्यांच्या कवितेने जपलेल्या 'साम्यवादी' निष्ठा कधीच दडविलेल्या नाहीत. 'ऐसा गा मी ब्रह्म' मध्ये अशा अनेक कविता आढळतील की ज्यामुळे या कवीच्या निष्ठेविषयीची साशंकताच उरणार नाही. 'ब्रह्म' च्या पहिल्या 'चार शब्दा' तच सुर्वे यांनी

रोटी प्यारी खरी आणखी काही हवे आहे
याचसाठी माझे जग राजमुद्रा घडवीत आहे

असे उद्‌गार काढलेले आहेत. 'युगस्वामी' मध्ये कवीने, 'भविष्याचे पाखरू माझ्या खांद्यावर' आहे आणि 'श्रमणाऱ्याचा सूर्य सांगाती आहे' असे म्हटले आहे. 'तेथेच गा मुक्ती' मध्ये सुर्वे यांनी 'माझी खरी शक्ती जनशक्ति' असून तेथेच 'चिरंतन मुक्ति' आहे असे सांगितले आहे. 'ऐसे दिसे चित्र' या कवितेत त्यांनी, 'घट्टा ज्याचे हाती त्यांचे असे राज्य' असे परखडपणे म्हटले आहे. नारायण सुर्वे यांच्या अख्ख्या, कवितेत असे अनेक संदर्भ विखुरलेले आहेत आणि ते इतके स्पष्ट ब बोलके आहेत की ठार आंधळ्या-बहिऱ्या व्यक्तीलाही त्याबाबत शंका घेता यायची नाही. 'लुमुम्बाचे गीत' गाणाऱ्या किंवा 'लेनिनचा ग्रंथ पठण केला' असे बेधडक सांगणाऱ्या कवीला स्वतःची जातकुळी लपविण्याचे कारण नाही. काही गणिते पुरी सोडवावी लागत नाहीत, पहिल्या एकदोन पायऱ्यातच समजून येतात. नारायण सुर्वे यांनी कधीच न टाकलेले पण समीक्षकांनी स्वतःच उपस्थित केलेले सुर्व्यांच्या कम्युनिस्टपणाचे गणितही असेच आहे. त्यासाठी कसल्याही प्रश्नालंकाराची गरज नाही. प्रक्षोभाला आमंत्रण देण्यासाठी सुर्वे यांनी 'रिकाम्या पोटातल्या रसवंतीचे कार्य' सुरू केलेले नाही. तसे असेल तर आपल्या कवितेतील कलात्मकतेकडे संपूर्णतया पाठ फिरवून सुर्वे या कवीने केवळ एक साधन म्हणून कवितेची रावबणूक केली आहे, असे होईल. पण 'ऐसा गा मी ब्रह्म' किंवा 'माझे विद्यापीठ' यामधील बव्हंशी सर्वच उत्कट कवितेची कलात्मकता वादातीत आहे: 'माझी आई' 'थोडी ठेव', 'थांब', 'गलबलून जातो तेव्हा', 'पुन्हा भेटू सखे', 'थरकू नको', 'येतेस दमून', 'दोन दिवस', 'पाहुणे', 'चंद्र', 'सत्य', 'नेहरु गेले त्यावेळची गोष्ट,' 'विचार', 'मुंबई', 'आम्ही आहोत', 'माझे विद्यापीठ' अशी खूप मोठी यादी करता येईल. पण सुर्व्यांची कविता कलात्मक आहे हे सांगण्यासाठी किंवा आक्षेपांची राळ धुण्यासाठी त्याची काहीच जरूरी नाही. त्याचे प्रतिनिधीरूपही खूपसे सांगून जाणारे आहे.

नारायण सुर्वे यांची सर्वच कविता कलात्मक नाही, पण त्यांची सर्वच उत्कट कविता कलात्मक आहे. सुर्व्यांच्या कित्येक समकालिनाप्रमाणे ती दुर्बोध, गुंतागुंतीची किंवा संदिग्ध नाही. ती स्पष्ट आहे, 'स्ट्रेट' ( Straight ) आहे. ताठ आहे. तिला जे म्हणावयाचे आहे ते ती सरळ म्हणते. कुठेही लपवाछपवीचा भाग नाही की हात राखून सांगणे नाही. असे हे सरळसोट सांगणे आशयगर्भ सूचकतेला मागे लोटते, कलात्मकतेला बाध आणते ; हे खोटे नाही. कवीला त्याची जाणीव आहे; पण कवीने काही प्रांजळ निष्ठा जपलेल्या आहेत. त्या निष्ठांना तो बांधला गेलेला आहे. मात्र 'त्या' निष्ठांच्या उद्घोषासाठी त्याने कलात्मकतेचा कुठे बळी दिला आहे असे दिसत नाही. 'माझे विद्यापीठ' मध्ये लेनिन, हातोडा, लुम्बुबा, लाल चौक असे उल्लेख येतात पण त्यांच्या जागा त्या किती आहेत ? अगदी हाताच्या बोटावर सुद्धा मोजता येणार नाहीत. अर्थात अशा जागा कमीजास्त असण्यावरून काही निष्ठांची मोजदाद होत नाही. त्याचा संदर्भ पाहणे जरूर असते. अंतर्गत भाव न्याहळणे आवश्यक ठरते. ते पाहता सुर्वे यांनी, उघड्यावाघड्या वास्तवाची चित्रे रेखाटताना लाल रंगाची उधळण–रक्तरंगणाची किमया–उगीच कुठे केलेली नाही. क्वचित वळलेल्या मुठींचा धाक ते दाखवितात. कामगारांविषयी लिहिताना मध्येच उचंबळून येतात. 'मुंबई' मध्ये ते म्हणतात,

> मित्रहो! तुम्हीच मुंबईच्या घडणीतील अमृत अक्षर
> माझ्यावर, ह्या शहरावर तुमचेच हरघडी संस्कार
> कसे तुम्ही; काय वर्णू थोरवी! तुम्ही पोलाद, तुम्ही अलवार
> फुले टपकन पडताच; जखमा होतात हृदयांवर

अशा जागी सुर्वे जरूर भावविवशतेच्या आहारी जातात. वास्तवतेचे चित्रण बाजुला फेकतात आणि हताश दुबळीक प्रकट करतात. आपल्या अनुभवविश्वाची मर्यादाही जाणवून देतात. ह्या सगळ्या उणीवा लक्षात ठेवूनही एक गोष्ट विसरून चालत नाही. ती गोष्ट ही की, एखादी सामाजिक वा राजकीय (किंवा अन्य कसलीही) विचारप्रणाली जीवनाच्या अपरिहार्य संघर्षातून निपजत असेल, कलावंताच्या जीवनाचा आणि कलेचा ती अविच्छिद्य भाग बनत असेल तर त्या निष्ठेवर का आणि कसा आक्षेप घेतला जाऊ शकतो? असा आक्षेप घेण्याचा अधिकार, कुठल्या ना कुठल्या तरी निष्ठेत असलेल्यांना कसा काय पोचतो ? आक्षेप घ्यायचाच झाला तर त्या कलावंताच्या कलाकृतीमधील कलात्मकतेच्या कच्चेपणाविषयी घेता येईल. जीवनसंघर्षाने, अप्रूप जिव्हाळ्याने जपलेल्या, वाढविलेल्या निष्ठांविषयी बोलण्यात अर्थ काय ? सुर्वे यांच्या निष्ठेने लालरंग नव्हे तर

त्यामधील बीज मात्र राखून ठेवले आहे. त्यादृष्टीने सुर्वे यांच्या काचेचा लालरंग उडाला आहे, पण दृष्टीचा फोकस मात्र तोच राहिला आहे. हे लक्षात घेतले की, सुर्व्यांच्या कवितेने कामगारविश्वाचे अंतर्निहित व्यापक दर्शन अद्याप द्यायचे आहे हे स्पष्ट होते. तरीही ज्या जीवनातील ताण सुर्व्यांच्या कवितेत– मर्यादित प्रमाणात का होईना– प्रकट झालेले आहेत, ते जीवन मराठी कवितेत इतक्या अस्सल व नेटक्या स्वरूपात प्रथमच प्रविष्ट होत आहे. ते अनोळखी, अनोखे आणि अपरिचित आहे. मात्र ते जनसमूहाच्या एकदम कक्षेत येणारे आहे. या ओळखीच्या कक्षेत सुर्व्यांची खास प्रतिमासृष्टी आणि आशयसंपन्न नेटदार भाषा समाविष्ट आहे. आपल्याला जे जाणवलेले आहे, त्यामागची तळमळ सुर्वे प्रभावीपणाने व्यक्त करतात आणि त्यात वक्त्याला साजेसा आभास निर्माण करून तत्क्षणीच रसिकाला स्वतःच्या कब्जात घेतात. त्यांच्या कवितेत क्वचित् थोडे रंजनमूल्य प्रकटताना दिसले तरी अमूप आत्मविश्वासाने ती सतत स्फुरताना दिसते. 'इथे सत्य, एक अनुभव' हे त्यांचे ब्रीदवाक्य आहे आणि ते जीवनातून, जगता जगता उपजले आहे. ते बाहेरून आत नव्हे तर आतून बाहेर डोकावते आहे. पण म्हणून जीवनाचे स्वरूप पूर्णतः गवसल्याचा उथळ आव कोठे आहे असे नाही की आत्मश्लाघेचा ओंगळ प्रवाह नाही. उलट,

'नाही सापडला खरा माणूस; मीही तरी मला अजून कुठे पुरता सापडलो ?'

अशी विचारणा आहे. स्वतःकडे त्रयस्थाच्या वृत्तीने पाहत धीटपणे दिलेली कबुली आहे, आणि त्या दिशेने शोध आहे.

— या जीवघेण्या संघर्षाने, सातत्याने चालू ठेवण्यास भाग पाडलेल्या जीवनाच्या अखंड शोधात नारायण सुर्वे यांच्या कवितेचा उगम आहे, प्रवासाचे प्रस्थान आहे. सुर्वे यांची बव्हंशी कविता आत्मनिवेदनाच्या स्वरूपाची आहे. अशी कविता पुष्कळ, वारंवार आणि हुकमेहुकूम लिहिली जात नाही. म्हणजे रडगाण्याचे स्वरूप येऊ न देता लिहायची झाली तर खूप अशी काही ती लिहिता येत नाही. खूप वेळ खाऊन सुर्वे आटीव कविता लिहितात. पण सुर्व्यांच्या अशा थोडक्या कवितेनेही (जेमतेम दोन संग्रह आणि वरती काही कविता) सुजाण–साक्षेपी रसिकांच्या मनात स्वतःसाठी जागा करुन घेतली आहे, हे विशेष आहे.

नारायण सुर्वे यांचे जीवन आणि त्यांची कविता यांचा संबंध अत्यंत निकटचा आहे. किती निकटचा? किती घनिष्ठ? माणूस आणि त्याची नाळ इतका जो घनिष्ठ आहे, नारायण सुर्वे यांच्या जीवनातून त्यांची कविता वगळली किंवा

त्यांच्या कवितेतून सुर्वे यांचे जीवन बाजूला काढले की विलक्षण रितेपण जाणवते. अर्थात् हे काढणे – वगळणे अशक्य असते, पण काय झाल्याने काय होऊ शकते, कुणावर काय कमीअधिक परिणाम होऊ शकतो त्याचा अंदाज घेणे संभवनीय असते. खरे तर सुर्वे यांच्या कवितेतून सुर्व्यांच्या जीवनातला संघर्ष वगळला की सुर्वे यांची कविता शिल्लक उरत नाही. किंबहुना जीवनसंघर्षाविना सुर्वे यांची कविता उभीच राहू शकत नाही. सुर्व्यांची कविता नुस्त्या जीवनाच्या संगतीने वाढलेली कविता नाही तर जीवनसंघर्षाच्या दाहक वेदनांनी फुललेली लढाऊ कविता आहे. ती जीवनाला बाजुला करून, जीवन दूरवर लोटून, जीवनाला सांदी कोपऱ्यात ढकलून फुलत नाही, फुलू शकत नाही. सरळ जीवनात तिला गम्य नाही; रस नाही. अशा जीवनाचे कविमनाला आकर्षणही नाही. संघर्षाचे ओझे, झगड्याचे जू मानेवर बसल्याखेरीज तिला जन्म नाही. सुखासीन प्रवासाची तिला आच नाही. झंझावातात, पदराखाली पणती सांभाळून चालण्यात तिला आनंद आहे. परिणामतः नारायण सुर्वे यांची कविता खास करुन त्यांचीच कविता आहे. मात्र ती सुर्वे या व्यक्तीची कविता नसून सुर्वे यांच्या रूपात सामावलेल्या समान मनांची प्रतिनिधीरूप कविता आहे. सुर्वे आयुष्यातील नव्याजुन्या अनुभवांना सामोरे होऊन जीवन जगले. रुळ्या वृतीने न चालता जीवनाचे हाडाचे प्रेमिक म्हणून चालत राहिले. जीवन स्वाहा करू पाहत असताना जीवनाचे भक्त राहिले. जीवनाला तिडा देऊन त्यावर स्वार झाले; आणि त्यामधील आर्त स्पंदनांची बिनचूक नोंद करीत गेले; म्हणून तर सुर्वे यांची कविता पुस्तकाच्या कव्हरसारखी गोंडस, गुटगुटीत, बाळसेदार आणि करकरीत नाही. केशवसुतांच्या कवितेतील सारभूतता जपणाऱ्या, क्वचित् गद्यप्राय वाटणाऱ्या सुर्व्यांच्या कवितेच्या दर एक सांगीत लपलेला जीवनाचा अर्थ जाणण्यात अनुपम आनंद आहे.

सुर्वे यांच्या 'माझे विद्यापीठ' मधील ब्रह्म हे अनोळखी, अपूर्व, अनपेक्षित, अनोखे आणि अपरिचित आहे. अर्थात ते अनोखे म्हणून विलोभनीय किंवा अपूर्व म्हणून नवे, अतएव स्वीकारार्ह असे नव्हे. ते मुळातच अनोखे, नवे निश्चितच आहे पण त्याहून युगायुगामध्ये कधीही प्रकट न झालेली अशी तिच्यामध्ये युगवेदनाही आहे. अज्ञान, विषमता, दारिद्र्य कुठे नाही ? देव, दैव आणि दैववाद कुणाला वेटाळून नाही ? 'आहे रे' आणि 'नाही रे' चा झगडा कुठे आणि कुणी पुरता निपटून काढला आहे ? यांत्रिकता आणि औद्योगिकरण यांचे विदारक परिणाम कुठे भेटत नाहीत ? सर्वत्र हे आहे. मात्र मानवी प्रयत्नांनी ते जाणार असले तरी त्याचे म्हणून जे विधायकपण असते ते जपावे लागते. ते जपण्यात सुसंस्कृतपण असते. ते सुटते त्याजागी माणूस पिळला जातो, पिचून निघतो, चिपाड बनतो;

2463
27229



त्यातून आक्रोश फुटतात. जगायचे असते पण जगायला विरोधी परिस्थिती असते. जगायचे असते पण वाटेल तसे जगायचे नसते. अस्मितेने, अभिमानाने, प्रतिष्ठेने जगायचे असते. माणुसकीचा वसा घेऊन जगायचे असते. सगळेच जीवन जीवन असते पण सगळ्याच जीवनाला अर्थ नसतो. अर्थपूर्ण जीवनाची एक विनजोड लय असते. पिळलेल्या, पिचलेल्या, चिपाडलेल्या माणसांना त्याची पुरेपूर जाणीव असतेच असे म्हणणे बरोबर नाही पण त्यांचा आक्रोश वैगुण्य–सामर्थ्याचा आलेख काढू पाहते. अशा माणसांचे सतत फुटणारे आक्रोश हे नारायण सुर्वे यांच्या कवितेला मिळणारे आवाहन आहे. त्यात त्या आक्रोशाचा, आक्रंदनाचा किंवा वेदनेचा वेद करण्याचे थोडेफार सामर्थ्य अंतर्भूत आहे. सुर्वे यांच्यामधल्या 'भागो नही, बदलो' या जिद्दी व्यक्तिमत्त्वाने ते राखून ठेवले आहे.

त्यामागे सुर्व्यांच्या समाजाने त्यांना दिलेले अनुभव आहेत. तो प्रसंगी कामगार बनला आहे, चपराशी झाला आहे. हातपाय पसरायलाही जागेची पंचाईत अशा कोनाड्यात सुखासीन माणसाच्या तब्बेतीने सुखनैव झोपा काढण्याचे भाग्य अनुभवले आहे. निद्रानाशाचा विकार जडलेला नाही. लोळण घेणाऱ्या घोड्यांना नालबंद करण्यासाठी नालीचा खोका सांभाळणाऱ्या पोऱ्याचे दुर्भाग्य सोसले आहे. झोपडपट्टीतल्या दुर्गंधीने नाकातील केस जळून गेले आहेत. मात्र मन मेलेले नाही, वृत्ती मरगळलेली नाही. मनाची हळवी कोंच जीवनातील आरस्पानी सौंदर्य टिपण्याइतकी सजग राखली आहे. तिच्यामध्ये बागुडर्चांनी वस्ती करू नये, मन काळोखाचे कैदी होऊ नये अशी मनोमन तरतूद केली आहे. उघड्यावाघड्या वास्तवात अनिष्ट, अर्वाच्य, अशिष्ट आणि अश्लील अशा अनेक बाबींचा कचकोळ उडूनही सुर्व्यांचे मन अटळ आहे, अडग आहे. किमान सुर्व्यांच्या कवितेने तरी दुभंगपणा दाखविलेला नाही. डोळ्यात विद्रोहाचे पाणी पेटूनही कानांनी उत्थानाचे बोल झेलण्याचे सोडलेले नाही. जीवनाची ही ओढ सुर्व्यांना जगवते आणि कविताही लिहायला प्रवृत्त करते. पण ही ओढ आसक्ती मात्र नव्हे. सुर्वे समाजात वावरतात, समाजात जगतात आणि म्हणून प्रांजळ उत्कटतेने सामाजिक जीवनाची बांधीलकी स्वीकारतात; मानतात.

नारायण सुर्वे समाजाची बांधीलकी मानतात तेव्हा स्वतःला सर्वांगांनी समाजाची पूर्णतः बांधून घेतात असे नव्हे किंवा सर्वसाधारण जनतेचा पक्ष तो आपला पक्ष असे भावडेपण बाळगतात असेही नव्हे. तसे असते तर सुर्वे कवी न होते; बखरकार बनते. सुर्वे समाजाची बांधीलकी स्वीकारतात म्हणजे आजकालच्या दुःखांची, वेदनांची, व्यथांची वास्तवता स्वीकारतात असा

त्याचा अर्थ आहे. दुःखप्रक्षोभातील सूक्ष्मातिसूक्ष्म पदर न्याहाळण्याचा, सुर्वे यांनी वसा घेतला आहे. सुर्व्यांच्या बांधीलकीतील वास्तव भेदक तितकेच भयानक आहे, रौद्र तितकेच प्रक्षोभक आहे पण अवतीभोवतीच्या दुःखाची वास्तवता भोगून–पाहून जाणूनही सुर्वे यांचे मन भेगाळलेले नाही, बलदंडच राहिले आहे. बलदंडपणातील निर्धार, आशावादीत्वाचा आवेश आणि अभंगतेमधील निश्चय ही ह्या मनाने गर्भ जोपासावा तशी सांभाळली; जोपासली आहेत. दुःखांनी आणि त्यातल्या त्यात गिळू पाहणाऱ्या दुःखांनी माणूस कोण खिरून जातो, हताश–हतबल होतो; मुडदूस बनून जातो. बकऱ्यांच्या सोललेल्या धडांची साकळलेली पांढुरकी स्थिती त्याच्या साऱ्या शरीराला कोण ग्रासून राहते ! दुःखांची तीव्र आच माणसाचे सारे जीवनच कडेलोटाच्या परिसीमेवर आणून उभे करते. अर्थात कडेलोट करून घेणे किंवा कडेलोटाला साहाय्य करणे यापेक्षा कडेलोटापासून माघारी वळून स्वतःच्या हातांनी कडेलोटच बुजवून टाकणे यात हिंमत आहे, ' जीगर ' आहे. ती युगानुयुगीच्या व्यथेला काडी लावण्याचे काम करते. माणसाला उभी करते. अनंत अडचणींनी सुर्वे यांचे मन खचले–पिचलेले नसून ते अधिकच सृजनशील बनले आहे. जीवन व्यर्थ नाही, मुळीच फालतू नाही, अर्थहीन कहाणीही नाही. जीवनाच्या प्रलयंकर वेदनेतून जगाचे एक सुंदर स्वप्न फुलणार आहे, अशी सुर्वे यांची श्रद्धा आहे. सुर्वे यांची कविता मानवी जीवन चरचरून टाकणाऱ्या शोकान्तिकेचा एक जाहीरनामा आहे.

साहजिकच सुर्वे यांची कविता समाजाची बांधीलकी घेऊन यावी यात आश्चर्य काहीच नाही पण त्यामुळे तिच्यात काहीतरी उणेपण येते असे म्हणणे मात्र नवलाचे आहे. समाजाच्या बांधीलकीत कविता समाजाची, समाजासंबंधीची, समाजाच्या प्राणगर्भ आत्म्याची, तिचा उगम या बांधीलकीत; असे म्हटल्याने किंवा तसे असल्याने तिचे मूल्य कमी ठरते / ठरावे असे नाही. पण ठरविण्याचा प्रयत्न होतो हे मात्र खोटे नाही. शेवटी लक्षावधी लोकांच्या समाजाचा सुर्वे नामक प्राणी एक सभासद आहेच. तेव्हा समाजाची सुखदुःखे सुर्व्यांचीही सुखदुःखे असू शकतात; असतात. अगदी निरुंद पट्टचातील सुखदुःखाचे सोडून दिले तरी सुर्व्यांची किमान काही सुखदुःखे सुर्व्यांच्या अवतीभोवतीच्या समाजाची राहू शकतात. सुर्व्यांच्यासारखा समर्थ कवी त्यास सहज कलात्म रूप देऊ शकतो, काहीशी खासगत वाटणारी सुखदुःखे सार्वत्रिक करू शकतो. त्यामुळे स्वाभाविकपणेच लक्षावधी लोकांपासून सुर्वे आपली नाळ कापून अलग होऊ शकत नाहीत. अलगता नाही म्हणजे सलगता, समरूपता किंवा किमानपक्षी समरसता आवश्यकच होते. तटस्थपूर्ण तादात्म्य जरूरच ठरते. परिणामतः जीवन आणि साहित्य वेगळे

काढता येत नाही. केवळ कला हे प्रचंड ढोंग आहे, हे नाणे सुर्व्यांच्यासारख्या कवीच्या बाबतीत वस्तुस्थितीच्या भट्टीत वितळून गेलेले असते. केवळ स्वतःलाच कोरीत राहणे हाच खरा धर्म वा खरा शोध नव्हे. स्वतःबरोबरच संबंध सूर्यमालिकेचाही शोध घेणे, तिच्या अस्तित्वाचे भान असणे म्हणजे स्वतःचे अस्तित्व सिद्ध करणे होय. नारायण सुर्व्यांच्यासारखा कवी आपल्या कवितेतून आपल्या (आणि आपल्या भोवतीच्या समाजाचा, तदनुषंगाने येणाऱ्या अनेक गोष्टींचा) शोध घेण्याचा प्रयत्न करतो आहे. अस्तित्वाचे हे भान कवीला वस्तुस्थितीला पाठमोरे व्हायला देत नाही. नाहीतरी सापडलीच तर सजीव प्रेरणा देणारी खरी कविता वा प्रेरणा या विराट संघर्षातच सापडेल अशी सुर्व्यांच्यासारख्या कवीची धारणा आहे; जीवन आणि साहित्य, अस्तित्व आणि कला, भान आणि शोध इत्यादी संबंधात काही दृढ धारणा आहे. म्हणून 'भागो नही, बदलो' ही कवी सुर्व्यांची घोषणा आहे.

या घोषणेत सुर्व्यांची जीवनविषयक दृष्टी आहे; साहित्यविषयक कळा आहेत. त्यामुळेच सुर्व्यांच्या गद्यप्राय कवितेतही पुरेपूर सामर्थ्य भरून राहिले आहे. समाजाच्या कणखर आणि दणकट जाणिवातील मूलस्त्रोत घेऊन ती आकार घेत आहे. जगण्याची लढाई सुरू आहे. अस्तित्वाचो झुंज चालू आहे. कवी सुर्वे ही ढाई लढत आहेत, झुंज घेत आहेत. तीत त्यांची भूमिका प्रेक्षकाचो नाही तर, सहवेदनेची आहे, भागीदाराची आहे, साथी आणि साक्षीदाराची आहे. 'ऐसा गा मी ब्रह्म' च्या प्रस्तावनेत वि. वा. शिरवाडकर यांनी या साक्षीदाराचे वर्णन केले आहे: "श्री नारायण सुर्वे हे कामगार जीवनाशी केवळ समरस झालेले नव्हेत, तर ते जीवन प्रत्यक्षात अनुभवणारे कवी आहेत. श्री. सुर्वे यांनी पुस्तकांच्या कपाटात आपली स्फूर्तिस्थाने शोधलेली नाहीत. सभोवारच्या परिसरात काही श्रद्धा जागत्या ठेवून ते जगत आहेत आणि त्यातूनच त्यांनी काव्याचा शोध घेतला आहे. त्यांची बरीचशी कविता लढाऊ वृत्तीची, समाजक्रांतीची उपासना करणारी, नव्या आनंदवनभुवनाचे स्वप्न पाहणारी आहे. प्रामाणिकपणा आणि उत्कटता ही सत्काव्याची आधारतत्त्वे, सुर्वे यांच्याजवळ या दोन्ही गोष्टी आहेत"[1] प्रामाणिकपणा आणि उत्कटता ही सत्काव्याची आधारतत्त्वे सुर्व्यांच्या कवितेतून प्रकट झाली त्याचे कारण जे जाणवले, काळजाला डसले, काळजात सलत राहिले ते शब्दरूप घेऊन कलात्मतेने अवतरत राहिले हे होय. कवी सुर्वे सारस्वतांच्या पुत्रांना आपली गंधवेणा सांगतात : "मी स्वस्थ बसेन, शरीर स्वस्थ बसेल, पण आत्मा स्वस्थ बसून देईना. शब्द मला ढकलीत राहिले, मी ढकलला जाऊ लागलो. . . . मी

---

१. 'ऐसा गा मी ब्रह्म' : नारायण सुर्वे : प्रस्तावना : वि. वा. शिरवाडकर : पृ. ४.५

आपला लिहीतच राहिलो आहे, राहणार आहे. त्याशिवाय मला गत्यंतर नाही. जेव्हा काळजातला ठणका बंद होईल, जेव्हा मला शब्दासाठी अडून बसावे लागेल, तोवर तुमची वाट विचारीत, कधी मागचा आदर्श घेऊन, कधी स्वत: चुकत-माकत, रस्ता शोधीत मला चालावेच लागणार आहे. नाहीतर मी माझ्या जीवनाशी बेइमानी केली असे होईल " [२] म्हणून कवी स्वत:बरोबर इतरांसाठी एक जग निर्माण करीत आहेत. ते जग युगाची साथ घेऊन राजमुद्रा घडवीत आहे. त्यासाठीच सारस्वतांच्या साम्राज्यात कवितालेखनाचा थोडासा गुन्हा कवी करीत आहे. हा गुन्हा जाणीवपूर्वक, समंजसपणे केलेला आहे. त्यात धसमुसळेपणा किंवा बेरागबाळेपणा नाही. सारस्वतांच्या साकळलेल्या साम्राज्यात, नंग्यांच्या दुनियेत ज्याच्यासमोर रोजचा रोटीचा सवाल आहे असे कवी सुर्वे मिटलेली अवजड महाद्वारे उघडू पाहत आहेत : सगळ्याच अर्थांनी ! या सगळ्यातील सुर्वे हा माणूस प्रथम कामगार आहे, नंतर कवी. कवीचे भावमधुर स्वप्न, कामगाराच्या दृष्टीतून तो मिटीमिटी डोळ्यांनी पाहतो आहे. कामगाराच्या हाती असलेली तळपती तलवार त्याच्या जीवनातील वास्तव आहे, त्या आधारे त्याचे स्वप्न आहे. अशा या कामगार कवीने स्वत:चे-स्वत:बरोबर इतरांसाठी एक विद्यापीठ निर्माण केले आहे. नारायण सुर्व्यांच्यासारख्या कवीचे हे विद्यापीठ म्हणजे 'भणंग' भिकाऱ्याचे वसतीस्थान आहे, दाही दिशांच्या खांद्यावरचा इमला हे छत्र समजणाऱ्या आणि अख्खी धरती स्वत:चा जमीनजुमला मानणाऱ्या कर्जमुक्त युगस्वामीचा तो खुला फूटपाथ आहे. घडल्या जाणाऱ्या युगाचा तोच खराखुरा स्वामी असला, श्वासोच्छवासातून सुखाची हमी पेरीत जाणारा श्रमणाऱ्यांचा तो सांगाती असला तरी शेवटी त्याला घर नाही, गणगोत नाहीत, सगेसोयरे नाहीत. माथ्यावर मावणाऱ्या आकाशाच्या घराखेरीज छत्र नाही. चालत्या पायाखालील जमीनीखेरीज आधार नाही. अशा 'कंगाल' आणि 'बेताल' विद्यापीठाचा कवी सदस्य आहे. विझता-विझता स्वत:ला सावरणाऱ्यांनी निर्माण केलेल्या अशा विद्यापीठाची वात जपून नेताना कोण यातना भोगाव्या लागतात म्हणून सांगावे? त्याच्या स्वागतासाठी सार्वजनिक नगरपालिकेचा फूटपाथ सदैव खुला आहे. या फूटपाथने सार्वजनिक अनिष्टतेची कोळीष्टके खूप जपलेली आहेत. जातीजातीत वाटलेले वाडे-रस्त्या, तांबलेल्या-आंबलेल्या, करपलेल्या भाकरीसाठी घोटाळणारे गोंगाटांचे थवे; दीनदलितांच्या दुनियेची मिरासदारी आहे. असे खूप-खूप पाहिले असूनही अजून खूप पहायचे आहे, जे पाहिले ते पुरेसे नाही असे या सदस्याचे मत आहे. साहजिकच मागच्यासकट पुढचे खूप पहावे अशी कवीची इच्छा आहे.

---

२. 'ऐसा गा मी ब्रह्म' : नारायण सुर्वे : 'आभार' : पृ. ६

आपणच आपल्याला पुरतेपणी सापडले नसू तर माणूस तरी खरा सापडला असे कसे म्हणावे ? त्या दिशेने चाललेले प्रयत्न मध्येच कसे सोडून द्यावेत ? कवीला पडलेले हे प्रश्न आहेत. म्हणून माणूस शोधण्यासाठी, माणसाचा शोध घेण्यासाठी माणसाचा आत्मा पकडण्यासाठी, कैकदा गोंधळून जाऊनही; झापडून जाऊनही कवी प्रयत्नशील राहिला आहे. या प्रयत्नात समाजाच्या बांधीलकीचे सूत्र अनुस्यूत आहे. ते कुठे सुटलेले नाही, सैल झालेले नाही की निसटलेले नाही. सुर्वे सांगतात, "मार्क्स व एंगल्स हे आजच्या युगाचे थोर विचारवंत आहेत. ते वैज्ञानिक दृष्टीकोन देतात. जीवनाने पुढे आणलेल्या प्रश्नांची उत्तरे देतात.... सर्वोत्कृष्ट कलाकृती जीवनाचे दिग्दर्शन करते. मार्क्सवादी तत्त्वज्ञानातील शब्दही असेच जीवनाचे मूल्यमापन करतात. दिग्दर्शन करतात. ते माणूस, भौतिक परिस्थिती आणि निसर्ग ह्या सर्वांच्या अतूट संबंधाचे विवेचन करतात. माणूस आणि कलेचाही संबंध सांगतात. तरीही पोथीनिष्ठ मार्क्सवाद्यांकडून माणूस व कलेच्या स्वातंत्र्यावर बंधने आली तर.... तर माणसाचा व कलेतील सच्च्या स्वातंत्र्याचा पक्ष तोच माझाही राहील. नाहीतरी मार्क्सनेच, गंज चढलाच तर तो घासून काढा व पुढे चला हे सांगितले आहेच. कारण गंज चढलेल्या तलवारीने–तत्वज्ञानाने–विजय मिळविता येणार नाही. म्हणून दरखेपेस मार्क्स मला बजावीत असतो: वस्तुनिष्ठ हो, कठोर आत्मपरीक्षण कर. डोळसपणा धारण कर व निर्भयपणे पुढे चल !" पुढे सुर्वे म्हणतात, " अमूक एक भूमिका मनात वागवून कविता लिहितो असे कधी घडलेच नाही. मला ते पटत नाही. भूमिका लक्षात ठेवून कविता लिहिली की ती घोषणा होते. 'स्लोगन' होते. कविता बिघडते. खरे म्हणजे ज्याला जसे आयुष्य भोगावे लागते तसा त्याच्या कवितेचा रंग असतो. तशी त्याची वरीवाईट भूमिकाही असते. आणखी खोलात शिरलो तर प्रत्येक शब्द हा भूमिकाच घेऊन जन्मलेला असतो. नाहीतर ती निरर्थक बडबड होईल. जगातील उत्कृष्ट कलावंतांनी आपली भूमिका कधीच झाकलेली नाही. शिवाय प्रत्येक चांगली कलाकृती ही त्या त्या युगाची भूमिकाच असते. म्हणून मनुष्य ( ह्यात कवीही आलाच ) भूमिका घेऊन जगत असतो. भूमिकाविरहित अशी कुठलीच गोष्ट नसते. शिवाय स्वत:चा 'चेहरा हरवलेले' कृत्रिम युगही मराठी साहित्यात मागेच येऊन गेले. परंतु अशांचीही एक भूमिका होतीच. तरीही कवी मनात भूमिका वागवूनच लिहितो असे म्हणण्याचे धाडस मला तरी करता येणार नाही. असा स्वानुभवही नाही. माणसाविषयी आणि माणसासाठीच लिहिणारे आपण आहोत. ही भूमिका मी कधीही विसरत नाही. ह्या कोटयवधी लोकांपासून स्वत:ची नाळ कापून मी अलग होऊ इच्छित नाही. हेच लोक माझ्या रचनेचे विषय आहेत. स्वत: जगताना जे बरेवाईट अनुभव

येतात त्यांचा सजीव आविष्कार, त्यातील संघर्ष, वैश्विक अनुभव ह्यांचे जर जिवंत, कलात्मक आणि यथार्थपणे चित्रण मला करता आले तरी पुष्कळच झाले. म्हणून संघर्ष करीत, पाय घट्ट रोवून उभा रहा, ' भागो नही, बदलो ! ' असे अनुभवानेच मला शिकविले आहे.'' [३] साहजिकच माणसाइतका समर्थ सृजनात्मा दुसरा भेटलाच नाही असे सुर्वे सांगत आहेत. सुर्व्यांची भूमिका वगैरे म्हणतो ती त्यांनी झाकलेली नाही आणि कवी मनात भूमिका वागवूनच लिहितो असे म्हणण्याचे धाडस त्यांनी केलेले नाही. कारण त्यांचा तसा स्वानुभव नाही. माणसाविषयी आणि माणसासाठीच लिहिणाऱ्या कवी सुर्व्यांचा माणसाच्या सृजनशक्तीवर असीम विश्वास आहे. कवी सांगतो :

> तरी कां कोण जाणे ! माणसाइतका समर्थ सृजनात्मा मला भेटलाच नाही
> आयुष्य-पोथीचीं उलटलीं सदतीस पानें; वाटतें, अजून कांही पाहिलेंच नाही,
> नाही सापडला खरा माणूस; मीही तरी मला अजून कुठे पुरता सापडलों ?
> सदतीस जिने चढून उतरतांना, मीही नाही का कैकदा गोंधळून सापडलों? [४]

कवी सुर्व्यांच्या सृजनशील मनोवृत्तीने सृजनशील माणसाच्या आत्म्याचा शोध जारी ठेवला आहे. तसे सगळे जगतच असतात. पण जगण्या-जगण्यात गंमत असते. बाज असतो; आणि फरकही असतो. काही न करता, काही न पाहता जगत असतात, ते जगूनही मरत असतात. त्यामुळे जगात उणेअधिक होते, वेगळे काही घडते असे नव्हे. सुर्वे अशा निष्किय-निर्बीजांच्या वाटेला जात नाहीत, ते समर्थ सृजनशील आत्म्यांच्या वाटेवर उभे आहेत; शोधात आहेत. हे आत्मे कुठे आहेत? कसे आहेत? खाटकाने खाटिकखान्यात तोडलेली धडे हारीने मांडावीत तसे ह्यांचे जीवन रक्ताळलेले, चिरकाळलेले, भेगाळलेले आहे. नेहमी युद्धाचाच वणवा घेऊन जगणाऱ्या त्यांचे जीवन काजळी कुरतडीत दिवा जळत रहावा तसे आहे. बॉम्बफेक झालेल्या उध्वस्त नगरात सर्वस्व हरवून बसलेला सैनिक खिन्न उदासपणे हिंडत रहावा तशी ह्या जीवनाची सैरभैर अवस्था आहे. ते जीवन जीवन असले तरी ते कोळपून गेलेले असते. त्या जीवनात पहाटेचा तारा उगवत असला तरी आपल्या घरात तो कधी परतलेलाच नसतो; सागराचा पेला ओठी आलेला असतो, पण तो कधी कलंडलेलाच नसतो. हे जीवन लोभसवाणे ऋतुराज्य पाहत असते. पण देहाच्या देवाला फुलविण्याचे सामर्थ्य त्यात आलेले नसते. त्यात सारे हलाहल,

---

३. ' प्रतिष्ठान ' : डिसें, १९६६ ' मराठी कविता आणि आजचे कवी ' : परिसंवाद : नारायण सुर्वे : पृ. १०७.१०९

४. माझे विद्यापीठ : नारायण सुर्वे : ' माझे विद्यापीठ ' : पृ. १४

उग्र कोलाहल आणि घोर दावानल यांचेच मोठे साम्राज्य असते. 'मुक्ती कोन पथे? अशी जीवनाची आर्तता असते. ती शोधण्याचा, हुडकण्याचा अनेक चेहऱ्यांत, अनेक माणसांत, अनेक अक्षरांत प्रयत्न होतो. पण अर्थ मनात उतरतोच असे नाही. इथे सारे बाकी हजार ग्रंथराजही कोलमडून पडतात. त्यांच्याशी केलेली सोयरिक बाटगेपणात जमा होते. परिचारिकेप्रमाणे त्यांनी देह जोपासावा, कामगाराप्रमाणे त्यांनी निर्मितीक्षम असावे असे वाटते पण रुक्ष्या मनाने दुबळेपणाचीच तिरडी ते उचलतात; आणि रात्रभर उबळणाऱ्या अस्थम्यासारखा अख्खा जीव ते हल्लक करुन सोडतात. प्रतिकूल परिस्थितीची गिधाडे वादळात सापडलेल्या केळीसारखी माणसाला कशी अल्लद गदगदून टाकतात. क्वचित् शांत मनाला चटके देऊन कोडगेही बनतात. अशा वेळी 'माझ्या मना, बन दगड' अशी कवीची मागणी असावी. सारे दुःसह्य झाल्यावर दगडाहून वेगळे ते काय व्हावे? पण मन दगड बनल्यावर अश्रूंचे काय? नाती तुटत नाहीत, तोडवत नाहीत. स्नेह जिरत नाही, मिटत नाही. बंध विरत नाहीत, सुटत नाहीत. कवीचे मन दगड बनत नाही. समाजाशी ज्याची घट्ट बांधीलकी त्याचे मन सजीव का नाही राहणार? 'इथे सत्य, एक अनुभव; बाकी सर्व झूट' ही कवीची पहिली श्रद्धा. समर्थ अश्रूंच्या निर्मितीक्षम थेंबात हलाहलाची वात जाळून जीवनाचा पथ उजळीन ही दुसरी आणि अपार जनभक्तीच्या शक्तीत चिरंतन भक्तीचा शोध ही कवीची तिसरी आणि अखेरची श्रद्धा. त्यापुढील काही असल्यास अद्याप कवीच्या काव्यात प्रकट झालेले नाही. सुर्व्यांच्या कवितेत या श्रद्धानिष्ठांचा कचकोळ उडून गेला आहे. कवी सांगतो :

> आता आलोंच आहे जगांत, वावरतों आहे
> ह्या उघड्यानागड्या वास्तवांत
> जगायलाच हवें; आपलेंसें करायलाच हवें ;
> कधी दोन घेत ; कधी दोन देत.[५]

दोन घेत - दोन देत उघड्यानागड्या वास्तवात जगण्याची जिद्द नवसृष्टी निर्माण करण्याकडे लक्ष लावून आहे. समाज बंधनांनी करकचून बांधले गेल्याची जाणीव असलेल्या कवीची ही नवसृष्टी आहे. बंदीशाळेच्या अंधारातील बंडवाल्याची ही बंडखोरी आहे. ती कुठून येते? कशी येते? स्वेदाच्या थेंबात धरणी नाहते, यंत्राच्या हाताने गोपुरे उभी राहतात आणि मानवी जीवनाची अज्ञात शिखरे धुंडाळण्यास प्रारंभ होतो – हे सारे, घडते ते कशामुळे? कवी म्हणतो,

---

५. माझे विद्यापीठ : नारायण सुर्वे : 'माझे विद्यापीठ' : पृ. १६

श्रम आणि सत्य । सौंदर्याची गाथा ।
सारे झूट मिथ्या । याच लोकीं ।। [६]

ही गाथा ब्रह्मांडीचा ताप हटविण्यास व हरविण्यास सज्ज करते. घडीभर अंधार राहिला तरी नंतर पहाटच आहे या श्रद्धेने तगवते. म्हणून तर नारायण सुर्वे यांची कविता ही नारायण सुर्वे नामक कवीची कहाणी नसून उभ्या विश्वात सडून जात असलेल्या, खचत – पिचत असलेल्या अवघ्या श्रमणाऱ्यांच्या श्रद्धानिष्ठांची जिवंत कहाणी आहे. ती कुणा एका जिंदगीच्या बरबादीची कहाणी नसून अवघ्या जिंदगीच्या उत्थानाची कथा आहे. म्हणून हार नाही, माघार नाही. धाकाने प्रहार करीत पुढे सरणे आहे. कवी सांगतो :

जगणे कठीण झाले आहे तरी जगायचे आहे
साहण्यासारखे अजून पुष्कळ साहायचे आहे
घडीभर अंधार राहील नंतर पहाटच आहे

कारण,

ताऱ्यांच्याहि पुढची दुनिया माझ्या नजरेंत आहे
एक फूल, एक हृदय, एक ग्रंथ नजरेंत आहे
नजर रोखून बसलों तो क्षणहि समीप आहे[७]

म्हणून काळोखाचे कैदी असलेल्या अवघ्या उच्चभ्रू मशारनिल्ह्यांना इशारा आहे,

काळोखाचे कैदी तुम्ही उगा धाक दावूच नका !
माफ करा एवढे काम मला सांगूच नका !

काळोखाच्या कैद्यांना बंद्या गुलामाचे जिणे प्राप्त झाले आहे, कारण हातातील सारी आयुधें त्यांनी टाकून दिली आहेत. अशा, हातातील आयुधें गळून गेलेल्या, टाकलेल्या निःशस्त्र गुलामांना, चाचपीत-रापत चालणे सोडून द्यावे असे सांगण्याचा अधिकार नाही, नसतो. दौड वितीचे पोट कुणाला सुटलेले नसते, चैत्रमासातील उन्हाप्रमाणे दारिद्र्याचे उन्ह अगतिक करून सोडत असते आणि असत्य चरणपूजा बांधीत असते, हे खोटे नसले तरी नांगराच्या तप्त फाळाप्रमाणे मुके दुःख गिळून

---

६. 'ऐसा गा मी ब्रह्म' : नारायण सुर्वे : 'ऐसे दिसे चित्र' : पृ. ५१
७. 'ऐसा गा मी ब्रह्म' : नारायण सुर्वे : 'माफ करा' : पृ. ४०

नवे युग रचणाऱ्या सृजनाच्या यात्रिकांना त्याचे काहीच नसते. अशा महायात्रेत खर्व-निखर्वाचे आखाडे बुजतात. मेंदू चक्कर होतात. नफ्या-तोट्याचे लष्कर बेचिराख होते. गणित वापुडे बनते आणि अंधाराच्या वाटेवर असलेली जिंदगी युगग्रंथातील एक 'पहाट-पान' लिहून मोकळी होते. आकाश मातीसह उठून येते. दारिद्र्याच्या सहाणेवर भविष्याचे रूप उमटते. कुणी साथी असो अगर नसो, वादळाची वात बनते. मुक्तीची दिशा दिसते. हृदयावरचे काळे-निळे डाग फुलवंतीचे रंगेल स्वप्न घेऊन येतात. 'क्षितिज रुंद होत आहे' मध्ये कवी सांगतो की, अशा वेळी आपल्या वेदनेला नवा अर्थ येतो. मृत्युंजयी आत्मा धडक देतो. भूमीच्या गर्भामधून बीज हुंकार भरते. सारे गगन नजरेला फिके पडते आणि परिणाम असा असतो की, तडकलेले मन एकसंध होते. कवी म्हणतो,

आज तडकलेले मन
एकसंध होत आहे
आणि उसवलेले धागे
गुंफूनीया देत आहे
आज माझ्या कोरड्या गा
शब्दांत आग येत आहे
आणि नव्या सृजनाचें
क्षितिज रुंद होत आहे. [८]

साहजिकच दोन दिवस वाट पाहण्यात आणि दोन दिवस दुःखात गेले असले, पोलाद झोतभट्टीत शेकावे तसे आयुष्य छान शेकून निघाले असले, त्यामुळे मन काहीसे ढोरही बनू लागलेले असले तरी डोईवर उन्हाळे किती उरलेत याचा हिशोब सुचतोच आहे. भाकरीचा चंद्र शोधण्यात जिंदगी बरबाद झाली असली, सर्वस्व हात दारिद्र्याकडेच गहाण राहिले असले तरी दुःख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे अशा काही गोष्टी अश्रूंच्याच शाळेने शिकवून ठेवल्या आहेत. त्या वाया नाहीत. म्हणून कढ काढीत पुढे सरण्याखेरीज गत्यंतर नाही. आयुष्य मागे जातेच कुठे मुळी? ते पुढे सरत असते, पुढे जात असते. कवीचा हा अनुभव. म्हणून हरणाऱ्यानेही अन्यायावर तुटून पडावे, पिडल्या-पिळल्या गेलेल्याने व्यथेवर औषध घ्यावे, वंचिताने धुमसत-

---

८. 'ऐसा गा मी ब्रह्म' : नारायण सुर्वे : 'क्षितिज रुंद होत आहे' : पृ. १६

उसळत-पेटत यावे: जाळीत जावे, घडवीत यावे. श्रमसूर्याच्या कक्षेत स्वतःस उजळीत मुक्त फिरावे अशी कवीची धारणा आहे. ऐन रणातून रथ माघारा नाही, ही वृत्ती आहे. कवीची इशारत आहे,

अपयशाचे चार कडू घोट गिळले तरी
विष पचवून उरलों दहा अंगुलें वरी [१]

यातूनच दिक्कालांच्या गाठी सोडविण्याची कवीची आस आहे. सूर्याची लंगोटी टिचविण्याची, ढगांचा हत्ती दारी बांधण्याची, अमृताने घागरी बांधण्याची त्याच्या मनाची इच्छा आहे. कवीला हक्काच्या खोलीस लाचार व्हावे लागावे ही त्याची शोकान्तिका असली तरी विश्वाचे गोकुळ दारी खेळविण्याची आस मेलेली नाही. म्हणून तर दर वळणावर नवीन मुक्काम करीत वाटचाल सुरू आहे. या वाटचालीत, जन्मभर एका घरात कुडून घेतल्याचे दुःख नाही असे नाही. त्यापासून थोडे विलग होताना, मजल दरमजलीत मुक्काम बदलताना 'ताकमेढ' हळहळत नाही असे नाही. किमान हातपाय मुडपून झोपता येईल असे छोटेसे घर, सग्यासोयऱ्यांची धावपळ, जीवनाच्या साऱ्या वाटा उंबरठ्यात विसर्जित करण्याची तत्परता हे उगीचच असे वाटले तरी ही उगीचता फलीभूत होणारी आहे. ती स्वतःसकट कवीला फुलविते. त्यातून कवी स्वतःलाच रचत जातो. हरेकात वावरूनही हरेकांना दिसू न येण्याचे गुपित या उगीचतेने सांभाळले आहे. त्यामुळे 'हे असे कसे ?' बरोबरच 'आम्ही असे कसे ?' असा प्रश्न पडला आहे. त्याची सोडवणूक जरूर आहे. हमेशा जमवून घेऊन जगणे कठीण झाले आहे. क्वचित् साऱ्या संबंधांची नाळ एकदाची कापून टाकावी म्हणजे सारे कसे गडीचूप होईल असेही कवीला वाटते. मात्र कैक ऋतू उडून गेले असले तरी नाळ कापून समाजबाह्य होण्याची हिम्मत झालेली नाही. नाळ कापायची म्हणजे समाजाची बांधीलकी तोडायची–फोडायची पण ती तोडतो–फोडतो म्हटल्याने फेकता येत नाही; त्यासाठी सुद्धा आत्म्याची पूर्वमंजुरी लागते. केवळ कल्पनेने उगीचच मन मोहरून चालत नाही. साहजिकच दररोज स्वतःला धीर देत जगणे आवश्यक बनले असले तरी कठीणही होत आहे. भोकाड पसरणाऱ्या मनास थोपटीत झोपवीत राहणे कठीण होत आहे. उफाळणारे विद्रोहाचे पाणी कोठारात कधी शिरेल, कधी पडेल, भडका केव्हा उडेल यावी हमी देणे कठीण होत आहे. विझता विझता स्वतः बरोबरच दुसऱ्यालाही प्रकाश देत जगावे हो

---

१. 'ऐसा गा मी ब्रह्म' : नारायण सुर्वे : 'रथ त्याचा आवरा', पृ. ६३

मनीची भावना. तसे प्रयत्न. पण वाड्यावाड्यावर इमान विकत घेणारी दुकाने भेटतात, डोकी गहाण टाकणारे महाभाग मिळतात. कवी म्हणतो :

अशा बेईमान उजेडांत एक वात जपून नेतांना
विझता विझता स्वतःला सावरलेंच नाही, असेही नाही. [१०]

लालबागेच्या पाईक कवीची कविता, जीवनाचे अर्थ शिकून राहिल्याने फुलोरुन येते. कवीच्या जीवनसंबद्ध दृष्टीचे प्रत्यंतर मिळते. जीवनात काही अपरिहार्य, अटळ, अनिवार्य आहे. व्हायचे तसे होणार, घडणार त्याला मोडता कोण नि कसा घालणार ? पण हा प्रश्न तर अगतिकतेचा झाला. दाती तृण धरून घातल्या जाणाऱ्या लोटांगणाचा झाला. व्हायचे तसे होणार, घडणार म्हणून चालायचे नाही. चालत नाही. जे आणि जसे घडावेसे वाटते, ते तसे घडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न हवेत, धडपड हवी. मार्ग मग दोनच : एक, शरण जाणे आणि दोन, लढता लढता मरणे. कवीच्या दुःखाने दुसऱ्याचा स्वीकार केला आहे. कारण जीवनच सर्व आहे, सर्वस्व आहे. जीवनावेगळे काय आहे ? मग जीवनापासून पळून का जावयाचे? कुठे जावयाचे ? कसे जावयाचे ? आमंत्रित तरी कोणाला करावयाचे ? स्वर्गाला ? पण स्वर्गासारखे हे सारे आहेच कुठे ? कोपऱ्यातील तलवारीकडे बोट त्यासाठी आहे. त्याच्यावर तरी नशीब घासून-पुसून घ्यावे असा हिशेब आहे. त्यासाठी 'ऊठ' असा कवीचा हाकारा आहे, आणि

यंत्राच्या काळजांतील आर्त स्वर
तुझ्या कंठात आकार घेऊं दे
उडणाऱ्या नाडीचे जागते ठोके
त्यांचा घंटारव अंतरांत घुमूं दे

अशी आस आहे. नारायण सुर्व्यांच्यासारख्या अभिजात लोककवीने अस्तित्वाचे हे भान सतत जागवावे यात कर्तव्यभावना आहे, प्रचार नाही. नारायण सुर्वे हा माणूस आणि नारायण सुर्वे हा कवी हे समांतर वाटत असले तरी भिन्न आहेत. म्हणून सुर्व्यांच्या कवितेच्या बाबतीत, कवी सुर्वे विसरुन माणूस सुर्वेचाच विचार अनिष्ट आहे. सुर्व्यांच्या कवितेत कवी सुर्वेने माणूस सुर्वेवर हमेशा मात केल्याचे दिसते. म्हणून तर कवी चाकोरीच्या चेचवट चौकटींचा कंटाळा करतो. स्वतःच्या

---

१०. माझे विद्यापीठ : नारायण सुर्वे : 'विझतां विझतां स्वतःला : पृ. ५४
११. माझे विद्यापीठ : नारायण सुर्वे : पृ. ९

आत्मसमर्पणातून सामाजिक क्रांतीची ध्वजा उंचावली जाईल असे मानतो. नव्या सुंदर जगाची स्वप्ने रचतो. अस्तित्वासाठी सतत अट्टाहास करावा लागत असल्याने –प्राणपणाने झुंज घेणे हा धर्मच होऊन राहिल्याने–जीवन व्यर्थ वाटत नाही. जीवनातल्या वऱ्याबाईट वर्दळीचा धागा अर्ध्यात तोडून टाकला जात नाही. शक्य नाही.

साहजिकच मराठीचिये नगरी सुर्व्यांची कविता सिंहाच्या छाव्यासारखी शोभून दिसते. धगधगत्या पौरुषाचा आणि पुरोगामी प्रवृत्तींचा जोरकस वेध घेणारी सुर्व्यांची कविता सर्वसाधारण रसिकाला चेतविणारी आहे, समजणारी आहे, पटणारी आहे. सुर्व्यांच्या जीवनाचा दारिद्र्य हा परीक्षक, कष्ट–छळणूक हे प्रश्न आणि धैर्य–जिद्दीने त्याचा मुकाबला हा लढा आहे. या लढ्याभोवती दुःख आहे आणि दुःखाला हटविण्यासाठी–त्याचे हृदय विधूने टाकणारे चित्रण करण्यासाठी–लढा आहे. सुर्व्यांच्या कवितेने प्रगल्भ दुःखाची कहाणी उभी केली आहे. पण या दुःखाबद्दल खंगणे नाही, आक्रोश नाही, नितळ जाणतेपण मात्र पुरेपूर आहे. गंगाराम सुर्वे नावाच्या कुणा एका कामगाराने वाढविलेला, जन्मतारीखही माहीत नसलेला, उपाहारगृहात कधी पोऱ्याचे काम करणारा, कधी रस्त्यावर ओझे वाहणारा, रेल्वेमध्ये हमाली करणारा किंवा मुले सांभाळणारा, गोदरेज फॅक्टरीत पत्रे उचलणारा, गिरणीत शिपायाचे किंवा चपराशाचे काम करणारा असा लक्ष लक्ष जीवामधला नारायण सुर्वे नामक कुणी एक अनामिक जीव. परिस्थितीने पिचत नाही, पिंजत नाही. डरत नाही. ताठपणे उभे राहून राष्ट्राच्या स्वातंत्र्याकरिता चाललेल्या रणसंग्रामात बेगुमानपणे उडी घेतो. क्षणाक्षणाला आवंढा गिळायला लावणाऱ्या जगण्याला अर्थ मिळवून देतो. काळजात कसलीही कटुता न ठेवता स्वतःच्या जिवंत जीवनाइतकीच रस-धगीने संपन्न कविता लिहितो. जीवनाचे जगणे मांडून जातो ; तोलबाज कविता लिहून जातो. कटुता, द्वेष विखार यापासून अलिप्त असलेली कविता वास्तविक ह्या माणसाने एवढे भोगल्यावर काय काय झूट म्हणून सांगायला हवे ? सारे झूट – आईबाप, बहीणभाऊ, नातीगोती, समाज, सारे सारे झूट – अशी खच्चून, एकदा नव्हे पुन्हा पुन्हा आरोळी ठोकायला हवी पण नाही ठोकली. नाही म्हटले काही. नारायण सुर्वे यांनी कार्ल मार्क्सचे 'भांडवल' ( 'दास कॅपिटल' ) पुरे वाचले असेल – नसेल पण ह्या परिस्थितीचे भांडवल करणे शक्य असूनही त्यांनी ते केले नाही. ( आणि असे भांडवल करायला ह्या देशाइतका संपन्न दुसरा देश कुठला असेल ? सुर्व्यांसारख्या संवेदनशील कवीला हे भान का मिळाले नसेल बरे ? की मिळूनही वापर नाही असा त्यांचा विचार असेल ? तेच शक्य आहे.) सुर्वे सांगतात, "कुठला कोण सुर्वे मला वाढवतो, समोरच्या अक्षरशः फूटपाथवर एका चौपाईखाली एक घर करून

राहिलेली, मुलांना वाढविणारी, रात्री भजन म्हणणारी बाई रोज मी पाहतो मग मी माणसावरची श्रद्धा झूट म्हणून आरोळी मारून कशी उडवून देऊ? माझा माणसावर अपार विश्वास आहे. बऱ्यावाईट प्रवृत्तीनिशी, भल्याबुऱ्या परिस्थितीत जीवन कंठणाऱ्या माणसाच्या चांगुलपणावर माझी श्रद्धा आहे. कुणी, कधी वाईट, कधी बरे दोन्हीही असेल. कुणी, कधी अमानुषपणे वागतही असेल पण तरीही चांगलं ते घ्यावं. चांगलं खूप आहे."

सुर्व्यांची ही श्रद्धा मूलभूत माणुसकीवरची श्रद्धा आहे. तिने सुर्व्यांच्या कवितेला धग दिली आहे. जगायलाच काही नसलेल्याने ते निर्माण करून, त्याचा सुखास्वाद घ्यायला प्रवृत्त व्हावे; हा सुर्व्यांच्या कवितेचा हिशोब आहे. त्यांच्या कवितेचे ते मर्म आहे. पोटाची जाणीव, जिवंत राहण्याची लढाई, प्रतिष्ठेने जगण्याचा अट्टाहास, आणि त्यातून काहीतरी सुंदर फुलावे–उमलावे अशी दृष्टी–या सर्वांतून उफाळणारे दुःख, व्यथा, सुख साऱ्याची साक्ष कवी सुर्वे यांची कविता आहे. ती जीवनातल्या कडु–गोड, आंबट–तुरट अनुभवांचे गणित मांडीत आहे. काहीं हिशोब सादर करीत आहे.

पण म्हणून कवी सुर्वे यांची कविता सुर्वे यांच्या जीवनाची प्रतिकृती नाही. छायारूप काही असले, असतेही पण सुर्व्यांच्या कवितेत सुर्वे जितके जागे आहेत त्याहून त्यांच्यामधला कवी अधिक सजग आहे; तो खूप जाणतेपणाने – कळतपेक्षा नकळतच अधिक- वाटचाल करताना दिसतो. " असे म्हणतात की, कविता लिहून झाली की ती कवीपासून वेगळी आणि स्वायत्त होते. तिचा निर्मात्याशी संबंध राहत नाही. पर्यायाने याचा अर्थ असा की, ज्या जीवनातून कविता अवतीर्ण होते त्याच्याशी संबंधरुप असलेली तिची नाळ तुटते आणि मातेपासून अपत्याला त्याप्रमाणे तिला स्वतःचे वेगळे स्वयंपूर्ण असे अस्तित्व लाभते. समुद्राच्या पाण्यातून मेघ उत्पन्न होतो पण तो समुद्रापेक्षा सर्वस्वी भिन्न असतो. रुप आणि रंग, आशय आणि आकार, गती आणि नियती या सर्वच बाबतीत हे विधान बहुताशांने खरे असले तरी त्याच्या खरेपणालाही एक मर्यादा आहे असे मला वाटते. नाळ तुटणे अपरिहार्य असले तरी त्यामुळे नाते तुटते असे होत नाही. किंबहुना अपत्याच्या द्वारा त्यांच्या आईबापांच्या जीवनाचाच एक नवा उन्मेष प्रकट होत असतो, असे म्हणावयास हरकत नाही. स्वरुप, स्वभाव, विझलेल्या आकांक्षा आणि दबलेली दुखणी इत्यादिकांची आनुवंशिक मिळकत आपल्याला स्वीकारावीच लागते. म्हणूनच मला वाटते, नाळ तुटली तरी नाते तुटत नाही."[१२] हे कुणालाही मान्य

---

१२. 'माझे विद्यापीठ' : कुसुमाग्रज : 'सत्यकथा' : सप्टें, १९६८ : पृ. : ३३

व्हावे. त्यात अवास्तव काहीच नाही. पण हे पटले तरी सुर्वे यांची कविता त्यांच्या जीवनाची प्रतिकृती आहे, कम्युनिझमच्या तत्वज्ञानाची धारावाहक आहे – असे कुणी म्हणतात तेव्हा सांगणे जरुर होते की, सुर्व्यांच्या कवितेबाबतची ही मूढता यथार्थ नाही. केवळ कलावादाला धोतांड मानणाऱ्या, कलामूल्यांची यथायोग्य बूज आवर्जून राखणाऱ्या नारायण सुर्वे यांनी मराठी कवितेत प्रागतिक, वस्तुनिष्ठ व बुद्धीवादी विचारांस हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे. मनाने सांभाळलेल्या आशयाच्या अभिव्यक्तीची आच पकडण्याचा अट्टाहास बाळगला आहे. सुर्वे आपल्या कवितेतून अलक्षित वेदनांची असह्य व्यथा सांगतात: त्यामागील आशयात व्यासंग आहे; आणि अनेक संदर्भ सूचकतेच्या विविध परिमाणांचा पदर आहे. अर्थात सर्वत्रच तो शोधण्याचे कारण नाही. शोधायचाही नसतो. पण बहुतांश जागी त्याचा वावर आहे. साहजिकच सुर्व्यांच्या कवितेच्या बाबतीत संदर्भ-सूची-टीपा यांच्या जंजाळात पडावे लागत नाही. मनावर कमालीचा ताण टाकणाऱ्या आणि कविता वाचून होताच गळ्यासारख्ये होऊन जाणाऱ्या कवितेच्या या जमान्यात सुर्व्यांच्या कवितेने हा जंजाळ मिटवून टाकावा हे किती उत्साहवर्धक आहे. ' माझे विद्यापीठ ' च्या ' आभार ' मध्ये सुर्वे लिहितात, " ह्या संग्रहातील कविता सर्व काही बोलेल. तिला स्वतःचा अनुभव आहेच. भाषाही आहे, मग माझे पांगळे ' निमित्त ' कशाला ? " [१] अशी थेट भूमिका घेऊन सामोरी जाणारी सुर्व्यांची कविता, जीवनाशी बेइमानी न करता मराठी नव कवितेचे क्षितिज रुंदावताना दिसते. सुंदर जीवनाची स्वप्ने पाहते. निर्मितीवर प्रगाढ विश्वास ठेवते. जीवन व्यर्थ न वाटणाऱ्याला असा विश्वास ठेवता येतो. वेदनेतून स्वप्ने फुलविता येतात. त्या अधिकाराबद्दल प्रश्न उपस्थित करण्याचे कारणही नसते. पण प्रश्न उपस्थित होत नाहीत असेही नसते. ते होतातच. तरीही नारायणाला उद्याच्या जगाचे

नसे तेथे खंत । नसे जातपंथ
अवघा सुपंथ । जीवनाचा

असे ' आदर्श ' चित्र दिसते. हे नक्की आदर्शच की काय हे सांगणे कठीण असले, अत्यक्ष प्रयोगाच्या दर्शनातच त्याची सिद्धी असली तरी सर्वसाधारण सुखी जीवनाचे ते चित्र, ते स्वप्न आहे, एवढे मानायला हरकत नाही. कवीला ते पडते, पडत राहते; कारण संयमी, सुखी आणि संतुल जीवनाला स्वप्ने पडत नाहीत. सुंदर चित्रे – सुंदर स्वप्ने फुलविण्यासाठी देखील मनात एक ' जीगर ' लागते.

---

१ अ. वित्ता : पृ. ४

जगण्याचेच जिथे बांधे आहेत, उध्वस्त धर्मशाळा हेच उभ्या जीवनाचे जिथे रूप आहे; तिथे स्वप्नें कसली फुलावीत ? काहीच फुलू नये. जीवनच मिटावे. पण नाही. जन्माबरोबरच दुःख, दारिद्र्य, अपमान, हेळणा सारे काही वाटयाला येऊनही थरकाप उडविणारे दारिद्र्य सुर्व्यांना भिववीत नाही. भिवविण्यासारखी परिस्थिती उद्‌भवूनही ते भीत नाहीत. उलट नशिबी लिहिलेल्या दुःखद, क्रूर, गुंतागुंतीच्या प्रसंगांनी त्यांच्या कवितेला सजीव केले आहे. वस्तुतः क्रूर गुंतागुंती– मुळे भय वाटावे, भयाचे घृणेत रुपांतर व्हावे. पण सुर्वे चिखलातील कमळासारखे उरले आहेत. जीवनात कुठला एकच भाव स्थायी नसतो. दुःख, आनंद, विषाद इत्यादीचा एकच भाव चेहऱ्यावर कायम ठेवला तर चेहरा भावनाशून्य होऊन जातो, शुष्क बनतो. सुर्वे हे जाणतात म्हणूनच उठून उभे राहू शकतात. 'दोन दिवस वाट पाहण्यात ऐन दुःखात गेले' असूनही 'कामगार आहे, मी तळपती तलवार आहे' ही जाणीव तीव्र आहे. ती महत्त्वाची आहे. नंग्यांच्या दुनियेत वावरायचे तर या जाणीवेचा आधार हवा; त्याखेरीज समर्थ सृजनात्मा भेटणार नाही, शोधता येणार नाही; इतकेच काय स्वतःचाच स्वतःला शोध घेता यायचा नाही. तो घेतला जातो आहे याचा अर्थ अगदी स्पष्ट आहे. तो विवरुन सांगितला पाहिजे असे नाही. जिवंत राहण्याची लढाई, भुकेची जाणीव, दुःख आणि व्यथा यांचा कल्लोळ यांची चतुर साक्ष सुर्वे यांची कविता आहे. यातूनच खूपसे अभय किंवा सुरक्षेची भावना निर्माण होते. सुर्वे यांनी आपल्या काव्यनिर्मितीमागील स्पष्ट केलेल्या प्रेरणा–प्रक्रियाविषयक विवेचनात त्याचा अंदाज मिळतो. सुर्वे सांगतात, " कविता लिहिण्यापूर्वी खास ठळक, स्पष्ट असे चित्र डोळ्यापुढे नसते. बरीच अस्पष्टता जाणवते. बराचसा मी अस्पष्टच असतो. एक धागा, एक सूत्र मनाच्या कोपऱ्यात सलत असते. बीज म्हणाल तर तेच. हा अबोल सल मला स्वस्थ बसू देत नाही. सलत राहतो. आणि मी मनातल्या मनात घुमसत राहतो. शब्द येत नाहीत; ते फार दमवतात मला आणि ज्या पद्धतीने (शब्दांत) ती कविता व्यक्त होऊ इच्छिते ती मला आवडत नाही. काहीतरी अपूर्ण राहिले आहे हे सतत जाणवत राहते. असे अनेक दिवस निघून जातात. आतल्याआत ही भावना संस्कारित होत जाते. तिची पिंजण चालू असते. अनेक दिवस, महिनेसुद्धा हे बीज खलखलत राहते. जोवर कवितेचा आवाज, खरा स्वर सापडत नाही तोवर हे असेच चालते. एकाच बैठकीत बसून कविता पूर्ण करणे मला अद्यापही जमत नाही. अनेक बैठकी होतात. नाहीतरी भाराभर ओळी काय कामाच्या ? असा विचारही दरक्षणी माझ्या डोक्यात घोळत राहतोच. कविता लिहिणे ही सोपी व सहजसाध्य गोष्ट आहे असे मला कधीच वाटले नाही, ती असाध्य व कष्टसाध्यच गोष्ट आहे. अर्थात मला शब्द माहीत नसतात असे नव्हे.

शब्द मला गौण वाटतात. अनुभवाची कविता होते; निव्वळ शब्दांची झाली तर ती दिवाळीतल्या दारूकामाची शोभा ठरेल. . पुढे पुढे मग हळूहळू आकार येत जातो, परंतु त्याचे निश्चित रूप काय असते हे मलाही कळत नाही. जिथे मलाच प्रामाणिकपणे थांबावेसे वाटते तिथेच मी थांबतो... एक विचार, एक भावना अथवा एखादे चित्र सर्वार्थाने पूर्ण झाले की माझे काम संपले. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास मी कवितेला कवितेच्या तोलाने जाऊ देतो. अकारण स्वत:ची अडगळ मध्ये कशाला ? ... शिवाय कविता लिहिताना अनेक मोहही होतात. शब्दांचा मोह, प्रतिमांचा मोह, असंख्य कल्पनांचा मोह, हे सर्व मोह टाळून स्वत:ची अशी निवड करावी लागते. छाटाछाट करावी लागते, नाही तर कवितेवर सूज चढते ... केव्हा केव्हा मी अतिशय हताश होतो, आपणाला कविता धरताच येणार नाही असे वाटत राहते. उत्तम कविता शेकडो योजने दूर आहे असे जाणवत राहते मग मी खिन्न होतो. ही कबुली द्यायला मला लाज वाटायचे कारण नाही. 'हा अट्टाहास बंद कर' असा मीच मला सल्ला देतो आणि गप्प राहतो"[१४] कारण कवी सुर्वे यांना 'भाराभर ओळी' लिहायच्या नसतात, 'निव्वळ शब्दांची' न करता 'अनुभवाची कविता' व्हावयाची असते; 'शेकडो योजने दूर' च्या जाणवत राहणाऱ्या उत्तम कवितेला कवितेच्या तोलाने जाऊ द्यायचे असते. साहजिकच निर्मिती आटीव, थोडकी राहते. सुर्वे स्वत:च्या कवितेबद्दल माफक उत्साहाने बोलतात. 'कविता लिहिताना खास निवडक अशा शब्दांची निवड न' करता लिहितात. 'शब्द हेच माध्यम असतात' हे सुर्वे नाकारीत नसले, शब्दांचे थोरपण त्यांना पुरे माहीत असले तरी शब्द लक्षात ठेवून कविता लिहिणे हा सुर्व्यांना गुन्हा वाटतो. 'काही निराळे आकलन,' 'मनुष्याच्या मूलप्रवृत्तीसंबंधीचा रसास्वाद' 'स्वत:च्या आयुष्याच्या दशा आणि दिशा अनुभवताना जगाचा – जीवनाचा प्रतीत झालेला अर्थ' अशा कलेसंबंधी, त्यामागच्या प्रक्रियेसंबंधी विचार करणे हा ते गुन्हा मानत नाहीत. आपल्या कवितेचे ते वाचक, अभ्यासक आणि प्रसंगी समीक्षकही असतात. स्वत: बरोबरच दुसऱ्याला आपली कविता समजाऊन-उकलून देऊ पाहतात. सुर्वे यांच्या कवितेने 'प्रतिप्रश्ननसेवया' सतत सुरू ठेवले आहे: शब्दापेक्षा अनुभवांवर तिचा खूप जोर असल्याने अनुभवांना सामोरे जाणाऱ्या आपल्या प्रकृतीशी तिचा संवाद आहे. 'माझे शब्द' मध्ये सुर्वे सांगतात:

माझे शब्द तुम्हांला आमची कथा सांगतील
याचं सोहळ्यासाठी दोन अश्रु जपून ठेवलेत. [१५]

---

१४. 'प्रतिष्ठान' : डिसें, १९६६, : पृ. १०८ · १०९

१५. माझे विद्यापीठ : नारायण सुर्वे : 'माझे शब्द' : पृ. ५८

— काही शब्दाजवळ दोन अश्रू आहेत, तसे मुठी वळलेले हातही आहेत. मुठी वळलेले हात हे लाल रंगाचे प्रतिकच नव्हे. असे रूढ सांकेतिक रुप फार झाले. ते सामर्थ्याचे रुप आहे: अन्याय–अत्याचार सहन करून करून नसा न् नसा सैल पडल्यावरही प्राणपणाने उभे राहण्याचा, त्यात नेस्तनाबूत होण्याचा असंभव नसताही अखेरचा प्रयत्न म्हणून उठाव्याचा 'मुठी वळलेले हात' हे प्रतिक आहे. सुर्व्यांच्या कवितेत अनुभव प्रमुख असल्याने त्यानुसार ' मुठी वळलेले हात ' ही कृती आहे. केवळ शब्द ह्या साधनामधून प्रकट झालेली ती शब्दशरणता नाही. अनुभवशरणता आहे. सुर्व्यांची कविता उत्कट अनुभवांनी बोलते; अनुभवच उत्कट होऊन ते कवीपण उपभोगतात. हा उपभोग कवीची काव्यविषयक भूमिका सांगून जातो: त्यात शब्द गिरविणे आणि रसवंती विकणे दोन्हीही नसते. सुर्वे लिहितात, "शब्दांनी सुजलेली कविता मी गेली काही वर्षे वाचतो आहे. ही लाट अनेकदा माझ्या मनावरुन जाते; मी मात्र कोरडाच राहतो. असे का होते हा प्रश्नही मी अनेकदा स्वत:ला विचारला आहे. पण हे असे आहे खरे, हा कवितेचा फेस आहे. तिची गर्जना, खोली, सूक्ष्मता अशा शब्दात नसते. असे खटाराभर शब्द अद्यापही निर्माण करण्यात येत आहेत. ह्या नि:सत्व शब्दांचे कौतुकही होते. ह्यामुळे मराठीत नवीन शब्दांची भर पडेल, कदाचित शब्दकोश संपन्न होतील, परंतु कविता संपन्न व्हायला हवी त्याचे काय ? आज कैक शतके मराठी भाषेला अर्थपूर्ण शब्द तुकारामच पुरवतो आहे, हेही केवढे मोठे आश्चर्य आहे ! तुकारामाचा एक समर्थ शब्द लक्षावधी लोकांना प्रेरणा देतो, परंतु सध्याचे लक्षावधी शब्द एकाही माणसाला हलवू शकत नाही असे का ? ..... म्हणून असे गुलगुलीत (गुळगुळीतही) नि:सत्व शब्द सुखासीन वर्गांच्या छानछोकीसारखे ' नादमयी ' स्वरूपात वावरतात. ते क्वचित मला मोहवतातही परंतु अभिजात कवितेसाठी भुकेल्या माणसाची गरज ते भागवू शकणार नाहीत. म्हणून कवितेत वापरलेले शब्द कवितेचा मूळ आत्मा प्रकट करु शकले नाहीत तर उपयोगाचे काय ? असे शब्द मला प्रत्ययकारी अनुभव देऊच शकत नाहीत ... .. मात्र ' मजूर ' हा शब्द मी कटाक्षाने टाळतो. हा शब्द मला नेटीवासारखा मवाळ वाटतो. असे शब्द कटाक्षाने टाळताना ह्यामागे माझी राजकीय व सामाजिक भूमिकाही असते. त्याऐवजी मी माझ्याच लोकांच्या बोलीभाषेतले शब्द उचलतो. (हे नेहमीच जमत नाही.) ते अधिक सामर्थ्यवान वाटतात उदा: 'आऱ्या'. सामान्य लोकांची भाषा हीच खरी कवितेची भाषा..... शिवाय आणखी एक महत्त्वाचे: असे कवी स्वत: आतून किती हादरला ह्यावरच भाषा व शब्द अवलंबून आहेत. ' हादरणे ' हा अनुभव जर कवीला नसेल तर तो नुसते शब्दच वीत राहील. ते सिंहिणीचे ' विणे ' नसेल. दुसरेच काहीतरी असेल ... ...कवीला स्वत:ला व्यक्त

करण्यासाठी त्याला त्याची स्वतःची भाषा सापडणे आवश्यक असते. ही फार महत्त्वाची गोष्ट असते. तशी मला माझी स्वाभाविक भाषा सापडली किंवा नाही हे सांगणे कठीण आहे. आणि म्हणून भाषेत ( काव्याच्या ) आपण काही केले आहे हेही सांगणे कठीणच वाटते." [१६] उगीच शब्दांना, भरीला न घालणारे कवी सुर्वे साहजिकच 'माणसाविषयी आणि माणसासाठीच' लिहितात. आपली कविता अशी की तशी, आपली काव्यविषयक भूमिका अमूकअमूक की तमूकतमूक अशा रीतीची फालतू वटवट न करता, " आणि म्हणून भाषेत ( काव्याच्या ) आपण खास काही केले आहे हेही सांगणे कठीणच वाटते " असे लिहिताना कवितेमधील कर्तुकीचे सहजतेने सूचन करून जातात, ते दुर्लक्षिता येत नाही. सुर्व्यांच्या स्थूल वाटणाऱ्या कवितेत अशी सूचकता अनेक स्थळी आढळते. ठाशीव स्वरूपाची स्वयंभू रूप घेऊन उभी राहणारी सुर्व्यांची कविता स्वभावतःच वरवर स्वतःसाठी असणारी पण तितकीच आतून दुसऱ्या कुणासाठी तरी असणारी आहे. ती सतत संवाद साधत जाते. वक्तृत्वपूर्ण साधेपणाच्या शैलीने मढलेली ही कविता अभिव्यक्तीवरील हेतूंवर आक्षेप बाळगूनही जोरकस बनते आहे. नारायण सुर्व्यांच्या उभ्या कवितेचे रूप आत्मनिवेदनाचे आहे. " जसा जगत आहे मी तसाच शब्दांत आहे,' हे या कवितेचे संपूर्ण सत्य आहे; आणि सोबत

एकटाच आलो नाही युगाचीही साथ आहे
सावध असा तुफानाची हीच सुरवात आहे [१७]

असा सावधानतेचा निर्भय इशाराही आहे. सच्चे कवी नारायण सुर्वे पांढरपेशेतर समाजातील नव्या, उमद्या, ताज्या कवीवर्गाचे प्रतिनिधीरूप आहेत. हे प्रतिनिधीत्व साहित्यातील गटबाजीचे-झुंबडबाजीचे-कप्प्याकप्प्याचे निदर्शक नाही; तर संप्रदायाचे ते प्रदर्शक आहे. पण संप्रदायातही जी विकृती राहू शकते, तिच्यापासून ते अलिप्त आहे. निदान अद्यापपावेतो तरी ते तसे आहे. या प्रतिनिधीचा एक पाय सामाजिक संघर्षात तर दुसरा वाङ्मयीन लावण्यात आहे. आजपर्यंतच्या मराठी साहित्यात सर्वस्वाच्या जाणीवेच्या दृष्टीतून आपला आत्मा वंचित केला आहे ही एका बाजूची जाणीव आहे तर स्वतःचे सर्वस्व सामाजिक परिवर्तनात गुंतवून घेतल्यास, गुंतल्यासच टिकण्याची शक्यता आहे, ही दुसऱ्या अंगाची धारणा आहे. या सामाजिक जाणीवेतून वाङ्मयीन प्रेरणांची उचल आहे, त्यातून नव्या दिशावळणांची सांस्कृतिक दृष्टी आहे.

---

१६. 'प्रतिष्ठान' : डिसें, १९६६, पृ. १०९ - ११०
१७. ऐसा गा मी ब्रह्म : नारायण सुर्वे : 'चार शब्द' : पृ. १३

त्यासाठी सुर्व्यांची शाहिरी हाक आहे : ... "आपण जीवनातील रोजच्या संघर्षाकडे वळू या. तिथली प्रचंड उलाढाल पाहू या. भोगू या. अनुभव गोळा करू या. थोडेसे अंगावरचे कातडे शेकले तर हरकत नाही, हलगी शेकवावीच लागते. नाही तर खरा स्वर बाहेर येत नाही. सापडली तर जातिवंत कलाकृती ह्याच धुमाळीत सापडेल. आपण काय 'कवी' आहोत हाच अकारण भ्रम ठेवला तर शब्दच सापडतील; अभिजात कविता सापडणार नाही. म्हणून आपण जिवंत अनुभवाकडे वळू या. जातिवंत कवितेच्या शोधाकडे चालू या." [१८] कारण ही सृष्टी मराठी कवितेचा क्रांतिकारक व परिवर्तनशील कणाच तयार करणारी आहे. त्यामागची कवी सुर्वे यांची स्थूल विचारधारा अशी आहे : वास्तवाची एक बाजू आजचा माणूस किती क्षुद्र झाला आहे हे सांगणारी आहे, परंतु आजचा माणूस या क्षुद्रत्वाविरुद्ध लढाही देतो आहे. स्वाभाविकपणेच स्वत:भोवतीच गिरगिरत राहून महानुभाव वाङ्मयातील हत्तीची गोष्ट सांगून मोकळे होता येणार नाही. सामाजिकदास्य, समाज मन व त्याभोवतीचा संघर्ष लक्षात घेणे आवश्यक आहे, घेतलेच पाहिजेत. त्यामुळे स्वत:च्या म्हणजे एका कोंडलेल्या मनाचे चित्रण म्हणजेच समाजाचे चित्रण व जुन्या वाङ्मयीन टीका-मूल्यातून नव्या आवृत्त्या म्हणजेच सार, हे भ्रांत आहे. आता साहित्याचे पुर्न-मूल्यांकन आणि समीक्षेची समीक्षा जरूर आहे. पिळवणूक ही केवळ राजकीय व आर्थिक किंवा सामाजिक बाबतीतच होते हे खरे नाही. ती सांस्कृतिक, शैक्षणिक व मानसिक पातळीवरही चालू असते. म्हणून युद्ध एका आघाडीवर नव्हे तर सर्व आघाड्यांवर, पुन्हा नव्याने जारी ठेवणे इष्ट आहे. ज्या खुळचटपणाच्या परंपरा असतील व आजच्या जीवनाला त्या कोंडीत पकडून त्यांचा निकाल लावत असतील तर त्या निरुपयोगीच होत. त्या टाकल्या पाहिजेत. कथाकादंबऱ्यांच्या आधाराने इतिहासात किंवा पुराणात शिरणे शक्य आहे. रमण्याचा प्रश्नच नाही. पण विचार-वर्तनाच्या । जगण्याच्या दृष्टीने ते कसे शक्य आहे? काळ ते करू देणार नाही, देत नसतो. या संदर्भातील प्रागतिक परंपरा स्वीकारण्याखेरीज गत्यंतर नाही. वस्तुत: ही काही नव्याने उद्भवणारी समस्या नसते, अनादि-अनंत अशी प्रतिक्रिया आहे. भांडवलदारी समाजजीवनात दोन संस्कृत्या असतातच: एक, पिळणाऱ्या वर्गाची आणि दुसरी, पिळलेल्या समाजाची. हे असे काही घडू नये असे कुणाला वाटत नाही? प्रत्येकजण ते मनातून म्हणत असतो पण त्यादृष्टीने प्रत्येकजण भांडवलदारच असतो. त्यासाठी भांडवलदारी समाजच असला पाहिजे अशी अट नाही. तशी मुळी गरजच नाही. हा समज

---

१८. 'प्रतिष्ठान' : डिसें, १९६६ : पृ. १२०

चुकीचा आहे. भांडवलदारी समाज आहे की नाही किंवा कोण कुणाला आणि कसा पिळतो हे महत्त्वाचे आहेच पण त्याहूनही अशा असलेल्या–नसलेल्या समाजात पिळवणूक करणारी हिंसक मनोवृत्ती आहे की नाही हे अधिक महत्त्वाचे आहे. पण या महत्त्वात, आपण कुणाची बाजू घेऊन उभे राहणार आहोत, हे या सर्वांहूनही खूप महत्त्वाचे आहे. हाच खरा व मौलिक प्रश्न आहे. म्हणजे समाज कोय पद्धतीचा असणार यापेक्षाही त्यामधील माणसाची प्रवृत्ती न्यायाच्या बाजुने उभी राहणारी असणार की नाही हा खरा प्रश्न आहे. कारण अंती ही न्यायनिष्ठ प्रवृत्तीच समाजातल्या विकृतीस सुकृती प्राप्त करुन देत असते. वाङ्मयीन लढा हा त्यातला एक भाग आहे. तेवढ्याने काम भागणारे नाही. तसे दुखणे जुने आणि हेकट; साहजिकच एकंदर जीवनाच्या सर्व संघर्षांतच झगडण्यातून वाढत व विचार करीत पुढे सरले पाहिजे. प्रचंड रथ उचलला पाहिजे. एकूण जूग झुंजाचे तसे काम विलक्षण झटापटीचे, शरीरश्रमाचे आणि मनःस्तापाचे आहे. वादळ–वाऱ्याशी ती झुंज आहे. ती दूर पल्ल्याची, लांबवरची आहे. सुर्व्यांची कविता हे काम नव्हे तर त्यामधील आशय उराशी जपून वाटचाल करीत आहे कारण "कवी हा कोणी अवचित आकाशातून तुटलेला तारा नाही, त्याला भोवतालची परिस्थिती, त्याचे संस्कार, त्याची आंतरिक घालमेल ह्या गोष्टीही खूपशा प्रमाणात कारणीभूत असतात."[१९] अर्थात कवितेने संपूर्ण क्रांती होत नसते; पण क्रांतीच्या बिजांकुरांना ती प्रस्फुरित जरुर करीत असते. ते नाकारता येत नाही. आपल्याकडले 'वंदे मातरम्' किंवा फ्रान्समधले 'ला मार्सेएझ' अशी त्याची काही उदाहरणे आहेत. कविता हळुवार सौन्दर्यात्मक प्रतिक्रियांनी नटलेली असते तशी बलदण्ड सामाजिक जाणीवांनीही समृद्ध असते. ही कविता आणि ती कविता नाही, असे काहीच नसते. सगळी कविताच असते. पण कवितेकवितेत फरक असतो आणि परिणामा–परिणामात अंतर असते. साय पांघरणाऱ्या शब्दातील दिखाव्पणाची निरर्थकता समजावून सांगण्याची आवश्यकता नसते आणि काव्यात्म जीवनदर्शक कविता करीत असलेल्या सारथ्याचा प्रत्यय चुकत नसतो. सुर्वे यांनी फ्रान्समधल्या 'ला मार्सेएझ' (La Marseillaise) या गीताची एक गोष्ट सांगितली आहे; ती या संदर्भात लक्षणीय ठरावी.[२०] गोष्ट अशी आहे: "फ्रान्सच्या राज्यक्रांतीच्या वेळची ही गोष्ट. स्त्रास्बूर्ग (Strasbourg) येथे 'रुझे द लील' (Rought De Lisle)

---

१९. 'प्रतिष्ठान' : डिसें, १९६६ : पृ. ११२

२०. 'प्रतिष्ठान' : डिसें, १९६६ : पृ. ११२ : ११३

मूळ : Modern French Course by Dondo, P. 421.22

भाषांतर : डॉ. प्रा. सदा कऱ्हाडे : थोडे फेरफार करून

त्या नावाचा एक तरुण अधिकारी होता. वेळोवेळी कविता लिहून तो स्वतःची करमणूक करुन घेत असे. त्या कवितांना तो स्वतः चाली देत असे. एके सायंकाळी स्त्रास्बूर्गच्या मेयरने त्याला जेवायला बोलावले. स्वाभाविकच त्यावेळी क्रांतीचे, फ्रान्सवरील संकटाचे आणि स्वातंत्र्यासाठी सर्व युरोपशी सुरु असलेल्या लढ्याविषयीचे बोलणे निघाले. देशभक्तीच्या भावनेने भारावलेला मेयर आपल्या पाहुण्याला म्हणाला, "आपल्या सैन्यासाठी तू एखादे समरगीत का लिहीत नाहीस ?"

"मी विचार करीन." असे त्या तरुण अधिकाऱ्याने उत्तर दिले.

घरी आल्यावर झोपायला जाण्याऐवजी 'रूझे द लील' गीतरचनेची धडपड करु लागला. रात्रभर त्याने खटपट केली. त्याने काहीतरी गीतरचना केली. लगेच तो उठला आणि खोलीतच येरझारा घालू लागला, जे नुकतेच लिहिले ते गाऊ लागला. शेवटी थकल्यावर आरामखुर्चीतच झोपी गेला. जेव्हा तो उठला तेव्हा दिवस आधीच उजाडला होता. क्षणाचाही विलंब न लावता तो खाली आला आणि मेयरच्या घरी धावत गेला. "मी नुकतंच काही तरी लिहिलं आहे. तुम्ही ऐकू इच्छिता का ?" आल्याबरोबर तो मेयरला म्हणाला.

मेयर आणि त्याच्या कुटुंबातील मंडळी हॉलमध्ये जमली. कुटुंबातीलच एकाने पियानोवर 'रूझे द लील' ने लिहिलेले गीत वाजवावयास सुरूवात केली. 'रूझे द लील' उभा राहून गाऊ लागला:

Allons, enfants de la patrie
Le jour gloire est arrive!

(चला, मातृभूमीच्या सुपुत्रांनो, भाग्याचा दिवस आला.)

ते शब्द आणि संगीत इतके सुंदर आणि जिवंत होते की तिथे हजर असलेले सगळेच उभे राहिले आणि हे प्रसिद्ध कोरस गाऊ लागले.

Aux armev, citoyens !
Formez Vos bataillons !
Marchons ! Marchons

(शस्त्रसिद्ध व्हा नागरिकांनो ! सज्ज करा पथके तुमची ! पुढे चला ! पुढे चला !)

"लवकरच त्या गीताचा खेड्यापाड्यांतून, प्रांताप्रांतातून प्रसार झाला." ह्या

गीतातील चैतन्याने पुढे असंख्य तरुण भारावले. त्यातून संपूर्ण फ्रेंच सैन्य ह्या गीताच्या ध्वनीने स्वातंत्र्य सिद्ध झाले.

– कवितेमधल्या या निरंकुश सामर्थ्याने समाजातल्या वादळवाऱ्याशी झुंज घ्यायची आहे. सुर्व्यांच्या काव्यविषक भूमिकेला ते अभिप्रेत आहे. आणि जाता जाता, सुर्व्यांच्या कवितेतून प्रकट होणाऱ्या भाष्याव र टीका–टिप्पणी करणाऱ्या टीकाकारांना सहज उत्तरही आहे. 'दुःखाची गाणी' मध्ये ते

दुःखाची गाणी
गाणाऱ्या कवीचा
धावून ते येतात
घोटायला गळा
म्हणतात, 'हा द्रोही
कवींच्या जातीतला
हळुवारशा स्वप्नांना
लावतोय् विळा !'
तरिही तो गात रहातो
दुःखाचीच गाणी
जिवंत असतात, त्यांच्या
डोळां येते पाणी !

असे स्पष्टपणे व्यक्त झाले आहेच. इथे त्याचे सूचन होते: कवीच्या दृष्टीतील हे क्रांतदर्शित्व टवटवीत आहे.

सुर्व्यांची कविता, त्यांच्या प्रकृतीसारखीच रोखठोक आहे. विचारामधील प्रागतिकता आणि शैलीतील नावीन्यपूर्णता आदी गुणांनी ती मंडित झालेली आहे, मराठी कविता पुन्हा एकदा लोकांना समजू लागली आहे, तिची 'भावना' येऊ लागली आहे; 'भावना' मिळू लागली आहे. पुन्हा एकदा मराठी कविता हा विषय सामान्य वाचकांचा होत आहे. वामन इंगळे यांनी सांगितल्याप्रमाणे "समकालीन पिढीत नारायण सुर्वे हे कवीनाम एक अतिशय वैशिष्ट्यपूर्ण नाव आहे. विशेषतः समकालीन पिढीला ज्या एका अधांतरी लोंबकळणाऱ्या वैतागाने ग्रासले त्या वैतागाचे बलस्थानात रूपांतर करणाऱ्या सुर्वेंचे काव्ययश हे म्हणूनच अतिशय मोलाचे आहे. त्या बलस्थानाची नोंद मराठी काव्याने आणि समीक्षेने विंदा करंदीकर आणि शरच्चंद्र मुक्तिबोध यांच्या कवितांच्या रूपाने यापूर्वी केली आहेच. जीवनविषयक तत्त्वज्ञानातील सारखेपणा जमेस धरूनही सुर्व्यांची कविता

या श्रेष्ठींच्या कवितेपेक्षा भिन्न होऊ शकली हे सुर्वे यांनी कलावंत या नात्याने मिळविलेले यश उल्लेखनीय आहे." [१२] हे यश, मानवी समाजाच्या अवती भोवतीच्या परिसरातील क्रूरता, तांडव, घृणेचा कल्लोळ यांच्याशी सामना करण्याची हिंमत राखून आहे. सुर्व्यांची कविता सामाजिक दृष्टी ठेवून माणूस धर्म जागवू पाहते आहे: मानवी रक्ताला मूल्य असते हे सांगू इच्छिते आहे.

नारायण सुर्वे यांच्या कवितांमधून नव्या भाषेतून नव्या जाणिवा प्रकट होताना दिसतात. अर्थात नवी भाषा किंवा नव्या जाणिवा हे महत्त्वाचे आहेच खेरीज या कवितेतील जगही नवे आहे. ते अनोळखी, दुर्लक्षित आणि अपरिचित आहे. जगाला नवे आहे असे नव्हे तर मराठी कवितेच्या जगाला ते नवे आहे: त्यामधील हृदयावर कोरली जाणारी अनुभवाभिव्यक्ती अस्वस्थ करून सोडणारी आहे.

या अवस्थेचा मार्ग सुर्व्यांच्या कवितेतील जगाचे स्वरूप हे आहे. अर्थात हेच एकमेव कारण नव्हे,इतरही आहेत,पण प्रामुख्य 'नाही रे' च्या जगाला आहे.उभ्या जगाकडून वंचित होणाऱ्या, छळल्या जाणाऱ्या, पिडल्या गेलेल्या माणसांची ही दुनिया आहे: इथे माणसे माणसे नसतात, संसार संसार नसतो, श्रद्धा–निष्ठा–नीती याचे शेण असते, जगणे असले तरी त्याला मूल्य नसते. जगण्यात, पोसता येणार नाहीत इतक्या पोरांची वीण वाढते, कर्जात कुजणे होते, शादी काय किंवा ताटी काय, दोहोंसाठी वर्गणी जमवावी लागते. कशातच काही नसते पण जगणे असते. ते अल्प असते. टाकता न येणारे असते; म्हणून चालू असते. भान मिळवीत, सुटत पुढे जात असते.

मात्र वंचितांची ही दुनिया पांढरपेशांच्या दृष्टीने निर्जीव मानली गेली असली तरी अधूनमधून गलबलून उठते. दंगे – हाणामाऱ्या – गोंधळ इत्यादींनी उसळून उठते. बळी पडतात, दिले जातात. साधीभोळी माणसे हिंसक होतात. गिधाडांचे भक्ष्य बनतात. उध्वस्त होतात. काही काळ हलकल्लोळ. शासनकर्त्यांची धावपळ, पक्षोपपक्षांचे रिंगण, विचारवंतांचे नक्राश्रू . . . गजबज . . . पुन्हा नेहमीचे जीवन. जुन्या मार्गाने पुढे चालू. चेहरा नसलेला हा एक थर.
दुसराही एक थर आहे: तो आहे 'बेतून दिलेले आयुष्य' धुडकावून देऊन स्वतःलाच रचीत जाणाऱ्या युयुत्सू माणसांचा. विझता विझता ती स्वतःला

---

२१. इंगळे वामन : साप्ताहिक 'अभिजात' : दि. ७–९–६९ : 'नाळ' : एक रसग्रहण

सावरताहेत, सावध होताहेत. कैकदा जगणे नको नकोसे वाटते, 'एकदाची कापावी नाळ' असे वाटते. वैताग येतो पण जगावे लागते. जगण्याच्या अर्थाशी वैतागाचा संबंध असतो. तो लागला नाही की मनात निरर्थकता साचते पण म्हणून काही जीवन संपविता येत नाही. ते जगावेच लागते. झूट बोलून ते सजवता येत नाही असे नाही, ह्यातभर पेटते निखारेच स्वागताला सिद्ध असल्याने जीवनाशी तडजोड करण्याकडे मोहरा वळतो; पण या कल्पनेनेही अंगावर फणसासारखे काटे फुटतात. शक्तीयुक्तीबुद्धीनुसार नव्या क्षितिजांच्या कडांकडे प्रस्थान ठेवताना रावता – खपता आयुष्य मेगबत्तीप्रमाणे विझवून घेतात. पाण्याखाली असलेल्या माणसाचे अधुरे–अपुरे रूप दिसत रहावे, मात्र माणसाची खात्री पटावी तसा हा थर.

अशी ही निर्बीज-बीजसमृद्ध, सामाजिक जीवनातील निम्नतर थरांची कथा बव्हंशी निर्घृण पातळीवरील ह्या बकाल जीवनाला फारसा सांस्कृतिक संदर्भ नाही. बंधने, नियम, निर्बंध वगैरेंचा फापटपसाराही नाही. आनंद नाही, खंत नाही. हर्ष नाही, खेद नाही. पांढरपेशांना या जीवनाबद्दल प्रसंगोपात खूप काहीसे विचित्र वाटते पण सारे विसरून, मागे सारून सहज लयकारीसारखे ते जगले जाते. खरे पाहता सामाजिक जीवनातील निम्नतर थरांपैकी निर्बीजांचा थर येतो आणि जातो. त्याचे कर्तृत्व येण्याजाण्यात काय सामावले असेल तेवढेच ! यापलीकडे वेगळे असे काही नाही. पण निर्बीजातील बीजसमृद्ध या निर्बीजांनाही हालवू पाहतात. उचलू मागतात. चैतन्याची धग देऊ पाहतात. प्रसंग येऊनही हल्लक बनत नाहीत. गोंडा घोळणारे हुजरे होत नाहीत; म्हणून वर्तमान नसणाऱ्या समाजाला भविष्य मिळते. त्याकरिता बीजसमृद्धांना निर्बीजांना पोटात घालून चालावे लागते.

नामदेव ढसाळ, हिं. गो. बनसोडे, वामन निंबाळकर, प्र. ई. सोनकांबळे सारखे काही त्याचेच प्रतिक होत: ती आयुष्यविषयक तत्त्वज्ञानाबरोबर सर्वदुःखसमावेशक जीवनासक्तीचे प्रखर भान घेऊन येतात. समाजच्या समाज उभा करतात. समाजसंचिताशी असणाऱ्या अतूट नात्याच्या साहचर्याचे अनेक पदर स्पष्ट होतात. सुर्वे त्यापैकीच एक. श्रमजीवींच्या मर्मबंधी आक्रंदनाचे शब्द अनुभवांकित करणाऱ्या सुर्व्यांच्या उभ्या कवितेला संबंध समाजजाणीवेची भक्कम बैठक आहे. सुर्वे सांगतात:

प्रत्येक रात्र आत्म्याशीं चर्चा करण्यांत घालविली एक आम्हींच असें निघालो;

बेईमान झालो नाहीं. [२२] या सांगण्या-बोलण्या-करण्यात रोखठोकपणा आहे. कुठे नाटकी उसासे नाहीत की भावनांचे रेशमी पोत चिवडीत बसण्याचा उपद्व्याप नाही. थोडाफार वैताग असला तरी तो क्षणकाळचा आहे, अनंत काळचा नाही. निराशा असली तरी ती नपुंसक नसून निर्मितीक्षम आहे. म्हणून ती काळोखाची कैदी नाही, अंधारयात्रेची प्रवासी नाही. सुर्व्यांच्या कवितेला काल्पनिक भूलभुलैय्यात रमता येत नाही. तिचा व्यवहार आणि प्रतिपादन चोख आहे. सुर्वे सांगतात:

आता आलोंच आहे जगांत, वावरतों आहें ह्या उघड्यानागड्या वास्तवांत
जगायलाच हवें; आपलेंसें करायलाच हवें; कधी दोन घेत; कधी दोन देत [२३]

खरे तर जीवनातील कटुता अपरिमित; पण दुःख-कटुतेच्या पाठीवर हात टाकून पुढे चालणे आहे. पळणे नाही. सुर्व्यांच्या कवितेतील अशी भेदक वास्तवता दूरवर पसरलेली समाजजीवनाची मुळे शोधते. कारण " सुर्वे यांची जीवनविषयक जाणीव खोल आहे,अनुभवाची व्याप्ती व्यापक आहे आणि आविष्कार पद्धतीही परिणामकारक आहे, याची प्रचीती त्यांच्या प्रत्येक कवितेतून येते. विषम समाजरचनेने आपल्या जीवनावर केलेले वार ते उघड्यावर मांडतात आणि वाचकाच्या मनात सध्याच्या सदोष समाजपद्धतीविषयी व सामाजिक परिस्थितीविषयी संताप निर्माण करतात. जीवनानुभवातून निघालेल्या खऱ्याखुऱ्या निष्कर्षांना एक प्रकारचे वजन, भारदस्तपणा व सामर्थ्य प्राप्त होत असते, ते निष्कर्ष सांगणाऱ्या शब्दांना आवेग व आवेश येत असतो. सुर्व्यांच्या कवितेत हा प्रत्यय जागोजाग येतो. " [२४] रॉक काव्हॉलिंचे हे मतप्रदर्शन कार्डधारक कम्युनिष्टाला साजेसे आहे हे खरेच आहे मात्र त्यांनी मांडलेले सुर्व्यांच्या कवितेचे रूपदर्शन बिनचूक नाही. आशय-गाभा बरोबर आहे हे मान्य व्हायला हरकत नसावी. सुर्व्यांच्या ठाशीव कवितेने श्रमजीवींच्या जीवनातील धगधगते वास्तव ठामपणे मांडले आहे. तिच्या आत्मविश्वासपूर्ण वाणीला आवेशाची बुलंद बैठक लाभली आहे. त्यामुळे कम्युनिस्टी आक्रस्ताळेपणाला तीत वाव आहे असे वाटणे स्वाभाविक आहे पण म्हणून तिला कलेच्या महिरपीतून प्रचारकी चौकटीत डांबून ठेवण्याचे कारण नाही. साम्यवादी तत्वज्ञानाशी असलेली जवळिक सुर्व्यांनी नाकारलेली नाही.

---

२२. माझे विद्यापीठ : नारायण सुर्वे : 'एक आम्हीं असे निघालो', पृ. २०

२३. माझे विद्यापीठ : नारायण सुर्वे : माझे विद्यापीठ : पृ. १६

२४. सोवियत देश : रॉक काव्हॉलो : 'माझे विद्यापीठ' (वाङ्मय समीक्षण) पृ. २९

असलेली आत्मीयता लपविलेली नाही पण त्याचा अर्थ सुर्व्यांनी कुणाचा केवळ प्रचाराचा गंडा बांधला आहे असा होत नाही. शब्दांच्या नक्षत्रापलिकडच्या दुनियेतील 'अंतरीची खूण' दाखविणाऱ्या जिवंत, सडसडीत, सडेतोड, अर्थस्वी कवितेला असा गंडादोरा बांधून चालत नाही, बांधता येत नाही. सुर्वे वर्गीय लक्षणा विशद करताना सांगतात: "कवी कोणत्या वर्गाचा हा गौण भाग आहे. मी कामगारवर्गातील असूनही मी असे सांगत आहे. कारण त्यामुळे कवितेला न्याय मिळत नाही. निव्वळ आगांतुक पुटें चढली जातात. तलवारीला प्रथम महत्त्व असते. म्हणून कविता कशी आहे, तिच्यात अभिजात गुण आहेत किंवा नाहीत हा विचार प्रथम लक्षात ठेवायला हवा... म्हणून कलेच्या वर्गीय लक्षणाचा मी नाकारतो आहे असा ह्याचा अर्थ नव्हे. प्रत्येक युगाला वर्गीय भूमिका होतीच. त्या त्या काळची कला त्या त्या युगाचा इतिहासच सांगते. तसे म्हटले तर आजही भाकरीच्या प्रश्नातून ( ह्यात इतर स्वातंत्र्येही आलीच. ) मुक्त होऊ इच्छिणारे व भाकरीच्या प्रश्नातून मुक्त झालेले असे सरळ सरळ कवींचे वर्गही दिसतातच की नाही ? मराठी कवितेतही ते आहेत. तरीही भाकरीचीच समस्या तेवढी खरी नाही. तर त्याही पलीकडे खूप गोष्टी आहेतच. ठरतातच .. तेव्हा माझा मुख्य मुद्दा हा नाही. कवितेला न्याय मिळावा हा आहे." [२५] सुर्व्यांचा हा दृष्टीकोन त्यांच्या समृद्धसंपन्न दृष्टीचा निदर्शक आहे: कामगारांच्या जगात वाढलेले सुर्वे तिथल्या सुखदुःखांचे चटके सहन करून परत जुन्या जखमाकडे पहावे तितक्या अलिप्त निर्विकारपणे रोजच्या ओंघळत्या रक्ताकडे पाहतात. कारण सामाजिक जीवनातील एका विशिष्ट कक्षेची सुर्व्यांची दृष्टी निगडित आहे 'ऐसा गा मी ब्रह्म' च्या प्रस्तावनेत वि. वा. शिरवाडकरांनी म्हटले आहे: "श्री नारायण सुर्वे हे कामगार जीवनाशी केवळ समरस झालेले नव्हे, तर ते जीवन प्रत्यक्षात अनुभवणारे कवी आहेत. आजवरचे आमचे साहित्य हे बव्हंशी पांढरपेशी वर्गातील लेखकांनी निर्माण केलेले आहे. 'सदाशिव पेठी साहित्य' ही डॉ. केतकरांनी वापरलेली संज्ञा अद्यापही सार्थ आहे. ही सदाशिव पेठ अर्थात् पुणे शहरापुरती मर्यादित नाही, ती सर्व महाराष्ट्र देशभर पसरलेली आहे. ती विशिष्ट जाती-पोटजातीपुरती संकुचित आहे असेही मानावयाचे कारण नाही. ती एक प्रवृत्ती आहे आणि ती सामाजिक जीवनाच्या प्रचलित व्यवस्थेतून उत्पन्न झालेली आहे. जातीभेदाच्या तटबंदीने एकूण समाज-जीवनाचे विविध स्वायत्त प्रांत निर्माण करून या प्रवृत्तीला फार मोठा हातभार लावलेला आहे: अनेक मर्यादांनी ग्रासलेल्या अशा वाङ्मयाला तोच तोचपणा

---

२५. 'प्रतिष्ठान' : डिसें, १९६६ : पृ. १७७

यावा, त्याच्या चतुःसीमांचा संकोच व्हावा मात नवल नाही. वाङ्मयनिर्मितीच्या सीमांसा कोणत्याही आणि कशाही असोत, त्याचा विस्तार वाढायला हवा, समाजाच्या सर्व विभागातून त्याचे पोषण व्हावे आणि जीवनाच्या साऱ्या सरहद्दी पर्यंत त्याचा संचार व्हावा, याबद्दल मला वाटते दुमत होऊ नये." [२६] त्यादृष्टीने नारायण सुर्वे हा अभिनंदनीय प्रयत्न आहे. साहजिकच कामगारांच्या जीवनातील गंधवेणा तळपती तलवार बनून सुर्वे मांडीत आहेत. त्यामुळे वेदनेला अर्थ येत आहे. भूमीच्या गर्भामधून बीज हुंकार देत आहे. तडकलेले मन एकसंध करण्याचा आणि उसवलेले धागे गुंफण्याचा प्रयत्न होत आहे. शब्द ओले–कोरडे कसेही असले तरी उफाळणाऱ्या आगीने नवे सृजन घडत आहे. सामान्य जनतेमधील या सृजनाच्या दिंडीचे नेतृत्व सुर्वे करू पहात आहेत. ते मुद्दाम ओरबाडून घ्यायला हवे असे नाही. तसे घेऊन कुठले नेतृत्व येतही नाही. निसर्ग–क्रमाने ते येत आहे. त्याचा स्वीकार होत आहे. तळपती तलवार अशा कामगारांच्या विश्वाचे नेतृत्व, त्यांच्यामधल्या सृजनाला हाक घालणाऱ्या कवीनेच करायला हवे.

मात्र त्यामागे त्या समान जनसमूहासाठी व्यापक सहानुभूती आहे. विश्वाचा आधार म्हणून ज्याचा आपण गौरव करतो तो हक्काच्या साध्या खोलीस लाचार असतो, हे सुर्वे यांच्या ध्यानी नाही असे नाही. 'युगस्वामी' त सुर्वे सांगतात की, दाही दिशांच्या खांबावरचा इमला आणि साध्या धरतीवरला जमीनजुमला आपलासा मानला तरी भविष्याचे पाखरू काळोखाचे कैदी बनलेले असते. श्रमणाऱ्यांच्या हाती असतो सूर्य, त्यांच्या सांगाती असतो तोही सूर्य. त्याच्या उदयास्तावर त्यांचा व्यवहार असतो. दुःखाचा भार सतत वहावा लागतो. कामगारांच्या जगात सगळा न्यायच उलटा आढळतो. चुकलेली टोके मिळविण्याचा आटापिटा चालतो. तरीही चांदण्याचा चारा, विजेचे लवणे–फुलणे काही थडत नाही. सारांश, चर्मचक्षूना दिसणारे तेवढेच कवी मांडून मोकळा होतो. नारायण सुर्वे यांच्या कवितेचे वैशिष्ट्य हे की, कामगार जीवनाचे खगोल सुर्वे यांनी त्यांच्याच डोळ्यांनी पाहिले आहे. कामगारांच्या जीवनाकाशातील बोल रागानुरागासह लोचनात साठविले आहेत. पोळलेल्या अंगाखांद्यावर मातेच्या

---

२६. ऐसा गा मी ब्रह्म : नारायण सुर्वे : प्रस्तावना : वि. वा. शिरवाडकर, पृ. ७

ओलाव्याने शीतलतेचा वर्षाव केला आहे. कामगारांच्या जीवनास पडलेले खळे दाखविण्याचा आणि मिटविण्याचा प्रयत्न आहे. त्यात चीड आहे, अन्यायाबद्दल तीव्र इशारा आहे, विषमतेविरुद्ध आक्रोश आहे. मात्र फार मोठ्या जाणीवपूर्वकतेमुळे या सर्वांबद्दल चीड असली तरी अंधा खेद नाही. सर्वांचा धिक्कार करण्यासाठी, विध्वंसन करण्यासाठी कामगार समर्थ आहे अशी सुर्वे यांची श्रद्धा आहे. त्यासाठी ' येत आहोत ', ' सज्ज आहोत ' असे घोषणांचे फलक हाती धरून इशारे होत आहेत.

कामगारांच्या दुनियेतील वैश्विक दुःख सुर्वे यांनी आपल्या घोटीव शब्दांतून साकार करण्याचा प्रयत्न केला आहे. युगधारेत चिंब न्हालेली ही दुनिया सतत अंतर्यामी जळणारी आहे. युद्ध न पेरता युद्धाच्या निर्मितीची आस बाळगणे आणि घाम गाळून त्यावर दान मिळवणे हा या दुनियेचा मंत्र आहे. तेथे सांजसकाळी पोटासाठी उभे रहावेच लागते. प्रचंड रणधुमाळीने जीवनाचे धुराडे होण्याचेच तेवढे बाकी उरते. पांढरपेशांना ही दुनिया अनोखी असते, झेपणारी नसते. ऐकीव असते. ' अमुची दुनिया ' मध्ये कवी या दुनियेतील धुमाळीचे वर्णन करीत आहे.

कधी शहराच्या रस्त्यावर
झेंड्यांचे झुलवित सागर
आम्ही काढितो भव्य जुलूस
सौख्याचे सजविण्या उरूस
बगलेत धुराडे दाबून
राजमुद्रा लढतो आम्ही
बलवानच ठरतो आम्ही
अशी गाजते रोज धुमाळी
अमुची दुनियाच निराळी

या दुनियेतील पिचलेल्या पददलितांचे जीवन गंजलेले असते. तारेवारेच मित्र असतात. दुःख गिळणारे हे पीडित नवे युग रचणारे असले तरी नव्या युगाचे स्वप्न त्यांनी भावी पिढ्यांसाठी राखून ठेवलेले असते. दारावर सोनेरी मनोरथ कधी येतील, जीवनाचा अवघा सुपंथ कधी दाखवतील, सोन्याचा उंबरा ओलांडून आपल्या घरी कधी जाता येईल हे त्यांना कधीच सांगता येत नाही. काकणांच्या गोड धुंदीत आणि भाकरीच्या दरवळणाऱ्या वासात (विशेषतः दुसऱ्यात अधिक) विचारांना पायवाट पकडता पकडताच नाकीनऊ येतात. कामगारांच्या जीवनाचे आभाळ जुनेच राहते, सुनेच होते. ' त्याने यावे ' मध्ये अशी हाक असते :

लखलखत्या पात्यांनी यावें
घरघरत्या जात्यानीं यावें
अणुअणूच्या कणाकणांतून
उसळत धुमसत पेटत यावे
जाळीत जावें; घडवीत यावें
संहारावें; उभवित यावें
विराट श्रमसूर्याच्या कक्षेंत
स्वतःस उजळीत मुक्त फिरावें[२८]

कामगारामधील सृजनात्मा जुलूम रगडीत जातो ,नवीन जग घडवीत येतो. याचा अर्थ असा नव्हे की, सुर्वे यांची कविता ही केवळ कामगाराशीच निगडित आहे. कामगाराशी ती जरूर निगडित आहे, परंतु अधिकतर ती त्यांच्या आंतरजीवनाशी-सृजनात्म्याशी-निगडित आहे; अवतीभवतीच्या परिसराशी संबंधित आहे. मुंबईचे प्रत्ययकारी वर्णन ती करते. नेहरू गेले त्या वेळेची गोष्ट ती सांगते. निष्ठेने जीवन जगणाऱ्या गणिकांच्या मोहल्ल्यातील 'पाणी घे' चा अर्थ ती समजावून देते. लालबागेचे रणकंदन ती उभे राहते. शहीदांचा ध्वज खांद्यांवर डौलाने नाचवते. या युगाचे सारे तुम्हा हाती, उठावे आता म्हणते. यामधून, नारायण सुर्वे नेमके काय पकडू पाहतात ? मला वाटते, या खचलेल्या जनसामान्यांच्या काळजातील आर्त स्वर ते टिपू पाहतात. हे टिपणे उघडेवाघडे आहे. सुबक नाही, विवस्त्र पांचालीसारखे ते व्यथित आहे. सुर्वे यांची ती बैठक आहे.

या बैठकीमागे कवितेची म्हणून काही ताकद आहे. सुर्व्यांनी ती जाणली आहे. सुर्वे सांगतात : " चांगली कविता ही त्याच्यामागे असलेल्या उद्ध्वस्त वा जिवंत मनाची मनोभूमिका असते. कविता हा वाङ्मयप्रकार काही ओळींचाच असला तरी त्या ओळी केव्हाही, कोणत्याही स्थळी मला स्फुरण देतात. सबंध जीवनाचे चित्रण कादंबरी (नाटकही) करते, परंतु संपूर्ण जीवनावरचे भाष्य कविताच करते." कवितेच्या या ताकदीच्या आधाराने पिचलेल्या साधारणांच्या काळजातील आर्त स्वर सुर्वे टिपू मागतात: वस्तुनिष्ठ चिंतन आणि गुणानुरूप अभिव्यक्ती सुर्व्यांना या स्वरांजवळ नेते.

मुंबईचे सारे जीवन इतके विविधलक्षी आणि विविधरंगी आहे की, त्याचे सौंदर्यरंग सुर्वे यांनी 'मुंबई' सारख्या कवितेत दाखविले आहेत. मुंबई ही कामगारमजुरांचे

---

२८. कित्ता : पृ. ६०

मायपोट आहे. सह्याद्रीचा घाट उतरून पटकूर खांद्यावर टाकून अनंतांचे श्रम या मायपोटात विसर्जित होतात. मुंबई म्हणजे महामोहिनी आहे. इथे अनेक जन्म होतात आणि अनेक मरणे मरून जातात. पगाराचा दिवस हा जन्माचा उत्सव असतो. अशाच एका कोंड्या अंधाऱ्या घरात कुठल्यातरी एका काळोख्या रात्री आपला जन्म झाला असे कवी सांगतो. हा जन्म वेदना देणारा तसाच वेदना सहन करायला शिकविणाराही आहे. कारण ज्या घरात जन्म झाला त्या घराला घरपण असे काहीही नव्हते. किंबहुना मुंबईचे जीवनच असे की कितीही पैसा मिळो कामगार–मजुरांच्या घरांना घरपणच मिळत नाही. घरपण न येण्याची कारणेही तशी ठरलेली असतातः एक तर दारिद्र्याने घातलेला भयाण वेढा, अज्ञानाचा भयंकर काळोख, त्यामुळे रंगमहाल ठरणारे रात्रसुख, त्यातून निर्माण होणारे पोरांचे लेंढार आणि कष्टी जीवनाची कुत्तरओढ; यामुळे घराचे सारे घरपणच हरवून जाते. नव्हे उभे राहिलेले घर आतून पोखरतही असते. कधी ढासळेल याची शाश्वती नसते. घराचा पिंजरा होतो. त्याला तुरुंगाचे रूप मिळते. गिरण्या, साचे धुराडी, कापसाचे बारीक पिंजण या साऱ्यामुळे या घराला क्षेत्राजागच्या रुग्णालयाचे रूप मिळते. त्यातील जिद्द अर्थातच संपलेली असते किंवा ताठा मिटलेला असतो असे नव्हे. पण आर्थिक पिळवणुकीने आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या अनंत विवंचनानी साऱ्या घराचेच धुराडे बनते. लोहार हातोड्याला घडवतो तसा माणूस इथे घडवला जातो. हक्कासाठी तो भांडतो. रस्त्यावर येतो. गर्जना करतो. त्रासनखात्यात किंवा अन्य खात्यात काम करता करताच दमेकरी बनतो आणि अखेर तेथेच देहही ठेवतो. हा क्षय, हा दमा आणि तुळतुळीत काळ्या पोटरीच्या तटतटीत स्नायूंच्या होणाऱ्या काड्या पाहून अनेकांना इथेच ढसढस फुटते. मुंबई सौंदर्यनगरी असली तरी घरचे रपाटे, बाहेरचे सपाटे खावेच लागतात. नरकासमान चाळीत राहण्याचा हक्कही कधी कधी हिरावून घेतला जातो. संस्कृतीचे वय वाढत असले तरी माणसाची उंची चढत–वाढत नाही. आणि नुसते माणसाचे वय वाढून चालत नाही तर संस्कृती वाढावी लागते. सुर्वे सांगतातः

> नरकासम चाळींत राहुनच स्वच्छ करतो तुझे रस्ते
> उठवले जातों कधीं, दंडुकेवाले जसे उठवतात फिरस्ते
> पुन्हा उचलतो संसार थाटतो दुज्या बाजूच्या खाचरात
> जगत आहोत ह्या संस्कृतीच्या सडत आलेल्या वारशात [२९]

ह्या सडलेल्या संस्कृतीच्या वारशात लक्षावधी नरनारींची आयुष्यें मेणबत्ती–

---

२९. माझे विद्यापीठ : नारायण सुर्वे : 'मुंबई' : पृ. ३५

प्रमाणे विझून जातात. खरे तर हे सारे मुसाफीर असतात. जायचे कुठे, जाणार कुठे ? शेवटी काय ? हे त्यांचे त्यांनाच माहीत नसते. तशा त्यांच्या समोर दोनच वाटा असतातः एक गिरणीची, कारखान्याची आणि दुसरी तिरडीची. हया वाटा त्याच्या जीवनाच्या घडणीत हरघडी संस्कार करीत जातात, हृदयांवर जखमा कोरीत राहतात. किनाऱ्यावरचे दिवे ताऱ्यासोबत मिणमिणतात; त्याप्रमाणे अवतीभवतीची माणसे एकलेपणात सोबत करून एकमेकांना धीर देतात, परंतु हा धीर देता- घेता छातीवर सहस्र घण कोसळतच असतात. वाघूट आठवून भोई चालावेत तसा माणूस सांभाळून चालतो आणि आयुष्याची कमाई शोधतो तेव्हा मुका होतो. काळोख कोरीत जीव जळत राहतो आणि चुलाण्यात लाकूड फटफटावे तसा आत्मा तडफडू लागतो. हृदयघट भरून येतो. तो कुठे रिता करावा याचा प्रश्न पडतो. स्फूर्तिशाली कविता हा आधार ठरतो. पण स्फूर्तिशाली कवितेने जीवन उभे राहत नाही. ते राहते त्यातील जीवनरसाने.

ओसंडु पहातो आहे हृदयघट; सांग कुठे करूं रिता
घडवुन गेला माझा बाप तुजसम स्फूर्तिशाली कविता[३०]

सामुळेच कवीचे पाय लालबागेकडे वळतात. लालबाग हे साम्यवाद्यांचे धारातीर्थ. त्यास तसेच महत्त्व आहे. अवघ्या मानवी समाजाच्या विषमतेवर, अन्यायावर, दारिद्र्यावर आणि अज्ञानावर हातोडा घालून त्या सर्वांचे बंध तोडणारा हा लालबाग. कामगार–मजुरांची ही रंगभूमी. दर्द देऊन झुंजणे, रस्त्यात फुलांच्या माळा शृंगारून मरणाला मारून धावणे हे लालबागचे वैशिष्ट्य. म्हणूनच कवी कैक शहीदांची ती कर्मभूमी आहे असे सांगतो. ' सदैव सज्ज बॅरीकेड लालबाग ' असेही तो म्हणतो. एका बाजूने यंत्राशी आणि दुसऱ्या बाजूने दुःखाशी लालबाग जोडला गेला आहे. मध्ये आहे तो मानवाचा पूल. अथांग पूल. तो अनेक अन्यायांचे निराकरण करतो; करवून घेण्याचा प्रयत्न करतो. मुंबई सौंदर्यवती तशीच वेदनावतीही आहे. तेच लालबागचे. तो पोलादी समशेर राहूनही मजूर कामगारांच्या जीवनाचा दर्दभरी आलेखही आहे. मुंबईतल्या या दर्दभरी जीवनाला पोटात घेऊन लालबाग मुंबई सांभाळतो आहे. लालबागेचे वैभव सांगताना कवीने ' उद्याच्या नभाचा लालबाग तारा ' आहे असे सांगितले आहेच, पण कैक ऋतूंचा ऋतुराजही तो आहे असेही त्याने म्हटले आहे. सौंदर्यसज्ज लालबागेचे वर्णन सुर्वे करतातः

---

३०. कित्ता : पृ. ३७

मुंबईच्या धमन्या मुठींत घेऊन
वेशीवर येतो रणगाडे घेऊन
पर्वतासम खडा ठाकतोस घेऊन
वीजेची पोलादी समशेर घेऊन[३१]

अशा ह्या मुंबईने जसा लालबाग सांभाळला आहे तशाच आणखी काही वसाहतीही सांभाळलेल्या आहेत. 'पाणी घे' किंवा 'पोस्टर' सारख्या कवितांमधून त्याचा निर्देश मिळतो. 'पाणी घे' ही कविता तशी साधीसुधी आहे. मुंबईच्या बकाल जीवनातल्या काही कप्प्यांची तोंडओळख करून घेण्याचा प्रयत्न केला की पहिल्यांदा डोळ्यासमोर येतो तो फोरास रोड. त्या फोरास रोडवरील हिरवे–तांबडे दिवे, सज्जासज्जा सजवत असलेल्या प्रमत्त–अप्रमत्त, तेजाळलेल्या–सुरुकुतलेल्या नारी, त्यांचे ते विटके संसार; चेहरे. बुटक्या काळोखात आणि उघड्यानागड्या वास्तवात चाललेला तो शृंगार; कधी संज्ञाहीन तर कधी संज्ञापूर्ण, पण बहुतांशी वांझच. पण या बुटक्या अंधाराखाली शरीराचा चाललेला हा विक्रा.पण त्यातही एक व्रत आहे, जोगियाची धून आहे. त्यामधील आर्त व्यथितपणा, खेदाची भावना, मेलेली शरम या सर्वांचे निदर्शन 'पाणी घे' म्हणण्यात आहे. एकीकडे गर्तीचा रंगमहाल सजत असताना दुसरीकडे देवदासींच्या बाजाराने उघड्या–वाघड्या जगाचे दर्शन होते आहे; असे हे दाहक रूप आहे. 'पाणी घे' मध्ये एका संकेताने ते चित्रित केले आहे.

'पाणी घे' ही देवदासींच्या जीवनातील एक रीत आहे. गिऱ्हाईक येते आणि जाते, भोगते आणि जाते, पण गिऱ्हाईकाच्या अंगमस्तीने गिरगिटलेले शरीर दुसऱ्या गिऱ्हाईकाच्या तसेच स्वाधीन न करणे हा 'पाणी घे' मधला संकेत आहे. मीलनाची वेला म्हणजे अस्वच्छ अंगाचा धुमाकूळ नव्हे. केवळ दिल लावून प्यार केल्याने स्वर्ग नजीक येत नाही तर त्यासाठी देवदासींच्या जीवनातही संकेताचा व्रतस्थ भाग असतो. 'पाणी घे' मध्ये तो आहे: 'पाणी घे' मध्ये या गणिकांची वॉस, एक गिऱ्हाईक जाते आणि दुसरे येते तेव्हा त्यांना ज्या अनेक सूचना करते त्यात प्रत्येक गिऱ्हाईकासाठी पाणी घेण्याची सूचना आहे. एका मुकादमाच्या नजरेखाली जो अनेक गणिकांनी व्यापार थाटला आहे त्याचे हे चित्र आहे. यात अनेकविध व्याप आहेत. अलबेल्या छलबेल्यांची रेलचेल आहे. मीलनाची वेला येऊन ठाकल्याबद्दल फुटणारे हर्षखेदाचे स्वर आहेत. अलबेल्या छलबेल्यांच्या रंगात दंग होत असताना खुडबुडणाऱ्या खोक्यामुळे येणारा व्यत्यय आहे. सज्जाखाली दुकाने थाटून असलेल्या बदमाशांची चाचेगिरी आहे. आगबोटवाला इंग्लिशचा राजा येतो तेव्हा त्याची ढोल मढोल बेंडबाज्या म्हणून केलेली टिंगल आहे आणि

३१. कित्ता : 'लालबाग' पृ. ५६

नव्या पोपटाला छू छू करून पडद्याआड नेण्याची रीतही आहे. यासाठीच छोकरीला, इंदीला आणि चिमणीला 'पाणी घे' अशी तातडी आहे. आजपर्यंत मराठी कथा–काव्यात देवदासी आली ती कारुण्यमूर्ती म्हणून. दयेने तिला आणले गेले. किंवहुना अशा कुणा उपेक्षितांना आणले गेले ते भूतदयेच्या भावनेनेच ! सुर्वे यांनी देवदासीला आणली ती माणूस म्हणून. ' नेहरू गेले त्या वेळची गोष्ट ' मध्ये हा माणूस अधिक स्पष्टतेने दिसतो. अशा वसाहतीत, नेहरू जातात तेव्हा जी गलबल उडते ती लक्षणीय आहे. नेहरू गेले त्याचे दुःख या ना त्या प्रमाणात सर्वांनाच झाले. परंतु मुंवईच्या त्या वसाहतीस झालेले दुःख हे अधिकच मनाला जाणवणारे आहे. प्रा. नरहर कुरंदकर लिहितात : " नेहरूंच्या मृत्यूची बातमी आली आणि कारखाने बंद झाले. जे आतापर्यंत स्तब्ध आणि सुस्त असे जग दिसत होते, ते एकदम व्याकूळ होऊन उठले आणि सगळीकडे हरताळ पडला. सुर्वे यांच्या कवितेत सूचकतेचे प्रमाण किती मोठे हे पाहण्याच्या दृष्टीने, आणि अनेक संदर्भ त्यांची कविता कसे लीलया स्पर्शून जाते हे पाहण्याच्या दृष्टीने एकदा ही कविता तपासली पाहिजे. आरंभालाच 'पाठी शेकवीत बसलेली घरे कलकलली' या शब्दात असणारा गोंधळ, आक्रोश आणि आर्तता, व्यथा यांचा समुच्चय पाहण्यासारखा आहे. ही घरे पाठी शेकवीत बसली होती. सुजाणपणे ऊन खात स्वस्थ करणारी, सुस्त, सुरक्षित मने, आणि पाठी शेकवीत बसलेली घरे हा संकरही पाहण्याजोगा आहे. एका बाजूला सुरक्षिततेच्या विश्वासाने चालू असलेली विश्रांती आणि दुसरीकडे अनपेक्षित आघातानंतर झालेला बोलका विषाद, यांच्या विसंवादाचेही चित्र आहे. हा नियतीचा निर्णय मान्य करणे सर्वांनाच भाग होते. हा आघात एकीकडे सुन्न करणारा होता, दुसरीकडे प्रतिकाराची सोयच नव्हती. पराभूत मनाने आले दुःख मान्य करण्याशिवाय गत्यंतर नव्हते. पुढच्या ओळी हा कल–कलाट शांततेत कसा क्रमाने बुडून गेला हे ते सांगतात. पाहता पाहता सारे शहर करडे होऊन गेले. यातील 'करडे' शब्दात असणारा फिकटपणाचा, कोरडेपणाचा समुच्चय पुनः विचारात घेतला पाहिजे. नंतर सारे शहर अंजिरी झाले. आणि पुढे काळोखाने माणिक गिळून टाकले. या साऱ्या अवस्था एकाच वेळी शहराच्याही आहेत आणि देशाच्याही आहेत, कविमित्राच्याही आहेत. सर्वांच्या समोर एकाएकी अंधार पसरल्यासारखा झाला. यानंतर सुतकीपणाचा प्रारंभ होतो. दगडी गाऊन घातलेले कारखाने विचारात बुडाले. येथील कारखान्यांना असणारे हृदयशून्य गाऊन आणि या हृदयशून्यांनाही विचारात बुडविण्याएवढा आघात पाहण्याजोगा आहे. यानंतर सगळेच ओळे खमीज खांद्यावर टाकून खुराडचाकडे वळले. हे खुराडचाकडे वळणारे दगडी कारखानेही आहेत. मजूरही आहेत. इथे प्रेतयात्रेतून ओलेत्याने शेवटचा निरोप घेऊन दहनानंतर परतणारे

अंतेवासीही आहेत. या दोन्हीचाही समन्वय 'ओले खमीस' या प्रतिमेने साधला आहे. जे पाठी शेकवीत बसले होते ते प्रथम करडे झाले. आता ओले खमीस ते खांद्यावर टाकून परतत आहेत. जणू प्रत्येकाच्या घरातील एक माणूस गत झालेला आहे. या भव्य दुःखाला अधिक गडद करणारी एक क्षुद्र पातळी आहे. ती क्षुद्र पातळी आज सुट्टी मिळाली या आनंदात बुडालेली आहे. एवढा मोठा आघात झाल्यावर सुद्धा माणसे या क्षुद्र पातळीवर का जातात? कवीच्या मनात हयाचा तिरस्कार नाही. यांनाही समजून घेण्याइतकी व्यापक सहानुभूती कवीजवळ आहे. कारण हे जग न संपणारा थकवा खांद्यावर घेऊन कायमचे उभे असणारे, शीण पेलणारे जग आहे. पाठी शेकवीत बसलेल्या घरांच्या शेजारीच आपला थकवा घेऊन तसेच रखडत उभे राहिलेले हे थकलेले जीवित आहे. या जीविताला खाटेवर कलण्याची या आघातामुळे संधी मिळाली. या सर्वांच्या मधोमध कवी उभा आहे. हा कलण्याचा भाग एकदा वरच्या 'कलकलण्या'शी जोडून पाहिला म्हणजे पाठी शेकणारे आणि शीण पेलणारे यांच्यातील काही संबंध दिसू लागतात. या वातावरणात कवीला कागदी खोळीत उजेड घेवून चाललेला हातगाडीवाला योगायोगाने भेटतो. हा योगायोगच म्हटला पाहिजे. कारण या वातावरणात जसा कागदी खोळीत उजेड घेऊन जाणारा भेटेल, तसा कागदी खोळीत अंधार घेऊन जाणाराही भेटेल. उजेड घेऊन जाणारा भेटला हा योगायोग, आणि 'वा! राव पुढे काळ दात विचकत असेल' असे तो म्हणाला, हाही योगायोग. पण या दोन्हीही योगायोगांनी त्या काळोखाला नवा अर्थ दिला आहे. हातगाडीला नवा अर्थ दिला आहे. सगळ्या घटनेलाच एक नवे परिमाण दिलेले आहे. सुर्व्यांच्या कवितेतील अनेकार्थता संपेल की काय, याबद्दल हळहळणाऱ्या मंडळींनी या कवितेतील एकएका शब्दामधून निर्माण होणारी अर्थाची वलये पाहून घेतली पाहिजेत."[३२] नेहरू गेल्यानंतर पाठी शेकवत बसलेली घरे कलकलली. शहर करडे होत गेले. रस्ते भयाण वाटले. त्याहूनही आता प्रकाश लोपला याचे दुःख अधिक आहे. युगंधर नेता मालवला याचे दुःख अधिक आहे. नेहरू गेल्यानंतर सहकाऱ्यांच्या जीवनात काय घडले, नेहरू गेल्यानंतर आंतरराष्ट्रीय जगात कोणत्या घडामोडी घडल्या, शत्रूमित्रांच्यामध्ये कोणत्या प्रतिक्रिया झाल्या याची नोंद इतिहास जरुर घेईल, पण तेच नेहरू गेल्यानंतर सामान्यातल्या सामान्य माणसातील मनःप्रवृत्तीवर कोणते परिणाम होत गेले, ज्या नेहरूंचे दर्शनही घडले नसेल असा हातगाडीवाला कसा गदगदला,

---

३२. प्रतिष्ठान : नरहर कुरुंदकर : डिसें, १९६६ : पृ. २२

प्रकाश लोपल्यामुळे पुढे दात विचकीत असलेल्या काळोखाचे सूत्र त्याने कसे पकडले, कारखाने धडाधड कसे मिटले, घराघरातून कलकल कशी उडाली आणि अधिकतर शरीराचा सोस सुंद्रीने एक दिवस कसा आवरला हे इतिहास काही नमूद करणार नाही. शक्यही नाही. त्याची जागा ललित साहित्य, पण तेही तसे अशा रेखांकनाला आतापर्यंत पारखेच राहिले. घडावे तेवढे ठळक रीतीचे काही घडले नव्हते. सुर्व्यांच्या कवितेने त्याची लक्षणीय सुरुवात केली. अतिशय सुंदर रीतीने सुर्वे सांगतात:

' क्या हुआ ए सुंद्रे ... ...! '
' आज लोबन मत जला! ... ... नेहरु गये! ! '
' सच; तो चलो आज छुट्टी! ... ... '
शीण पेलणारे जग खाटेवर कललें ' [३३]

मराठी कवितेला मिळालेली ही आगळी मिती आहे.

' पोष्टर ' हे असेच आणखी एक उदाहरण आहे. नेहरू गेल्यानंतर सामान्यांच्या जीवनात काय घडले ही एक साधी कथा, तशीच ' पोष्टर ' ही सुद्धा एक सहज कथा आहे. चार पोरे एकत्र येतात. पोट पेटू लागते म्हणून ते जाळण्यासाठी पोष्टर चिकटविण्याचा धंदा करतात. धंद्याची वेळ रात्र. नीरव शांत अशी ही वेळ. गप्पाटप्पांना ऊत यावा अशी वेळ. उखाळचापाखाळचा निघाव्यात आणि शिदळकी करावी अशी वेळ. पोरे नेमके हेच करतात. नव्या काळाची ही अपत्ये नुसती पोस्टर डकवीत नाहीत तर जीवनाचे पेंटिंगही करतात. शिद्याची बायको खळ कशी छान करते आणि इसल्याची माँ कडक कशी आहे, कुणाची मैना कुठे राहते आणि म्हणून कुठल्या खिडकीपाशी पोष्टर डकवायचे नसते, या गोष्टींची जशी चर्चा होते त्याचबरोबर गालिबची जिंदगी बरबाद करणारी गझलही त्यांना आठवते. मीटिंगचा कंटाळा आलेला असला तरी इसल्याच्या शादीप्रमाणे आपल्याही घरात एक दुल्हन येईल या कल्पनेने अंग मोहरते. पोष्टरमधील सगळेच भावना–विचार सामान्य थरांतील पोरांचे आहेत. त्यात फारशी सूक्ष्मता नसली तरी अनोखे असे त्याचे स्वरूप आहे. वस्तुतः भररात्री पोष्टर डकवताना गप्पा मारणे हाच या पोरांचा विरंगुळा; त्यात ती चार घरची चार पोरे; या विरंगुळ्यामध्ये भावना–विचारांची कोण चमत्कृती असते ! तिथे

---

३३. माझे विद्यापीठ : नारायण सुर्वे : ' नेहरू गेले त्या वेळची गोष्ट ' : पृ. १९

खाली पकपक नसते तर आयडियाच आयडिया असतात. खरे तर पोष्टर विनोदी नाही, ती कधीही न संपणाऱ्या दारिद्र्याची अर्थगहन कहाणी आहे. मानवी जीवनाचे विराट दुःख, त्याच्या जीवनाला वेढून असणारे दारिद्र्य, तरीही त्याच्या जीवनात फुलणारा उल्हास आणि निर्बीजतेमुळे येणारा विलक्षण थकवा इत्यादी अनेक गुंतागुंतीचे पदर तीत एकवटले आहेत. पोष्टर लावायला बाहेर पडलेली पोरे जीवनानंदाच्या खुषीत आहेत. एका बाजूने ती वैफल्यग्रस्त तर दुसऱ्या बाजूने ती उल्हाससंपन्न आहेत. दारिद्र्य त्यांच्या नशिबी आहे. त्याची आच त्यांच्या जीवनाला लागते. पण या खडूस दारिद्र्यावर त्यांची इतराजी नाही. ते गेले तर त्यांना नको आहे असे नाही. ते हवेच आहे. पण ही पोरे आपल्या दारिद्र्यावर कुथत बाहेर पडलेली नाहीत. एका अर्थाने सुर्व्यांच्या कविता या कथा आहेत. बीज कथेचे, रूप कवितेचे अशी तिची प्रकृती आहे. 'मुंबई', ' नेहरू गेले त्या वेळची गोष्ट ', ' पोष्टर' ही त्यांपैकीच काही कविताचित्रे होत.

या 'पोष्टर' संबंधी विवेचन करताना प्रा. नरहर कुरुंदकर यांनी सारांशाने लिहिले आहे: " त्यात कुणी शिंदे आहे, त्याच्या बायकोचा सद्‌गुण ती खळ चांगली करते हा आहे. एक इसल्या आहे. त्याची आई मोठी 'कडक बाई' आहे. आपल्या मुलांनी उडाणटप्पूपणा करावा असे तिला वाटत नाही. तिची नजर चुकवून तिच्या मुलाला बोलवावे लागते. दाराशी एक कुत्रेही आहे. या कुत्र्याच्या अंगावर पाय न पडता आलो हीच हुशारी, ज्या जगात खळ चांगली करता येणे हा स्त्रीत्वाचा विलोभनीय म्हणून सद्‌गुण आहे, त्या जगात डोळा चुकवून पळालो हीच कर्तबगारीची कथा राहणार. हा सगळाच पोस्टर चिकटवीत हिंडणाऱ्या दरिद्री जीवनाचा भाग आहे. पण त्यालाही विविध परिमाणे आहेत. प्रत्येकाची मैना त्याची त्याला प्यारी असते. तिच्याकडे इतरांचे लक्ष जाऊ नये, याची या मुलांना काळजी आहे. पोलीस हा त्यांच्या कायम शत्रुत्वाचा भाग आहे. त्याच्या डगल्यावर एखादे पोस्टर चिकटवावे काय हा विचार मनात येणे हा खोडकरपणाचा भाग. रात्र अशी जाते आणि जेव्हा जग जागे होत असते, झाडाची पाने सळसळत असतात, तेव्हा हे थकून घरी परत येतात. जेव्हा काळोख म्हातारा होऊन खुरडत असतो तेव्हा हे उत्साहाने ऊत जात असतात. जेव्हा पाने सळसळत असतात, तेव्हा हे थकून झोपण्याच्या अवस्थेत आलेले असतात. या जगाला राजकारणाविषयी आस्था किती आहे ? मुळीच नाही. तिकडे मीटिंग चालेल या सूचनेला उत्तर ' मला झोप येत आहे, मरो ती मीटिंग ' इतकेच आहे. सुर्व्यांची कविता प्रचाराला बांधलेली आहे, हे म्हणणाऱ्यांच्या नजरेतून अशी ठिकाणे सुटावीत हे स्वाभाविक आहे ! या जीवनात मरणे ही गंभीर

गोष्टच नाही. मरायचे असेल त्यांनी चटकन मरावे, ताबडतोब स्मशानात पोचवून उरलेले परततील आणि झोपी जातील. पण याही जगाला एक विरंगुळा आहे, एक स्वप्नरंजन आहे. त्यांनाही चंद्र पाहावासा वाटतो. गझला गाव्याशा वाटतात. वर्गणी जमवून का होईना पण इसल्याचे लग्न करण्यास सर्वांचा पाठिंबा आहे. कारण उद्या आपले लग्न होईल अशी अंधुक आशा आहे. आपल्याही दारात सनई वाजेल अशी आशा आहे. पण त्याबरोबरच घरच्या मंडळींच्याविषयी काही रोखठोक सद्भावना आहेत. बुढ्ढचासाठी चष्मा घ्यावा यावर एकमत होण्याइतकी कृतज्ञता अजून शिल्लक आहे आणि मग हे जग किती पुढे गेले याची जिज्ञासाही अजून जागी आहे. एका बाजूने पाहिले तर पोस्टर डकवीत जगणारे, पोस्टर चिकटविण्यात मरणारे असे हे एक क्षुद्र जग आहे. दुसऱ्या बाजूने पाहिले तर याही जगात चंद्राविषयी आस्था, बुढ्ढचाविषयी कृतज्ञता आणि संसाराविषयी आशा शिल्लक ठेवणारे हे एक चिवट आणि जिद्दीचे जग आहे. ज्या क्षणी एखादा रोगच सगळे शरीर सूज आल्यामुळे बाळसे दाखवू लागतो त्या वेळी दर्शन जसे चमत्कारिक घडते तसा या कवितेचा प्रकार आहे. या कवितेत हसणे, खिदळणे, उल्हास, स्वप्नरंजन या सगळ्याच बाबी कायमं व्यर्थेच्या गटारात पुन्हा पुन्हा उगवणाऱ्या बुडबुड्यांसारख्या एका बाजूने दिसतात. दुसऱ्या बाजूने काही बुडबुड्यांवर इंद्रधनुष्याचे काही रंग उमटलेले दिसतात. अशा कथा सुर्व्यांच्या कवितेत सारख्या पसरलेल्या आहेत. या कथांमध्ये 'माझे विद्यापीठ' हीच एक प्रदीर्घ कथा आहे. सुर्व्यांच्या कवितेतील सगळे सामर्थ्य अशा वेळी उचंबळून येते आणि त्यांचा साधासुधा शब्द एकाच वेळी अर्थघन होऊ लागतो. उत्कट होऊ लागतो. "[३४] ही सघनता सुर्वे यांच्या बहुतांशी सर्वच सामाजिक कवितेत दिसते. त्या दृष्टीने सुर्वे यांची अमूक एक कविता सामाजिक आहे आणि अमूक एक कविता सामाजिक नाही असे म्हणणेच चुकीचे आहे. कारण सामाजिक बैठकीशिवाय मुळी हलायचेच नाही अशी सुर्व्यांच्या कवितेची प्रकृती आहे. आधुनिक युगाने प्रामुख्याने विचार केला तो सामान्य माणसाचा. सामान्य माणसाच्या अवतीभोवती या जगातील सारी तत्त्वज्ञाने, या जगातील सारे प्रयत्न घोटाळत राहिले आहेत. असामान्यांच्या मानाने या सामान्यांचे दुःख कदाचित क्षुद्रही असेल, परंतु सामान्यांचेही एक जग असते. ते लहान मोठे कसेही असले तरी असते. जगावे की मरावे हा प्रश्न हॅम्लेटलाच पडत नाही. सामान्यातल्या सामान्यालाही पडतो. साहजिकच अशा सामान्य माणसासंबंधी, सामान्यातील एक नारायण सुर्वे यांनी आपल्या कवितांमधून आधिक्याने लिहिले आहे. त्याचे आकर्षण वाटायला लावले आहे. "जे कोणत्या ना कोणत्या

---

३४. प्रतिष्ठान : नरहर कुरुंदकर : 'नारायण सुर्वे यांची कविता' पृ. ३५

दृष्टीने असामान्य आहे, त्याचे आकर्षण जगाला वाटावे हे स्वाभाविकच आहे. पण ज्याला आपण जीवन म्हणतो त्यात अधिक भाग कुणाचा असतो? मूठभर असामान्यांचा की शेकडा नव्वद किंबहुना शेकडा नव्याण्णव असलेल्या सामान्यांचा? जगातले सर्व लोक सुखी व्हावेत असे आपण उद्‌गार काढतो, तेव्हा कुणाच्या सुखाच्या कल्पना आपल्या डोळ्यापुढे असतात? आजपर्यंत राजांनी, वीरांनी, संतांनी, तत्त्वज्ञानी, कवींनी आणि शास्त्रज्ञांनी या सामान्य मनुष्याला फारसे बोलू दिले नाही. कुणी त्याची वकिली केली, कुणी कत्तल केली, कुणी त्याच्यातला देव जागृत करण्याचा प्रयत्न केला, कुणी त्याच्या मनाचे पृथक्करण करून तो पशूच राहणार असे भविष्य वर्तविले. सामान्यांच्या कर्तृत्वाचा त्याला अनेक वेळा फायदा मिळाला, पण त्याचबरोबर त्यांच्या संघर्षात त्याची वारंवार ससेहोलपटही झाली. कुठलाही मुखवटा न चढविता जगापुढे उभे राहण्याची संधी, आपले मनोगत मोकळेपणाने बोलून दाखविण्याची संधी, हा या शतकाचा त्याला फायदा मिळाला "[३५] या सामान्य माणसाची आकांक्षा, कामगार परिस्थितीतून सुर्वे यांनी रंगविली आहे. एका अर्थाने विसाव्या शतकातील सामान्य माणसासंबंधीचा मंत्र सुर्वे यांनी जागवलेला आहे. 'बरं का रे पोरा' मध्ये मे दिनाच्या आठवणीने बापाचा ऊर भरून येतो. उद्याच्या जगातील स्वप्ने रंगविताना उगीचच चाळीकडे पाहून अंग मोहरून येते, ते अशा आकांक्षी मनाचे चित्रण करण्यासाठीच. सामान्यांच्या जीवनातले हे कारूण्य, ही कणव आणि कधी तरी, केव्हा तरी अंग भरून टाकणारी वृत्ती 'बरं का रे पोरा' मध्ये सुर्वे मोठ्या दमदारपणे सांगतात. अंधारावरून लवलवत जाणारा रक्ताचा ओघळ दाखवितात. करकचून पोते आवळावे तसे शरीर आवळणारी अवस्थाही सांगतात. तेव्हा नुसत पोरच व्याकूळ होत नाही तर वाचणाराही व्यथित होतो. सुर्वे लिहितात:

" हा-तर पुढे होतों मी समुद्र घेऊन माणसांचा
बरं कां रे पोरा; पुढे निघालों,
चाळीकडुन वळलों; तेव्हां उभी होती दारांत
उगीचच मोहरलों मनांत
चाळकरी कुजबुजले आपसांत ... ...
'तो बघा आत्म्याचा बापुस-फुडारी'
बरं कां रे पोरा –
" वाढत गेलों महासागर झालों

---

३५. खांडेकर वि. स. : अश्रु : प्रस्तावना: पृ. ३२२

आकाशाला रुपलो
बरं कां रे पोरा, कळसांना खुपलो [३६]

असे समाज दर्शन 'असा कसा दगड झालो' मध्येही दिसते. आधुनिक जीवनाने पुढे मांडलेली परिस्थिती आणि मुलांच्यासंबंधी निर्माण झालेली कर्तव्यविन्मुखता यामुळे दगड बनलेले मन, परिस्थिती थोडीशी सैल झाल्याने त्या दगडालाही फुटलेला पाझर यातून आर्थिक विषमतेवर अचूक बोट ठेवले आहे. 'असा कसा दगड झालो' मध्ये त्याचे मर्मस्पर्शी चित्र आहे. पिशाच्च होऊन तडाखे हाणीत जाणारा हा बाप 'असा कसा दगड झालो' मध्ये शेवटी कळकळून म्हणतो :

असा कसा दगड झालों ... ... ...
दगड झाले डोळे
विसरलों पोटचे गोळे.
'पोरं पोसतां येत नाही, तर बाप कशाला झालात ?'
शब्द कोसळले.
माझ्याकडेच दया मागणारे माझेच चिमुकले हात
भाविक भोळे !
असा कसा दगड झालों;
दगडच झालों ! [३७]

अशी ही हादरून टाकणारी सुर्व्यांची हरहुन्नरी सामाजिक कविता हरहुन्नरी सामाजिक परिस्थितीने निर्माण केलेली आहे: या परिस्थितीत शब्दही जगवता येत नाहीत. अब्रूदारांच्या जगात म्हणून वावरायला जावे तर बेअब्रू व्हावी अशी स्थिती आहे. माझे घर शोधण्याचा, माझे म्हणून स्वत:चे घर उभे करण्याचा सामान्यांचा प्रयत्न आहे. उरात वेदना जपून जगात वावरण्याचा प्रयत्न आहे. केव्हा तरी, कधी तरी, जखमींना कायमचा दवा मिळेल अशी आशा आहे. बंद दारादारांतून आपली कहाणी कळावी अशी अपेक्षा आहे. बेतलेल्या आयुष्याचा, बेतलेल्या प्रकाशाचा, बेतलेल्या बोलण्याचा, बेतलेल्या जगण्याचा आणि बेतलेल्याच रस्त्याने गेले तर स्वर्ग मिळण्याच्या या सर्वच गोष्टींचा कवी धिक्कार करतो आहे. तो 'थू:' म्हणून त्यांच्यावर थुंकतो आहे. मात्र सामान्यांचे हृदय फुलविणारा, त्यांचा

---

३६. माझे विद्यापीठ : नारायण सुर्वे : 'बरं कां रे पोरा !': पृ. ३०

३७. कित्ता : 'असा कसा दगड झालो': पृ. ३३

कोंडमारा नाहीसा करणारा समर्थ नायक हवा अशी इच्छाही आहे. त्यासाठी फाटके नेसून सुद्धा मधुघट ज़ोपासावेत अशी सांगी आहे. खऱ्या अर्थाने हा सामान्य माणूस कर्जपुत्र आहे. 'पॅरिसची संध्याकाळ' या कर्जपुत्राला भुलवते. परंतु शेवटी पॅरिसच्या संध्याकाळपेक्षा गोलपीठ्यावरची संध्याकाळच त्याला अधिक प्रिय आहे. पॅरिसची संध्याकाळ गोलपीठ्यावरच उगवेल, अशी तो आकांक्षा धरतो आणि उगवलीच नाही तर विघडले कोठे? असा काहीसा आशायुक्त निश्चित प्रश्नही करतो. 'असेल नसेल' मध्ये सुर्वे सांगतात. :

पॅरिसची संध्याकाळ
धुवट चादर वापरीत असेल
कदाचित इथे तिही नसेल ?[३८].

असा हा कर्जपुत्र आशावादी आहे. विज्ञता विज्ञता स्वतःला सावरणारा आहे. कर्जातच जन्मणे आणि कर्जातच मरणे असे जगण्याचे वांधे झाले आणि वर्गणीच्या ताटीवरच गुंडाळून जाण्याचे ठरले तरी हा कर्जपुत्र आपले अस्तित्व नाकारीत नाही. दररोज स्वतःला धीर देत जगणे कठीण होत असूनही न जगण्याची इच्छा बाळगीत नाही. उलट जगण्याची शक्ती वाढते. जगणे कठीण होत असूनही हे घडते.

सुर्व्यांची कविता, जे वाटयाला आले, पाहिले–साहिले ते पचवून; जागत्या डोळ्यांनी कसनिकस शोधून, संयमाने सारे शब्दांकित करीत आहे. अनुभवांचा सच्चेपणा आणि त्यांच्या अभिव्यक्तीमधील, खरे पाहता पाळता येण्यास अत्यंत अवघड असा संयम हा सुर्व्यांच्या कवितेचा विशेष आहे. सुर्वे माणसाच्या जीवनातील कारूण्य आणि माणूस व यंत्र यांच्यामधील कोमल नात्याचा हलकेच मागोवा घेतात. मागोवा परिस्थितीचा असतो तसा दिशेचाही असतो. म. ल. वराडपांडे यांनी " किंवहुना उडणाऱ्या नाडीच्या जागत्या घंटारवाच्या पार्श्वभूमीवर माणूस आणि यंत्र यांच्यातील कोमल नात्याचा मागोवा घेणारा मायबोलीतला हा पहिलाच कवी आहे " असे सांगितले आहे.[३९] सुर्वे कामगारवस्तीतल्या सामान्य माणसांच्या वस्त्या–वाडचापाडयातील–वेदना, दुःख, व्यथा, खुरडती भावना चित्रित करीत आले आहेत. सर्वसामान्य मध्यमवर्गाहून हे वेगळे आहे, निराळे,

---

३८. किता : 'असेल–नसेल' : पृ. ६१

३९. तरूण भारत : म. ल. वराडपांडे : 'माझे विद्यापीठ' (परीक्षण) : ५ जून, १९६७

रसरशीतही आहे. पण म्हणून कामगारवर्गाची ती वर्गीय अभिव्यक्ती आहे असे म्हणणे बरोबर नाही. सुर्व्यांनी निष्ठा म्हणून बाळगलेल्या आणि भाष्यकारांनी त्यादृष्टीने दृष्टीक्षेप केलेल्या दृष्टीकोनाचा तो काहीसा अपरिहार्य परिणाम नाहीच असे नव्हे. हेतुने पाहिले असता काहीच नसताना खूप काहीबाही दिसते, ही माणसाची प्रवृत्ती आहे. सुर्व्यांच्या कवितेत सामाजिक जाणिवेचा, दारिद्र्य–अज्ञानाचा, विषमतेचा वाजवी अभिनिवेश आहे. त्यामागे निष्ठांची आच असली तरी त्याहूनही माणूसधर्माच्या प्रतीतीचे जागरण अधिक आहे. कुठल्या पक्षाच्या लेबलाखाली ते दबले–दडपले गेलेले नाही. म्हणून कविता हीणकस नाही. ठरत नाही. निर्जीव कलाबतूच्या मखरात मढवून ठेवलेली गोष्ट हीणकस ठरते. बदलून वैभव मिरवता येते : सुर्व्यांच्या कवितेत आरपार विचारांची धार किंवा सूक्ष्म भावनेचा झंझावात नसला तरी ती वेगळेपण सिद्ध करून जाते. सुर्व्यांची स्थानान्तर गात्री प्रवृत्ती दाही दिशा पसरू पाहील तसतसे तिचे वेगळेपणही वेगवेगळ्या क्षितिजांना भिडून जाईल. असे असूनही विकासाच्या दृष्टीने सुर्व्यांच्या कवितेने अंतर्मुख होणे इष्ट आहे. सुर्व्यांची कविता ढोबळ चित्रणाने आज उभारी घेत आहे. मात्र सामान्यांच्या पदरातील निखाऱ्यांच्या आणि मनाच्या शवच्छेदनाच्या दर्शनापासून ती तशी दूरच आहे. सामान्यांचा देह तिच्यामधून अभिव्यक्त होत असला, स्थूल मन प्रकट होत असले तरी त्याच्या अनंत पातळ्या तिला अजून अज्ञातच आहेत. खेरीज ललित साहित्यात सामाजिकता आहे की नाही, असल्यास किती आहे हा काही साहित्याच्या मूल्यमापनात विशेष महत्त्वाचा प्रश्न नाही. त्याचे म्हणून स्थान असले तरी सामाजिकतेने संपृक्त कलात्मकता किती सखोल हे अतीव महत्त्वाचे आहे. ते नाकारण्याचे प्रयोजन नाही. राजकीय प्रक्षोभाच्या बाबतीत अटीतटीची भूमिका शक्य आहे, पण साहित्याच्या संदर्भात तशा हठाग्रहाचा उपयोग काय ? दलित साहित्याच्या बाबतीत, या संदर्भातील अनाठायी आग्रह ध्यानात घेतला की, अटीतटीच्या भूमिकेतील वैय्यर्थ्य ध्यानात येते. सुर्व्यांच्या कवितेच्या बाबतीतही हे ध्यानात घेतले पाहिजे.

सुर्व्यांनी विचारले आहे: " माझी कविता ही निव्वळ कविता म्हणून तपासली जाणार कधी ? स्वतःच्या फूटपट्ट्या लावून कविता मापण्याचा सस्ता धंदा मराठी कवितेचे समीक्षक, टीकाकार सोडणार कधी? "[४०] सुर्व्यांची ही वृत्ती

---

४०. मनोहर: श्री. भा. महाबळ: ' नारायण सुर्वेची गोष्ट': फेब्रु ' १९६८

त्यांना वाढवणारी आहे, उंच करणारी आहे. सुर्व्यांना त्यांचे स्वतःचे विद्यापीठ गवसले आहे, पण त्यांना त्यामधील आत्म्याला अद्याप गवसणी घालता आलेली नाही. अंतर्मुखवृत्ती ते करू शकेल, ब्रह्म पकडू शकेल आणि विद्यापीठ समृद्ध, स [illegible] शकेल.

ग्रेस यांचा ' संध्याकाळच्या कविता ' हा पहिलाच कवितासंग्रह आहे.

या संग्रहाच्या मलपृष्ठावर या कवितेचे स्वरूपवर्णन असे केले आहे: '' 'संध्याकाळच्या कविता ' त अनंत संध्यावेळा एकवटल्या आहेत. सगळचा वेळांची मिळूनच झाली आहे एक दीर्घ संध्याकाळ. प्रकाशाचा मृत्यू होत असताना सृष्टीवर दाटून आलेले गहन आणि गहिरे औदासीन्य, दूर दूर पसरत गेलेली जडता, स्तब्धता आणि निःशब्द एकटेपण, या एकाकीपणात जाणवणारे, चिरंतन सोबत करणारे गूढ पण उदात्त दुःख आणि अशा दुःखातच पटणारी त्या अद्‌भूत शक्तीच्या अस्तित्वाची ओळख. त्या अद्‌भूत शक्तीचे अवतरण संध्याकाळी साऱ्या सृष्टीमध्ये होते आणि अशाच वेळी ग्रेसचा आत्मा जागा होऊ लागतो. तिथे बाहेर आणि इथे आत एक विलक्षण समाधी अवस्था निर्माण होते. बाहेरची उदास गूढ चित्रे आतमधला अर्थ खेचून घेतात– एका उत्कट, अधीर प्रतिक्षेचाच भाग बनतात. संध्याकाळच्या

## सात संध्याकाळ : ग्रेसच्या कवितेचे गोत्र

धूसर वातावरणात ग्रेसचे दुःख फिरून फिरून जन्म घेते. संध्याकाळीच ही वेदना पुनः पुन्हा जागी होते, कारण याचवेळी -- फक्त याचवेळी – आत्मा एकटा एकटा होतो. याचवेळी तो स्वतःतून वाहणाऱ्या उगमापर्यंत जाऊ शकतो. प्रत्येक अनुभूतीतून, प्रत्येक आठवणीतून, अस्तित्वाच्या प्रत्येक कणाकणातून तिथे पोचण्याची तळमळ एक आर्त परंतु मूक हाक मारते ती फक्त संध्याकाळीच. म्हणूनच या संध्याकाळच्या कविता.'' 'संध्याकाळच्या कविता' या काव्यसंग्रहातील कविता 'आषाढवन', 'चंद्रधून', 'मरणगंध', आणि 'स्मरणगंध' अशा चार गटात वभागली आहे; विभागून देण्यात आली आहे. त्या सगळ्या कवितांची मिळून

१. झाली आहे एक दीर्घ संध्याकाळ. त्यामध्ये जाणवते आहे एकटेपण-एकाकीपण

२. या एकाकीपणाची चिरंतन सोवत करते आहे गूढ प ण उदात्त दुःख

३. त्यातून पटते आहे त्या अद्‌भुत शक्तीच्या अस्तित्वाची ओळख

या साऱ्या क्रिया–प्रतिक्रियात कवीच्या मनाला येते 'पिसेपण'; या पिसेपणात ते पार–पार बुडून जाते. डुबून जाते; आणि मूक हाक मारीत राहते; तळमळीने; आर्त अशी. त्यामुळे 'ईश्वरी करूणांची स्तोत्रे' म्हणणाऱ्या कवीच्या अंगामानाला विलक्षण आर्त व्याकुळता येते; आख्ख्या कवितेतून धूसर संधि प्रकाशासारखे अनुभवविश्व प्रकट होते.

'संध्याकाळच्या कविता' सुटचा सुटचा असल्या तरी त्यांची एक दीर्घ संध्याकाळ बनून राहते, किंवा असेही म्हणता येईल की, लोंबणाऱ्या धुक्यासारखी जाणवणारी लांब लांब संध्याकाळ संध्याकाळच्या कवितांच्या लहानसान आकृत्यांतून उमटते. क्रिया कशीही असली तरी ती एक दीर्घ संध्याकाळ असते. ती कवीच्या मनाला भावते–सर्वांहून अधिक भावते, सर्वांहून ती अधिक उमज देते. उचका देते. इतर कुठल्याही वेळेपेक्षा 'संध्याकाळ' कवीला प्रिय राहते; कवी तिच्यात 'काळाचे दर्शन' घेतो. त्यात त्याला 'कालयवना' चे सर्वाधिक भान मिळते. प्रभातकाळची आस असणाऱ्या कवीला 'संध्याकाळ' मोहविते. इतर काळाला बाजूला टाकून संध्याकाळ कवीच्या जीवन–दर्शनाची अतूट घटक बनते. त्यासाठी दोन डोळे, दोन हात, दोन पाय इत्यादी परिमित अवयव अपुरे ठरतात, वाटतात. मग कवीला नकळत वाटते, सर्वांगाला बोटे फुटावीत आणि संध्याकाळ चुंबून घ्यावी ! संध्याकाळसंबंधी कवीची ही आंतरिक भावना आहेः कुणाला रूचण्या न रूचण्याचा प्रश्नच नाही; त्याची ती प्रामाणिक भावना आहे.

– पण संध्याकाळचे दर्शन–वर्णन या गुंतलेल्या भावनेपोटीचे नाही. एवढेच नाही. कवीच्या जीवनाची सखी म्हणून संध्याकाळ येते. नव्हे कवीचे जीवन हेच संध्याकाळ बनून राहते. किंवा असेही म्हणता येईल की, इतर कुठल्याही वेळेपेक्षा संध्याकाळमध्ये कवीला जीवन उभे असल्याचे दिसते. तरळत–विहरत असल्याचे आढळते. त्याचे जीवन हे दर्पण बनते, देहाचे साधनासारखे उपयोजन होते, आणि अद्भूतशक्तीच्या अस्तित्वाची ओळख पटते. कवीच्या जीवनात 'संध्याकाळ' खोल मुद्रा उमटविते, जीवन तदात्म करते आणि जीवनाचे सम्यक् रूप न्याहाळायला साहाय्य देते.

वस्तुतः संध्याकाळ ही दिवसाची आंधळी अवस्था होय. मरगळलेल्या उदासवाण्या वृत्तीचे संध्याकाळला वेड अधिक असते. काळवेळेच्या उदासीन सावल्यात वाढणारी संध्याकाळची कविता एकमेकात गुरफटून आत्ममग्नतेने एकमेकातून उगवते. सकाळ, दुपार प्रमाणेच संध्याकाळ ही एक स्थितीगती. मानवी जीवनात अपरिहार्यपणे येणारी. दिसणारे दृष्टीआड नेणारी. उदासत्या वातावरणात मरगळलेल्या मना-जीवाला चैतन्य देणारी. पण मरगळ उदासता-अबोधता इत्यादींनी जडावलेली. या जडावलेपणात 'नको, पुरे झालं आता हे. थांबू या इथंच. थांबविण्यापेक्षा सहजीच थांबलं तर बरं– खूपखूप बरं.' अशी एका बाजूने तर दुसऱ्या बाजूने, 'छे! उद्या खूप आहे. थांबण्यात रस नाही. जरा उद्यापर्यंत बघू या. घाई तरी कशाला?' असा सूर जपणारी संध्याकाळ आहे. मात्र बहुतांशी संध्यावेळा भिवविणाऱ्या, जीवनावरची आसक्ती धुत्कारून देणाऱ्या, जीवनातला रस–रंग–गंध–रूप यांना उणेपण देऊ पाहणाऱ्या. तशा वाटणाऱ्या. संध्याकाळचा हा धर्म, हा स्वभाव आहे. चांदण्या रात्री लांब लांब होत जाणाऱ्या सावल्यांनी, त्यांच्या वेड्याविद्र्या आकारप्रकारांनी मनाने धसका घ्यावा, मन लबलबत रहावे; 'काय? कसे?' अशी मनाची पाल घाबरतघुबरत चुकचुकावी; काय खरे? काय खोटे हेच कळू नये; कळले, जाणले असे वाटावे; तो अस्पष्ट धूसर व्हावे. साचलेल्या धुक्यातून पुढे सरताना विरळ विरळ रेषा–रूप दिसावे; तसे व्हावे– अशी ही संध्याकाळ. 'सायंकाळच्या कविता' सुट्या सुट्या आलेल्या तरी त्यातून एक दीर्घ सायंकाळ बनलेली. त्यादृष्टीने तिला तशी स्पष्टता, काहीसा रेखीवपणा आल्यासारखा दिसणारा. पण ते खरे–खोटे काहीच नव्हे. उदास काळ जाणवावा ही संध्याकाळची फलश्रुती. अर्थात् अगदी साऱ्यांच्याच बाबतीत ती खरी असे नव्हे; मनोवृत्ती आणि भावस्थिती ही वेगवेगळीही असू शकतील; अगदी अपरिहार्य संबंध–नाते असते, असावे, असले पाहिजे असे काहीच नाही. पण

ग्रेसच्या संदर्भात ते आहे. दिवसाच्या अवस्था अनेक; पण ग्रेसला त्यांचे आवाहन मिळत नाही. निदान इथेतरी नाही. मिळते ते संध्याकाळचे. 'संध्याकाळच्या कविता' च्या 'ब्लर्फ' मध्ये म्हटले आहे, "संध्याकाळच्या धूसर वातावरणात ग्रेसचे दुःख फिरून फिरून जन्म घेते. संध्याकाळीच ही वेदना पुनः पुन्हा जागी होते, कारण याच वेळी– फक्त याच वेळी आत्मा एकटा एकटा होतो. याचवेळी तो स्वतःतून वाहणाऱ्या प्रवाहाच्या उगमापर्यंत जाऊ शकतो. प्रत्येक अनुभूतीतून, प्रत्येक आठवणीतून, अस्तित्वाच्या प्रत्येक कणाकणातून तिथे पोचण्याची तळमळ एक आर्त परंतु मूक हाक मारते ती फक्त संध्याकाळीच." ग्रेसच्या मनाला संध्याकाळचे असीम, अपार–अपार आकर्षण आहे. संध्याकाळ हे ग्रेसचे आणि त्याच्या कवितेचे प्रतिक रूप आहे. संध्याकाळच्या उदासवाण्या रागात ग्रेससकट ग्रेसच्या कवितेचे गोत्र आहे.

'संध्याकाळच्या कविता' मधील 'संध्याकाळ'– अनेक एकवटलेल्या संध्याकाळ– ही कवीची मनोवृत्ती आहे. संध्याकाळचा उदासवाणा रंग लेऊनच ती सजलेली नाही; धूसरतेनेच रंगलेली नाही तर चिंतनशीलतेच्या स्पर्शाने तो नियळून गेली आहे. त्यामध्ये तरलपणा आहे आणि अनुपम संवेदनशीलताही आहे. याचबरोबर 'समृद्ध' जीवनाला 'कसर' लावणाऱ्या संध्याकाळच्या विद्रूप आचारावद्दल राग आहे. पण संध्याकाळ प्रभातकाळ गिळून उभी असल्याने या रागालोभाला महत्त्व नाही, मूल्य नाही, किंमत नाही; याची जाणीवही आहे. या जाणीवेनेच मूळातल्या उदासीनतेत विकलतेची, हताशतेची भर टाकली आहे. तीव्र संवेदनशीलता, सूक्ष्म चिंतनशीलता, उदासीनता आणि विकलता यांच्या उभ्याआडव्या धाग्यांनी 'संध्याकाळ' ला गडद–गहिरे रूप आले आहे : ते थंड नाही, सरळ नाही, शांत नाही. त्याचा अनिमिष नेत्रांनी प्रश्न आहे : तुझ्या अस्तित्वाचे – 'असतेपणा' चे – मूल्य काय ? तुझे अस्तित्व म्हणजे नेमके काय ? नेमके काय ? संध्याकाळच्या उदासीनतेत, अशा प्रश्नोपनिषदांची चक्रगती घोंगावली की, संध्याकाळचकट जीवन आंधळे होते. असते तेही नसते होते असे वाटते. नसते त्याचा असल्याशी सांधा जुळविणे कठीण जाते. मन मग चक्राकार होते. जत्रेतल्या पाळण्यात तीनचार फेऱ्या माराव्यात नि पाळणा थांबावा, आकाश सभोवती घुमत रहावे, उतरायला जावे तो पडायला व्हावे; घेरी–घेरी, अंधारी–अंधारी आल्यासारखे व्हावे, पडतो पडतोसे वाटताना आधार शोधायची धडपड रहावी– असे काहीसे संध्याकाळी होते. मनाने निर्माण केलेल्या स्पंदनांच्या आवर्तात जीवाला गिरकी येते; पण त्यातून निर्माण होणाऱ्या बेहोपीत अस्तित्वाच्या शोधाची वाटचाल सुरू राहते. ती चालू रहावी हीच तर संध्याकाळची किमया असते.

' संध्याकाळच्या कविता ' च्या संदर्भात, संध्याकाळचे रूपरंग, गुणधर्म सांगताना प्रा.त्र्यं.वि. सरदेशमुख यांनी लिहिले आहे, "संध्याकाळ हा अर्धा आंधळा समय होय. त्यात दिसते ते 'हां हां म्हणता' 'दिसत नाही' मध्ये मावळत असते. ' दिसणें न दिसणेंनसीं मावळवी ' म्हटले ज्ञानदेवांनी, एका वेगळ्या संदर्भात. जाणिवेचा स्वतःला गळफास घालणारा एक प्रकार दिवसाच्या या प्रहरात अनुभवाला येतो. बाहेर संधिप्रकाश, आणि आत जाणीव–नेणीव यांच्या सीमेवरची उलाढाल. अशी आतबाहेर युती झाली म्हणजे माणसाला बावरल्याप्रमाणे, हरवल्याप्रमाणे व्हावे यात नवल नाही. सामान्यतः माणसे ही वेळ कशात न कशात बुडवू पाहतात. मन थाऱ्यावर नसते. त्यावर एका अबोध उदासीची छाया आलेली असते. हिय्या करून तिच्यात वावरायचे माणसे सहसा टाळतात. दिवसभराच्या बऱ्यावाईट प्रिय–अप्रिय घालमेलीचा आवेग दिवसास्ताच्या लांबणाऱ्या छायांबरोबर ओसरत जातो. मनःप्रदेशावर धूसरता साचते. अशा असंख्य संध्या एकवटल्या म्हणजे गुदमरायला होते–जर त्यात कराराने वावरता येण्याजोगी प्राणांची गहनता आपलीशी नसेल तर.

संध्याकाळचे हे उदासपण व आंधळेपण जिवंत मनाला अधिकच डिवचत राहते. अज्ञेयाच्या किनाऱ्यावर आणून सोडते. गोविंदाग्रज म्हणतात तसा ' दिक्कालाचा तट ' आरपार दिसू शकत नाही. सृष्टी आतबाहेरून आभासांच्या थव्यांनी भरून येते. तिच्यात चाहुली, गंध, अरूपता आणि भारावलेपण वाढते. व्याकुळपण स्थिर होते. आठवणींच्या छाया–उपछाया गडद होत जातात.

केशवसुताना संध्याकाळ 'उन्मन' करतो आणि गाणे सुचवतोः तांब्याना संध्याछाया भिववतात : ' संध्याकाळ सदा उदास करतो माझ्या अभागी मना..... ' हा गोविंदाग्रजांचा उद्‌गार. ' मरणाचा अर्थ तोकडा मिळतो कातरवेळेला घर लुबाडतो ' म्हणतात खानोलकर : आणि दिलीप चित्रे 'सांजसावल्यात उभी एक बाहुलीः मनाहून खोल कुठे तिची सावली ...' व्यक्तीव्यक्तीवर संध्याकाळ अशी कमी जास्त खोल मुद्रा उठवते. प्राधान्याने उदासपणाची व एकलेपणाची?"[१] ग्रेस यांच्या ' संध्याकाळच्या कविता ' नी उदास एकलेपणाचा गंध जपला आहे.

अशी ही संध्याकाळच कवीने का जपली ? खरे तर हा प्रश्न अप्रस्तुत आहे; आणि त्यापेक्षाही हे खरे की, असे प्रश्नच करायचे नसतात. पण आकलनाच्या

---

१. सरदेशमुख प्रा.त्र्यं.वि.: 'धुके आणि शिल्प': पूर्वार्धः सत्यकथा: मार्च, ७४ : पृ. २०

विस्तारासाठी ते करण्याखेरीज गत्यंतरही नसते. तसे ते उपस्थित केल्यावर त्यांची उत्तरे सोपी नसतात, हे माहीत नसते असे मुळीच नाही; 'हे का नि ते का?' अशा शंका कुठल्याही सच्च्या कलावंताच्या बाबतीत एकदम फालतू असतात. आत्ममग्न, आत्मलीन कवीच्या बाबतीत तर त्या शशशृंगासारख्या असतात. 'संध्याकाळ' ही कवी ग्रेसच्या मनाची वृत्ती आहे. त्यांची ती एक चित्तवृत्ती आहे. ती उदासीनतेचे रंग लपेटून वावरते कारण जगाच्या दर्शनाच्या मूळ स्त्रोताशी–कालस्त्रोताशी–पोचण्याची तीत शाश्वती आहे. सकाळ, दुपार इतकेच काय उत्तररात्रीसारख्या वेळा प्रकाशाच्या अतएव झगझगीत जीवनाच्या दर्शनाच्या. जीवनाला उदासीन करणाऱ्या संधिप्रकाशात त्यांचा उपयोग काय ? 'बर्फाच्या कविता' मध्ये उदासभरल्या आयुष्याबद्दल कवीने सांगितले आहे :

> वाऱ्यालाही जागा मिळू नये अशी बंद खोली.
> बाहेर हिमाची वादळे घोंघावू लागली आहेत.
> माझ्या रक्तांतील हाडांचे पाणी होऊन मस्तकाच्या
> दिशेनें वाहतें, असें हें दुःखाचें प्रगाढ चिंतन किंवा
> अंधाराच्या पृष्ठभागावर उमटणाऱ्या बर्फाच्या सकंप रेषा
> डोळ्यांच्या मागील अंधारांतून येणारें हें वादळ;
> एखाद्या महायात्रेसारखें झाडांना झोंबूं पाहतें,
> जसें या निषिद्ध रात्रीं माझ्या दाराशीं कोणी
> टांगा घेऊन आलें आहें...
> वारा येऊंच शकणार नाही या खोलीच्या बंद दाराशी.
> पायाखालची फरशी किती थंडगार ! जसें मीच बसून
> असावें माझ्या प्रेताशीं... या बेवारशी डोळ्यांना
> असेंच सोडून जावें या पुस्तकाच्या सांगातीं; तसें यांचें
> पुढें कोण आहे ? मी जसा वर्फांतून आलों तसाच
> बर्फांतून जाईन; रात्रीच्या शेवटच्या प्रहरांतील
> रहदारीसारखा.[२]

जीवनाचे (जीवनाचे म्हणावे की आयुष्याचे ?) असे हे ओघळणे संध्याकाळ मध्ये दिसणेच स्वाभाविक आहे. ग्रेसच्या कवितेत 'प्रेम' हा शब्द जसा येत नाही-जवळ जवळ येत नाही – तशी दिवस दुपारही येत नाही. येतात संध्याकाळ आणि रात्रीचे शेवटचे प्रहर. निवांत, निःशब्द, नीरव शांततेत जमा होणारे. अत्यंत सूक्ष्म संवेदनांनी गलबलून जाणाऱ्या कवीला अशा वेळा मानवणाऱ्या. आतून बाहेरुन भडभडून आलेले असले, कल्लोळ माजून राहिले असले, गलबल्याने दिशा झाकोळून गेल्या असल्या तरी संध्याकाळच्या वातावरणाचा चिंतनासाठी

---

२. ग्रेस : 'संध्याकाळच्या कविता' : पृ. ७६–७७

उपयोग होणारा. कवीच्या मनाची नस संध्यावेळेने पकडली आहे; संध्यावेळात कवी मुरून गेला आहे. सर्व व्यवहार सुरू असूनही कवीचे सारे चित्त संध्याकाळ जागवित असलेल्या आत्म्याकडे आहे – अस्तित्वाच्या शोधाकडे आहे.

संध्याकाळच्या सूत्रातून अस्तित्वाच्या आत्म्याचे सूत्र पकडण्याचा कवीचा प्रयत्न आहे. संध्याकाळ हे साधनमात्र आहे. ही काहीशी, 'संध्याकाळ' मधील 'पदार्थाभावनी' अवस्था होय. कवीची संध्याकाळमध्ये गाढ समाधी लागली आहे, पण ती निश्चेष्ट समाधी नव्हे; जागेपण आहे; शक्यतेनुसार भान आहे पण जेवढी म्हणून समाधी– 'संध्याकाळ' मध्ये गुंतणे आहे; मग ते किती काळ का असेना– तेवढचा अवकाशात जीव–जगत्–जीवनाचा अन्वय लावण्याचा प्रयत्न आहे. खरे तर, हा प्रयत्न नाहीच. कवीच्या मनाची ती सहजगती आहे. संध्याकाळ हा कवीच्या जीवनातील 'योग' आहे आणि या 'योगयुक्ता'ने अस्तित्वाची गाठी सोडतत आल्यास पहावी, अगदी सगळे, आख्खे खरे नाही हे खरेच; पण होता होईल तेवढे तरी, पहावे–करावे अशी चाल आहे.

कारण संध्याकाळ म्हणजे एकलेपणाच्या जाणिवेचा जळता उद्रेक. दुःखाचे प्रतिक. इतर कुणाचे काय असेल ते असो, ग्रेसचे ते आहे तसे आहे. सुखापेक्षा दुःखात जीवनाचे रूपरंग अधिक जवळ येते. स्पष्ट दिसते. म्हणून तर देवदत्त दानाकडे कुंतीने दान मागितले ते वेदनेचे. संध्याकाळ उदास, धूसर, अधुरी– वेदनामय. जगाचे सुंदर रूप तिच्यातून दिसणारच नाही असे नाही. कदाचित अधिकच दिसेल. का आणि कसे नाही म्हणावे? अस्तित्वपरायण कवी या संध्याकाळमध्ये, या दुःखात, या वेदनेत, प्रकाशकाळात न दिसणाऱ्या जगाचे विश्व न्याहाळू पाहतो आहे. एकटा एकटा होणाऱ्या आत्म्याचे तादात्म्य जोडू पाहतो आहे; 'भोग' निस्तरू पाहतो आहे.

असे का घडते आहे? त्याचे कारण हे आहे की, ग्रेसच्या कवितेशी ग्रेसच्या जीवनाचा संदर्भ निगडित आहे. हा संदर्भच संध्याकाळ घेऊन येतो, प्रतिकरूप बनून राहतो; मग अस्तित्वाच्या प्रवाहाच्या उगमापर्यंत ते जाऊ पाहते. सचेतनाचे जीवन जगणाऱ्या संवेदनाक्षम सर्जनशीलतेचा हा चिरप्रवास आहे. म्हणून संदर्भाविना करता येणारा हा प्रवास नाही.

वामन इंगळे आणि त्र्यं. वि. सरदेशमुख यांच्या अनुक्रमे 'संध्याकाळच्या कविता' व 'धुके आणि शिल्प' (उत्तरार्ध) या लेखात त्याची काही प्रमाणे हाती लागतात. या संदर्भात ती बरेच काही सांगून जातात :

वामन इंगळे सांगतात, "... ...'आषाढवन', 'चंद्रधून' या सर्गांतील कविता माझ्यासारख्या ग्रेसच्या अंतर्गत मित्रालाही एक परकेपणाचे असमाधान आणि शब्दशिल्पातील असामान्यपणाचा आनंद देतात. ग्रेसच्या या कवितेचा भोळा भगवा रंग मला पटून जातो–पण भेदून का जात नाही, असा प्रश्नही पडतो. त्या पार्श्वभूमीवर ग्रेसची जीवनगाथा डोळ्यासमोर उभी राहते. कर्नल बागेतील ते ग्रेसचे जुने घर... धूळ खात पडलेले तबले–डग्गे आणि तानपुरे; पं. पुजारी, राजाभाऊ कोकजे आणि वनारसच्या ठुमरी गायिका – या सर्व कलावंतांच्या गाण्याच्या नादी लागलेले ग्रेसचे रसिक वडील; ग्रेसची मरणोन्मुख क्षयी आई; त्या तशा स्थितीत 'माणिक' कडे भिरभिर पाहाणारी लहान मुले; कर्नल बागेची ती कराल वस्ती – आणि या सर्वांना पोटात घेणारे ग्रेसला लाभलेले सामाजिक अस्पृश्यत्व !" [३]

दुसरा उल्लेख व्यं. वि. सरदेशमुख, दि. ३० जाने. ७२ रोजी ग्रेस यांनी त्यांना लिहिलेल्या पत्रातील मजकुराचा करतात. ग्रेस आपल्या पत्रात लिहितात : "... माझी आई एक विलक्षण बाई होती. ती फक्त माझीच आई असू शकते. मातृत्व–वात्सल्य–प्रेम या स्त्रीजीवनाच्या पातळ्यांचे सामान्यीकरणही तिच्यात नव्हते. ती गेली तेव्हापासून माझ्या मूळ पिंडाच्या आयसोलेशनबरोबरच मला एक अनाथपणाची जबरदस्त फीलिंग येतेय. हा अनाथपणा आधाराची मागणी करणारा नाही एवढेच मला सांगता येईल. कुठलीही रचना करताना या जाणिवेपासून मी इंचभरही दूर होतो असे मला वाटलेले नाही. शिवाय मी पळत नसतानाही ती माझा सतत पाठलाग करीत आहेसे वाटते. माझ्या कवितेत 'तू'ची रूपे तिचेच भिन्न भिन्न आविष्कार आहेत. ही रूपे मला इन्ग्रिड बर्गमनपासून तर दक्षिणेतील ख्रिस्ताच्या देवालयात भेटलेल्या अनेक स्त्रियांची दर्शने असू शकतील! शिवाय, म्हणून प्रत्येक कविता मला अपूर्ण वाटते. 'दुपार' मधले हेच रूप मला कालपरवा सापडले ते असे :

माझ्या कुळाप्रमाणे मृत्यू मला दुपारीं
आईस दर्पणांतुनि बोलावतात घारी."[४]

हे दोन्ही संदर्भ ग्रेसच्या कवितेची जन्मखूण सांगतात. श्री. इंगळे यांनी मोजक्या

---

३. इंगळे वामन : सत्यकथा : सप्टें.' १९६८ : पृ. ५१
४. सत्यकथा : एप्रिल ७४ : पृ. ३८

शब्दात उभ्या केलेल्या कराल वस्तीतल्या क्षयी आईचे आणि लहान मुलांच्या भिरभिर नजरांचे आर्त चित्र आणि प्रा. सरदेशमुखांच्या पत्रातील "ती गेली तेव्हापासून माझ्या मूळ पिंडाच्या आय्सोलेशनबरोबरच मला एक अनाथपणाची जबरदरत फीलिंग येतेय" – हा उल्लेख ग्रेसच्या कवितेतील प्रकृतीचा सांधा जुळवून जाते.

ग्रेसच्या कवितातील उदास–सौम्य एकाकीपण–अनाथपण त्यांच्या कवितेचा आरंभ आणि अंत, अंत आणि आरंभ आहे. प्रक्रिया सारखी सुरू आहे. त्यात आधारासाठी लाचारपण नाही पण कारुण्याचा निथळ आविष्कार आहे. प्रतिक्षेचा 'शाप' आहे; पण 'रंगास्त' नाही. देहाच्या अंगव्याकुळ डोहात दीर्घदुःखी पाणी सतत खळाळते आहे, उभ्या शरीराला मन सापडत नसले तरी साद घालीत अंधार येतो आहे. पाण्यावर तरंगणाऱ्या निःशब्द एकाकी कमळाप्रमाणे येतो आहे. संध्याकाळ घरादारात वस्ती करून आहे. परदेशी पोराचे दरवेशीपण ग्रेसच्या कवितेने संध्याकाळच्या रूपाने जपले आहे. जपले आहे असे म्हणण्यात मुद्दाम ते सांभाळले, राखले आहे असा अर्थ ध्वनित होतो. पण तेही बरोबर नाही. बरोबर हे आहे की, ते त्याचे अविभाज्य, निकट, अनिवार्य अंग आहे. ग्रेस वजा अनाथपण झाले की, ग्रेसची म्हणून काही कविता उरेल, पण ती सायंकाळची, खास करून ग्रेसची कविता असणार नाही. या अनाथपणाच्या दुःखाच्या अंगाने ग्रेसची कविता वाढली आहे; निर्माण झाली आहे.

हे पोरकेपण–अनाथपणाचे दुःख 'रंगास्त' मध्ये कवीने ठळकरीतीने सांगितले आहे :

> दृष्टीला अतीव कारूण्यानें आंधळे
> करणारें धुकें पसरत असावें
> गाभाऱ्यांत...
> अशा दिशा हरवतात आणि अशा
> दिशा उगवतात.
> मनाचे सर्व आभास, दुखाच्या एवढ्या
> समर्थ वैभवांतही असतात
> पराधीन, पोरके आणि सर्वस्वी
> अनाथ. [५]

---

५. संध्याकाळच्या कविता : पृ. ७०

पण अनाथपणाचे हे दुःख, निष्क्रिय किंवा निर्बीज नाही. येथे सूक्ष्म खिरणें निश्चितच आहे; पण वेदनेच्या फुलांना फुलण्याची क्रियाही आहे.

आईच्या मनावर ठसलेल्या, अंगामनात रूतून बसलेल्या 'त्या' चित्राने येणाऱ्या अनाथपणाच्या जबरदस्त फीलिंगच्या संदर्भाने प्रा. सरदेशमुख सांगतात, " ... एकटेपण आणि त्याशी सुसंगत असणारी निःशब्दता, उदासी व प्रतीक्षा ही 'संध्याकाळच्या कविता' ची स्वाभाविक रूपचर्या आहे. हिच्यातून विकसत जातो कविमनाकडून होणारा संवाद भौतिक आणि आत्मिक 'तूं' शी. पुनः पुन्हा दुःखवादी आठवणी निघतात. त्या आठवणींतून मरणाची चाहूल सदाच वावरत असते. प्रेमाचा अनुभव दुःखाच्या मापाने मोजला जात असल्याने प्रेमाचे व मरणाचे अभंग साहचर्य ग्रेस यांच्या कविता पुन्हा एकदा स्थापित करतात. ग्रेसच्या कवितांचा आदि-मध्य-अंत एकाकीपण-दुःख-पोरकेपण यात सामावतो. आरंभातच अंत आणि अंतात पुनः आरंभ आहे. अशाने या कवितासंग्रहाला जमीन–आकाश–जमीन अशा चक्राकार फिरणाऱ्या व फिरवणाऱ्या पाळण्यासारखे एक देखणे आकर्षण आहे. आपली रूपचर्या आस्वादकाच्या मनावर ठसवून अल्प काळातच त्याला झापडणारे. एकाकी पोरकेपणाची गडद छाया पोटात साठवूनच 'संध्याकाळच्या कविता' समोर येतात... ग्रेस वर्णन करतात तशा विलक्षण आईचे या जगातून जाणे नैसर्गिक रीतीचे असले तरी मुलाला पोरकेपण येईलच येईल: आणि ते मरण अनैसर्गिकपणे कोसळलेले किंवा ओढवून घेतलेले असेल, किंवा यापैकी ते कसे असेल याची साशंकता निर्माण झाली असेल तेव्हा तर त्याच्या स्मरणाने आरपार मन ढवळून निघावे व पोरकेपणात दिग्भ्रम निपजावा यात आश्चर्य काय ? " [६]

माणसाला पोखरणाऱ्या क्षयासारखे हे दुःख; हे पोरकेपण, हे अनाथपण ग्रेसला वेढून आहे, कवितेत पसरून आहे. झपाटणारे, झेपावणारे, भोवळ आणणारे पण त्यातूनच निर्मितीचा सूर धरणारे असे हे विकल । विकल करणारे दुःख आहे. व्याकुळ, करूणार्त. कासवासारखे अंग आत मुडपून घेणारे, मानवी अस्तित्वाचा शोध घेऊ पाहणारे. धूसर, उदास, काळोख्या संध्याकाळातून उभारून येणारे दुःख गूढ अबोध भावविश्वाचा अनुभव देते. हे दुःख 'नेहमी वैयक्तिकतेच्या परिघातीलच असते.' किंवा 'जवळ जवळ सर्व कवितांना खाजगी अनुभवांचा अंतःस्पर्श आहे' हे ग्रेस नाकारत नाहीत. मात्र असे असले तरी 'संध्याकाळच्या कविता' मधील दुःख वैयक्तिक असूनही भडभडे किंवा आकस्ताळे नाही. ते

---

६. कित्ता : 'धुके आणि शिल्प' : पृ. ३८

सार्वत्रिक बनलेले नसूनही वैयक्तिकतेच्या कक्षेत गहन। गडद। गहिरे आहे; आणि दुसरे असे की, ते एकाच तऱ्हेचे, साच्याचे किंवा चौकटीतले नाही. त्याच्या म्हणून काही परी आहेत; त्या विविध आहेत असे नाही; पण ज्या आहेत त्या लक्षणीय आहेत.

'संध्याकाळच्या कवितामधील जवळ जवळ सर्व कवितांना खाजगी अनुभवांचा अंतः स्पर्श आहे,' असे प्रा. सरदेशमुख यांनी सांगितले आहे, तर 'हे दुःख नेहमी वैयक्तिकतेच्या परिघातीलच असते', अशी प्रा. बाळकृष्ण कवठेकर यांनी ग्वाही भरली आहे. अशी वैयक्तिक दुःखे आक्रोश–आक्रंदनाची गाणी व्हावीत अशी साधारणतः मराठी कवितेची परंपरा आहे. जगाचे दुःख गौण, कमी किंमतीचे, आपले व्यापून उरणारे, श्रेष्ठ किंबहुना त्यातच सारे असणारे.त्यात आपण कवी; म्हणजे अधिकार आलाच; अशी सर्वसाधारणपणे दृष्टी राखली गेल्याचा प्रत्यय मिळतो. यातून कविता श्रेष्ठ झाली किंवा होते असा अनुभव नाही. उलट विलक्षण भावविवशतेने ती ढेपाळताना दिसते; कारण स्वतःच्या नको त्या दुःखाची ती वेडगाणी ठरतात. ती सच्ची असती तरी ठीक होते. पण नसतात हे दुःख आहे. बरीचशी उबवलेली, उबग येणारी असे त्यांचे स्वरूप असते. व्यक्तिगत दुःखालाही वैश्विकता प्राप्त करून द्यावी लागते. कलावंताच्या कुवतीवर ते अवलंबून असते. पण कित्येकांना ते साधत नाही, जमत नाही. परिणामी, ती भडभडचा, आक्रस्ताळचा, भावविवश आखाड सास्वासारखी वैतागाची ठरतात. (त्याही आता कमी होत आहेत. पण काव्य मात्र वाढत आहे.) मराठी कवितेने असला वैतागथोडाथोडका दिलेला नाही.

'संध्याकाळच्या कविता' मधील स्थायीभाव दुःख आहे. प्रमुख रस दुःख आहे. मात्र दुःखामुळे स्वतःला जे हरवल्यासारखे वाटते ते त्याच दुःखातून शोधण्याचा कवीचा प्रयत्न आहे. विलक्षण संवेदनशील आर्ततेने दुःखाचा स्वीकार करून अस्तित्वाचा शोध सुरू आहे. हे दुःख जीवनाचा अपरिहार्य घटक आहे; त्याच्या भोगण्यात जीवनाची पूर्तता आहे; त्याला टाळून वा वळसा घालून पुढे जाता येणारच नाही असे नाही, पण त्यात अर्थ नाही. शेवटी माणूस माणूस म्हणजे तरी काय आहे ? त्याच्या जीवनाचा प्रवास म्हणजे तरी काय आहे ? त्याच्या जीवनाची फलश्रुती कोणती आहे ? असे अनेक प्रश्न, मानवी जीवनाला जीवनाच्या निर्मितीपासूनच पडले आहेत. त्याची बरीवाईट उत्तरेही अनेकांनी दिली आहेत. 'ग्रेस' यांचे त्यावरचे उत्तर आहे : अंतहीन प्रतिक्षा : विखुरलेल्या शब्दांचे अर्थ तिथे गोळा करायचे असतात. कारण जीवन एक 'व्यथालय' आहे.

'आसवांत पापणी' मध्ये कवी सांगतो :

यी इथें व्यथालयांत
दुःख सांगतों तुला
घे मला कुशीत आज
पावलांत शृंखला !
संपणार ना कधींहि
रात्र घोर पापिणी
ओंजळींत हीं फुलें नि
आंसवांत पापणी ![७]

कारण 'दुःख घराला आलें' मध्ये कवीने परिस्थितीच सांगितली आहे:

नाहींच कुणी अपुलें रे
प्राणांवर नभ धरणारें
दिक्काल धुक्याच्यावेळीं
हृदयाला स्पंदविणारें ... ...[८]

मग 'दुःखाचे वन' उधळले जाते. आईच्या मृत्युने आलेली उदासी, मरणाच्या दुःखाचे आकर्षण आणि दुःखस्वरूप प्रीतीचा साज यांचा विलक्षण एकात्म संयोग घडतो. पण तो तत्वज्ञानाच्या पातळीवर चढत नाही. त्याचा रूपाविष्कार निखळ भावनात्मकच असतो. साहजिकच दुःखाचे खोलवर चिंतन असे घडत नाही. प्रकाशाचा मृत्यू कवीला आकर्षित करतो आणि तसा तो होत असताना सृष्टीवर दाटून येणारे गहन आणि गहिरे औदासीन्य त्याला लोभावून सोडते. हे लोभावणे त्याला चिंतनाच्या पातळीवर जाऊ देत नाही. मग तो भावनेच्या ओवरीत वावरतो. कवीची संवेदनशीलताही इतकी तीव्र सजग आणि उतावीळ की, मनावर उमटणाऱ्या भावनिक प्रतिक्रिया रेखांकित केल्या की, कवीला सांगायचे ते सांगितले, संपले असे वाटते. हे सांगणे, तेवढ्या क्षणकालापुरते त्याला तत्वज्ञानपर, चिंतनपर वाटत नसेलच असे नाही. पण ते तसे नसते.

अर्थात असे काही तत्वज्ञान सांगितले पाहिजे किंवा सांगावे लागते असा आग्रह

---

७. संध्याकाळच्या कविता : पृ. ६८
८. संध्याकाळच्या कविता : पृ. ३५

असण्याचे कारण नाही. 'संध्याकाळच्या कविता' मधील ग्रेससारख्या उत्कट अधीर कवीकडून ती अपेक्षा करण्यात अर्थही नाही. 'चपापून' 'महाशन्यांत' 'चौफेर' पाहणाऱ्या कवीला

नाहीतर रक्तामांसाच्या संभोगाला उगवणारें
शिल्पउदास व्याकुळतेचें एखादें फूल... [९]

एवढीच अपेक्षा आहे, तिथे 'वैचारिक स्वरुप' भेटणे कठीण; ते त्यांच्या काही कवितांच्या अर्थाइतके, आशयाइतके, आकलनाइतकेच कठीण यात शंका कसली? प्रा. कवठेकर यांनी म्हटले आहे. "दुःखानुभूतींचा भावनात्मक स्वीकार आणि आविष्कार हेच या कवितेचे स्वरूप. चिंतनाच्या प्रक्रियेतून या दुःखानुभूतीचा ग्रेस कधीही शोध घेत नाहीत. ती ग्रेस यांची प्रकृतीच नव्हे. परिणामतः ग्रेस यांची दुःखविषयक जाणीव प्रकट करणारी कविता आपल्याला अस्वस्थ करते; उदास करते; पण अंतर्मुख होऊन या दुःखाचा शोध घेणारे चिंतन करावयास लावत नाही. 'हे असे आहे' या जाणिवेने आपण उदास होतो; पण 'हे असे का?' असा प्रश्न विचारून त्याचे उत्तर शोधण्यास आपण प्रवृत्त होत नाही. ग्रेस यांच्या कवितेचा परिणाम असा एकेरी आणि मर्यादित स्वरुपाचाच असतो."[१०]

ग्रेसच्या कवितेने जीवनाचे एक अपरिहार्य अंग म्हणून केलेल्या दुःखाच्या स्वीकाराचा खास करून काही विशेष अर्थ म्हणून ग्रेस दुःखावर प्रेम करतात किंवा ते वृत्तीने दुःखवादी असून सुखाविषयी त्यांना सुप्त तिटकारा आहे असा नव्हे. जीवनातील सुखाची त्यांना निश्चितपणे जाणीव आहे. आपल्या संन्यस्त सुखाच्या काठी वळिवाचा पाऊस यावा, अशी अपेक्षाही ते व्यक्त करतात. आपल्या रक्ताखाली सजलेले चंद्र ढळताहेत, असे म्हणत ते सुखस्वप्नांच्या भग्नतेबद्दल खंत व्यक्त करतात; पण ते सुखस्वप्नें पाहत असतातच. जीवनातील दुःखाची विविधांगी जाणीव प्रकट करणाऱ्या या कवीला दुःखाचे आकर्षण आहे असे नव्हे. उलट जीवनाचे सर्वश्रेष्ठ रुप असलेल्या माणसाच्या केवळ निसटत्या स्पर्शानेही तुझ्यामाझ्यापासून निघालेला हा दुःखाचा काळोख पैंजणासारखा रुणझुणत वाहू लागतो, असे त्यांना वाटते.

आणि इथेच आणखीही एक गोष्ट आपल्या लक्षात येते: वहरात आलेल्या

---

९. 'प्रिस्टस' : पृ. ७४

१०. वैखरी । जाफेमा, ७३ : 'संध्याकाळच्या कविता' : समीक्षण : पृ. २०

दुःखाची चित्रें रेखाटतानाही हा कवी कधी जीवनावर चिडत नाही किंवा जीवनाची विरूप, विद्रूप, किरटी अशी चित्रेंही रेखाटत नाही. भग्नमनस्क निराशेने अशुभ सूर जशी त्याची कविता काढीत नाही, तसाच आपण उध्वस्त, उजाड झालो आहोत असा कंठाळी आक्रोशही ती करीत नाही. इथेच ग्रेस यांची कविता समकालीन संतप्त कवींच्या कवितेपासून वेगळी उमटून पडते. जीवनातील दुःखाचे चित्रण करीत असतानाच हा कवी जीवनावर विलक्षण प्रेमही करीत असतो. जीवनातील सुंदरतेचे, मांगल्याचे त्याला भान असते. जीवनाचे संचलन करणाऱ्या अव्यक्त, अलौकिक शक्तीची जाणीवही तो व्यक्त करीत असतो. त्याची ही सौंदर्याची जाणीव, त्याची ही आस्तिक्यभावना त्याला जीवनाचे दुःखजन्य ओंगळ स्वरुप रेखाटण्यापासून आणि जीवनासंबंधी चिडचीड करण्यापासून परावृत्त करते. या कारणामुळेच ग्रेस यांची कविता अस्तित्वाचा शोध घेते पण अस्तित्ववादी होऊ शकत नाही. "११

'संध्याकाळच्या कविता 'तील जीवनाचा न्याहाळ हा तात्कालिक सुख-दुःखांच्या उन्मनस्क प्रतिक्रियेचा आविष्कार नाही. वैफल्य, उदासीनता किंवा भग्नता यातही त्याचा जन्म नाही; तर तो आहे वाळूची घरकुले मोडलेल्या बाह्य जीवनाच्या आत असलेल्या, जीवनाच्या तळापर्यंत जाऊ पाहणाऱ्या उन्मेषपूर्ण उल्हासात ! कारण,

या इथें शिल्प–गांधाराच्या शून्य नगरींत
मी जेव्हां अंतिम वासनांच्या प्रार्थना म्हणूं लागतों,
आत्मलीन पाचोळ्याच्या साक्षीने;
तेव्हां तुझ्या लोचनातील अतर्क्य दुःखांतून,
चंद्रकालीन शिवालयांचीं बर्फाच्छादीत शिखरें
प्रार्थनांच्या अंधारांत शिरत असतात.१२

त्यातून

अंगोअंगीं पजाळले
केशरांचे दिवे

---

११. कित्ता : पृ. १८/१९
१२. संध्याकाळच्या कविता : 'प्रार्थना' : पृ. ४८

अंधारांत दिसे गांव
तृष्णेकांठीं नवें[१३]

असा हा दु:खस्त्रोत कवीच्या जीवनात चैतन्यस्त्रोत घेऊन येतो, तो जीवनावर चिडत नाही, कातावत नाही, आक्रंदत करीत नाही; जीवाचा वैताग येऊन संन्यस्तवृत्तीचा अंगिकार करीत नाही, की मरणाचे आकर्षण असूनही मरण जवळ होत नाही– त्याचे मूळ या चैतन्यस्त्रोतात आहे.

प्रा. सरदेशमुख 'धुके आणि शिल्प'च्या पूर्वार्धात सांगतात, " ग्रेस यांच्या सगळ्या कवितेला, म्हणजे तिच्यातील अनुभव-चिंतनाला एकांताचे आवार आहे. त्या एकांताला 'स्वप्नगंध' आहे. स्वप्नात मरणचाहूल आहे. टॉमस ग्रेच्या प्रसिद्ध 'एलेजी' मध्ये पहिल्याच चारसहा ओळीत जे एक अंधाराचे, श्रांतपणाचे, एकाकी पणाचे स्तब्ध आणि गहनगंभीर वातावरण उभे राहते "[१४] ते ग्रेस यांच्या संबंध कविता संग्रहाला व्यापून आहे.

ग्रेस यांना अत्यंत प्रिय असलेल्या एमिली ब्रॉंतेच्या कवितांतूनही असाच एक विराट स्वरुपाचा उदास, करूण, सुकुमार असून करारी आणि कणखर सूर सदाच वाहताना आढळतो.[१५] त्या सुरांबरोबर आभासाचे आणि स्वप्नांचे एक जगच निर्माण होते आणि विलयास जाते. त्या रहदारीखाली एका अंत:करणाची पाताळनगरी धपापत असते.

माणसाचा एकांत–स्वीकार ही सहसा दुधारी क्रिया असते. एकाचवेळी करणात्मक व अकरणात्मक असू शकते. मानवला म्हणून एकांत स्वीकारणे निराळे आणि लादला म्हणून भोगणे निराळे. पण या दोन्ही अवस्था एखाद्या व्यक्तीस एकाचवेळी अनुभवाला येण्याचा संभव असतो. दूरीभवन ( स्टँडिंग आयसोलेटेड ) हा

---

१३. : संध्याकाळच्या कविता : ' संग ' : पृ. ३२

14. .....The ploughman homeward
plods his weary way
And leaves the world to darkness
and to me.
Now fades the glimmering landscape
On the sight,
And all the air a solemn stillness holds....

15. ..... Winds take a pensive tone, and
stars a tender fire,
And visions rise, and change, that
Kill me with desire.

करणात्मक अनुभव जीवाला एक प्रकारची सांत्वना देतो. एका आश्वासनाची व आत्मबळाची जाणीव त्याच्यात असते. पण दूरीकरणाचा ( 'वीइंग आयसोलेटेड'चा ) अनुभव वेगवेगळ्या क्षणसंदर्भात ताटातुटीचे, स्वत्वच्छेदाचे, निर्मितिनाशाचे दुःख निर्माण करतो. त्या दुःखाने येते पांगळेपण आणि आंधळेपण, व्याकुळपण आणि ओसाडपण. ग्रेस यांच्या कवितेत 'आयसोलेशन'ची दोन्ही रुपे जागोजाग दिसतात. दुसरे अधिक व्यापक आणि विकट आहे. त्याच्यातून एक प्रकारचा शाप, एका जातीची बद्धता आणि शिलीभवन (पेट्रिफॅक्शन) जाणवते."

"..... या आयसोलेशनचा एक चमत्कार असा की, त्यातून एकंदर माणूस या जीवमात्राचेच परस्परांशी असलेले विभक्तपण सतत जाणवते:

"वैराण आणि एकाकी आकाशाच्या
पार्श्वभूमीवर हा संथपणाने जात असतो..."

'घरांनी आपलीं दारें बंद केलेलीं असतात...' त्याच्या ( 'वैराण आणि एकाकी') पावलागणिक 'माझ्या गीताचीं शकलें होऊन रस्तोरस्तीं सुरांची कारंजी उडतात'

– गीताची शकले होतात ! ते जणू अटळ आहे.

आपले विभक्तपण हे एकूण माणसाच्या विभक्तपणाचाच एक अंश, हे कवी पाहतो: आणि आपल्या दुःखाचा काळोख ( 'तुझ्या माझ्यापासून निघालेला' ) त्या विराट माणसाच्या 'निसटत्या स्पर्शानेही पैंजणासारखा रुणझुणत वाहू लागतो' : आपली गीतशकले ती हीच हे कवीला जाणवते.

ग्रेस यांच्या कवितांना मनुष्य–(जीवन)–स्पर्शाची आस आहे. त्या स्पर्शात ग्रेस आपल्या गीतरचनेचा उगम पाहतात. विभक्तपणातही मनुष्यस्पर्शाची आतुरता जपणाऱ्याकडून माणूसघाणेपण संभवेल कसे ? म्हणून, ग्रेस यांच्या समग्र कवितेला व्यापून असणारी विभक्तता भयकारी नाही, की भयातून निर्माण झालेली नाही. कारण, कवीने समाज मनोमन जाणलेला आहे ..सगळ्या बऱ्या-वाईट संस्कार–संदर्भासह. तरी तो व्यक्तिगत संपर्कापासून अलिप्त होऊन राहिलेला दिसतो. किंवा, त्याच्या जात–मित्र–गोतावळ्याने आपल्या समजशक्तीच्या उंचनीच पातळ्यांवरून त्याला दूर ठेवलेले असते..."

"ग्रेस यांच्या विभक्तानुभवाचे स्वरुप निश्चित वेगळे आहे. बालकवींचे हादरलेपण आणि गाडलेपण येथे नाही. प्रलयाच्या लाटेतही नव्या सृजनपत्रावर जीवबिंदू तरळता राहावा तसे जीवितसमुद्राच्या दीर्घदुःखी पाण्यावर ग्रेसचे मन तरंगत

राहते. 'जशीं निःशब्द एकाकी कमळें,' 'कमळांच्या पानांवर टिंबांचा खेळ...' 'कुठे कल्पान्ताला प्रणयभरला कंठ फुटतो,' 'उभा आढळ मुक्तिचा प्रलयगंध प्राणांवरी,' 'उरीं भरावी किती सघनता जळांत गळती तारे! कुठून येती इतके हलके तरंगभरले वारे?'...अशा ओळी वाचताना वाटतें, या ओळी गाणाऱ्याच्या पायाखालचा धर सुटलेला असला तरी त्याच्या अंतर्यामी लाटेवर स्वार होण्याचा हिय्या आहे...कंठ मोकळा आहे...आणि मुक्तीचा गंध त्याच्या प्राणांचा अढळ सहचर आहे!" [१६] अवतरणाच्या एवढ्या विस्ताराचे कारण अनेक जागी कवीची ही भावना उफाळून आली आहे : क्वचित सरळ रीतीने आली आहे, अधिकतर अध्यात्मिक अवगुंठनात प्रकट झाली आहे. एका बाजूस काळोखी उदासता आहे, दुसरा बाजू आस्तिक्यबुद्धीने व्यापून उरली आहे. एका बाजूस एकाकीपण आहे, दुसरी बाजू दैवीकृपेच्या सश्रद्धतेने लावून धरली आहे. एका बाजूस अतितरल दुःख जाणीव आहे तर दुसरी बाजू चोळीत दुधाचा थेंब तळमळावा तशा चैतन्यदायी आत्म्याच्या प्रकाशाचा आहे. म्हणून कितीही, काहीही कसेही उदासपण जाळीत राहिले तरी

> वकुळीसारख्या सूक्ष्म नक्षींचा मेणा;
> माझ्यांतील अंधाराला कापीत जातो आहे,
> जेथे बांधिले आहेत ईश्वरानें माझ्या
> सर्वांगांचे स्पर्श–काहूर शिलालेख : [१७]

'संध्याकाळच्या कविता' मधील ग्रेसच्या कवितांचा स्थायीभाव अतितरल दुःख जाणीव आहे हे सांगताना त्या जाणीवेचे स्वरूप काय आहे, हे पाहिले. निर्मिती प्रयोजनांचा विचारही समोर ठेवण्यात आला. पण ही अतितरल दुःखजाणीव एकाच स्वरूपाची, एकाच रीतीची आहे काय? ग्रेसचे दुःख '(ते) नेहमी वैयक्तिकतेच्या परिघातीलच असते' हे खरे आहे. पण त्याचा अर्थ, ते एकसाची-एकरूपी असते असे मात्र म्हणता येत नाही. त्यातही रंग आहेत, गंध आहेत, रुपे आहेत. 'आषाढबन,' 'चंद्रधून,' 'मरणगंध' आणि 'स्मरणशिल्प' अशा गटवार कवितांतून जाणवणाऱ्या दुःखाच्या परी वेगवेगळ्या आहेत. त्या एकमेकीत मिसळणाऱ्या, घुसळून एकजीव होणाऱ्या नाहीत, असे नाही; पण हरेकातून

---

१६. कित्ता : पृ. ३०/३१/३२

१७. संध्याकाळच्या कविता : 'शिलालेख' : पृ. ५०

जाणवणारा एक वेगळा सूरही आहे. ठळक–अस्पष्ट, अधुरे–अपुरे असे त्याचे स्थूल स्वरुप आहे.

'संध्याकाळच्या कविता' मधील दुःख स्थूलरूपाने असे जागे होते :

१. परिस्थितीच्या काचातून,
२. निसर्गदृश्यांच्या संमेळातून,
५. मरणविषयक कल्पनेतून,
३. पूर्वस्मरणाच्या उत्सवातून,
४. अलौकिकाशी जोडल्या जाणाऱ्या संबंधातून,

सर्वसाधारणपणे निरनिराळचा संबंधातून 'संध्याकाळच्या कविता' मधील दुःख जागे होत असले तरी त्याचे स्वरुप प्रायः वैयक्तिक असते, ते निर्वैयक्तिक न होताही रडवेले, आक्रोशणारे वाटत नाही. नितळ वाटते. परिस्थितीचा काच अनेक अंगांनी आलेला, अनेक रीतींचा. आईचे क्षयी मरण, त्याचे खोलवर ठसे, कर्नल बागेची कराल वस्ती आणि सामाजिक अस्पृश्यत्व ! मनावर याचे काही असर आहेत, ठसे आहेत, परिणाम आहेत. त्याची नाती जाम झाली आहेत. लौकिक जीवनातील यशापयश आणि अनुभव यांनी या नात्याशी अनुकार साधला आहे. त्यातून परिस्थिती बलवत्तर असूनही एकाकीपण उभारून येणे चुकत नाही. विलक्षण एकाकीपण अंतःकरण जाळीत राहते, शांत सागरी वादळे होतात, प्रक्षुब्धता येते. शाप उःशापांच्या गुंतवळचात जीव्रन हेलकावे खाते. 'खरे काय ? हे की ते ?' असा संभ्रम पडतो. ती परिस्थिती आता उरलेली नसूनही हल्लक हल्लक वाटते. कुणी नाही. कुणी असणार नाही. कुणी का असावे ? कशासाठी असावे ?' असे प्रश्न एकामागून एक गोळा होतात; आणि जीव वेडापिसा होतो.

इथलेंच पाणी
इथलाच घडा,
मातीमध्यें––
तुटला चुडा. [१८]

त्यात 'सोन्याच्या मोहरा' कुठून असणार ? कारण कवीला जाणीव आहे :

उरलेल्या स्पर्शाच्या ओळींत सजतांना
थिटीं पडलींत माझ्या प्रारब्धांतील अक्षरें !

---

१८. कित्ता : 'आषाढबन' : पृ. १०

अनाहूत अशा विलक्षण विश्वासानें,
तडकलींत माझीं घरकुलें,
शेंदरी देठांचे प्राजक्ती स्मशान
ओंजळींतून गळतांना !
तुझ्याच आघातानें कां टळून जात नाहीं
सुरंगी गात्रांना कुरतडणाऱ्या
राघववेळेचा प्रहर ?[२०]

'तुटलेली ओळख' कवी विणू पाहतो आहे, 'ओठांची मिथिला ल्याया, पदरांतुन नभ व्याकुळतें' आहे, 'मावळतीच्या सरणावरती मनाचे उरले सुरले दुःख निजून आले' आहे; कवीला वाटते आहे,

रित्या मुठींत झांकला
शुक्र प्रभेचा अनंत,
स्पर्शास्पर्शांत गोंदलें
स्वप्न राधेचें हिवाळी[२१]

कारण

माझ्या आसवांना
फुटे हिमगंध,
मागें – पुढे बंध
पापण्यांचे.[२२]

असे कवीला वाटते आहे. 'शब्द फुटण्याच्या आधी ऊर दुभंगत असले' तरी वाटते आहे. कारण निर्मितीचा आवेग अहंतेचे टोक छेदून टाकतो आहे. नियतीची संज्ञाहीन भाषा मनाच्या काठाकाठाने स्मरणाच्या मुक्तीचा ऊद जाळीत अबोल रानाला साद घालणाऱ्या सुतार पक्षाप्रमाणे झेपावत असली तरी कस्तुरीच्या मातीवर उमटलेली राजहंसाची पाऊले दृष्टीआड नाहीत. एखाद्या प्राचीन शिल्पाची पार्श्वभूमी त्यास लाभावी अशी इच्छा आहे. 'कुणी आपुले म्हणे ना, कुणी बिलगेना गळा' अशा आर्त आर्त एकाकीपणात रुजून असणारी ही भावना असूनही, या इच्छेला मरण नाही.

---

२०. कित्ता : 'राघववेळ' : पृ. १३
२१. कित्ता : 'पहांट' : पृ. १६
२२. कित्ता : 'हिमगंध' : पृ. १७

काही वेळा निसर्गदृश्यांच्या संमेळातूनही हे दुःख फुटून येते. निसर्ग सुख आणि दुःख, विरह आणि वेदना, व्यथा आणि कथा– अशा अनेक भावस्थितींना आवाहन करतो. जशी ज्याची संवाहक शक्ती तशी त्याची उत्पत्ती; तसे त्याचे प्रकटीकरण; ग्रेसची कविता व्याकुळ दुःखरसाला आवाहन करते; यात निसर्ग अलग नसतो, एकटा नसतो. कवीच्या दुःखाचे तो प्रतीक बनतो; आणि प्रतिकरुपानेच कवीचे दुःख सांगतो.

'श्रावण' मध्ये कवी सांगतो:

हा श्रावण रडतो दूर
तमाला सूर
मधाची वाट
झाडांची चरणें
त्यांवर एक ललाट[२३]

या ललाटाला काही स्वप्नें पडतात. 'सटवीचे लिखित' आहे – नियती नाव तिचे; कवीला त्याची जाणीव आहे. या नियतीचा रंग बदलायचा असा निर्धार असला तरी व्याकुळपणाने निर्धार विवशही झालेला आहे; किंचित्से का होईना तसे झाले आहे.

'वर्षाव' मधील कवीची सांजबनातील व्याकुळता अशी आहे :

स्वप्नें अपुलीं
कुणी सजविलीं ?
रंग तिरावर व्याकुळसा
नाद उगाळुन
सांज – बनांतुन
कळप गुरांचा निघे जसा.[२४]

– शिल्पाकृती शब्दसंहतीने 'संध्याकाळच्या कविता' मधील दुःख आवर्तात सापडत असले, त्याच्या अर्थछटा विरतही असल्या तरी निसर्गाच्या लाघवी रुपातून प्रकट होणारे गोठलेले दुःख अंतःकरणाला भिडणारे आहे. केवळ ते निसर्गाचे लाघवी, गोंडस रूप नाही तर निसर्गाच्या गूढ रूपात खिन्नतेची छटा आहे, उदासीनतेची

---

२३. कित्ता : पृ. २७
२४. कित्ता : पृ. २९

झालर आहे. त्यात आनंद, उल्हास किंवा चैतन्य यांचा आढळ कमी होतो; अतर्क्य गूढ गुहयांनी तो मंडित झालेला आहे; आणि त्यातून कवीचे वंचित मन फुटताना दिसते आहे. 'फुटताना' हा शब्द थोडा बोजडच झाला; कारण ग्रेसच्या कवितेत स्फोट नाहीत, स्फोटांतर्गत कल्लोळ आहेत; पण त्यांचे रूप सांद्रमंद आहेः कधी हा निसर्ग पांढऱ्या शुभ्र हत्तींनी डोंगर उचलून धरीत असताना काळजाखाली अस्थींचे झुंबर फुटताना दिसतो, कधी अंधार कडे घेऊन कोण रडाया आले म्हणून विचारतो आणि

तरि तुझ्या कुशीचा रंग
शरिरावर माझ्या उमटे
कीं चिंब अभंगामधला
भगवंत स्मृतीवर दाटे... २५

असे भगवंताचे स्मरण करतो. तर कधी

पाऊस कधींचा पडतो
झाडांचीं हलती पानें
हलकेच जाग मज आली
दुःखाच्या मंद सुरानें. २६

जाग आणतो आणि माझ्याच किनाऱ्यावरती, आज लाटांचा पहारा का? असा प्रश्न करतो. त्यातून तो

नाहींच कुणी अपुलें रे
प्राणांवर नभ धरणारें
दिक्काल धुक्याच्या वेळीं
हृदयाला स्पंदविणारे...
दुःख घराला आलें २७

---

२५. कित्ता : 'भगवंत' : पृ. २५
२६. कित्ता : 'पाऊस' : पृ. २६
२७. कित्ता : 'दुःख घराला आलें' : पृ. ३५

या जाणीवेने दुःखाच्या पहाडाखाली जीव व्याकुळ होतो. पण हाच निसर्ग पांडुरंग धनीशी संगही घडवितो. 'संग' मध्ये कवी म्हणतो:

देह ओवूं जाता जडे
अंबराचा मणी
अजाणाचा संग माझा
पांडुरंग धनी. २८

— परमेश्वराच्या रुपात कधी 'प्रत्यक्ष' म्हणून हा निसर्ग अवतरतो, तर कधी मानवी मनाशी संबंध जोडून त्याच्या हृदयीचे बोल उलगडून दाखवितो. ग्रेसच्या कवितेत प्रत्यक्ष निसर्गाचे हुबेहूब वर्णन नाही, बाह्यरुपाचा नित्य परिचयही नाही; निसर्गाच्या कविमनावर उमटलेल्या भावनात्मक प्रतिक्रियांचे अनोखे शब्दशिल्प कविमनाच्या दुःखाशी सांधून येते; दुःखातील सौंदर्यप्रेरित अनुभवांची मांडणी करताना आढळते.

साहजिकच ग्रेसच्या कवितेतील निसर्ग अतिसूक्ष्म आहे. त्याचा पोत अतितलम आहे आणि वीण अत्यंत नाजूक आहे. म्हणूनच त्यात अतितरल दुःखजाणिवेशी बांधलेले संधान किंवा निसर्ग महत्त्वाचा नाही; तर त्यातून ग्रेस सतत घेत असलेला अस्तित्वाचा शोध महत्त्वाचा आहे. माणसाच्या अस्तित्वाच्या मुळाशी जी झुंज आहे– नियती, नशीब आणि माणसाचे स्वातंत्र्य यांच्यातून उद्भवलेला जो झगडा आहे–त्याचा हा शोध आहे : ग्रेसच्या कवितेचा त्याकडे संकेत आहे.

ग्रेसच्या कवितेत, निसर्ग न्हालेल्या गर्भवतीच्या नितळतेने प्रकट होतो. त्यात अगोचराला गोचर करण्याचा, कैवल्याला जागविण्याचा, अनंताला साक्षी राखण्याचा, किंवा अपेक्षाभंगाचे दुःख निसर्गावर लादून जीवन उजविण्याचा काही हा प्रयत्न नाही; त्यासाठी शब्दांचा खेळ केलेला नाही; तर दुःखाच्या जाणिवेनिशी जगण्याचा तो प्रयत्न आहे. शेवटी जाणिवेनिशीच जगता येते; हे 'संध्याकाळच्या कविता' मधील मन चांगले जाणते.

पूर्वस्मरण किंवा अलौकिकाशी जोडल्या जाणाऱ्या संबंधातूनही 'संध्याकाळच्या कविता' मधील दुःख उफाळून येते. पूर्वस्मरणात सुख किंवा वेदना यांचा आठव होतो; कालआजच्या परिस्थितीचा कुठेतरी सांधा जुळतो आणि जीव व्याकुळ

---

२८. कित्ता : पृ. ३२

होतो. यात वेदनेचा भागच अधिक असतो. रंग–रुप–गंध–स्पर्श, गोठलेली स्वप्नें अशा अनेक रुपांतून हे दुःख जागे होते. कुठूनतरी काहीतरी धावून येते. मनःस्थिती 'अल्लद' बनते; आणि स्मरणाला पंख फुटतात. स्मरण शाप बनते; दुःखावेग अनावर होतो. प्रारब्धापर्यंत जाऊन भिडतो. 'स्वप्न' मध्ये कवी सांगतोः

शाप आहे मला संगमरवरांत स्वप्न
लपवून ठेवण्याचा.[२९]

स्मरणाची 'शिळा' होते, 'शिल्प' बनते; पण संध्याकाळी त्यातही प्राण भरला जातो. त्याचाही जीव वितळतो. अंधारव्रत वितळू लागते. 'आठवण' मध्ये कवीचे सांगणे आहेः

या व्याकुळ संध्यासमयीं
शब्दांचा जीव वितळतो
डोळ्यांत कुणाच्या क्षितिजें . . .
मी अपुले हात उजळतो.[३०]

तर 'संवेदनेचा कणा' 'चांदणे' मध्ये हुंकारतो,

घुमावी मुकी हांक यावी पुन्हा
भव्य घुमटांत अंधारली स्पंदनें
तुटे एक तारा तसा अस्त माझा
सुखाला तुझ्या ने कुठे चांदणें . . .[३१]

निसर्गाच्या सान्निध्यात कवी रमत नाही, तर त्याच्या दर्शनाने त्याच्या अंतःकरणात काही सूर घुमतात; लकेरी तरंगत जातात; अतितरल दुःखजाणिव मनांत साठून येते 'वाट' मध्ये कवी सांगतो आहेः

मी पाहतों झाडांकडे, पहाडांकडे,
तूं येशील म्हणून अज्ञाताच्या पारावरती
एक नसलेली पणती लावून देतों...

---

२९. कित्ता : पृ. ५३
३०. कित्ता : पृ. ५४
३१. कित्ता : पृ. ५५

आणि आई नसलेल्या पोरासारखे हे माझे
शहाणे डोळे, हलकेच सोडून देतों
नदीच्या प्रवाहांत.... [३२]

पाण्यावर तरंगणाऱ्या निःशब्द एकाकी कमळांना निसर्गाच्या दर्शनाने, 'संध्याकाळच्या कविता' मध्ये लय मिळते. रुप लाभत नसले तरी भगवंताशी नाते जोडणारा घंटानाद खुणावीत राहतो; काळोखात तृप्तीची किरणे तळपतात. तळपतात म्हणण्यापेक्षा सहज विझूमिटू चमकून जातात; आणि त्यांतून उरतो तो साऱ्या भावविश्वाला ग्रासून उरणारा अतितरल दुःखावेग! जो संध्याकाळशी कवीच्या भावनेच्या गाठी घट्ट करतो.

अलौकिकाशी जोडल्या जाणाऱ्या संबंधांतून फुटून येणाऱ्या दुःखासंबंधी प्रा. कवठेकर यांनी म्हटले आहे, "लौकिकाच्या संबंधातील अतृप्तीवरोवरच काहीवेळा अलौकिकाच्या संबंधातील जाणीवही ग्रेस यांच्या कवितेतून प्रकट होणाऱ्या दुःखाला जन्म देताना दिसते. आपल्या स्वप्नांना आकार देणारी, त्यात रंग भरणारी, आणि नंतर त्यांना उधळून लावणारी ती अलौकिक शक्ती कोण असावी? हा विराट गोल शून्यवत् आहे का? हे गगन कुठे संपते? अंधारातून सरकत जाणारे हे झाडांचे जड पुतळे कुणी मांडले आहेत? आपण का आणि कोठून आलो? आणि जाणार तरी कुठे? असे प्रश्न मनात निर्माण होऊ लागतात. त्यांची उत्तरे अर्थातच मिळत नाहीत. आणि मग एक आगळीच वेदना जाणवू लागते. एकीकडे अस्तित्वाचा शोध आणि दुसरीकडे अपार्थिवाला जाणून घेण्याची इच्छा या परस्पर निगडित जाणिवातून ही वेदना जागी होत असते. ग्रेस यांच्या कवितेतील अपार्थिवाची किंवा अलौकिकाची ही जाणीव नेहमीच पार्थिवाच्या, लौकिकाच्या संदर्भातच निर्माण होत असते, हे महत्त्वाचे आहे." [३३]

लौकिक–पारलौकिक यांच्याशी संबंध जोडण्याच्या अतृप्तीतून निपजणारे हे दुःख 'पांढरे हत्ती,' 'लाटांचें देऊळ,' 'पाऊस,' 'जन्म,' सारख्या कवितांतून स्पष्टपणे दृष्टीस येते.

त्याची काही उदाहरणे अशी :

पांढरे शुभ्र हत्ती मग

---

३२. कित्ता : पृ. ६२
३३. वैखरी : पृ. २०

अंधारबनांतुन गेले
ते जिथे थांबले होते
ते वृक्ष पांढरे झालें.... [३४]

सागर तंद्रींतून नसावें
कुठें चुळाभर पाणी
तुझ्या कृपेच्या दुःखामागें
येईन मी अनवाणी... [३५]

संदिग्ध घरांच्या ओळी
आकाश ढवळतो वारा
माझ्याच किनाऱ्यावरती
लाटांचा आज पहारा.... [३६]

रिक्त या कवेंत मी नि
शून्य ध्यान एकलें;
रात्र घेउनी उशास
क्षितिज गाढ झोपलें... [३७]

—'संध्याकाळच्या कविता'तून ग्रेस बुडत्याडुबत्या सांजप्रवाहातून ' अल्लाद —'अलगद' भरुन येताना दिसतात आणि ' गाईच्या हंबरण्यातल्या व्याकुळतेला समांतर' असे अनेक भावबंध निर्माण करताना आढळतात.

मरणविषयक कल्पनेतून उद्भूत होणारे दुःखही असेच आहे. 'मरणगंध' नावाचा कवितागुच्छच ' संध्याकाळच्या कविता ' मध्ये आहे. मराठीत मरणविषयक कविता फार नाही. मराठी कवितेचा आवाका ध्यानात घेता ती अगदीच नगण्य आहे. कविवर्य भा. रा. तांबे किंवा प्रा. सदानंद रेगे यानंतर ग्रेसचेच नाव घेणे उचित ठरते.

---

३४. कित्ता : 'पांढरे हत्ती' : पृ. २०
३५. कित्ता : 'लाटांचें देऊळ' : पृ. २३
३६. कित्ता : 'पाऊस' : पृ. २६
३७. कित्ता : 'जन्म' : पृ. २८

जन्माला येणाऱ्या प्रत्येकाला मृत्यू अटळ असतो. तो आज ना उद्या केव्हातरी येतच असतो. टळत काही नाही. मृत्युचा अर्थ संपणे – सारे काही सोडून जाणे– असा असल्याने, पुन्हा येणे–जाणे या संबंधात कसलीच खात्री नसल्याने भीती, आशंका; हुरहूर लागावी हे स्वाभाविकच आहे. मृत्युच्या कल्पनेने अंगाची लटलट व्हावी, थरथर घडावी; यात चुकीचे काहीच नाही. म्हणजेच मृत्यू मूलतः दुःखदायक आहे; व्याकुळ करणारा आहे. त्याच्याकडे पाहण्याच्या काही पद्धतीही आहेत:

१. मरण दुखःकारक, म्हणून दुःखी अंतःकरणाने थरथरण्याचा । घाबरून जाण्याचा

२. आणि मरण दुःखपूर्ण असले तरी त्याकडे अत्यंत उल्हसित दृष्टीने पाहण्याचा, त्याचा म्हणून एक आनंद घेण्याचा

– हा दुसरा दृष्टीकोन केव्हाही स्वागताचा हे उघड आहे. त्याने लौकिक आणि पारलौकिक यांचे नातेगोते जमण्याचा आणि जीवनाला आनंदीवृत्तीने सामोरे जाण्याचा दिमाख आहे, डौल आहे; बाज आहे; नजाकत आहे.

'संध्याकाळच्या कविता 'त दुसऱ्या दृष्टीकोनाचा स्वीकार आहे. त्यात मरणा-संबंधाने मरगळलेले मन नाही; तर उल्हसित वृत्ती आहे. 'आता काय करावे ?' असा हातपाय गाळून खोंगी घालून बसण्याचा प्रयत्न नाही तर त्यात टक्कर घेण्याची ईर्षा आहे. अवास्तव आकर्षण किंवा ओढ नाही तर मरणाचा डंख आहे; आणि गूढ, अनाकलनीय, अतर्क्य रूपासंबंधी आदर आहे. मरण काहीतरी भयंकर अशी भीतीची भावना नाही, तर तीही एक सहज नैसर्गिक बाब – पोशाख बदलावा एवढी – अशी दृष्टी आहे. त्यामुळे या कवितेत गलितगात्रता, हताशपणा, विफलता इत्यादींची सूतें चिकटलेली नाहीत . मृत्यू ही सुद्धा शेवटी नियती आहे. आणि नियती म्हणजे दुःख. सर्वार्थाने दुःखच असे नव्हे, पण साधारणपणे दुःख; आणि शेवटी दुःख भोगायचे असते. आणि भोगण्यासाठी सहनशक्ती कमवायची असते. जीवनाने या शक्तीवरची अविचल दृष्टी – आनंदी, उल्हासपूर्ण, सहज दृष्टी -- हीच जीवनाला सामर्थ्य पुरविते; यातून 'प्राणांना मुक्ती' लाभते.

अशावेळी गडबड-घाई-गोंधळ करून काही उपयोग नसतो. मूकपणे मृत्यूची रूपे न्याहाळण्यातच जीवनाचे महाभारत असते; चराचरातील चैतन्यप्रदतेचा साक्षात्कार होत जातो: जीवनाच्या अस्तित्वाच्या शोधाची ती वाटचाल असते. ग्रेसच्या कवितेने ती पूर्णतया कलात्मकतेने केली आहे; तीत तटस्थ आहे, काहीसा थेटपणा आहे . मरणाच्या रूपानेच अधिक असे दुःख उपजले आहे: हे दुःख एकूण दुःखाशी

निगडित आहे, वेगळे किंवा निराळे नाही. कोळचाच्या जाळचाच्या धाग्याची वीण एकमेकांत गुंतली असावी तसे ते आहे.

या नात्यात, विश्वाच्या अफाट गहन–गूढतेची शोध-प्रक्रिया आहे. संध्याकाळ आणि मरण ही त्याची माध्यमे आहेत. नव्हे, संध्याकाळ हे मरणाचे, मरण हे दुःखाचे आणि एकूणच दुःख हे नियतीचे, आणि नियती हे कवीचे असे हे चक्र आहे. या चक्रात गेले की, बुडणे किंवा तरणे एवढेच हाती असते. हे बुडणे । तरणे कसे, कोणत्या पद्धतीने करायचे, व्हायचे; त्याची नियती वेगवेगळी राहते. कवीने मरणगंधातून याचा शोध घेतला आहे, प्रयत्न सुरू आहे. या ' मरणगंधा ' त मृत्युच्या गूढ रुपाचे चित्रण नाही, तर त्याच्या भावनात्मक प्रतिक्रियांचे रूप आहे. नियतीचे दाहक रुप, प्रारब्धाचे भूलभुलैय्येपण, पारलौकिकाच्या पलिकडील कैवल्याचा शोध – या साऱ्या निसरडचा वाटेवरील भयाण डोहांची प्रतिभा या मृत्युकल्पनेत आहे. निर्भाव भावनांच्या कल्लोळात ' मरणाऱ्या हिरव्या राशी ' पडतात आणि ' घराघरांना मरण फुलांची गंधित भूल ' मिळते. [३८]

---

३८. कित्ता :

तहान ही मला गिळे नि कंठ हो तुझा निळा
उन्हांत पाय वाजती कुणांत जीव गुंतला...

'दुपारच्ये ऊन' : पृ. ३८

पहाड इथले मुके दिवस आंधळा कीं जसा
अभंग तिमिरांतला तडत चालला आरसा
तसा सहज नाचतों कधि न बांधिलीं पैंजणें
जशा धुळितल्या दिशा भुलुन गाय जी हंबरे...

'संयोगिनी' : पृ. ४२

उभे धराया मला पुरांतुन सूर समाधी ल्याले
हृदयांमधलें अमृत प्याया मरण कोठवर आलें...

'मरण' : पृ. ४४

माझ्या हातुन मुठभर माती अवकाशावर पडे
घरांघरांना मरणफुलांची गंधित भूल पडे...

'भूल' : पृ. ४५

संध्याकाळीं मुका उभा मी मला सतीचा शाप
कुठें पाहतो ? अस्थींवरती सरसर चढती साप...

'शाप' : पृ. ४६

ग्रेसची कविता, जगण्याचा अर्थ, जीवनातून तर शोधतेच खेरीज जगण्याच्या दु:खातून शोधू पाहताना दिसते. दु:खाची खोलवर बोच व खोलवर जाण, ग्रेसच्या अतिशय तरल भावविश्वाच्या मुळाशी आहे.

ग्रेसच्या कवितेत मरणविषयक जाणिवा वारंवार येतात, याचा अर्थ ग्रेस यांना मृत्युविषयी ओढ किंवा आकर्षण वाटते असा होतो का ? मला तसे वाटत नाही. मृत्यू म्हणजे नाईलाजाने स्वीकारावी लागणारी जीवनांतक अवस्था अशीच ग्रेस यांची भावना आहे. '' मी जसा बर्फातून आलो, तसाच बर्फातून जाईन; रात्रीच्या शेवटच्या प्रहरातील रहदारीसारखा '' असे ग्रेस म्हणतात. हे मरणासंबंधीचे आकर्षण नसते तर एका अटळ अवस्थेचा अगतिक थंडपणाने केलेला स्वीकार असतो. जीवनावर विलक्षण प्रेम करणाऱ्या या कवीला मरणाचे आकर्षण तर नाहीच; पण मरणाविषयीच्या त्याच्या सर्व प्रतिक्रिया जीवनाच्या संदर्भातच व्यक्त होत असतात. '' [३९]

– जीवनाच्या मूलभूत पातळीवरील अस्तित्वाचे अंग ढवळून काढणाऱ्या आणि अर्थसंघटनेने अस्तित्वाच्या समस्येशी सामोरे जाणाऱ्या ग्रेसच्या कवितेत मरणाचे उल्लेख विपुलतेने येतात. प्रा. सरदेशमुख सांगतात, ''मरणाचेही तसेच. त्याचे इतके विपुल पण तरंगते उल्लेख या कवितातून येतात की वाटावे, हा नुसता संवेदना–शून्य, पुन:पुन्हा येणारा उच्चार तर नाही? भाविकाने ओढलेली ' राम - मरा 'ची जपमाळ. ' घुमे मरणगंध हा ' असा नाद + घराण यांची युती सांधणारा एक विचित्र प्रतिमासंकर ग्रेस योजतात : घराघरांना मरणफुलांची गंधित भूल पडते : ' मरणाच्या हिरव्या राशी ' पायावर येऊन पडतात : ' हृदयामधले अमृत प्याया मरण कोठवर आलें ? ' असा प्रश्न केला जातो. मरण हे जीवनाच्या डहाळीडहाळीतून उमलणारे फूल होते. गंधयुक्त , म्हणून मोहनिद्रेचे आवाहन दु:खाला प्रेमाचा पर्याय म्हणून आपलेसे केले असल्याने मरणाची भयकारिता सर्वस्वी निपटून गेलेली दिसते, ग्रेस यांच्या कवितात. ' मरणाचें स्मरण असावें': कशासाठी ? तर ते स्मरण इतर सर्व दु:खांना पोटात घालतें, आणि मरण ज्या अस्तित्वाचा नकार त्या अस्तित्वाच्या जिवंत क्षणास आपणास वंचित करीत नाही. युनामुनो म्हणतो: जीवनाच्या वैराणपणात प्रीती हेच एक सांत्वन. मरणावरचे एकमेव औषध. कारण प्रीती व मरण ही भावंडे होत. ग्रेसच्या पुढील ओळी पाहा:

---

३९. कित्ता : पृ. २२

...दुःखवादी तुझी आठवण...स्मशानाकडे जाणारी
...मावळतीच्या निवांत क्षितिजावर
दुःखाचे अभिजात शिल्प उभारशील का
पारदर्शक मरणांत ?
...मला मरण येऊं दे फिटत जाऊं दे वर्तुळे
जशा मिटत पापण्या फुलत आसवांचे मळे

मरण आणि दुःख (म्हणजे प्रीती) यांचा जोड-उच्चार ग्रेस देतात तेव्हा मरणाचे भय आणि प्रीतीचा उल्हास यांनी जणू परस्परांना छेद दिलेला असतो. नादाला सकंप पांगळेपणा, दृष्टीला अर्धामुर्धा आंधळेपणा, स्पर्शाला अचेतन शिल्पता जिथे भरपूर आहे असे संध्याकाळचे जग या कवितांतून साकार होत जाते. उदास व्याकुळतेने सर्व व्यापले आहे. पण त्यातही तीव्रतेचा अभाव आहे—त्या अनुभवाशी माधुर्य, उत्सव, अमलता, अभिजातता या संकल्पना निगडित झाल्या असल्याने, भीषणतेला असे टाळल्याने प्रसन्नतेला व मोकळेपणालाही साहजिकच ठुक्की मिळाली आहे. दुःखाचा आणि मरणाचा उच्चार वारंवार असूनही त्याला विविध काकुस्वरांचे आलंबन नाही. त्यामुळे त्यात एकसूर आहे." ४०

—अर्थात असा एकसूर ग्रेसच्या 'मरणगंध'लाच आहे असे नसून 'संध्याकाळच्या कविता'त थोडचाफार फरकाने तो सर्वत्रच आढळतो.

'संध्याकाळच्या कविता' मध्ये प्रीतिभावनेचा झालेला आविर्भाव दुःखभावनेच्या रुपानेच झालेला आहे : प्रेम=दुःख असेच त्याचे स्वरुप आहे. प्रा. सरदेशमुख लिहितात, "...दुःखप्रत्यय हा ज्याचा एक अनिवार्य परिणाम आहे त्या प्रेमासंबंधी बोलताना ग्रेस 'दुःख' हाच शब्द योजतात. 'संध्याकाळच्या कविता' मध्ये प्रेम । प्रीती हा शब्द कोठेही येत नाही, हे केवढे आश्चर्य ! ग्रेस यांना प्रेमाविषयी काहीही लिहायचे नाही काय ?

'दुःखाचे बन' उधळले जाते आणि घरात 'अधरविणेच्या मधुधारा' ओघळतात ! 'स्मरणाचा उत्सव' घेऊन दुःख घराला येते. दुःखाशी 'पैंजणी रात्री,' 'स्पर्शमय वर्तुळें' आणि 'अभिजातता' संगत होते ! दुःख 'अमल' असते. त्याचा 'बहर पिकतो.' ते 'दिलासा' देते. त्याच्या तंद्रीला अमृतत्व आहे. ते 'व्रतस्थ,' 'इनाम' दार, 'समर्थ' आणि 'वैभव' शाली असते. हे दुःख म्हणजे प्रेमदुःख आहे. किंवा, प्रेमच नुसते.

---

४०. कित्ता : पृ. ३५/३६

'प्रेम' या शब्दाची संपूर्ण उचलबांगडी करून त्याचा परिणाम। प्रत्यय मात्र विविधांगांनी द्यायचा, असे ग्रेस यांनी वेगळे काही करून दाखवले आहे. येथे दुःख नुसते जळणारे वा जाळणारे नसून स्वत्वाला पक्वता देणारे चैतन्य आहे. जणू पृथ्वीला सूर्यप्रकाश. दुःखाचा शोकानुभवाशी संपर्क असलेला नित्याचा अर्थच येथे पार बदलून गेला आहे. दुःख केवळ एक जीवनानुभव. अढळच नव्हे तर अगत्याचा. त्यावाचून जीवनाला अर्थ सापडता सापडत नाही.

दुःखाची कोणाला हाव असते असे नाही. प्रेमाची सर्वांनाच असते. प्रेमाची हाव दुःखाला बोलावणे करतेच करते. अश्रू ढाळण्यात गोडी नसूनही 'धुकें दाटणें,' 'उरीं फुटणें' वाटयाला येते, तेव्हा 'गहन गारठ्याची झळा' ('माझ्या प्राक्तनाचे रंग बांधणारा बर्फाचा पाऊस' – त्याचा हा गारवा) सोसावीच लागते. दुःखात साथ करणारे ('सगुण वृक्ष') फाटलेल्या आकाशाच्या दिशा सावरून आपल्यावर ओणवतात, रक्षणार्थ. पण लौकिक-अलौकिकाच्या किंवा भौतिक-अध्यात्मिकाच्या भेटीचे संकेतस्थान असलेले आपले मन तोवर प्रकाशहीन होत जाते, ('क्षितिज–दीप मंदावला,') आणि जीवनाचा ओघ व्यथेच्या पावलांनी वळणे घेतो. मधूनच चेतनेची, उल्लासाची एक उबदार लहर तरळते, पण कशी बावरल्यासारखी! उन्हे केव्हाच वेचून झाली . . . गतकालाची गोष्ट ती! चंद्रही ढळून प्रहर झाला. वर्तमानात अंधार भरू लागतो. कळसाचा दगड उभा होता होत नाही. दृष्टीला अंधता येते. हृदयाची सर्व कंपने ओंजळीत जमा होतात. . . तळहातीच्या वस्तूला अनुभवायला दृष्टीचा अभाव जणू अडथळा करीत नाही. देहातला (म्हणजे बाहेर भौतिकात साठून राहिलेला) मरणगंध हृदयाला व्यापतो. आणि सगळी चेतनाच त्या मरणचिंतनाने घुमत आहेसे वाटते."[४१]

'संध्याकाळच्या कविता' मधील काही कविता रतिभावनेचा आविष्कार करीत असूनही मूलतः त्या दुःखानुभवाचाच वेध घेताना दिसतात. ग्रेसच्या रतिभावना भोवती दुःखभावनेचे कडे आहे; आणि ते स्थूलपणे इंद्रियनिष्ठ आहे : इथे भावनेचा उचंबळ, स्मरणाची व्याकुळता असे काही नाही. प्रेम, दुःख, भक्ती, ईश्वरशरणता अशी काहीशी तिची वाटचाल आहे. त्यात मानवाच्या अस्तित्वाच्या शोधाची एखाददुसरी रेषा हाती लागते असे कवीला वाटते. 'हाक' त्यासाठी घातली जाते:

धुकें अतुट दाटलें नसुन आसवांचा लळा
उरीं फुटुन पेटते गहन गारव्याची झळा

---

४१. कित्ता : पृ. ३५ व ३७

दिशा धरून वांकले सगुण वृक्ष दुःखांतले
दिसे इथुन दूरचा क्षितिज दीप मंदावला [४२]

'सुसाट पारवा' मग रक्तवाहिन्यांतून उडतो. 'वहार' मध्ये कवी गातो :

... ऐकतों कुठेंतरी तमांत झांकलीं घरें
दिशादिशांत गात हा फकीर एकटा फिरे
पहाड शब्द वेढती तसा सतंद्र गारवा
नि रक्तवाहिन्यांतुनी उडे सुसाट पारवा...
तुझी वहार मंदशी तृषार्त जाग ये जरी
वेदनेंतली फुलें नि चांदण्यांतल्या सरी... [४३]

'संध्याकाळच्या कविता' मधील काही प्रेमविषयक कवितांना 'मी–तूं'चा जसा पदर आहे, तसाच आध्यात्मिकतेचा आणि क्षयी आईच्या, जीवन उध्वस्त करणाऱ्या मृत्युच्या वेदनेचाही पदर आहे. मात्र यातला 'मी–तूं' स्पष्ट जाणता, ओळखता येतोच असे नाही. त्याची रूपे नेहमी बदलणारी आहेत. 'उर्मिला', 'उर्मिलेच्या कविता,' 'चुडा', 'साजण,' 'सांज,' 'पाऊले' अशा काही कवितांचा, त्यादृष्टीने निर्देश करता येईल. [४४]

---

४२. कित्ता : पृ. ५१
४३. कित्ता : पृ. ३८.
४४. 'उर्मिला' : पृ. ६५

देहास आठवे स्पर्श
तूं दिला कोणत्या प्रहरीं
कीं धुकें दाटलें होतें
या दग्ध पुरातन शहरी...

या हातानें स्तन गोंदून घे लाव मंदिरीं दिवा
फूल होउनी अंधाराचे गळुन पडे काजवा...
तूं मरणावर मग रेखावें प्राक्तनगंधी मोती
कीं डोहांवर किणकिणते गे शतजन्मांची भीती...
असुन तुझा मी तुझी दूरता . . . तुला झाकितो काल
सांग ऊर्मिले, कुणी बांधिले नयनीं चंद्रमहाल ?
रंग उदा की उभा उदासिन महामेघ क्षितिजांत
पायाखालीं वाळवंट मग उगवत ये निमिषांत...

असे हे उदास, व्याकुळ 'शिल्प' लौकिक पातळीवर दुःखभावना–प्रीतिभावना– आणि त्याचबरोबर अलौकिक पातळीवर अव्यक्त व्यक्तीशी संवाद साधताना आढळते. घरटे चुकलेल्या पाखरासारखे उन्मळून आलेल्या मनाची 'दुःखसावळी मिथिला,' त्यातून प्रकट होते. प्रा. सरदेशमुख म्हणतात त्याप्रमाणे "आईच्या स्मृतीचा, वेगवेगळ्या स्त्रीरूपांत आईच्या मानसदर्शनाचा एक ध्यास 'संध्याकाळच्या कवितां'तून निनादत राहिला आहे. हे कळल्याने कित्येक कवितांना अर्थाकार येतो हे मी पाहिले." [४५]

सारांशाने ग्रेसची कविता मातीचा लोभ आणि पृथक्त्वाची अहंता यामधील अस्पष्टतेच्या नात्यात रेंगाळत असून विरणाऱ्या धुक्यासारख्या शब्दांच्या

---

४४. कित्ता : (पुढे चालू)

लाव मंदिरीं दिवा परंतु सोड स्तनांची माया
मरणावांचुन आज सजविली मीच आपुली काया...

'उर्मिलेच्या कविता' : पृ. ७५

अशी ओल जातां तुझ्या स्पंदनांतून
आकांत माझ्या उरीं केवढा!
नभांतूनही मंद ताऱ्याप्रमाणें
दिसे कीं तुझ्या बिल्वरांचा चुडा...

'चुडा' : पृ. ३३

तुझा आला गे साजण
नको त्याच्यापुढें जाऊं
त्यानें यात्रेंत भेटल्या
कोण्या पोरीच्या देहाला
दिले आभाळाचे बाहू...

'साजण' : पृ. ४८

सांज घराला आली
कुरणांतुन फिरल्या गायी
नक्षत्र मिसळलें पाणी
कंठांतच गोठुन जाई . . . .

'सांज' : पृ. ७१

४५. कित्ता : पृ. ३८

साहाय्यात ती डुंबून गेली आहे. शब्दाकडून अर्थाकडे नव्हे तर आशयाकडून शब्दाकडे जाण्याने आणि वशेषत: 'चर्चबेल' च्या अभ्यासाने ती बरीचशी स्पष्टतर होते असे वाटते. माझ्यासाठी मी केलेला हा एक प्रयत्न होता. माझ्यापुरता तो लाभाचा झाला आहे.

आणखी एका दृष्टीने ग्रेसच्या कवितेचा विचार करता येईल: ग्रेसची कविता ही संध्याकाळची–आत्मदुराव्याची-कविता आहे. अनेक बाबींतून तो निघाला आहे आणि निरनिराळ्या परंपरागत प्रतिमांच्या साहाय्याने प्रकट झाला आहे. कवीच्या मनीमानसी खिळलेला आत्मदुरावा आणि त्याच्या प्रकटनाचे साधन प्रतिमा यांनी ग्रेसची कविता मढलेली आहे. त्यात आपल्या व्यथा-वेदनांचे निर्मितीत संक्रमण करण्याची ताकद आहे. जाळणारे एकाकीपण रडणारे नाही. दाह करणारा आत्मदुरावा तडफडणारा नाही. ग्रेसच्या आत्मदुराव्यात–एकाकीपणात–मानसिक अशांती, जीवघेणी अस्वस्थता आहे. 'निर्मिती' सारख्या काही कवितात, व्यक्ति-जीवनातील लाघवी क्षणांचा आढळ झाला तरी ग्रेससारख्या सृजनशील कलावंताच्या ठायी असणारी पूर्वोत्तर अस्वस्थता जाणवल्याखेरीज राहत नाही.

संध्याकाळसारख्या एका विशिष्ट उदास काळाशी बद्ध झालेल्या ग्रेसच्या कवितेत वेळेनेच बांधून धरलेली हुरहूर प्रकट झाली आहे. पृथक् अस्तित्वात ती उभी आहे: इतर आणि आपण यात व्यक्ती नेहमीच अंतर राखते. तशी ती स्वत:ला पूर्णत: कशातच कधी हरवून बसत नाही. ग्रेसचेही ते घडले आहे. ग्रेसच्या कवितेत, वेगवेगळचा वेळी प्रियकर आणि प्रेयसी परस्परांशी एकरूप होतात. पण दूर गेल्यावर ती वेळ, तो क्षण, तो प्रसंग त्यांना खायला उठतो. दाहक वाटतो. कारण पृथक् अस्तित्वाची जाण आणि आत्मदुराव्याची भावना हे आहे. एकत्र येऊन दूर जाणे आणि दुराव्यात स्मरणाशी एकरुप होऊन बसणे यात कस्तुरीच्या मातीवर उमटलेली राजहंसाची पाऊले स्मरणाच्या मुक्तीचा उद जाळीत असतात. त्यात गंध आहे पण दाहक उग्रताही आहे; हे सारे पुरते न जाणण्यातून उपजले आहे. पण जाणणे न जाणणे होवो अगर न होवो; क्षितिज सरकतच असते. ओळख हरवून बसलेली छायावेळ बुडत असते. तिच्याकडे पाहत बसणे बाकी राहते. या हुरहुरीबरोबरच उत्तानशृंगारामुळे निर्माण झालेला आत्मदुरावाही ग्रेसच्या कवितेत आहे. मीलनातील आनंद आणि विरहातली आर्तता दोहोंचा संयोग होतो, स्मरण जागे होते; उदवलेल्या केसाशी कवी एकरूप होतो. पण स्मरण क्षणकाल उजवले गेले तरी ते शाश्वत नसते, रिक्तता येते. अस्वस्थ अस्वस्थ व्हायला होते. 'दीठीवर नवा थेंब उतरत' असूनही अस्वस्थता संपत नाही.

अगदी निसर्गाशी एकरुप होऊनही संपत नाही. ग्रेसची कविता विशिष्ट वेळ नव्हे तर विशिष्ट भावस्थिती रंगवते. निसर्गचित्र नव्हे तर निसर्गाच्या मार्गातून आत्मदुराव्याचे दुःख उराशी ठेवून वागते. क्षणकाल कुणीच सखा नाही असे मानते. एकटे एकटे, उदास उदास समजते. त्यातून दृश्य जगताच्या व इंद्रियानुभूतीच्या पलीकडल्या जगावर कवीचे लक्ष जाते. शेवटी हे जगही शाश्वत नसल्याने लक्ष खिळून उपयोग काय? असा प्रश्न पडतो. सारेच आलंबनविरहित–अवचित, अगांतुक–उपटलेले वाटते. डोळे नसलेल्या संवेदनाशून्य त्वचेसारखे उभे शरीर बधिर होते, बनते. 'काही नव्हेच. सारं खोटं. हे खोटं. ते खोटं; आपण सारेच खोटे,' अशा विचाराने मन सांदळते. कवी लिहितो :

क्षितिज जसें दिसतें,
तशीं म्हणावीं गाणीं
देहावरची त्वचा आंधळी;
छिलून घ्यावी कोणी.

पण संध्याकाळच्या वेळेला गायीच्या हंबरण्याने कवीला आईची आठवण येते. तो अलगद भरून येतो; चित्र निसर्गाचे पण माणुसकीने माखलेले. कवीला जीवन-गतीची प्रेरणा प्राप्त होते. निसर्गाचे मानवी भावनेत रूपांतर होते. केव्हा आणि कसे होते हे कळतही नाही. मनात दुःखाचा मंद सूर मात्र हेलावत असतो. त्या दृष्टीने 'पांढरे हत्ती' चिंतनीय कविता आहे. संध्याकाळवरोबरच दुपारच्या मृगजळाचा कवीला मिळणारा दिग्भ्रम प्रत्यय, क्षणभंगुरत्व मानूनही जीव गुंतवून ठेवायला मदत करतो. प्रासंगिक का असेना, जगण्यातील निरर्थकता मागे सरते: निव्वळ शारीरिक दुःखकळांना विशेष किंमत मिळत नाही. इन्ग्रीड बर्गमनसारखी विश्वविख्यात अभिनेत्री ज्या निरर्थकतेने ग्रासून जाते, नेमकी तीच व्यर्थता कवीला जाणवते. सॉमरसेट मॉमने म्हटले आहे :'It is not a tragedy that men become old or die but cease from love.' कवीने ते उद्धृत केले आहे. ग्रेसच्या दुःखाच्या गंगोत्रीचा तो उगम आहे. आयुष्य आयुष्यच नाही. तो आहे एक भास; भासाला भासाचेच मूल्य असणार आणि तेही अशाश्वत राहणार; म्हणजे उत्सवाची यात्रा थंडावणार; हे स्पष्ट आहे. दुःख मरणाचे नाही. कवीची ती वृत्ती आहे. मरणातून सृजन होते, आणि सृजनाच्या पूर्णावस्थेपाशी मरणाचा पूर्णविराम असतो; याची जाणीव कवीला आहे. त्यामध्ये उत्फुल्ल सृजन आणि त्याचे मुरझणे यांच्या दर्शनाने येणारे व्याकुळपण आहे. ही व्याकुळता दुःखच आणणार, व आणते. अर्थात त्याबद्दल कवीच्या मनात भीती नाही. भीती नाही म्हणजे दुःख आले. हे दुःख्ख दुःख्खच ठरत असले तरी दुःख्ख दुःख्ख उरत नाही. पण त्यातून

उद्‌भवणारे एकटेपण व्याकुळता आणून पोचविल्याखेरीज राहत नाही. ' दुःख घराला आले ' मध्ये कवी सांगतो :

नाहींच कुणी अपुलें रे
प्राणांवर नभ धरणारें
दिक्काल धुक्याच्या वेळीं
हृदयाला स्पंदविणारें ...

हे एकाकीपण सांदवून टाकते. सांदळते. कुणाच्या तरी सहानुभूतीची गरज असते. पण ही सहानुभूती भरीव लागते, पोकळचा उपयोग नसतो. त्याने पोकळीच निर्माण होते. तशी गरजच नसल्याने ती मिळाली काय नि न मिळाली काय, फिकीर करण्याची जरुरीच पडत नाही. सारे निरर्थकच झाल्यावर– किमान काही क्षणकाळ का होईना तसे वाटत राहिल्यावर– कशाची तरी फिकीर का आणि कशासाठी वाटावी ? त्यालाही एक कारण आहे : या दुःखातून पुढच्या दिशेचे सूचन होते. ' बहार ' मध्ये कवी म्हणतो :

दुःख लागतां मला सभोंवतीं जसें जसें
दयार्द्र होऊनी तसें क्षितीज दृष्टिला दिसे ...

पण या साऱ्याच्या बुडाशी दुःखाचा महासागर उसळत असतो, हे विसरणे अशक्य होते. आयुष्यभर बांधलेल्या डोळ्यांवरच गांधारीने अश्रू गाळले– याहून कवीची वेगळी अवस्था नाही. अगदी अगतिकतेने, नाईलाज म्हणून विरक्तीचा भगवा रंग तो स्वीकारतो. काळातील माणूस नियतीच्या बाहूत किती गच्च खपून राहिला आहे, याचे वेगळे प्रमाण कोणते असेल ?

या आशयाला साथ लाभली आहे ती शब्दांची. ग्रेसच्या कवितेतील आशय पेलण्यास ग्रेसने निवडलेले शब्द अत्यंत समर्थ आहेत. त्यांचे अविभाज्य अनन्यत्व साधारण आहे. गणवृत्ते--जातीची निवडही विशिष्ट भावस्थितीची विशिष्ट लय साधण्यासाठी आहे. ही भावस्थिती मनाशी रुजून असल्याने सनातन स्वरूपाच्या लयीचा स्वीकार आहे. परंपरागत प्रतिमांच्या वापराइतकेच मर्ढेकरानंतरचे हे वेगळेपण ठळक आहे : त्यात नवीन जीवन आणि नवा अर्थ आहे. सुप्त, अर्धसुप्त, जागृत अशा तिन्ही अवस्थांचे चित्रण आहे. मात्र असंख्य हाकांचे आर्तपण प्रवाहाच्या फुंफाटपणाने येत असल्याने शब्दांच्या बिलोरी फेसात कवी फसल्यासारखे वाटते. हे आणि असे आणखी काही वाटते त्याची काही कारणे दिसतात. ती पुढीलप्रमाणे :

१. 'संध्याकाळच्या कविता' मधील अनुभवविश्व हे 'सबकॉन्शस् लेव्हल' वरचे आहे. बाह्यांगाच्या चित्रणात त्याला रस नसून भावस्थितीच्या मूल-स्वरूपाच्या जाणीवेच्या दर्शनात त्याला रस आहे. साहजिकच त्यामध्ये धूसर, अस्पष्ट, अधुरे वातावरण आहे.

२. ग्रेसच्या कवितेत खूप प्राचीन युगसमृद्ध अशा प्रतिमांची आरास असते. त्यातच समासांचे अनोखेपण आणि विशेषणांचा व्रात्यपणा यांची गर्दी असते. अनुभव किंवा आकलनाची कक्षा निरुंद असणाऱ्याना ते गूढ वाटते. अनाकलनीय होते. दुर्बोध वाटते.[४६]

३. ग्रेसच्या कवितेत अंतहीन प्रतिक्षा आहे. पण प्रतिक्षा कशाची? कुणाची? कशा करता? ग्रेस हे लपवतात. प्रतिक्षेचा शेवट कशात आणि तिचा उगम कोठे या गोष्टी प्रकट होऊ नयेत याची दक्षता घेतात. शिवाय ग्रेस यांच्या सगळ्याच कवितेत स्वत्वाला (आयडेंटिटीला) प्रदर्शित होऊ न देण्याचा एक अट्टाहास आहे. एखाद्या राजपुत्राने आपल्याच राज्यातून छुपी मुशापूरी करण्याचा छंद घ्यावा आणि सगळ्या मुलूखाला कसे चकवले यात आनंद मानावा तसे ग्रेस करू पाहतात.[४७]

आणि रसिकाला तर सगळे उलगडून हवे असते. तसे सारे समोर आले की, कलावंताच्या लेखनाचे सार्थक झाले असे मानण्याची प्रथा आहे. ग्रेसची कविता हे करीत नाही. त्यासाठी कलावंताला काही सांगणे इष्ट नाही, रसिकाच्या आकलनाची समज किती विस्तारते यावर सूर जमणे अवलंबून आहे. तो पावेतो संदिग्धता, धूसरता, दुर्बोधता, अस्पष्टता याची मिळून झालेली कोंडी अनुभवाचा प्रवाही सहजपणा भोवंडून टाकते.

४. 'संध्याकाळच्या कविता' प्रायः पार्थिव आणि अपार्थिव अशा मिश्र पातळ्यातून निर्माण झाली आहे. त्यात अनुभवांनाच लयरूप मिळते. कविता गेय होत जाते. लय आणि अनुभव यांच्या कमालीच्या एकात्मतेत त्यामधील नाट्यरुप अंग काढून घेते आणि परिणामाची एकरुपता निसटते. ग्रेसच्या या लयविषयक आसक्त निर्मितीमुळे शब्द थकल्यासारखे वाटतात, आशय घुसमटल्यासारखा वाटतो, सूनसान सूर मनावर तरंगत–तरळत राहतो पण रसिकाच्या मनांत कविता

---

४६. कित्ता : 'सत्यकथा' : मार्च, ७४ : पृ. २९ : व एप्रिल, ७४ : पृ. ३४

४७. कित्ता : एप्रिल, ७४ / पृ. ३० व ३२

वितळत नाही. मग ती कशी आहे ? कुठे आहे ? कुठे चालली ? असा संभ्रम पडतो. पुनः प्रश्न आकलनशक्तीशीच निगडित होतो.

५. 'संध्याकाळच्या कविता' तून काही गोष्टी जाणवतातः तोंडवळणी पडलेली लय आणि शब्दावर असलेली थोडी हुकमत यांच्या साहचर्यातून कवितेच्या निर्मितीचा आभास, अनुभूतीच्या अंगाने प्रतिमांचे मुक्तभ्रमण असे न होता प्रतिमासाठी अनुभूती अशा उलटचा प्रवासाची शंका, वात्सल्यरूप प्रेमाची संगती, 'इंद्रियसंवेदनांद्वारा अज्ञानाचे सारे रुपरस अनुभवास' आणून देण्याची रीत आणि 'या अनुभवक्षेत्राची अपूर्णता आणि संस्कृतिजन्य रुळलेपणा', स्वतः कवीला असलेली 'अभिव्यक्तीतील धूसरपणाची जाणीव', 'एखाद्या ज्वलंत विचारधारेचा पाठिंबा' सारख्या तात्कालिक अनिष्ट प्रभावाच्या अपमर्यादा, वृत्तांमधून कलात्मक सामर्थ्याचे विपुल लेखन करण्याची कवीची (आजच्या काळाला विसंगत) प्रवृत्ती, विशुद्ध भावकवितेची जातकुळी सांगणारी ग्रेसची कविता – अशा काही गोष्टी आहेत. त्याचे बरेवाईट परिणामही आहेत.

'संध्याकाळच्या कविता' मधील ग्रेसची भावसृष्टी अनन्यपरतंत्र अशी आहे. त्यात धोके, उणीवा जरुर आहेत. परंतु श्री. वामन इंगळे यांनी सांगितल्याप्रमाणे, "... ... ... ग्रेस संध्याकाळचा राग छान गाऊन गेले आहेत. अर्थातच नव्या रागाच्या वेळी आधीचे स्वर दरवळत राहातील. त्या स्वराची मोहिनी ग्रेस डोळसपणे बाजूला सारू शकले तर एका मोठ्या कवितेची निर्मिती अपेक्षित आहे. ग्रेस मनाच्या स्पंदनातून अस्तित्वाचा शोध घेतात. परंतु ज्या दिवशी त्यांना परिस्थितीच्या चक्रात सापडलेल्या नाट्यात्म अस्तित्वाची जाणीव होईल, त्यादिवशी ग्रेसचा अस्तित्वशोध पूर्ण होऊ शकेल."[४८] कारण रसरशीत प्रतिमा वर्षावाने अपूर्व, अलौकिक, अस्पर्श्य पातळीवरील अनुभवगम्य अर्थाचा धांडोळा घेणारी ग्रेसची उभी कविता ही मानवी जीवनाची विराणी आहे.

अर्थात जीवनाच्या राग–रंगात तृप्त होऊ इच्छिणाऱ्यांनी, गर्भ गांधारीच्या वेदनेने काव्यात्म चैतन्यपूर्ण अभिजात शिल्पाची वाट पाहिली पाहिजे. त्याचेही कारण हे आहे की अंतिम विश्वसत्याशी असलेल्या नात्याची नाळ ग्रेसची संध्याकाळ शोधू पाहते आहे आणि हे सोपे नाही. अवघड आहे.

---

४८. 'सत्यकथा' : सप्टें, १९७० : 'संध्याकाळच्या कविता' : पृ. ५१

१९६४–६५ मधली गोष्ट. सातारच्या 'रजताद्रि' हॉटेलसमोर उभे राहून अण्णा भाऊ साठे उभ्या उभ्या बोलत होते: "तर त्याचं काय आहे ... हं ... कोण बरं ती बाई ? ... जिनं तो इतिहास ... मराठी कादंबरीचा इतिहास ... लिहिला ... काय वरं नाव तिचं ? ... डोळ्यासमोरच आहे हो" ... अण्णा भाऊंच्या आठवणींचा पडदा पकडून मी म्हटले होते: "त्या कुसुमावती देशपांडे ...

अण्णाभाऊनी हातावर टाळी देत म्हटले होते: "हां ... बरोबर बघा. तीच ती तुमची देशपांडे ..."

"काय केलं देशपांडचानी अण्णा भाऊ ?" मी सहज विचारले.

"अहो, काय केलं काय विचारता ? या बाईनं तो इतिहास लिहिला...."

"मराठी कादंबरी : पहिले शतक १८५०-१९५० ( पूर्वार्ध व उत्तरार्ध )" मध्येच मधल्या जागा मी भरून काढल्या.

"हं तर तोच ... काय तो इतिहास पण बघा, एवढा मोठा इतिहास लिहिला, बरा लिहिला, चांगला लिहिला असं पुण्या-मुंबईकडं विव्दान साहित्यिक बोलतात. पण बाईला आमची एकही कादंबरी दिसली नाही. आख्खा इतिहासात चुकून नावसुद्धा नाही. हे असं आहे." अण्णा भाऊ हे बोलताना, त्यांचा आवाज कातर

## आठ अण्णा भाऊ साठे :
## बिनहत्यारी लढाऊ जनतेचा शाहीर

झाल्यासारखे मला वाटले. डोळचात विलक्षण विषण्णतेची गडद छाया तरळून गेल्याचा भास झाला. अण्णा भाऊंची व्यथा जाणवली.

१९६४–६५ मध्ये, केव्हातरी अण्णा भाऊ सातारला आले होते. सोबत शाहीर गव्हाणकर आणि इतर अनेक मंडळी होती. सातारच्या हजेरी माळावर 'फकिरा' च्या चित्रीकरणासाठी तळ पडला होता. 'फकिरा' मधील ब्रिटिश सोल्जरांच्या प्रसंगासाठी एन. सी. सी. मधील कॅडेट्स् हवे होते. म्हणून छ. शिवाजी कॉलेजच्या आम्हा एन. सी. सी. अधिकाऱ्यांशी शाहीर गव्हाणकरानी संपर्क साधला होता तर त्यावेळचे साताऱ्याचे कलेक्टर एम. ए. देशमुख यांना चित्रीकरणाच्या परवानगीच्या पूर्वी मूळ 'फकिरा' कादंबरी वाचण्याचा सोस सुटला होता; म्हणून अण्णा भाऊनी मला गाठले होते. त्या अनुषंगाने गाठीभेटी, चर्चा विनिमय घडत राहिला. प्रा. कुसुमावती देशपांडे यांच्या 'मराठी कादंबरी' मधील स्वतःचा अनुल्लेख, अण्णा भाऊंच्या बोलण्यातून अशाच प्रसंगाने उभारून आला. अण्णा भाऊंची ही व्यथा कथा मात्र बनून राहिली नाही.

अण्णा भाऊना हे जाणवले कारण ते त्यामधील प्रमुख घटक होते. त्यांच्याशी हे सारे अगदीच निगडित होते. पण निगडित नसूनही अण्णा भाऊशी 'समभाव' राखणाऱ्यांनाही हे जाणवले नव्हते असे नाही. हे तसे जरूर जाणवले होते; मात्र त्याचा आविष्कार व्हावा तेवढ्या प्रभावीरीतीने होऊ शकला नाही. त्यांच्याही मुळाशी थोडीफार 'पांढरपेशी मनोवृत्ती' कुठेतरी तरळत होती हे विसरून चालणार नाही. हे असे का झाले ? का घडले ? कालानुसार निर्माण होणारे साहित्य संप्रदाय, ते प्रस्थापित करीत असलेली वाङ्मयीन मूल्ये यांच्या सरभेसळीत आवश्यक ठरणाऱ्या विवेकाने दगा दिल्याने हे सारे घडले हे स्पष्ट आहे. या स्पष्टतेत उच्चभ्रूंचे साहित्य, त्यांची कलाविषयक कल्पना व मूल्ये यांचा विचार आग्रहाने अंतर्भूत होणे हे ओघानेच आले. खरे तर कालानुसार साहित्य संप्रदाय निर्माण होत असतात. वाङ्मयीन मूल्ये स्वीकारली जातात; म्हणून आग्रही वृत्तीला तिथे जागा नसते. अमूक एक प्रकारचे साहित्य हेच साहित्य, तसे नसेल तर नव्हे. अमकी अमकी चौकट, त्यातच सारे साहित्य बसते, नसले तरी ठोकन ठोकून बसविले पाहिजे; असा आग्रह अनाठायी यात शंका नाही. साहित्य हा चैतन्यपूर्ण जीवनाचा, मानवी आत्म्याचा प्रकट हुंकार आहे. तो चौकटीत असेल अगर चौकटीच्या बाहेर असेल; नेमका कशात असेल–बसेल हे सांगणे शक्य नाही. स्वसंवेद्य, स्वरचित, स्वयंपूर्ण चैतन्यशीलतेच्या अवतीभवतीच्या बंधनांचा विचार कसा करता येणार? ते शक्य नसते. पण प्रस्थापित साहित्य संप्रदाय नेमके तेच

करीत असतात. मग स्वत:ला न्याय्य व दुसऱ्यालाही न्याय्य करण्याच्या आविर्भावात अन्याय्य करून मोकळे होत असतात. अण्णा भाऊंच्या बाबतीत हेच घडले. उच्चभ्रूंच्या प्रस्थापित साहित्य संप्रदायाने नवी म्हणून काही वाङ्मयीन मूल्ये, आकृतीबंध, नव्या जाणिवांचे मानसशास्त्रीय संशोधन, नेणीवेचे रेखांकन, कलेचे तलस्पर्शी दर्शन इत्यादी स्वीकारली त्याबाबत आग्रही वृत्ती राहिली. परिणाम असा झाला की अण्णा भाऊ (आणि तत्सम अनेकांचे) साहित्य उल्लेखनीय ठरले. उल्लेख करावाच लागला तेव्हा ते अ-कलात्मक म्हणून बाजूला सारले गेले. पण एखादा साहित्य संप्रदाय प्रस्थापित करीत असताना किंवा होत असताना त्याबाहेरही काही राहून आपले प्रभुत्व प्रस्थापित करीत असते, त्याचाही एक साहित्य संप्रदाय स्थापित होऊ शकतो; हे एका बाजूने विसरले गेले तर दुसऱ्या बाजूने कालानुसार कलामूल्ये बदलली तरीही वाङ्मयाचे म्हणून एक शाश्वत मूल्य आहे, हे अमान्य करता येत नाही. हे नामंजूर करण्यात आले. परिणामी अण्णा भाऊसारखे साहित्यिक उपेक्षित राहिले. 'व्हाईट कॉलर' टीकाकारांना उल्लेखनीय वाटले नाहीत. एकूणच मराठी समीक्षा मागे-पुढे किती आहे, त्याचे हे प्रमाण आहे.

पण अण्णा भाऊनी आपला सूर बदलला नाही. कथा-कादंबऱ्या इत्यादी वाङ्मय लिहिले. सातत्याने व पोटतिडकीने लिहिले; पैसा हवा होता म्हणून लिहिले. दुसऱ्या प्रकारचे लिहिणे अर्थातच हीण मिसळल्यागत आहे. पहिले सकस आणि अव्वल आहे; विशिष्ट ध्येयाने प्रवृत्त होऊन ते लिहिले आहे; म्हणून ते महत्त्वाचे आहे. विपुलता हे वाङ्मयीन गुणवत्तेचे लक्षण नाही; पण या विपुलते-अविपुलतेमागील दृष्टी महत्त्वाची आहे. अण्णाभाऊंच्या जवळ अशी विलक्षण पोटतिडिकेने सळसळणारी ध्येयदृष्टी आहे. आतडी पिळवटून यावीत, तटातट तुटावीत, मस्तक चक्रावून जावे, उभे जीवनच बेहोश व्हावे; अशी दारूण परिस्थिती या ध्येयदृष्टीने नजरेखालून घातली आहे. त्यातून अण्णा भाऊंच्या साहित्याने ठसकेबाज पीळ घेतला आहे. बाभळीच्या गाठीगत रूप मिळविले आहे. हा पीळ सुटतो आणि रूप निदर्शनास येते, ते अण्णा भाऊंच्या संबंधात दोन प्रश्नांची उत्तरे घेण्याने ! ते असे :

१. जीवनाकडे पाहण्याची अण्णा भाऊंची दृष्टी कोणती आहे ? आणि
२. अण्णा भाऊनी लिहिले ते का लिहिले ? कुणासाठी लिहिले ?

तसे पाहता हे दोन्ही प्रश्न परस्परावलंबी आहेत, परस्परपूरक आहेत. एकमेकात ते असे गुंतून गेले आहेत की त्यांचा वेगवेगळा विचार करणे काहीसे जिकीरीचे ठरणारे आहे. कारण अण्णा भाऊनी जीवनमूल्ये आणि कलामूल्ये यांचा समन्वय वाङ्मयीन कलाकृतीत घालण्याचा प्रयत्न सतत केला आहे.

अण्णा भाऊनी काही जीवनमूल्ये मानलेली आहेत. कुणी काहीही म्हटले, मानले तरी अण्णा भाऊंनी आपली जीवन-मूल्ये सोडलेली नाहीत की टाकलेली नाहीत. अण्णा भाऊ कम्युनिस्ट आणि त्यांच्या विचारसरणीशी काही ही मूल्यकल्पना सुसंगत नाही. जीवन-मूल्ये वगैरे कल्पनासंबंधी कम्युनिस्ट काय मानतो? तो मानतो ते असे : ''जीवनात अनादि, अचल अशी मूल्ये मुळीच नसतात, कारण खुद्द जीवन हेच अनादि अगर अचल नसते. आजपावेतो मानवी जीवनाने जर सर्वात मोठा ध्यास कशाचा घेतलेला असेल तर तो भौतिक वस्तू मिळविण्यासाठी झगडण्याचा; जीवन शक्य करण्यासाठी-जीवन जगवून ते वाढीस लावण्यासाठी – झगडण्याचा. या भौतिक वस्तू, ही भौतिक मूल्ये निर्माण करावयाची व वाटून घ्यायची यासाठी युगायुगातील स्त्री-पुरुषांनी एकमेकांशी सामाजिक नाती जोडली; आणि ती अशा रीतीने जोडली की, जेणेकरून आपल्या भौतिक सुखसोयींची वाढ व्हावयाला मदत व्हावी. या सामाजिक नात्यातूनच दरेक युगामध्ये स्त्री–पुरुषांच्या नैतिक व नीतीशास्त्रीय, भावनात्मक स्वभावविशेषांची जोपासना झाली. प्राथमिक गणसमाज, गुलाम समाज, सरंजामी समाज, भांडवल–शाही समाज व सोवियत समाज असे समाज स्त्री-पुरुषांनी मानवी इतिहासाच्या वेगवेगळ्या युगात स्थापन केले. या समाजातील सामाजिक नाती-वर्गीय नाती-ही आपापल्यापरी वेगवेगळ्या नैतिक व भावनात्मक स्वभावविशेषांनी युक्त अशी आहेत. जेव्हा एकंदर समाजाच्या भौतिक सुखांची वाढ प्रचलित सामाजिक नात्यापायी अडून राहते मग ही नाती गुलाम व मालक अशी असोत, भूदास व जमीनदार अशी असोत, कामगार व कारखानदार अशी असोत आणि जेव्हा दलित व पिळली जाणारी जनत या अडचणीतून बाहेर पडायचा मार्ग शोधू लागते, तेव्हा ती नवी मूल्ये, नव्या भावना, नवी सत्ये, नवी वास्तवता निर्माण करते. जुन्या नात्यांना उचलून धरणारे हे प्रतिगामी ठरतात; बदललेल्या अगर बदलणाऱ्या नात्यांचे पवाडे गाणारे हे प्रगतिशील-पुरोगामी-ठरतात. सामाजिक इतिहासाचा हा एकच एक शास्त्रीय सिद्धांत आहे.

खरे जीवनदर्शन ते हेच आणि म्हणून खऱ्या कलेचे मोजमाप करायला मान-दंड हा एकच. मात्र त्या त्या युगातल्या कलाकृतींचे, आपापल्या काळातल्या दलितांचे व पिळल्या जाणाऱ्यांचे राजकीय व आर्थिक कार्यक्रमांचे जाहीरनामे फडकावले तरच ती कलाकृती प्रगतिशील व त्या युगाची खरी प्रातिनिधीक होऊ शकते असा याचा अर्थ नव्हे. जी कलाकृती आपापल्या युगातल्या 'सत्या'शी, 'वास्तवते'शी 'मानवतेशी' खरोखर समरस होते, ती आपला आविष्कार करण्यासाठी. आपली स्वतःची स्वतंत्र रीत ती शोधून काढते, आपापल्यापरी स्वतंत्र रूप धारण करते.

जी कलाकृती अशी समरस होत नाही, जीवनाच्या वास्तवतेपासून स्वतःची फारकत करून घेते, तिला उतरती कळा लागते, ती पोकळ ठरते.''१ यामधील शास्त्रीय सिद्धांत आणि तद्नुषंगिक विवेचन इत्यादीशी अण्णा भाऊ सर्वसाधारणपणे सहमत असले तरी जीवनात ते काही ठाम मूल्ये मानतात यात शंका नाही. अण्णा भाऊंच्यादृष्टीने ही मूल्येही अगदी स्पष्ट आहेत. ती अशी: देशाचे स्वातंत्र्य, स्त्रीचे शील, पुरुषाचा स्वाभिमान आणि मानवाची प्रतिष्ठा. याबाबत तडजोड नाही. कसनुसेपण नाही. तडजोड करू पाहतो तो नाहीसा होतो, इतिहास त्याला क्षमा करीत नाही. इतिहासाला ते साफसाफ नामंजूर असते. कारण यावर जीवनाचे 'अस्तित्व' असते, जीवनातील 'वास्तवता' निर्भर असते. देशाची मान मोडली, स्त्रीचे शील भंगले, पुरुषाचा स्वाभिमान खचला, माणसाची मानच मोडली तर ताठ मान कुणाची राहील? कशासाठी राहील? अण्णा भाऊंचा असा प्रश्न आहे.

या प्रश्नामागे विशिष्ट सूत्र आहे. अण्णाभाऊ व्यक्तीचा विकास पाहात नाहीत, तर समाजाच्या विकासाकडे लक्ष देऊन राहातात. व्यष्टीरूप नव्हे तर समष्टीरूपात ते साऱ्यांचा विकास पाहातात. कारण समाजाच्या विकासात व्यक्तीचा विकास असतो आणि व्यक्तीचा विकास म्हणजे त्याच्यामधील 'सत्' चा, 'ऋत' चा विकास; हा विकास व्यक्तीबरोबर समाजाला मोठे करतो. म्हणून व्यक्तीव्यक्तींचा मिळून बनलेला समाज गुणपूर्ण कसा होईल, कसोटीला कसा उतरेल याचा विचार अण्णा भाऊंच्या वाङ्मयात लहरत असतो. अण्णा भाऊंच्या कथा-कादंबरीतील एकही पात्र असे नाही की जे दुर्गुणी बनले आहे. उलट दुर्गुणी पात्रे सद्गुणी बनावीत आणि समाजाला उपयोगी ठरावीत असाच प्रयत्न आहे. या प्रयत्नात 'तरल' कला असलीच पाहिजे असा अण्णा भाऊंचा आग्रह नाही. प्रामुख्याने परिणामावर लक्ष असल्याने असा आग्रह ते धरू शकत नाहीत. साहजिकच सद्भिरूची, सत्प्रवृत्ती आणि सद्वर्तन इत्यादीकडे अण्णा भाऊंची धाव असते. ही धाव आपल्या पात्रांकरवी ते पुरी करतात. त्यातील काहीतरी समाजाच्या खालच्या तळापर्यंत झिरपत, पाझरत येईल असे मानतात. तशी श्रद्धा उराशी बाळगतात. या श्रद्धेपोटी अंतःप्रेरणेचा प्रबळ आविष्कार आणि नैतिक मूल्यांवर अपार निष्ठा आहे, हे स्पष्ट आहे. अशी अंतःप्रेरणा किंवा नैतिक मूल्ये वगैरे वगैरे कम्युनिस्टांच्या तत्त्वज्ञानात बसतात की नाहीत हा अण्णा भाऊंच्या दृष्टीने गौण प्रश्न आहे. अण्णा भाऊंच्या जगात-मनात ते सारे आहे. अण्णा भाऊ कम्युनिस्ट खरे; पण झापडे बांधलेले पोथीबंद कम्युनिस्ट

---

१. डांगे कॉ. श्री. अ.: 'वाङ्मय आणि जनता' : पृ. ७–८ )

नव्हते. कम्युनिस्टांची वाट थोडी बाजूला करून, थोड्या वेगळ्या वाटेने मनःपूत फेरफटका मारून येण्याचे स्वातंत्र्य ते जरूर घेतात. त्यामुळेच अण्णा भाऊंच्या साहित्यातून जनतेच्या-सर्वसामान्य माणसांच्या हृदयाचा व भवितव्याचा आविष्कार होताना दिसतो. नैतिकमूल्यांची जाण आणि जोपासना समाजाला मोठे करते, माणसाला थोर बनविते. अण्णा भाऊंच्या मनीमानसी हे सामर्थ्य बिंबले गेले आहे. त्यामुळे त्यांच्या कथा–कादंबऱ्यांची घडण त्या दिशेने होताना आढळते. सत्तू, चंदन, फकिरा, विष्णुपंत कुलकर्णी, व्यंकू अशी कितीतरी पात्रे उदाहरणादाखल पुढे करता येतील. ती केवळ सौंदर्यदर्शनाकडे नव्हे तर समृद्ध जीवनदर्शनाकडे जाताना दिसतात. म्हणून दिलेला शब्द पाळतात. त्यासाठी प्रसंगी प्राण गमावतात; एखाद्याचे पाठीराखेपण करताना हवी तेवढी संकटे उद्‌भवली तर ती निमूटपणे सोसतात, पण अन्याय, अत्याचार, इत्यादीवर तुटून पडतात. मागेपुढे काही पाहात नाहीत. या सगळ्या प्रक्रियेतून आदर्श जीवनव्यवस्थेसाठी, दलित जनतेच्या मर्म भेदक आक्रोशाचा आविष्कार होतो. गंभीर प्रकृतीचे अण्णा भाऊ शाहीरी पद्धतीने हा आक्रोश मांडतात. त्यामुळे तो गडद होऊन येतो. नितळ रूपामध्ये त्याचे निदर्शन क्वचित होते. पण जेव्हा होते तेव्हा ते नितांत आल्हाद देऊन जाते.

अण्णा भाऊंची प्रकृती शाहीरी आहे. लोकजागृती, लोकशिक्षण, त्यातून ईप्सित समाजरचना ही शाहीरी प्रवृत्तीची रग असते. अण्णा भाऊ त्याला अपवाद नाहीत. त्यात अण्णा भाऊ पडले कम्युनिस्ट. मात्र शाहीरी वाङ्मय आणि काही कादंबऱ्यांचा अपवाद वगळता कम्युनिस्ट अण्णा भाऊ क्वचितच भेटतात. अण्णा भाऊनी 'वैजयंता' च्या प्रस्तावनेमध्ये आपल्या लेखनामागची भूमिका विशद करताना म्हटले आहे: "जो कलावंत जनतेची कदर करतो त्याचीच कदर जनता करते हे मी प्रथम शिकून मगच लेखन करीत असतो. माझा देशावर, जनतेवर आणि तिच्या संघर्षावर अढळ विश्वास आहे. देश सुखी व्हावा, समृद्ध व्हावा, नि सभ्य व्हावा, इथं समानता नांदावी, महाराष्ट्रभूमीचे नंदनवन व्हावे अशी मला रोज स्वप्नें पडतात. ती मंगलस्वप्ने पाहत पाहत मी लिहीत असतो. केवळ कल्पकतेचे कृत्रिम डोळे लावून जीवनातील सत्य दिसत नसते. ते सत्य हृदयाने मिळवावे लागते. डोळ्यानं सर्वंच दिसतं परंतु ते सर्व साहित्याला हात देत नाही. उलट दगा मात्र देतं. माझा दावा आहे की पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती दलितांच्या तळहातावर तरली आहे. त्या दलितांचं जीवन तितक्याच प्रामाणिक हेतूने, निष्ठेने मी चित्रित करणार आहे नि करीत आहे." अण्णा भाऊनी त्याप्रमाणे लिहिले आहे. पण ते करताना पाहिले तसे लिहिले असे घडलेले नाही. सगळेच पाहिलेले असेही झालेले नाही. जे पाहिले ते जीवनस्पर्शी कलेच्या अंगाने

मांडले आहे; आणि जे पाहता आलेले नाही, पाहणे शक्य नाही ते 'जीवीच्या जिव्हाळ्याने' जाणून घेऊन रंगविले आहे. हे रंगविणे संकुचित अर्थाने दलितांपुरते मर्यादित नाही. साऱ्यांचीच मंगलस्वप्ने प्रामाणिक निष्ठेने पाहणारा अण्णा भाऊसारखा लेखक असा संकुचित असत नाही. साहजिकच अण्णा भाऊंच्या कथा-कादंबरीमध्ये प्रा. श्री. म. माटे यांच्या कथामधील विविध जातीजमातींच्या माणसांचा अव्याजमनोहर मेळावा उभा राहिला आहे. खचलेले, पिचलेले, दबलेले, मुरगळलेले, मरगळलेले, दडलेले, दडपलेले, काजळलेले, काळवंडलेले असे अनेक, अनेक रीतींचे उपेक्षित त्यात आहेत. अण्णा भाऊंचे त्यांच्याशी अलौकिचे अतूट नाते आहे. ही माणसे जातीधर्माने वेगळी आहेत, आचार-विचाराने निराळी आहेत; अण्णा भाऊंना ते माहीत नाही असे थोडेच आहे? पण त्यांच्या बाबतीत अण्णा भाऊंच्या ठायी एकच नाते आहे: ते आहे माणसाचे, माणुसकीचे. म्हणून त्यांना निर्मळ जीवनाचा लाभ घडावा, घडणे जरूर आहे; त्यांचा तो हक्क आहे, अशी अण्णा भाऊंची आच आहे. ही आच आहे ती, ती माणसे तशा विशुद्ध जीवनाची मागणी करतात म्हणून. परिस्थितीने या माणसांच्या भोवती काही कोंडाळे झाले आहे, काही कोंडीत पडून पिचू लागली आहेत, काही बुरी कृत्ये हातून घडली आहेत, घडताहेत; पण त्यांचा मूळ सत्प्रवृत्त आत्मा शाबूत आहे. अण्णा भाऊंचे आवाहन त्यास आहे. जसे ते पात्रांच्या कोंडीत अडकलेल्या आत्म्यास आहे तसेच ते बाहेरील जनसामान्यांच्या मळभ आलेल्या समजुतीसही आहे. परस्परांनी समजून घ्यावे, समजून रहावे, पराकोटीच्या सहृदयतेने आणि असीम सहानुभूतीने सामंजस्य घडावे अशी अण्णाभाऊंची धारणा आहे. त्या-दृष्टीने अण्णा भाऊंनी 'माणुसकीचा गहिवर' घातला आहे, 'उपेक्षितांचे अंतरंग' उकलून दाखविले आहे. वरवर पाहता अण्णा भाऊंनी आपल्या कथा-कादंबऱ्यांतून 'भावनांची मांडवी' सजविल्याचा भास होत असला तरी त्यामागे असलेले विचारांचे संघर्ष दुर्लक्षून चालत नाही. भावनेत ओघळणारे विचारात मात्र साफ कोरडे असे अण्णा भाऊंच्या कथा-कादंबऱ्यांचे एकूण स्वरूपच नाही. अण्णा भाऊंनी अशी कुठलीही 'बेइमानी' केलेली नाही. दलितांभोवती अक्राळ-विक्राळपणे पसरलेल्या परिस्थितीविरुद्ध त्यांनी जंग सुरू केलेले असल्याने अशी 'बेईमानी' खपणारी नाही. दलितांच्या जाणता-अजाणता, मूक-प्रकटपणे उभारलेल्या बंडातून अण्णा भाऊंच्या साहित्याचा जन्म झाला आहे. त्यामुळे त्यात समूहशक्तीला केलेल्या आवाहनाबरोबरच 'एतद्देशीयत्व' खच्चून भरले आहे. अण्णा भाऊंच्या बिनहत्यारी लढाऊ जनतेचे ते कवन आहे आणि श्रमजीवी जनतेच्या भावनारूपाचे दर्शन हा अण्णा भाऊंचा तर सोडाच पण एकूणच मराठी कथा-कादंबरीचा अभिमानबिंदू आहे. दोन बाप्पे आणि एक बाई, अगदीच

कंटाळा आला तर दोन बाया आणि एक बाप्या, त्यांची कुठेतरी, कधीतरी, केव्हा तरी धावतीपळती गाठभेट, भेटता भेटताच प्रेम बसणे, वाढणे; त्यांचे हे 'असे' पाहून तिसऱ्या कुणाला तरी हुक्की येणे, त्याने मध्ये 'पडणे', संघर्षाला सुरूवात, मग सवंग शृंगार, धावपळ, झटापट, अपघात-घात, थोडा पार्श्वभूमीदाखल सामाजिक–राजकीय 'कलर, अललडूरची भाषणबाजी, समाजवाद-साम्यवाद वगैरे चलनी नाण्यांच्या अंगाअंगाने अज्ञान, दारिद्र्य, पिळ-वणूक, अत्याचार, इत्यादीबद्दल काहीतरी बकवा, संकटे-अडचणी, झटापट, नष्ट होणे आणि शेवटी प्रेमगोंधळाची वस्त्रगाळ वर्णन बाकी राहणे; अशा डबक्यातून-अपवाद करून–अण्णा भाऊंनी मराठी कथा-कादंबरीला दूर सरकविले. त्याचे कारण हे की अण्णा भाऊंना माणसांचा आत्मा खिरवायचा नव्हता तर त्याच्या वर्धिष्णु इतिहासाकडे लक्ष ठेवून त्याला दिशेला लावायचे होते. याची सोबत करावयाची होती. अण्णा भाऊंनी ही सोबत पतिव्रतेच्या निष्ठेने केली आहे. जनतेच्या अनुरोधाने त्यांनी लिहिले आहे. स्वतःच्या चित्रणाच्या मनोभावनेच्या अनुरोधाने जनतेचा मुखवटा विदारलेला नाही. अण्णा भाऊना म्हणूनच आपल्या साहित्याला कोणती बिरूद्धे बहाल केली जातात याची फिकीर नाही.

अण्णा भाऊंचा जनतेवर माणसावर मोठा विश्वास आहे. हा विश्वास कसा मोजता येईल ? आकाश धरणी व्यापून उरणारा विश्वास आहे. माणसाच्या सृजनशीलतेवर त्यांची प्रगढ निष्ठा आहे. माणसाइतका दुसरा सृजनात्मा पाहिला नाही; असाच त्यांचा दावा आहे म्हणून माणूस वाढला पाहिजे, मोठा झाला पाहिजे ही अण्णा भाऊंची दृष्टी आहे. माणसाच्या वयाबरोबर संस्कृतीही वाढल्या खेरीज समाजाला भवितव्य नसते. म्हणून अण्णा भाऊंच्याच भाषेत सांगावयाचे तर, "आपण शाहीरगडी. पुरोहितपण करायचं माहीत नाही. त्यामुळं आपण आपल्या साहित्यात गाठी मारण्याच्या आणि गाठी सोडण्याचा प्रकार काही केलेला नाही." (या लेखाच्या प्रारंभी नमूद केलेल्या प्रसंगावेळच्या चर्चेतील संवाद) याचा अर्थ, अण्णा भाऊनी कलात्मकतेची बूज राखली नाही असे नाही. ती राख-ण्याचा प्रयत्न केला. कदाचित गंभीरपणे केला नाही असे वाटत नाहीच असे नाही; पण केला हे नाकारता येत नाही; पण मानवी मनातील मूलभूत प्रवृत्तींना आवाहन करून, त्यांच्यात परिवर्तन घडवून आणण्याचे साहित्यामधील सामर्थ्य अण्णा भाऊनी कलामूल्यापेक्षा अधिकचे मानले, अधिक श्रेष्ठ मानले; त्यामुळे अनुल्लेख होत राहिले पण सामान्य माणसाच्या जीवनाची बखर रंगत गेली, सजत राहिली. अण्णा भाऊ जनतेचे कलावंत बनले. अण्णा भाऊंचे कथा–

कादंबरी वाङ्मय म्हणजे जनतेची कला व 'जनतेचे वाङ्मय' यांच्या सुरेख संगमाचा अचूक पत्ता आहे.

त्यादृष्टीनेच अण्णा भाऊनी मानवी संस्कृतीचे वय कसे वाढेल याचा विचार केला आहे. तिची चांगली वाढ हा त्यांचा ध्यास आहे. आपल्या वृत्ती–प्रवृत्तीसंबंधी, आचारविचारासंबंधी, कथा–कादंबऱ्यासंबंधी मान्यवर समीक्षक न्यायनिर्णय काय करतील याची चिंता न बाळगता, कदर न करता, अण्णा भाऊनी हा ध्यास खच्चून पुढे रेटला आहे. सामान्य माणूस जगतो कसा ? खातो पितो काय ? झोपतो कुठे? कसा ? त्याच्या भावना काय आहेत ? कशा होतात त्या प्रकट ? हा सामान्य माणूस लढतो कसा ? पुनः पुन्हा ताकद गमावूनही ताकद वाढवतो कसा ? पिळवणूक, अत्याचार, गांजवणूक इत्यादींनी नाडला जात असूनही त्याच्या ठायी जिद्द, तडफ आणि ऐस येते कुठून ? एकूणच जगणे अशक्य असूनही ( म्हणजे इतरांना तसे वाटत असताना ) तो वागतो तरी कसा ? – अण्णा भाऊनी या 'श्रमिकांच्या जगाचे' कलावंतदृष्टीने रेखाटन केले आहे. शेवटी जनतेच्या जीवनाचा–राजकारणादी सगळ्या कारणांचा–आविष्कार कलेच्याद्वारा करायचा तो कलेच्या नियमांना धरून व्हायला हवा, हे निःसंशय उचित आहे. अण्णा भाऊनी ही 'उचितता' सांभाळली आहे. आविष्कृतीच्या क्षेत्रात कलावंत हा पूर्ण स्वतंत्र असल्याने त्याबाबतीतील नियम त्याचे त्यानेच बसवायचे असतात, प्रत्यक्ष लेखनाच्या द्वारे तोच साचा तयार करीत असतो. अण्णा भाऊनी नेमके हे केले आहे. अण्णा भाऊंची जीवनमूल्येच वेगळी असल्याने त्यांची वाङ्मयीन मूल्येही निराळी आहेत; त्यात कालसापेक्षतेचा भागही अंतर्भूत आहे. अण्णा भाऊंची ही वेगळी वाट कलामूल्ये थिटी बनवीत नाही की साहित्यिक गुणवत्ता कमी करीत नाही; तर एकूणच साहित्याच्या समृद्ध व्यक्तित्वात आपल्यापरीने थोडीफार–अगदी टिटवीच्या थेंबाने का होईना–भर टाकते. हे मान्य होणे न होणे, करणे न करणे ज्याचा त्याचा प्रश्न आहे. मात्र निष्कारण गोष्टींचे बागुलबुवे उभे करून शब्दांचे अर्थ दुबळे करणे इष्ट नाही, एवढे म्हणणे उचित आहे. ह्या बाबतीत, आपणा सर्वांची मने एकदा नीट पाखडून घ्यायला हवीत.

ह्या देशात मरण स्वस्त आहे, होत आहे; म्हणून अण्णा भाऊ अस्वस्थ राहिले, वाङ्मयाच्या कारखान्यातील धडाडता बॉयलर बनून, आपल्या लहानखुऱ्या, कुवतीनुसार त्यास भडाग्नी देत गेले. आम्ही कौतुक बाजूला राखून पाहत राहिलो. " आम्हाला सर्वात मोठे चार शाप आहेत. ते शाप घेऊन आमचा लेखक वा शाहीर पुढे येतो आणि त्या शापांच्याच ओझ्याखाली, जसे एखादे गाढव मरमर

काम करून ओझ्याखाली चिरडून मरावे तसा हकनाक मरतो. ते शाप म्हणजे दारिद्र्य, अज्ञान, जात आणि राजकारण."[२] अण्णा भाऊ या शापचक्रात उगवले, पोसले, वाढले, रोडावले, खचले आणि गेले. आणखीही जातील. भावनेने नव्हे कर्तव्यदृष्टीनेही नव्हे, तर न्याय्य म्हणून आम्ही या साऱ्याची किंमत चुकविणार की नाही, एवढाच प्रश्न आहे.

---

२. सुर्वे नारायण : शाहीर : 'सत्यकथा,' ऑगस्ट १९६९

पूर्वप्रसिद्धी

---

श्रीनामदेव दर्शन
नवभारत
लोकमित्र / वासंतिक अंक
समाज प्रबोधन पत्रिका
दैनिक 'पुढारी'

# पार्श्वभूमी

'प्रेरणा आणि निर्मिती' मध्ये
काही समीक्षालेखांचा
समावेश आहे.

गेल्या सात आठ वर्षात
लिहिलेल्या समीक्षालेखांपैकी
आठ लेख
इथे एकत्रित केले आहेत.

'फ. मुं. शिंदे :
परात्मताग्रस्त कंगालांच्या जाणीवांचा जुलूस'
हा नववा लेख होता.

त्यामुळे कुसुमाग्रज, सुर्वे, शिंदे
ही नामावळी सुसंगत व अर्थपूर्ण होते.

त्याचा समावेश होऊ शकलेला नाही.

निवडक असे या लेखांचे स्वरूप नाही.
काही मुळाबरहुकूम, काही पुनर्लेखित
असे त्यांचे रूप आहे.

काही समजून
आणि काही समजावून घेण्या–देण्यासाठी
ह्या टीकालेखांचा प्रपंच झाला.

त्यात अनाठायी आग्रह नाही.
मतभेदांचा आदर आहे.

मात्र
साहित्य, समाज आणि संदर्भ यांचा अनुबंध
सुटत नाही.
जीवनाची सक्ती साहित्याला टाळता येत नाही.

त्यामुळे वाङ्मयविषयक जाणीवेचें कलावादी भान
हेच साहित्याचे लक्षण
हा संवाद नाही.

असे कुणी कुणाच्या स्वातंत्र्याला
बाधा आणण्याचे कारण नाही; नसते.

साहाय्य अनेकांचे, आग्रह कित्येकांचा
त्या साऱ्यांचे
प्रस्थापित सरावाप्रमाणे
औपचारिक आभार मानीत नाही.

मी ऋण मानतो.
मानीत आलो आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय पुणे
२४६३
दा. क्र.
२१२१ ग्रंथ
शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0021211

एस्. एस्. भोसले

१६३८ / ६, 'ई', राजारामपुरी,
कोल्हापूर